

जबलपूर येथील म्यु. मराठी शाळेचा पन्नास वर्षांचा इतिहास

१९५३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. न ८२९

# आत्मचरित्र

RLFBK-0011606

लेखक
नी. धों. लिमये

जयश्री प्रकाशन — २

# आत्मचरित्र

जबलपूर येथील न्यु मराठी शाळेचा
पन्नास वर्षांचा इतिहास

RFLBK-0011606

— लेखक —

गुरुवर्य नीलकंठ धोंडदेव लिमये
नागपूर

मूल्य चार रुपये

– प्रकाशक –

श्री. वि. गंधे
एम्. ए., एल्. टी. सी., डी. पी. इ.
जयश्री प्रकाशन, धनतोली, नागपूर.

★

आवृत्ति पहिली
१२ जानेवारी १९५२

मुखपृष्ठ
पद्माकर सराफ, नागपूर.

★ ★ ★

या पुस्तकाचे भाषांतराचे, पुनर्मुद्रणाचे, उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क
**गुरुवर्य नीळकंठ धोंडदेव लिमये** धनतोली, नागपूर,
यांच्या स्वाधीन आहेत

★

– मुद्रक –

श्री. वि. गंधे
एम्. ए., एल्. टी. सी., डी. पी. इ.
प्रदीप मुद्रणालय, धनतोली, नागपूर

निःस्वार्थपणाने

शिक्षण देऊन

राष्ट्रपुरुष निर्माण करणाऱ्या

प्राथमिक

शिक्षकांस

# अनुक्रमणिका


प्रकाशकाचे दोन शब्द

लेखकाचें हृद्गत

प्रस्तावना १

## भाग १ ला-तासगांव व जमखंडी १८७६ ते १८८२

कुलवृत्तांत ५, प्रवासवृत्त ९; आजोळची थोडी हकीगत, आमची सोय लागते, गांवठी शाळा ११, घोडी, खुर्ची १२; आगठे धरणें, जुन्या गांवठी शाळेंतील व्यवस्था १३; थोडी पुढची हकीगत व घरचें प्राथमिक शिक्षण १४, आईचा मुलाच्या शोधविषयीं प्रयत्न १५, पुढचें शिक्षण, एक आश्चर्यकारक योगायोग १६, पूर्वीचा अभ्यास क्रम, परत मुलाचा शोध १७, पुन गांवठी शाळा व शिक्षणाची हेळसांड १८, जमखंडीची त्रोटक हकीगत १९, माझी मौंज २०; आमची संध्या २२; आजोळची हकीगत २३, माझें पुरुषसूक्ताचें शिक्षण २४, मामेभावाच्या अंगावर जळता दिवा २५, आईची पंढरपूरची वारी २६, अवचित टोळधाड २७; पुन तासगांवीं प्रयाण व कांहीं भुताटकीचे प्रसंग २८, प्राथमिक शिक्षण पुढें चालू, शिक्षण चालू असता मध्येंच उठलेलें एक खूळ (सोन्याचीं पाखरें) ३०, कांहीं कौटुंबिक हकीकत ३१, पुन. जमखंडीस प्रयाण व शिक्षणाची हेळसांड ३३, थोडी आजोळची हकीगत ३५; रामतीर्थावरील रमण्याचें वर्णन ३८, पुन. तासगांवीं आगमन आणि शिक्षण व चरितार्थासंबंधीं थोडा उहापोह ३९; आनंदाची बातमी ४३, दादांचें लग्न ४५; दिनकर भटजींचें तासगांवीं येणें व सांसारिक थोडी मधली हकीकत व राघोपंताचा व माझा थोडा ऋणानुबंध ४६; दिनकर भटजींचें लग्न ४९, नवस फेडण्यास कोंकणातील प्रवास ५०; एक दु खकारक प्रसंग, कांहीं किरकोळ सांसारिक गोष्टी ५१, चालत्या गाड्याला खीळ पडली ५२, एक भुताटकीचा प्रकार ५४, ब्राम्हणांची गरिबी व त्याकरिता सोसावे लागणारे

कष्ट व पूर्वीच्या रमण्याचा एक प्रसंग ५६; आणखी एक दु:खकारक प्रसग, इंग्रजी शिक्षणास सुरवात ५७, त्यावेळची दिनचर्या ५८, परान्नाचा एक प्रसंग ६०; एक हात चलाखीचा खेळ व त्यामुळें घडलेली अद्दल ६२; मिरजेस झालेली जेवणाची सोय ६३, कोल्हापुरांतील एक रमण्याचा प्रसंग, प्रवासांतील एक हास्यकारक प्रसग ६४; एक जबर दुखणें ६५; पुनश्च हरि ॐ ६८, मध्यें घडलेला एक प्रेमळ पाहुणचार ६९, शाळेंतील कांहीं किरकोळ गोष्टी ७१, दादाचें दुसरें लग्न ७४, दादांचा रेल्वेंत प्रवेश, माझी कपाळ दुखी व अभ्यासास खो व पुढील कथानकास अनुसरून घडलेल्या किरकोळ गोष्टी ७५.

## भाग २ रा–जबलपूर १८९३ ते १९३३

मीं घर सोडलें ८१, जबलपूर शहराचें थोडेसें वर्णन ८६, कांहीं तुलनात्मक विवेचन–घडलेल्या गोष्टीं ८७, मराठी शाळेच्या स्थापनेची पूर्व तयारी ८९; मराठी शाळेचा पाया ९३; शाळा रजिस्टर होण्याचा विलक्षण योगायोग ९५; शाळा रजिष्टर झाली ९७, शाळेच्या कमेटीची कायमची व्यवस्था १००, शाळेची जागा १०२, सेक्रेटरी साहेबांचा व माझा खटका १०३; शाळेचे सेक्रेटरी बदलले तरी ससेमिरा मागे राहिलाच १०६, माझी दिनचर्या, माझें लग्न १०९; मी निराळें बिऱ्हाड केलें, नवीन फायदेशीर गोष्ट १११, एक उत्साही सेक्रेटरी शाळेला मिळाले, शाळेचें वार्षिक परीक्षेचें घटनात्मक विवेचन ११२, शाळेची जागा बदलली व एक नवीन उपक्रम ११६, माझें ट्रेनिंग, प्लेगचें सकट ११७, मी पुन्हा घर बदललें व शाळेसंबंधीं थोडी विस्तृत हकीकत १२०, एक कायमचे शिक्षक शाळेला लाभले १२२; शाळेचे दत्तविधान १२३, सर्कल इन्स्पेक्टर शार्प साहेब शाळेंत येऊं पहातात १२५; शाळेंतील शिक्षकांचीं कामें कशीं असत १२९; थोडी सांसारिक हकीकत व घडलेले गमतीचे प्रसंग १३२; आर्य बालसभा व आमचें गांवांतील वजन, १३६; १९०६ सालांतील प्लेग १३७, माझा नवीन धंदा (व्यापार) १३८; आमचे पहिले सुपरवाईझर १३९, जन्मभूमीचें दर्शन व थोडा प्रवास, औट घटकेचा आनंद १४०; संस्थेचा बोलबाला १४४, राज्या रोहण समारंभ १४६,

चि गोविंदाचा जन्म १४७, कठीण प्रसंग–शाळेच्या इमारतीला आग लागते १४८; डे. इ. साहेब नवीन येतात, शाळेचे बक्षीस समारंभ शाळेच्या प्रगतीस कसे कारण होतात याची त्रोटक हकीगत १४९, कमिशनर शाळा पाहण्यास येतात १५४, शाळेचें पुन दत्तविधान १५५, नवीन कारभार सुरू झाला १५६, स्कालर शिप परीक्षा सुरु होते व मुलींकरितां म्हणून शिक्षकांना काहीं रकम स्वतंत्र रीतीनें मिळूं लागली १५८, कौटुंबिक हकीकत १५९; कु यमूचें लग्न व तिचे संबंधीं थोडा वृत्तांत १६०, काहीं सहायक धंदे बंद केले १६२, मागे बंद पडलेलें चिटणीस पुराण पुढें चालू १६३, मनोहरपंत सेक्रेटरी होतात, एक विलक्षण योगायोग १६४, लेले सेक्रेटरी होतात १६६, स्कालर-शिप प्रकरण पुढें चालू १६७ शिकवण्यावर एका गृहस्थाचा कटाक्ष व माझें त्याला उत्तर १६८, माझें शिकवणी पुराण १६९, मध्यें ओढवलेला एक दु खकारक प्रसंग १७३, १९१६ तील प्लेगचे वर्णन १७४, थोडी सांसारिक हकीगत कु गगूचे लग्न १७८, चि गोविंदाची मौंज १८०, चि. काशीनाथाचा जन्म व त्याचा पुनर्जन्म आणि काकाची आम्हाला अपूर्व देणगी १८०; पगारात एकदम वाढ व श्री फत्तेचद डे. साहेब येतात आणि पगारांत पुन वाढ करतात १८२, एक नवीन शिक्षक येऊन शाळेस मिळतात १८३, आमच्या शाळेचे एक विद्यार्थी सदाशिवराव परांजपे हे आमचे शाळेस येऊन मिळतात व त्यांचा लौकिक १८४, आणखी एक शिक्षक शाळेचे विद्यार्थी असून आज शिक्षक म्हणून आमच्या शाळेला लाभले १८५, शाळेचें स्थिरत्व व त्या करिता मी केलेले प्रयत्न १८६, चि गोविंदाचें शिक्षण १८८; चि गोविंदाचें लग्न १९२, कु कुशीचें लग्न १९३, चि. काशिनाथाचें शिक्षण १९४, चि रामकृष्णाचा जन्म व काशीनाथाच्या मुंजीची हकीकत. चि कु मनीचें लग्न १९६; माझी पगार वाढ, शाळेतील देशी खेळांचे सामने १९८, आमचे शेवटचे अपत्य, चि रामकृष्ण १९९, एका शाळेच्या दोन शाळा होतात २००; शाळेचे बक्षीस समारंभ २०१, मी सेवानिवृत्त झालों २०३, मानपत्र २०४

95002
2/10/53

# अनुक्रमणिका

## भाग ३ रा-प्रयाग १९३३ ते १९४१

प्रयागास प्रयाण २०९, प्रयाग येथील महाराष्ट्र बालशाळेचा चार्ज घेतला २१०, शाळेंतील कार्यक्रम २११ जबलपूर येथें थैली अर्पण व फोटोचा अनावरण समारंभ, तैल चित्र अनावरण व थैली समर्पण २१३; सेक्रेटरी रा सदाशिवराव परांजपे यांचें भाषण, माझा व कुटुंबाचा स्वभाव २१४, श्रीमंत छत्रपती करवीर सरकार यांचे अस्थीस पुष्पांजली २१८.

## भाग ४ था-नागपूर १९४१-४४

समारोप २२१, माझें भाषण २२३ उपसंहार २२७, मला अर्पण केलेली पुष्पांजली २३२, अभिप्राय २३५

# प्रकाशकाचे दोन शब्द

" जयश्री प्रकाशना " तर्फे ' हुतुतू " हें पहिले पुस्तक प्रसिद्ध होऊन आज जवळ जवळ चार वर्षे झाली आहेत. त्यावेळीं कागदावर निर्बंध असल्यामुळें मी स्वत: कागदासाठी परवाना मिळवून योगायोगाने प्रकाशक बनलों होतों. पण आज मी या प्रकाशनाच्या नवीनच क्षेत्रांत पदार्पण करण्याचें धाडस करीत आहेत. जनतेने योग्य सहाय्य केल्यास यांत मी खात्रीने यशस्वी होईन.

एका प्राथमिक शिक्षकाचें 'आत्मचरित्र' प्रसिद्ध करीत असताना माझ्या मनात असंख्य भावना उचंबळून येतात. प्राथमिक शिक्षकाच्या आयुष्यांतहि कांही विशेष लिहिण्यासारखें असतें हे, हे पुस्तक वाचल्यानंतर समजून येण्यासारखें आहे. गुरुवर्य नी. धों. लिमये यांनी जबलपूर सारख्या ठिकाणीं मराठी भाषेचा दीप तेवत ठेवला या बद्दल खरोखरीच ते अभिनंदनास पात्र आहेत. त्यांच्या या ' आत्मचरित्रा ' पासून पुष्कळच गोष्टी नवीन पीढीला शिकण्यासारख्या आहेत.

मराठीचे सहृदय वाचक या ग्रंथाचें सहर्ष स्वागत करतील अशी माझी अपेक्षा आहे

धनतोली, नागपूर.
१३ जानेवारी १९५२

श्री. वि गंधे

# लेखकाचें हृद्गत

व्यक्तीच्या आयुष्यात आत्मचरित्र लिहिण्याचा योग येणें ही खरोखरीच एक भाग्याची गोष्ट आहे असें मी समजतों राजकीय पुढारी, समाज सेवक, थोर साहित्यिक इत्यादि अनेक व्यक्तींनीं आत्मचरित्रें लिहून आपलें जीवन चिर-स्मरणीय करून ठेवलें आहे. पण एका प्राथमिक शाळेतील शिक्षकानें लिहिलेलें हें पहिलेंच 'आत्मचरित्र' असावें असें मला वाटतें

माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यात मला जें जें लिहिण्यासारखें वाटलें तें तें मी साध्या आणि सरळ भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे हें लिहून काढण्यांत लोकाना कांही विशेश सांगितलें आहे असें नसुन मी स्वत चीं हौस मात्र भागवून घेतली आहे स्वतःच्या मनाच्या समाधानाशिवाय यात दुसरें कांहींहि नाही

हें आत्मचरित्र लिहीत असतांना मला अनेक साहित्यिकांनीं अमोल मार्गदर्शन केलें आहे मी लेखक नाहीं मुंबईचे प्रथितयश साहित्यिक श्री श्री रा टिकेकर यांनी अत्यंत आपुलकीने आणि कळकळीने आत्मचरित्र लिहिण्याबद्दल सूचना केल्या त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे तसेंच आत्मचरित्र लिहून झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण वाचून योग्य मार्गदर्शन केलें आहे. प्रा ना के बेहेरे, श्री. पेंडसे, श्री हर्डीकर, श्री. डोंकस, श्री ठोमर इत्यादिंनीं हस्तलिखित वाचून आपले निर्भिड अभिप्राय दिले याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

प्रस्तुत ग्रंथ सचित्र करण्याचा प्रयत्न केला आहे. जबलपूर येथील श्री दत्त भजन मंडळाचे कार्यवाह श्री स. ल परांजपे यांनी जबलपूर येथील थोर महाराष्ट्रीय व्यक्तींचे ब्लाक्स देऊन त्यांचा उपयोग करण्याची परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. या ब्लॉक्समुळें ग्रंथाला खरोखरीच शोभा आली आहे.

ग्रंथ प्रकाशनास किती तरी मंडळींचा उपयोग झाला आहे. त्या सर्वां-चाच नामनिर्देश करणें शक्य नाहीं प्रदीप मुद्रणालयाचे मालक

प्रा श्री वि. गंधे यांनी प्रेमळपणाने हें काम अंगावर घेऊन अत्यंत आपुलकीनें तें पूर्ण केलें व पुस्तक प्रकाशनाचीहि जबाबदारी घेतली याबद्दल त्यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतों पुस्तकाची छपाई सुबक झाली असल्यामुळें पुस्तकाच्या सौंदर्यांत भरच पडली आहे.

मध्यतरीं कागदामुळें पुस्तकाचें काम स्थगित झालें होतें. बाजारात कागदच मिळत नव्हता चि बाबूनें खटपट करून कागद पाठवून दिला तिघांही मुलांनीं परिश्रम करून व वाटेल ती मदत करून हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला पाहण्याचा सुयोग आणून दिला याबद्दल या मुलांचे किती आभार मानावे हेच मला कळत नाहीं

शेवटीं ज्या दयाघन प्रभूनें माझे सर्व सकल्प सिद्धीस नेले त्याच्या चरणीं प्रेम जडो असें मागणें मागून हे दोन शब्द संपवितों

धनतोली, नागपूर
१२ जानेवारी १९५२

नी. धों लिमये

# जबलपुरांतील मराठीचा नंदादीप

— लेखक —



गुरुवर्य नी. धों. लिमये

जन्म २१ एप्रिल १८७६

‘आत्मचरित्रा’चे लेखक व त्यांच्या पत्नी



गुरुवर्य नी. धों. लिमये व सौ. रमाबाई लिमये

# प्रस्तावना

गुरुवर्य नीळकंठराव लिमये यांनीं आपल्या प्रस्तुत आत्मचरित्रास प्रस्तावनेदाखल चार शब्द जोडण्यास सांगितलें, ही त्यांची अनुज्ञा म्हणजे मी गुरुप्रसादच मानतों. वास्तविक त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा असून त्यात अनेक तोलदार अधिकारी लोकांचा व समृद्ध नि विद्वान् कीर्तिवंतांचा समावेश होतो. असें असतां त्यांनीं या कामीं माझी निवड कां करावी हें समजत नाहीं. ते कांहीं का असेना, हा त्यांचा मजवर विशेष लोभच आहे असें मानून कोणत्याहि तन्हेचा अधिकार नसतां त्यांच्या आज्ञेचें यथाशक्ति पालन करण्याचा प्रयत्न करितों

कुणीसें म्हटलें आहे कीं, प्रत्येक व्यक्तीस एकतरी उत्कृष्ट ग्रंथ लिहितां येईल आणि तो म्हणजे त्याचें स्वतःचें आत्मवृत्त ! पण आत्मचरित्र लेखन म्हणजे तारेवरची कसरतच होय मनुष्यास ' स्व ' हा अत्यंत प्रिय असल्यामुळें आत्मचरित्रकाराकडून स्वतःविषयीं आत्मस्तुतिपर असे कांहीं उणे पुरे शब्द लिहिले गेल्यास, त्याच्यावर लागलीच आत्मश्लाघेचा आरोप यावयाचा ! त्याच्याकडून झालेल्या कार्यासंबंधींचें वर्णन त्यानें थोडें अधिक जिव्हाळ्यानें केलें तरी सामान्य वाचक हा आपल्या कर्तृत्वाचा अवास्तव डांगोरा पिटतो आहे, असा त्यावर ठपका यावयाचा बरें या महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख न केल्यास, आत्मचरित्र तरि लिहावयाचें कशाला ? आत्मचरित्रात स्वतःच्या दोषांचें व झालेल्या चुकांचें दिग्दर्शन केलें, तरी तिकडूनही "हें पहा यांचें कर्तृत्व व चरित्र" असे उद्गार वाचकाच्या मुखांतून निघावयाचेच. बरें ज्यांनीं ज्यांनीं अन्यायानें व दुष्ट बुद्धीनें आत्मचरित्रकारांचा कर्तव्यपथ अडचणीचा करून ठेविला त्याचा उल्लेख जर त्यानें थोडा कमी अधिक प्रमाणात केला, तर तिकडूनही "हे त्यांचें वैर करतात बरें का" असा अभिप्राय ठरलेलाच !

इतकें हें कठीण कार्य गुरुवर्य लिमये यांनीं मोठ्या सहजतेनें यशस्वी करून दाखविले, असें म्हणावयास हरकत नाहीं त्यांच्या ठिकाणीं असलेलें सौजन्य आणि अंतःकरणाचा चांगूलपणा ह्या दोन विशेषांमुळेंच त्यांच्या ह्या

आत्मचरित्राकडे दोषैक दृष्टीनें पाहणारानाही त्याच्यावर भलभलते आरोप करता येणार नाहीत. जे जे आपणास ठावे । ते ते हळूं हळूं शिकवावें । शाहणे करुन सोडावे । सकळ जन ॥ ही समर्थोक्ति त्यांनी आपल्या आयुष्यात अक्षरशः कृतींत उतरविली. प्रतिकूल परिस्थितीमुळें त्याना उच्च शिक्षणाचा लाभ होऊं शकला नसतांहि त्यांनीं प्राथमिक शिक्षणाचेच कार्य अव्याहत ५० वर्षें चालविलें. एका अवगणलेल्या क्षेत्रात अत्यन्त नम्र भूमिका घेऊन एकनिष्ठेनें अखंड अर्धशतक पर्यंत कार्य करीत राहणें, हा कर्मयोग कांही लहान सहान नाहीं. सुदैवानें त्यांना बृहन्महाराष्ट्रांत आपले कार्यक्षेत्र सांपडलें, त्यामुळें तर त्यांनीं मराठी भाषेची ध्वजा नर्मदेपार फडकाविली. जबलपूरची प्राथमिक मराठी शाळा हें त्यांचें चिरंतन टिकणारें जागतें स्मारकच होय. एका मराठी शाळेचा मास्तरही जनतेच्या अंतःकरणात अत्यंत आदराचें स्थान मिळवू शकतो हे त्यांच्या जीवन चरित्रावरुन त्यांनी सिद्ध करुन दाखविलें. प्राथमिक शाळेच्या शिक्षकाचा दर्जा त्यांनी आपल्या आदर्श कामगिरीनें इतका वाढविला कीं आज जबलपूरच्या जनतेच्या अंतःकरणांत त्यांनीं ऋषितुल्य स्थान प्राप्त करुन घेतले आहे.

या आत्मचरित्रांतील अनेक प्रसंग कादंबरीतील कल्पित प्रसंगाप्रमाणेच आकर्षक वाटतील. पन्नास वर्षांपूर्वींच्या समाजातील अनेक रीतिभातींचे ज्ञान होईल आणि विशेषतः सार्वजनिक कार्यकर्त्यास केवढा स्वार्थत्याग करावा लागतो व त्याच्या मार्गांत किती तऱ्हेतऱ्हेच्या अडचणी येऊन कर्तृत्व व दैवयोग असल्यास तो त्यातून कसा निभावतो यांचा उत्कृष्ट बोध होईल. आणि हे सर्व आत्मचरित्र लेखन करतांना त्यांनीं कुणाच्याही विरुद्ध द्वेषबुद्धीनें एकही शब्द लिहिला नाहीं, हें पाहिलें म्हणजे हा ग्रंथ आदरणीय झाला आहे असेंच कोणीही म्हणेल.

तेव्हा असा हा उदात्त ग्रंथ जनतेस सादर करतांना गुरुवर्यांच्या प्रस्तुत शिष्याला का बरें आनंद होणार नाहीं ?

तारीख
१९-१२-१९४३

यादव मुकुंद पाठक

# भाग १ ला

तासगाव व जमखंडी

सन १८७६ ते १८९२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# कुलवृत्तांत

आम्हीं राहणारे कल्याचे. हा गांव रत्नागिरीजवळ असून फार पूर्वी बराच प्रसिद्ध असा होता तेथून आमचे पूर्वज राजापूर तालुक्यांत आडिवरे मुक्कामीं येऊन वस्ती करुन राहिले. आमची वस्ती वरील गावीं सुमारें सातशें आठशें वर्षांपासून आहे असा दाखला मिळतो

आमचें घराणें भिक्षुकीचें, वेदाध्ययन करावें आणि करवावें, यजमान कृत्यें संपादावीं, तीं राखावीं, संसार चालवावा, सुखानें कालक्रमणा करावी आणि आनंदांत दिवस घालवावे, अशा नऱ्हेचा त्या वेळीं आमच्या घराण्याचा दंडक होता

अशा स्थितींत आमच्या पणजोबांच्या मनांत आलें कीं, देशावर जाऊन आपला कांहीं भाग्योदय झाल्यास पहावा तो काळच असा होता कीं, धनाचा अभाव असला तरी अन्नपाण्याची विपुलता असल्यामुळें मनुष्यांना घराबाहेर पडण्याची इच्छाच होत नसे कदाचित् असें कोणाच्या मनात आलेंच तर वडील मंडळी मोडता घालीत व विशेषच हट्ट धरला तर त्यांच्या मनाला वाईट वाटून ते दुःखी होत

असाच प्रकार त्यावेळीं आमच्या येथें घडला असें आमच्या चुलत आजी आम्हांस सांगत हो नाहीं करतां करता आमचे पणजोबा बाळंभट व त्यांचे एक लहान भाऊ असे दोघे पुण्यास आले. तेथें लहान भावाची श्रीमंत पेशव्याकडे सोय लागल्यावर अचानक पणजोबांची व श्रीमंत परशुराम भाऊ पटवर्धनांची गांठ पडून त्यांनीं आग्रह केल्यामुळें पणजोबा तासगांवीं आले

श्रीमंत भाऊसाहेबांच्या कृपेनें एक मोठें घर व दहा बिघे जमीन त्यांना प्राप्त झाली. त्यावेळची अशी एक आख्यायिका आहे कीं, "भाऊसाहेब म्हणाले, महाराज मी आपणांस इतके हे स्वखुशीनें देतों, ह्या पेक्षां जास्तीची इच्छा असल्यास आणखी कांहीं मागावें तेव्हां बाळंभट म्हणाले, आपण दिले इतकें आम्हां दोन मनुष्यास पुरे आणखीची इच्छा नाहीं आपण

जे स्वसंतोषानें दिलें त्यांतच आम्हांस समाधान आहे " सांगावयाचा हेतु इतकाच कीं, त्यावेळीं असा संतोषवृत्तीचे लोक होते व बरकतही पण तशीच होती कोणाला कांहीं कमी पडत नसे. आतां पहावें तर ज्याचें त्यालाच पुरत नाहीं, गरजा फार वाढल्या त्यावेळीं एक मिळविता व दहा खाणारे असत आतां त्या दहानीं मिळविलें तरी पुन्हां हाकाहाक बनलेलीच.

आतां पणजोबाच्या कुटुंबांत संततीची भर पडत चालली त्यांना चार मुलगे झाले त्यांत आमच्या आजोबांचा नंबर दुसरा लागतो आजोबांना एक मुलगा व तीन मुली झाल्या तीन मुलींवर एक मुलगा झाल्यामुळें त्यांनीं मुलाचें नाव धोंडु असें ठेविलें. हेच माझे वडील.

वर सांगितलेंच आहे कीं, आमच्या चुलत पणजोबांना श्रीमंत पेशव्याकडे आश्रय मिळाला पर्वतीवर देवदेवेश्वराची पूजा करावी व रोज अभिषेक करावा हें काम त्यांना मिळालें. तन्निमित्त रोज रुपया दक्षिणा व जेवण मिळत असे. सदर पूजा आज तागायत आमच्या घराण्याकडेच वंशपरंपरा चालू आहे

माझे वडील हे आजोबांचे एकुलते एकच चिरंजीव असल्यामुळें लहानपणीं त्यांचे बरेच लाड पुरविले गेले. विद्याभ्यास बेताचाच झाला साधारण खाऊन पिऊन सुखी कुटुंब असल्यामुळें वडिलांचें लग्न फार लवकर झालें. इतक्यात दैवयोग असा कीं, आजोबा व आजींचें देहावसान झालें व सर्व संसाराचा भार माझ्या वडिलांवरच पडला.

वडिलांचा स्वभाव मनमिळाऊ व आर्जवी असल्यामुळें त्यांनीं लवकरच यजमानाचीं मन प्रसन्न करुन घेतलीं व आपल्या सहचरीच्या साह्यानें संसारशकट हाकण्यास सुरुवात केली. आईचा स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळें त्या दांपत्यांत कधीं खटके उडाले नाहींत व बोलाचालीचा प्रसंगही पण प्राप्त झाला नाहीं.

आजोबांचे हयातींत पुष्कळ वर्षे सर्व कुटुंब एकत्रच राहत होतें व ते दिवस मोठ्या सुखासमाधानांत गेले. नंतर परस्परांत जगरहाटीप्रमाणें तंटे बखेडे सुरु झाले, त्याचें पर्यवसान विभक्त होण्यांत होऊन मिळालेल्या

घराच्या वाटण्या झाल्या, व सर्व भाऊ विभक्त होऊन त्यांनी आपला निर-निराळा संसार थाटला आमच्या आजोबांना वर सांगितल्याप्रमाणें एकच मुलगा व तीन मुली होत्या तिन्हीं मुलींचीं लग्नें लहानपणींच झाली, व त्या आपापल्या घरीं सुखासमाधानानें नांदूं लागल्या त्या तिघींचे गावांतच सासर असल्यामुळें त्या येऊन जाऊन असत. घरांत एकटा एकुलता एक मुलगा, वास्तविकच त्याचे लाड करण्यांत येत. आजोबाचा स्वभाव मनमिळाऊ असू त्यामुळे त्यांनीं चार यजमान-कृत्यें संपादन केलीं व त्यावर आजोबाचा संसार मोठ्या आनंदांत झाला त्यांनीं त्याच्या वाट्यास आलेल्या जागेंत एक नवीन घर बांधलें तें अद्याप चांगल्या स्थितींत आहे आजोबांनीं मुलाची मुंज लवकरच केली मुलगा एकुलता एक व घरची स्थिति त्यावेळच्या मानानें बरी व शिक्षणही त्यावेळच्या सांप्रदायाप्रमाणें सर्व आन्हिक पार पडलेलें म्हणून मुलीही भराभर सांगून येऊं लागल्या त्यात सुस्वरूप व धडधाकट अशी एक मुलगी पसंत करून मुलाचे लग्नकार्य उरकलें गेले परंतु दैवयोग असा कीं, लवकरच ह्या नवीन दांपत्याला मातृपितृ विहीन होऊन आईबापांच्या कृपाछत्राला अंतरावें लागलें तीन बहीणी व इतर चुलत परिवार मोठा असल्यामुळें वडिलांना एकलकोंडेपणाचा भास कधींच झाला नाहीं. माझ्या वडिलांनीं आजोबांच्या धर्तीवरच भिक्षुकी सुरू केली, व आपला जम लवकरच बसविला. वडिलाच्या मनमिळाऊ स्वभावामुळें लोकांनाही ते लवकरच आवडू लागले व ज्याच्या त्याच्या मुखीं थोंडभटजींचें नांव निघूं लागले. तरी भिक्षुकींत मिळकत ती अशी किती होणार? अल्पवयातच म्हणजे १५।१६ वे वर्षीच माझ्या मातोश्रींना अपत्य सुखाला लाभ झाला. त्याचे नांव रामचंद्र ठेविले पुढें लागलींच दोन अडीच वर्षांच्या अंतरानें आणखी दोन मुलगे व एक मुलगी अशा चार अपत्याचा जन्म होऊन शेवटीं माझा जन्म झाला वडील बंधूत व माझ्यात सुमारें १६ वर्षांचें अंतर होतें लहानपणीं वडील व मातोश्री यांची प्रकृति अत्यंत निकोप व सुदृढ होती पण पुढें पुढें संसारांत फार कष्ट करावे लागल्यामुळें त्याचें शरीर थकत चाललें. ह्याच संधीस नातलगाच्या आग्रहास्तव एका मुलाचें वडिलांना दत्तविधान करावे लागलें मुलगाही पण दत्तक जाण्यास तयार नव्हता, व वडील बंधूही ह्या गोष्टीस प्रतिकूल होते "तुम्ही लक्ष्मणाला दत्तक देऊं नका, आम्ही दोघे कष्ट करून विद्याभ्यास करू

व आपलें पांग फेडूं " असेंही वडील बंधूंनीं वडिलांना सांगितलें, परंतु ह्या गोष्टीचा वडीलांचे मनावर कांहींच परिणाम न होतां दत्तविधान उरकलें गेलें वडील बंधूच्या मनाप्रमाणें न घडल्यामुळें त्यांना वाईट वाटून ते कोणताही विचार न करता एकाएकी घरातून निघून गेले पुष्कळ ठिकाणीं शोध केला पण तपास लागला नाही. ह्या प्रमाणें दोन मुलांचा निकाल लागला. राहतां राहिलों आम्हीं दोघे भाऊ व एक बहीण बहीणीचें नाव बाळूताई व भावाचें नांव दिनकर बाळूताईचें लग्न ह्याच सुमारास झालें आम्हीं दोघे भाऊ लहानच, पण त्यांतही माझ्यावर वडीलाचें अतिशय प्रेम असें. चोवीस तासांत ते मला कधींच विसबले नाहीत. वडील बंधूच्या नाहींसे होण्याचा त्यांच्या मनावर व शरीरावर बराच परिणाम होऊन त्यांनीं जे अंथरूण धरलें त्यांतून ते कांहीं उठले नाहींत अशा रीतीनें वडिलांचा एकाएकीं अंत झाल्यामुळें मातोश्रीवर तो एक मोठा दुःखाचा डोंगरच कोसळला

दु खांत सुख एवढेंच होतें कीं आईच्या माहेरची स्थिति त्यातल्या त्यात बरी होती आईचे वडील व मातोश्री म्हणजे आमचे आजोळ, जमखंडीस असे. तेथें आजोबाना श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धनाचा आश्रय होता. रामतीर्थावरील सर्व हव्यकव्याचा अधिकार आजोबाकडेच असे कोणालाही वर्णी देणें, अनुष्ठान सांगणें, नवरात्रासंबधीं सर्व धार्मिक विधी पार पाडणें वगैरे सर्व अधिकार त्यांचेकडे असल्यामुळें काशीरामेश्वरापासून ब्राह्मण येत आजोबाकडे मोठमोठ्या विद्वान ब्राह्मणाचीही वर्दळ फार असे, व त्या घरीं महिना दोन महिने त्याचा मुक्काम पडे आजोबाकडे वेदशाळाही होती त्या रुपानें कांहीं विद्यार्थी बारा महिने वेदपठणास राहात आजोबाना फक्त एकच मुलगा व एक मुलगी अशीं दोनच अपत्यें होतीं. तेच आमचे मामा. मामांचें लग्न होऊन त्यांना मुलेंबाळें झालीं होतीं ते श्रीमंताकडील सर्व धार्मिक विधीबाबत कामकाज पाहात त्यांचे एक जवळचे नातलग कै. अण्णा जोशी म्हणून असत ते आंधळे होते. त्यांचें कुटुंब तरुणपणांतच निवर्तले त्यांना मुलबाळ कांहीं नसल्यामुळें त्यानीं मामाचा वडील मुलगा काशीनाथ ह्याला दत्तक घेतलें होतें. त्या मुलाकरितां म्हणून आमचे मामा व मामी अण्णाकडेच राहू लागले. तेथूनच ते आपलीं सर्व कामें उरकत आईचे वडील व मातोश्री दुसऱ्या घरात राहात

५६२७

# शाळेचे पहिले हितचिंतक



कै. गंगाधर चिंतामण मडपे उर्फ गुरुसाहेब

कै.

मनोहरपंत गोळवलकर

प्राथमिक शाळा-समितीचे
उत्साही चिटणीस





प्रा. गं. गो. कानेटकर

शालेय समितीचे

सभासद

९५००२ २३।७०।५२.३

आईच्या आईचे म्हणजे आजीबाईचे डोळे अधू होते. डोळ्यांनीं दिसत नसे तेव्हां त्यांना कोणातरी मनुष्याची जरूरच होती. घरची स्थिति चांगली असल्यामुळें मुलीला पोसणें त्यांना कांहीं कठीण नव्हतें अशा स्थितींत आमच्यावर ओढवलेल्या प्रसंगाची त्यांना बातमी लागताच त्यांच्याकडून आईला जमखंडीस येण्याबद्दल आग्रहाचीं पत्रें येऊ लागलीं आता आईला विचार पडला कीं, कसें करावें ? जमलेला संसार मोडून जावें तर बरेंच नुकसान होणार न जातां येथें राहून कोणाच्या जीवावर दिवस काढायचे ? मुलें लहान काय करावें ? म्हणून आमचे जे मुख्य आश्रयदाते श्री हणमतराव जोग त्यांचा विचार तिनें घेतला वरील गृहस्थांचा आमचे वडिलांवर फार लोभ असे ते वेळोवेळीं लागेल तें सहाय्य आमच्या वडिलांस करीत वडिलांनींही त्यांचे पडेल तें काम करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं हाच घरोबा त्यांच्या मागें दोन्ही घराण्यात अद्याप चालला आहे माझा एक पुतण्या विनायक सध्या त्यांच्याकडे कारकुनीचें काम करितो. असा घरोबा मानणारे लोक फार थोडे आढळतात श्री हणमतराव मामा साहेब जोग यांनीं आईला सांगितलें कीं, तुम्हीं काळजी करूं नका, आम्हीं जिवत आहोत तो पर्यंत तुम्हाला अंतर देणार नाहीं म्हणून सांगण्यास मोठा अभिमान वाटतो कीं, त्यांच्या हयातीत तर त्यांनीं आपले वचन खरें केलेंच, पण आजही त्यांचीं मुलें, नातु वगैरे सुद्धां आमचा परामर्श घेत आहेत असो इकडे आजीबाईची फार निकड सुरू झाल्यामुळें आमचें जमखंडीस जाण्याचें पक्कें ठरलें.

येथे लहानशी हकीकत सांगून टाकतो आमच्या एक चुलत आजी नेहमीं वाती करण्यास आमच्या घरींच बसत त्याचें निजणें वगैरे आमचें घरींच असे कारण आतां आमचें घर रिकामेंच होते ह्या आजीबाईनीं ५-५० लक्ष वाती करून कित्येक जणांना पुरवल्या आहेत त्या वेळीं त्याचे वय सुमारें ८५ वर्षांच्या वर असावें

## प्रवासवृत्त

निघण्याचें पक्कें ठरल्यानंतर सामानाची आवरा आवर सुरू झाली. आतां परत येणें कधीं होते आणि काय ? म्हणून सर्व सामानाची योग्य ती व्यवस्था

करून जी कांहीं रोकड होती ती बरोबर घेतली व भांडीकुंडी यजमानाकडे ठेवून, नातलगांचे स्वाधीन घर करून निघण्याचा निश्चय केला आणि गाडी ठरविली मुलें लहान, बायको माणूस, कधीं प्रवास केलेला नाहीं बरोबर कोणी सोबत असावी म्हणून आईचे एक जवळचे नातलग चुलत मामा असत त्यांना बरोबर घेतलें व प्रवास सुरु झाला. त्यावेळेचा प्रवास जरा कष्टाचा असे रेल्वे नव्हती, बैलगाडीच्या सडकाही साधारणच होत्या म्हणून दिवसाच जितका प्रवास होईल तितका बैलगाडीनें करावयाचा. त्यावेळीं तासगांवाहून जमखंडीस जाण्यास सुमारें तीन दिवस लागत निघालों त्याच दिवशीं सायंकाळीं मिरजेस येऊन पोहोचलों व तेथें धर्मशाळेंत मुकाम केला आणखीही बरेच उतारू सायंकाळच्या मुक्कामास तेथे उतरले होते. आम्हींही आपली पथारी पसरून खाण्यापिण्याच्या उद्योगास लागलों परंतु दैवयोग असा कीं, त्या ठिकाणीं एक अघटित घटना घडून आली आम्हीं सोबत म्हणून ज्यांना बरोबर घेतले होते, त्यांच्या जवळ आईनें विश्वासू म्हणून ऐवज स्वाधीन केला होता तो त्यानी आपल्या कमरेसच बांधला होता त्याची बुद्धि फिरली मी एका मित्राकडे गांवांत थोडें काम आहे तें करून लवकरच परत येतों असें सांगून सर्व ऐवज घेऊन ते जे गेले ते गेलेच ! त्यांनीं पुन्हा दर्शन दिलें नाहीं

अशा तऱ्हेनें आम्हीं सर्वस्वी नागविलो गेल्यामुळें आई मोठ्या काळजींत पडली पुष्कळ शोध केला गाडीवानानेंही आम्हांस बरेच सहाय्य केलें. परंतु त्याचा शोध लागला नाहीं शोध तरी कोठें करावयाचा ' त्यांना कोणी बायको ना पोर आणि घर ना दार ! एकटे फटिंग होते

अर्ध्या वाटेंत असा प्रसंग आल्यावर मनुष्य सहाजिकच गोंधळणार ' तशांत ती बायको माणूस आम्हीं मुले लहान मोठ्या भावास कांहीं थोडें तरी समजत होतें मी अगदींच लहान होतों आई कां रडते हें मला कांहींच कळेना गाडीवानानें व आणखी वाटसरू लोकांनीं कांहीं समजुतीच्या गोष्टी सांगून तिची समजूत केली त्यांत वाटसरूच्या बायका मंडळींनींही बराच धीर दिला. व कसें बसें तें दुःख विसरून आम्हीं पुढें जाण्यास निघालों दुसरा मुक्काम अथणीस व तिसरें दिवशी कृष्णा उतरून सुखरूप जमखंडीस जाऊन पोहोंचलो मग वाटेंत कोणताही त्रास झाला नाहीं.

ह्या वाटेंत घडलेली हकीकत आजोळीं कळल्यावर त्यांनाही फार वाईट वाटलें, परंतु जी गोष्ट घडली त्याला कोणाचाच इलाज नव्हता काहीं रोकड व दोन अडीचशें रुपयांचे दागदागिने अशा तीनशें रुपयाचा चट्टा बसला

## आजोळची थोडी हकीकत

मामा व मामी आपले दत्तक दिलेल्या मुलाचा सांभाळ करण्याकरितां म्हणून मुलाकडेच राहात अर्थात् बाकीचीं त्यांचीं लहान मुलें आपल्या आई-जवळच असत शिवराम नांवाचा माझ्याच वयाचा एक मुलगा मात्र आजोबा-कडे राहत असे कारण तो त्यांचा फार लाडका होता अशा वेळेला आजीला कोणातरी मनुष्याची गरज होतीच, ती मुलगी घरीं आल्यामुळें अर्थात्च नाहींशी झाली.

## आमची सोय लागते

एकदर दुःखाची परंपरा टळून मातृहृदयाचा आसरा मिळाल्यामुळें आईच्या जिवाला थोडी स्वस्थता वाटूं लागली. वडील बंधु जे दिनकरभट ते माझ्यापेक्षां सहा वर्षांनीं मोठे होते अर्थात् त्यांचें वय ह्या वेळीं १०।११ वर्षांचें असावें. मामाच्या देखरेखीखालीं त्यांचा वेदपठनाचा अभ्यास सुरु झाला लवकरच त्यांची त्या विषयांत प्रगति दिसूं लागल्यामुळें एक दोन ठिकाणच्या पूजा व जेवणाची सोय जमली मी लहानच होतों त्या वेळीं माझें वय सुमारें ४।५ वर्षांचें होतें. लहानपणीं मी फार हूड व फिरस्ता असल्यामुळें एके ठिकाणीं माझा पाय कधींच ठरला नाहीं. आईचे पाठीमागें नेहमीं असावयाचे लहानपणीं आईचा लळा मला फार होता ७।८ वर्षांचा होईपर्यंत आईला विसंबून मी कधींच राहिलों नाहीं अंगावर पिण्याची सवय तर जमखंडीस जाईपर्यंत कायम होती.

## गांवठी शाळा

माझें सरस्वतीपूजन कधीं झालें हें मला आठवत नाहीं. परंतु मी जमखंडीस गेल्यावर नानाभट काळे यांचे गांवठी शाळेंत जाऊं लागलों. गुरुजींचें वय त्यावेळीं सुमारें ५० वर्षांचें असावें! त्यांच्या कुटुंबाचेंही वय जवळ जवळ ४५ वर्षांचें होतें त्यांना बाळंभट नावाचा २७।२८ वर्षांचा एक

मुलगा व त्याची बायको अशीं त्या कुटुंबांत चार माणसें होतीं जवळ जवळ भिक्षुकीवरच त्या कुटुबाचा निर्वाह चाले गुरुजी दिसण्यांत साधे भोळे, स्नान संध्याशील, हसनमुख असे असत त्यांना चिलमीचा नाद फार होता बाकी आणखी कोणत्याही तऱ्हेचें व्यसन त्यांना नव्हतें कधी कधीं आम्हां शिष्य-वर्गावर त्यांना चिलीम भरून देण्याचा प्रसंग येई आमची शाळा ज्या वाड्यांत लागे ती जागा गुरुजींकडे भाड्यानें होती. एक पडवी व सोपा अशा जागेचा शाळेकडे उपयोग करण्यांत येई. शाळेंत साधारण ५० । ६० मुलें असत गुरुजी व त्यांचे चिरंजीव मिळून शिकविण्याचें काम करीत शाळेंत शिकविण्याकरितां पुस्तकें अशीं कोणतींच नव्हतीं सर्व भर बहुतेक उजळणी-वरच असे मुळाक्षरें, बाराखड्या शिकवीत स्लेटपाट्यांचा प्रचार त्या वेळीं फार नव्हता लाकडी पाट्या त्यावर शाडूनें सारवून वर धूळ टाकून काम-टीच्या लेखणीनें सर्व उजळणी, बाराखड्या, अक्षरें काढावीं लागत दोन अडीच वर्षें त्या शाळेंत माझें शिक्षण झालें पण पुरी उजळणी काही पाठ झाली नाहीं थोडी अक्षर ओळख ह्या पलीकडे शिक्षण गेलें नाहीं अवस पौर्णिमा, प्रतिपदा अशा शाळेस सुट्या असत. प्रत्येक एकादशीस गुरुजींना पैसा सुपारी नेऊन द्यावी लागे वर्षांतून एक दिवस पाटीपूजा होई त्या दिवशीं मात्र प्रत्येक विद्यार्थ्याकडून सर्व शिधा, एक नारळ, चार सहा आणे ऐपतीप्रमाणें दक्षिणा, एखादें वस्त्र अशी बिदागी गुरुजींना होई मी शाळेंत जाऊ लागल्यापासून पाहण्यांत येई कीं, निदान दहा पांच मुलांना तरी छडीचा प्रसाद मिळाला नाहीं असें कधींच झालें नाहीं थोडें चुकलें कीं, दे छडी बहुतेक सर्व भर छडीवरच असे आणखीही कांहीं शिक्षेचे प्रकार असत ते आजकालच्या काळांत अनोळखी असल्यामुळें येथें नमूद केल्यास वाचकोंची थोडी करमणूक होऊन गंमत वाटेल आणि बोधही घेतां येईल

घोडीः– वर मलग्यास एक दोरी बांधून त्यांत विद्यार्थ्यांचे दोन्हीं हात एकांत एक अडकवून त्याला टांगून ठेवणें.

खुर्चीः– मुलाला दोन्हीं पायावर उभें करून पाठ भिंतीला टेकविणें,

व दोन्हीं हात वर करून खुर्चीसारखा आकार आणून बसविणें. ह्या शिक्षेनें पायाला रग लागून ते दुखूं लागतात

**आंगठे धरणें:-** पायाचे आंगठे दोन्हीं हातांनीं धरून वाकून उभे राहणें ह्या शिक्षेनें कमरेस कळ लागून पोटऱ्या दुखूं लागतात

घोडी दिल्यावर फारच व्रात्य मुलगा असला तर त्यावर छडीचाही प्रयोग करण्यात येई मौजेखातर एखादें वेळीं मिरच्यांच्या धुराचाही उपयोग करण्यांत येई. मी हें कांहीं अतिशयोक्तीनें लिहीत नाहीं, तर हे प्रकार त्या वेळीं आमच्या शाळेंत राजरोस व उघड उघड चालत. ह्या बाबतींत पालकांचीही तक्रार कधीं ऐकूं आली नाहीं शिक्षा चालूं असता चार तमासगीर जमत व तेही त्यांत भर देत. गुरुजींनाही त्या बद्दल कधी वाईट वाटल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं हा प्रकार नेहमींचाच असल्यामुळें मुलेंही त्या शिक्षा आनंदानें भोगीत. बाकीच्या मुलांना गंमत वाटे शाळेंत वेळापत्रक वगैरे कांहीं नसे दिवसातून दोन वेळां शाळा भरे. सकाळीं तीन तास व दुपारीं तीन तास सकाळीं ७ ते १० व दुपारीं २ ते ५ अशी सहा तास शाळा लगे. सहा तासांत अभ्यास काय होई तर झालेली उजळणी काढणें, एखादा नवा धडा घेणें, व परवचा फार झालें तर परवचाच्या वेळीं कधीं लहर लागल्यास थोडें तोंडी हिशेब ' झाला अभ्यास. मधून मधून शिष्यांना गुरुजींची थोडीं कामें करावीं लागत. गुरुजी बरोबर बाजारांत जाणें, त्याच्या पाठीवर व पायावर पाय देणें, शाळेचा केर काढणें, सोबत्यांच्या पाट्यांना शाडू लावणें, त्यावर त्रिटकरी कुटून त्याची धूळ तयार करून ती पाट्यांवर घालणें, मुलांना धडे देणें वगैरे कामाच्या मुख्य बाबी होत

शाळेंत खुर्च्या, टेबलें, बाकें वगैरे कांहीं नव्हतें. मुलांनीं बसावयास हवें तर आपापल्या घरून एखादें पोतें न्यावें व घरीं जातांना तें परत न्यावें. गुरुजींनाही बसावयास एक कायमचें पोतें असे. त्यावरच ते बसत व जवळच एक शेगडी, विस्तव, चिलमीचें सर्व सामान, खांद्यावर एक पंचा, अंगांत कांहीं नसे कधीं कधीं ते बंडी वापरीत. असा गुरुजींचा थाट बारा महिने होता. त्यात कधीं बदल झालेला आढळण्यांत आला नाहीं. अशी ती शाळा बरेच दिवसपर्यंत चालली होती आजही जमखंडीस गणपती आळींत म्हैसकरांच्या

वाड्यांत शाळेची जागा दाखविता येईल. ह्या शाळेंत माझें शिक्षण दोन अडीच वर्षे झालें हें मागें सांगितलेंच आहे

## थोडी पुढची हकीकत व घरचें प्राथमिक शिक्षण–

त्यावेळीं आजोळीं असतांना आम्हाला सकाळीं ४ वाजता उठावें लागे कारण पहांटे आमचे आजोबा मला व माझा मामेभाऊ शिवराम ह्या दोघाना अमरकोषाची संथा देत रूपावली, समासचक्र ह्यांचीही मधून मधून संथा मिळे त्यात एक नमूद करण्यासारखी गोष्ट नेहमीं घडत असे वास्तविक पाहतां वडील मनुष्यांचे दोष काढणें हें कांहीं मोठें भूषणावह नाहीं, तरी अतिरेक झाला म्हणजे राहवत नाहीं शिवराम हा मुलाचा मुलगा म्हणून विशेष लाडका, त्याला शिकवावयाचे वेळीं आजोबानीं त्याला मांडीवर घेऊन बसावें, त्याचे लाड करावे, माझ्यावर मात्र वक्रदृष्टि तशांत माझ्याच पायगुणानें वडिलास मरण आलें असा त्यांचा समज मरण येणें हें कांहीं कोणाच्या हातचें नाहीं. ह्या ईश्वराधीन गोष्टी ! त्याला मी काय करणार ! परंतु कांहीं इलाज नाहीं ' असे ते माझ्यावर नेहमीं रुष्टच असत त्याचा वचपा संथेच्या वेळीं निघे अशाच एका प्रसंगीं घेतलेला एक चिमटा मला अद्याप आठवतो. तो मी विसरलों नाहीं त्याचा परिणाम मात्र असा झाला कीं, मीं शिकण्यास कंटाळू लागलों. पहिल्या सपाट्यास जे १००–२०० श्लोक झाले, पुढें बंद. त्यांच्याजवळ शिकण्यास माझें मनच लागेना स्वत मातोश्रीच्या वडिलाची माझ्यावर ही ममता ! मग मामा व मामीबद्दल काय विचारावें ? मामाचा स्वभाव गरीब असे त्यांनीं कोणत्याही प्रकारें कधीं दुखवलें नाहीं. बरें नाहीं, वाईट नाहीं, ते बहुतेक मामीच्या तंत्रानें चालत. आमच्या आईचें माहेरीं येणें हें मामींना जाचक झालें होतें. तरी आजीबाईमुळें त्यांचें कांहीं चालत नसे त्या मनांत नेहमीं नाखुषच असत. त्या दुसऱ्या घरांत राहत असल्यामुळें विशेष प्रसंग असा कधीं झाला नाहीं.

अशाच कांहीं धुसफुशीमुळें आम्ही दोन अडीच वर्षे तेथें राहून तासगांवीं पुन्हां परत आलों दिनकरभटजी तेथेंच राहिले. यजमानांच्या घरच्या पूजा-अर्चा करण्यांत बंधूंचा उपयोग होत असल्यामुळें मामाची त्यांच्यावर मर्जी होती त्याकरितां त्यांनीं दिनकरभटजींना आपल्या जवळच ठेवून घेतलें अशा

तऱ्हेनें त्याच्या विद्याभ्यासात कांहीं व्यत्यय न येतां त्याचें वेदाध्ययन चालू राहून त्यांत ते तरबेज झाले व पुढें ते बरेच दिवस जमखंडीस होते

जमखंडीसही आजोबा व्यतिरिक्त, आमच्या दोन तीन चुलत आत्याबाई, चुलत बहिणी वगैरे बरीचशी नातलग मंडळी सुखवस्तु अशी असल्यामुळें आईचा त्याबरोबरच माझा त्या सर्व परामर्श घेत. त्यांच्या घरीं हव्य कव्य झाल्यास आईस बोलावल्यावांचून त्या कधीं राहिल्या नाहींत त्यामुळें तिच्या-वर ओढवलेल्या प्रसंगाचा तिला बराच विसर पडला.

## आईचा मुलाच्या शोधाविषयीं प्रयत्न--

पोटचा गोळा, नऊ महिने वाढविलेला तो कोठें निघून गेला, अद्याप काहींच पत्ता लागत नाहीं, ह्यामुळें ती मनांतल्या मनांत फार कष्टी असे तें दु ख तिनें विशेष कोणाला दिसूं दिलें नाहीं, तरी शरीरावर त्याचा बराच परिणाम होऊन तिचें शरीर बरेंच थकत चाललें मुलाचा पत्ता लागावा म्हणून जो कोणी जो काहीं उपाय सांगेल तो तिनें करावा. हेतु हा की, कसेंही करून मुलाचा पत्ता लागावा. पिंपळाला, दत्ताला, औदुंबराला लाख लाख दोन दोन लाख प्रदक्षिणा घातल्या, नवसें केलीं, नाना तऱ्हेचे उपास तापास व्रतें वैकल्यें केलीं देवाला खेटे घातले, ज्योतिष्यांना प्रश्न विचारले व त्यांनीं सांगितल्या प्रमाणें ब्राह्मणद्वारा जप करविले, दानें दिलीं, तरी तपास लागण्याचें कांहीं चिन्ह दिसेना!

कोणी सांगत आम्हीं पंढरपुरास तुमच्या मुलाला पाहिला, कोणी सांगत त्यांची आमची भेट पुण्यास झाली कोणी सांगत तो नाशकास शिकावयास राहिला आहे, परतु नक्की पत्ता असा कोणाकडूनच मिळेना प्रवासाला जावें, स्वतः शोध करावा, तर बायको माणूस, जवळ पैसा नाहीं तरुण वय, भलता सलता प्रसंग आला तर फार फजिती. त्यावेळीं आजच्यासारख्या रेल्वे नव्हत्या कीं, झट उठून गाडींत बसलें कीं, मुक्कामावर उतरावें, व एक दोन दिवसांत लांबचा प्रवास आटोपून परत आपल्या गावीं यावें प्रवास कष्टाचा होता, म्हणून तडकाफडकीं कोणतेंहि प्रवासाचें काम करतां येत नव्हतें

## पुढचें शिक्षण

तासगांवीं आल्यावर माझें नांव नंबर १ चे सरकारी शाळेंत पहिल्या वर्गांत लिहलें गेलें बाबुराव फडके नांवाचे, ज्यांचे वय ४०–४५ वर्षांचे असेल असे एक मध्यम वयाचे शिक्षक त्या वर्गावर मास्तर होते बिगर इयत्ता व पहिला वर्ग मिळून त्यांच्या ताब्यांत सुमारें ६०–७० मुलें होतीं इतक्या सर्व मुलांना त्यांना शिकवावे लागे. त्यांना पगार फक्त पांच रुपयेच होता. खालील सर्व शिक्षक अन्ट्रेन्ड असल्यामुळें बहुतेक सर्वांना पाच रुपयेच पगार होता. एवढ्या पगारात ते आपला निर्वाह कसा करीत असतील तें हरी जाणें! सरकारी नियमाप्रमाणे वेळापत्रक नांवाला मात्र भिंतीवर टांगलेलें असे शिक्षणक्रम ठराविक वेळेशीं मेळ खात नसे त्या वेळीं पहिल्या वर्गांत नुसती उजळणी व बाराखड्याच शिकवीत त्या शाळेंत पुन्हां उजळणी व बाराखड्या सुरु झाल्या सांघिक शिक्षण पद्धति नसल्यामुळें प्रत्येक मुलाचे निरनिराळे धडे असत ते देना देला मास्तरांचे टाके ढिले होत परंतु संवयीमुळें त्यांना ते जड वाटत नसे गावठी शाळेपेक्षां त्या शाळेंत शिक्षा देण्याच्या पद्धति निराळ्या होत्या मार कमी मिळे एवढेंच ' वर्षाचे अखेरीस डेप्युटी आले. परीक्षा झाली पहिल्या वर्गांत पास झाल्यामुळें मला दुसऱ्या वर्गांत प्रमोशन मिळालें

## एक आश्चर्यकारक योगायोग

योगायोग असा कीं, आज जबलपूर येथील महाराष्ट्र हायस्कूलचे सन्माननीय सुपरिन्टेन्डेन्ट व संचालक श्रीमान लेलेसाहेब यांचे वडीलच त्यावेळीं तासगांव येथील नं १ च्या सरकारी शाळेचे हेडमास्तर होते. त्या वेळीं कल्पना सुद्धा नव्हती कीं, त्यांचेच चिरंजीव श्रीमान लेलेसाहेब जबलपुरास येऊन त्यांच्या नेतृत्वाखालीं मला काम करावें लागेल, व हा चरित्र लिहिण्याचा योग जमेल केवळ हा योगायोगच समजला पाहिजे. अशीं उदाहरणें इतिहासांत केव्हां केव्हां घडून येतात. पुढें लवकरच तासगांवच्या हेडमास्तरांची म्हणजे लेलेसाहेबांची बदली सुप्यास इन्स्पेक्टरच्या जागी झाली, व त्यांचे जागी रा शिंदे या आडनांवाचे हेडमास्तर आले

## पूर्वीचा अभ्यासक्रम

आमच्या वेळीं कायम ठराची सरकारी क्रमिक पुस्तकें सर्व शाळांत सुरू होतीं. तीं पुढे बरींच वर्षे चालली आतां दुसऱ्या वर्गात संख्या मांडणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकारपर्यंत अभ्यासक्रम होता प्रात्यक्षिक शिक्षणापेक्षा घोकपट्टीवरच जास्त भर असे. दुसऱ्या वर्गाचे शिक्षकही जरा कडकच होते मनमिळाऊपणा त्यांच्यात नव्हताच. त्यांच्या धाकानेच जे काम होईल ते होईल! शिक्षणपद्धति अशी कांहीं नव्हतीच कारण ते स्वत ज्या पद्धतीनें शिकले तीच पद्धत ते उपयोगात आणात. हा म्हणजे कांहीं त्यांचा दोष होता असे नाहीं पुढे पांचव्या वर्गात एक ट्रेन्ड शिक्षकहा आम्हास लाभले होते परंतु त्यांच्याही शिक्षणपद्धतीचा ढचरा जुनाच, घोपट मागा त्यांनी ट्रेनिंगमध्यें शिकलेली पद्धति वर्गात शिकवितांना कधींच उपयोगांत आणली नाहीं तुमच्या ट्रेन्ड ह्या नावावरच बाकीचे अन्ट्रेड शिक्षक त्यांना वचकून असत त्यांनी फक्त क्लासांत येऊन बसावें उदाहरणे सांगणे, वाचन घेणें, ही सर्व कामे मॉनिटरनें करावीं त्यांनीं कधी सहा तासात खुर्चा सोडिली नाहीं बसल्या बसल्याच सर्व कामें उरकावयाचीं ते कधीं कोणाशीं फार बोलतही नसत फक्त कामापुरते पांच वाजले की धोतर फडकावून सरळ घरचा रस्ता बाकीच्या शिक्षक वर्गात ते फारसे मिसळतही नसत हे पांचव्या वर्गाचे मध्येच थोडे विषयांतर झालें पुढे जास्त माहिती क्रमाने येणारच आहे आता आपल्या मूळ क्रमाकडे वळू

## परत मुलाचा शोध

ह्याप्रमाणें आमचा शिक्षणक्रम चालला असता आईच्या मनांत घोळतच होतें की, सोबत मिळाल्यास प्रवासास निघून मुलाचा कांहीं शोध लागल्यास पहावा अशा सर्धास जमखंडीहून आजींचें पत्र आलें कीं, येथून आपल्या चांगल्या परिचयाचे व विश्वासू असे वारकरी पंढरपुरास जाण्याकरिता निघ-णार आहेत, तुला मुलाचे शोधास जावयाचे असेल तर ही चांगली संधी आहे घरच्या सारखी बायकामनुष्याची सोबत असल्यामुळें तुला कोणताही त्रास पडणार नाहीं तर तूं लवकर निघून ये

अशा तऱ्हेचें पत्र येतांच अशी संधी पुन्हा येणार नाहीं, असा विचार करून सर्व निरवा निरव केली व लागलीच आईनें निघण्याची तयारी करून ती मला घेऊन जमखंडीस पोहोंचली तेथलि वारकरी जाण्याच्या तयारींतच होते आईनें आजीच्या मदतीनें सर्व तयारी करून दिंडाबरोबर पांडुरंगाचें नांव घेऊन कूच केलें, व मजल दर मजल थोडा थोडा प्रवास करीत मंडळी १०।१५ दिवसांत पंढरीस पोहोंचली यात्रेच्या वेळचा पंढरीचा आनंद काय विचारा-वयाचा ? जिकडे तिकडे मनुष्येंच मनुष्यें, पताका, दिंड्या, टाळ व मृदंग यांचे आवाज आणि ज्ञानदेव, तुकाराम ह्या नांवाचा जयघोष ह्याशिवाय तेथें काय दिसणार ' कोठला मुलगा आणि कोठलें काय ! अशा त्या पंढरीरायाचे नगरींत मुलाचें दुःख विसरून अनन्य भावानें विठोबाच्या चरणीं ती लीन झाली आणि पंढरीनाथाचे चरणीं तिनें अशी प्रार्थना केली कीं, माझे हेतु तुझ्या कृपेनें पूर्ण होतील तर पताका घेऊन अशाच तुझ्या नगरीच्या मी आणखी वाऱ्या करीन. ह्या वेळीं तिनें वारकरी मंडळीबरोबर आळंदीपर्यंत पायीं प्रवास केला व सर्व ठिकाणीं शोध केला, परंतु कांहीं पत्ता लागला नाहीं पुढें सोबतीचे अभावीं तिला गेली तसेंच परत यावें लागलें ह्या मुळें तिचें मन बरेंच उदास झालें

## पुन्हा गांवठी शाळा व शिक्षणाची हेळसांड

त्या अवधींत आम्ही पुन्हा नानाच्या शाळेंत जाऊं लागलों पुन्हा उज-ळण्या पुन्हा धूळपाटी, पुन्हा घोडी हा क्रम सुरु झाला मुलाचें एकदा वडील-रूपी छत्र नाहींसे झालें म्हणजे त्याच्या शिक्षणाची कशी हेळसांड होते हे एक मासें घेण्यासारखें उदाहरण आहे मुलाच्या शिक्षणासंबंधीं काय हालहवाल आहेत हें पाहणारे जबाबदारीचे मनुष्य कोणीच नाहीं आजोळची मंडळी सगळी आपापल्या कामांत गर्क शिवाय त्यांचा व्यवसाय निराळा यजमान कृत्यामुळें त्यांना माझ्यासारख्या बेवारशी मुलाकडे पाहण्यास वेळ कोठला ? आजोबाच मुख्य पण आम्हीं त्यांच्या मनांतून उतरलेले दिनकर भटजी जरा मोठे होते. परंतु त्यांचे मागें यजमानाच्या पूजा अर्चा लागल्यामुळे त्यांना माझ्याकडे पाहण्यास वेळच मिळत नसे. दिवसभर ते मामाच्या मर-बराईंतच असत. दोन दोन दिवसांत माझी त्याची गांठ पडत नसे मला

असे कधीं आठवत नाहीं कीं, त्यानीं आपण होऊन माझी कधीं विचारपूस केली आहे कीं बाबा तूं काय शिकतोस? तुझा अभ्यास कोठपर्यंत झाला आहे? तुला सरकारी रेग्युलर शाळेंत जावयाचें किंवा कसें ह्याची कधीं चर्चाच झाली नाहीं आईनें पहावें तर तिची वृत्ति उदासीन तिला काहींच सुचत नसे पुन्हा कामाचा रगाडा आजोबाकडचें सर्व काम तिच्या एकटीवरच पडे. घरात दुसरें माणूस कोणी नव्हतेंच मग काळजी कोण घेणार '

## जमखंडीची त्रोटक हकीकत

जमखंडीसारख्या गावांत पाण्याचा फार दुष्काळ. नळ नुकतेच सुरू झाले होते. पण तलावांतच पाणी फार नसल्यामुळें दिवसातून फार थोडा वेळ नळ सुरू असत तेवढ्या वेळात जेवढें पाणी मिळेल तेवढें भरून घेतलें नाहीं तर मग पाणी विहिरींवरून आणावें लागे प्रत्येकाचें घरांत काहीं तोट्या नव्हत्या दुसऱ्याचे हौदावरून पाणी आणावें लागे पाणी भरणें हे एक त्या वेळीं कामच होऊन बसले होतें वेळ चुकली कीं, तारांबळ मग ही विहीर पहा! ती विहीर पहा' असा गोंधळ होई म्हणून तें काम नेहमीं वेळेवर उरकावें लागे त्या करितां सर्वांवरच पाणी आणण्याची पाळी येई तशांत आईला जास्त काम पडे, हें सांगावयास नकोच पाण्याचें तंत्र आटोपलें कीं, मग स्वयंपाकाची तयारी आमचे आजोबा ११ वाजतां स्नान करीत वाताचें शरीर असल्यामुळें त्यांना थंडीमुळें सकाळचें स्नान सोसवत नव्हतें त्याचे बारा महिने औषधोपचार चालू असत. मग संध्या पूजा ते पार्थिव पूजा करात ब्रह्मयज्ञ वगैरे कृत्यास सुमारें दोन तास लागत मग जेवण आमचें मुलांचेंही जेवण सर्वांबरोबरच होई शेवटीं आईचें जेवण आईला जेवावयास सहज तीन वाजत मग उष्टें खरकटें होतां होता संध्याकाळची जेवणाची तयारी, दिवाबत्ती वगैरे कामामुळें तिला आमच्याशीं बोलावयास सुद्धा वेळच होत नसे दिवसभर मी काय करतों? कोठें असतों? खेळतों का अभ्यास करतों, का उनाडक्या करत दारोदार हिंडतों! हें पाहावयास वेळ आहे कोणाला? रात्रीं कामातून ती निवृत्त होते तोंपर्यंत आमची निजानिज झालेली. सकाळ झाली कीं, पुन्हा तोच कार्यक्रम मामाकडे तमण्णाचार्य म्हणून एक विद्यार्थी शिकावयास असत ते बहुतेक सांगकामे असत ते आजोबाकडील बरीच

किरकोळ कामें पार पाडीत. त्यांच्यामार्फत आई माझ्या शिक्षणाची, पाटी पुस्तकाची, कपड्यालत्त्याची, वगैरे कामें करून घेई ते बिचारे हीं कामें मोठ्या आनंदानें करीतही.

## माझी मौंज

लहानपणीं खरूज, नायटे, फोड वगैरे मुळे माझी प्रकृती खराबच असे कोणी आईला सांगितलें कीं, ह्याची मुंज केली म्हणजे खरूज, फोड वगैरे नाहींसे होतील म्हणून आईनें आजोबांच्या संमतीनें हें मुंजाचें कार्य उरकवून घेण्याचें ठरविलें स्वतः आजोबाच ज्योतिषी असल्यामुळें त्यांनी पत्रिका पाहून एक चांगला मुहूर्त काढून कार्य करण्याचें निश्चित केलें भिक्षुकाचें घर, सर्व सामान तयारच होतें अनाथ मुलाची मुंज, त्याच्याकरिता साहित्य तें किती लागणार ? आमच्या आजीबाईजवळ सर्व गोष्टींचा बराच संच असे लागला जिन्नस, पळ बाजारांत, असें तिच्या ह्यातींत कधीं घडलें नाहीं संसारांत त्या फार दक्ष असत मुलांच्या खाण्यापिण्यापासून तों संसारांत लागणाऱ्या सर्व जिनसांचा त्यांच्याजवळ नेहमीं थोडा बहुत साठा असे त्यांना डोळ्यांनीं दिसत नव्हतें. तरी सर्व गोष्टींकडे त्यांचें बारीक लक्ष असे सर्व तयार जिनसांच्या लहान मोठ्या थैल्या भरून शिवून उशा लगतचे फडताळीत नेहमीं तयार असत कारण त्यांतील लागेल तो जिन्नस काढून देण्याचा माझ्या-बरच नेहमीं प्रसंग येई म्हणून मला त्या जिनसांची विशेष माहिती त्यांत एक पिशवी माझ्या फार आवडीची होती ती म्हणजे भडभुंज्याकडून भाजून आणलेलें डाळें त्याच्या दोन तीन थैल्या त्यांच्या उशाशीं नेहमीं तयार असत मुलांना भूक लागली म्हणजे त्या स्वतः त्यांतून मूठ मूठ डाळें काढून सर्व मुलांस खावयास देत मामाचींही मुलें येऊन जाऊन तेथें असतच केव्हां केव्हां आम्हांस काही सामान काढावयास सांगितलें असतां सहजच आमच्या दृष्टीस तीं डाळ्याची थैली पडे व आम्हांस मोह न आवरल्यामुळें त्यांतून मुठी दोन मुठी डाळें सहज आमच्या खिशात जात असे आजींना दिसत नव्हतें हे आम्हांला ठाऊकच मग जिन्नस काय झाला ह्याचा पत्ता लागतो कशाला ? पण त्याची विचारपूसही फारशी होत नसे आप्पा, ( आम्हीं आजोबांना आप्पा म्हणत असूं ) जरी आमच्यावर रुष्ट असत तरी खाण्यापिण्याचे

बाबतींत त्यांनीं कधीं काटकसर केली नाहीं लागेल ती जिन्नस [illegible] घरीं ऐेई कोणत्याही गोष्टीची कमी नव्हती

झालें । मुंजीची सर्व तयारी झाली अक्षत निघून वाजंत्री वाजूं लागली परंतु दैवयोग असा कीं, त्याच वेळीं आमच्या आंगांत ज्वर भरून आला आम्हास उठण्याची सुद्धां शक्ति अगात राहिली नाहीं चोवीस तास फिरणारा जो मुलगा, ज्याचा पाय क्षणभर सुद्धा घरात ठरला नाहीं, त्याची अशा स्थिति झालेली पाहून आई घाबरली व आता उभें केलेलें कार्य कसें पार पडतें ह्याची तिला काळजी उत्पन्न होऊन तेवढ्या वेळांत देवाला तिनें किती तरी नवस केले तशांत सर्व मंडळी बाहेर गेलेली घरीं आम्ही दोघेच मी तापाने फणफणलेला वैद्यास बोलावून आणण्यास सुद्धा कोणी नाहीं, आता काय करावें ही विवंचना तिला लागली अशा काळजींत आई आहे इतक्यांत देवानेंच पाठविल्याप्रमाणें स्वत वैद्यबुवाच कांहीं कामानिमित्त अचानक घरीं येऊन पोहोंचले आजोबा घरीं नव्हते सर्व मंडळी अक्षतीस गेली होती. तेव्हां आईनेंच मी आजारी झाल्याचें त्याना कळविलें व कार्य उभें केलें आहे हेंही सांगितलें सर्व प्रकार लक्षात आणून, वैद्यबुवांनीं नाडी पाहून, कांहीं घाबरण्याचें कारण नाहीं, हा लवकरच बरा होईल, असें आश्वासन दिलें व सांगितलें कीं, मी ज्या ह्या गोळ्या देतों त्यांतील एक एक गोळी दोन दोन तासांच्या अंतरानें देत जा, म्हणजे सकाळला हा मुलगा रोजच्या सारखा खेळूं लागेल कांहीं काळजी करूं नका तुमचें उभारलेलें कार्य निर्विघ्नपणें पार पडेल असें सांगून वैद्य बुवा निघून गेले लगेच आईनें वैद्य बुवांनी सांगितलेल अनुपान तयार करून गोळी दिली. दोन तासानी दुसरीही दिली. अशा त-हेनें दोन गोळ्या पोटात जाताच माझा ताप उतरून मला चांगली झोंप लागली, व सकाळपर्यंत कांहीं जागा झालों नाहीं मंडळी अक्षतीहून केव्हां परत आली? पुढें त्याचा काय विचार झाला? वगैरे संबंधानें मला कांहीं समजलें सुद्धा नाहीं सकाळीं जागा झाल्यावर मी पाहतों तों सर्व मंडळी आपापल्या धांदलींत आई ही आग धुवून स्वयंपाकाला लागलेली जिकडे तिकडे गडबड सुरू. मुहूर्त साधण्याची घाई. त्यांतल्या त्यांत एवढें बरें होतें कीं, मुहूर्त १० च्या नंतर होता जरदी नव्हता पुण्याहवाचनापासून सर्व

कर्सें त्याच दिवशीं ठरकावयाचीं म्हणून घाणा भरण्यापासून सर्व कार्याम सुरवात झाली. मीं सकाळीं उठलों तों जसें कांहीं मला कांहीं झालेंच नव्हतें अशा स्थितींत जिकडे तिकडे फिरू लागलों. त्या नंतर माझे फोड जे बरे झाले ते पुन्हा कित्येक दिवसांत त्यांचें पुन्हा दर्शन झालें नाहीं, व तापही आला नाहीं. लागलीच आईनें नवस केल्याप्रमाणें सव्वा रुपयाचे पेढे आणून सर्वांस वाटले दोन पेढे वैद्य बुवांच्या घरींही पाठविले. कारण अचानक वेळेवर ते जर आले नसते तर दुखणें कोणत्या थराला गेलें असतें हें सांगता येत नाहीं अशीच त्या वेळची दुखण्याची स्थिति होती

आईची काळजी दूर झाली ठरविल्याप्रमाणे मुंज पार पडली ब्राह्मण-भोजन आजोबांच्या ऐपतीप्रमाणें पार पडलें आमची ऐपत काय होती ? हें सर्वांस ठाऊकच होतें दुसऱ्यांचें जीवावर कार्य उभें केलेलें पण आजीबाईची मदत असल्यामुळें त्यांनीं कोणत्याच गोष्टींत उणेपणा भासू दिला नाहीं मामींनी बरीच धुसपूस केली. परंतु सासू खमग असल्यामुळें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. लोक लज्जेला अनुसरून सर्व कार्यांत मामींना भाग घ्यावा लागला व तो त्यांनीं कांहीं कुरकुर न करता घेतलाहा

## आमची संध्या

मुंज तर केली पण आता संध्या कोणी करावयाची ? तिचा तर लहान-पणापासूनच कंटाळा आमच्या घराजवळच महादेव भट करंदीकर म्हणून एक वैदिक ब्राह्मण हिरण्यकेशी शाखेचे सहकुटुंब राहत असत त्यांचेकडे माझें संध्या शिकावयास जाणें सुरू झालें पहिले पहिले दोन चार दिवस कांहीं खटखट न होतां पार पडलें परंतु पुढें पुढें दंगळ मगळ होऊं लागली आईनें त्रासून फरफटत ओढून नेऊन त्यांचें घरीं पोंहोचवावें मग त्यांनीं दोरी काढावी, आंगावर दहापाच दोऱ्या ओढाव्या, मग आम्हीं रडत ओरडत ते सांगतील त्या प्रमाणें संध्या म्हणावी असें बरेच वेळ झालें तरी त्या वेळीं मला संध्या आली नाहीं ती नाहींच कारण लहानपणापासून जमून कोणतेंही काम करण्याची संवयच नाहीं तर ती एकाएकीं लागावी कशी ? तशी संवय नसल्यामुळें सर्वांनाच त्यापासून त्रास होई व शिकणाराचेही धिडवडे निघत असें का होतें ह्या विषयींचा ऊहापोह मागें एकदां मीं केलाच आहे. कीं जो

वडिलांच्या शिकवणीला मुकला त्याला आयुष्यांत दचका बसलाच! असा एखादाच हरीचा लाल की, जो ह्या विपत्तीतून सही सलामत बाहेर पडला व नाव मिळविलें आमच्या सारखे दुर्भागीच पुष्कळ माझ्या पुढील आयुष्यात अशीं पुष्कळ उदाहरणें माझ्या पाहण्यात आलीं कीं, वडिलांचें छत्र नसल्यामुळें त्यांना बुद्धि असूनही त्यांची वाताहात झाली

## आजोळीची हकीकत

मुंज पार पडल्यामुळें आई मात्र एका विवंचनेंतून सुटली मुंजीमुळें माझा एक फायदाच झाला आजोबांच्या घरची स्थिति चांगली. शिवाय आजोबा विद्वान व गावांत मानमान्यता विशेष. श्रीमंत रामचंद्रराव आप्पासाहेब यांचा आश्रय. मोठमोठ्या श्रीमंत लोकांचीं यजमान कुळें, तरी आमचे आजोबा (आप्पा) कधीं कोणाकडे जेवावयास गेलेले मला ठाऊक नाहीत. घरीं स्नान संध्या करावी, यजमानाकडचीं लग्नें मुंजी वगैरे आन्हिक कृत्यें चालवावीं, आला गेला पाहुणा पंक्तीला घेऊन आनंदात काळ घालवावा ते स्वत जरी जेवणा-खाणास कोणाकडे जात नसत तरी त्यांच्याकडे आमंत्रणें फार शिल्लक असत आज काय यजमानाकडे श्राद्ध आहे या दोन ब्राम्हण पाठवून उद्यां काय लग्न कार्य आहे हेमाला ब्राम्हण पाहिजेत अशा अनेक निमित्तानीं त्याना नेहमीं ब्राम्हण वर्गाचा यजमानाकडे पुरवठा करावा लागे म्हणून आप्पांकडे नेहमीं गावातील भिक्षुक वर्गाची जा ये होत असे त्या योगाने भिक्षुक वर्गाचा फायदा होऊन त्यांना चार पैसे गांठी बांधता येत. बाकीच्या घरच्या मंडळीचीं बहुतेक जेवणें बाहेरच पडत कधीं छटीसहामाशीं घरीं जेवण्याचा प्रसंग येई. त्यात आमची मुंज झालेली. नवीन मुंजा, आप्पांचा नातु, लहान वय व बोलका प्राणी म्हणून यजमानीण बाई कौतुकाने मला जेवावयास सांगत शिवाय त्याला हेंही एक कारण होते कीं, वेणुताई (मातोश्री) अडी अडचणीच्या वेळीं त्यांच्या उपयोगी पडून त्यांचीं कामें पार पाडीत अशा बाईचा मुलगा मग तो हवासा कोणाला वाटणार नाही?

आमचे मामाच रामतीर्थावरील श्रीमंताचे मुख्य आश्रित असल्यामुळें नेहमीचीं आन्हिक कर्में त्यांच्या मार्फतच होत बाई साहेबाचीही

त्याचेवर बहाल मर्जी असल्यामुळें वाड्यांत त्यांची बोलबाला असे नारायणभट जोशी ह्यांचेशिवाय पान हालत नव्हतें शिवाय सर्व गांवाचा जोशीपणा ज्यांच्याकडे होता व श्रीमंताकडील जोशी वृत्तिही ज्यांच्याकडे होती असे जे भास्करभट जोशी त्यांचीही आजोबाकडे नेहमी जा ये असे व आमचे आईला ते आपल्या मुलीप्रमाणें मानीत म्हणून त्यांचीही माझेवर बहाल मर्जी असे ह्या कारणानें वटु म्हणून मलाच ते आपल्याबरोबर नवरात्रांत नऊ दहा दिवस रामतीर्थास घेऊन जात त्या ठिकाणीं एक मोठा बेसनाचा लाडू दक्षिणा व सुग्रास जेवण ह्यांची प्राप्ति होई. ती बाब अजूनही मला आठवते एकदोनदां श्रीमंताकडे इतक्या लहान वयांत दुहिन्याचा ब्राह्मण जाण्याचा प्रसंग माझेवर आला होता मोठ्याच्याकडचें जेवण, मग तें काय विचारावें? त्याचें विशेष वर्णन नको त्याचा थोडा फार अनुभव सर्वांस असतोच परंतु लोकांच्या दृष्टीनें माझ्यांत एक अवगुण होता तो हा कीं मी तूप खात नव्हतो तूप पाहिलें कीं, मला शिसारी येऊन वांतीचा प्रसंग येई परंतु यजमानांना तर सर्व पदार्थ खाणारा ब्राम्हण पाहिजे ते अगत्याने तुपाचा आग्रह करीत परंतु त्याचा व आमचा छत्तीसाचा आकडा असल्यामुळें यजमान जरा नाराज होत त्यांत जमखंडीही साजुक तुपाकरितां फार प्रसिद्ध आहे बारा महिने ताजे लोणी मिळत असल्यामुळें उत्तम साजुक तुप खाण्यांत येई. व त्यामुळें असला तूप न खाणारा ब्राम्हण कशाला सांगितला म्हणून यजमान मामांना रागे भरीत असे जरी होतें तरी पुन्हा आमंत्रण येईच

## माझें पुरुषसूक्ताचें शिक्षण

पुढे पुढें माझी एक दोन ठिकाणीं पूजा करण्यास जाऊं लागलो एकदा असे घडलें कीं, मी पूजा करीत असतांना एका एकी यजमान तेथें आले व मुला काय करितोस? असा त्यांनी प्रश्न केला मी उत्तर दिलें, पूजा करितो त्यांनीं विचारलें, तुला पुरुषसूक्त येतें का? मी म्हटलें, नाहीं. मग ते म्हणाले, उद्या पासून तू पुजेला येऊं नकोस पुरुषसूक्त पाठ कर मग आमच्या घरी पूजेस ये, असें त्यांनीं म्हणताच मीं तसाच अर्धी पूजा टाकून उठलों आणि घरीं आलों, व कोणालाही न सांगतां एका खोलींत जाऊन बसलों, व पुरुष-सूक्ताची पोथी घेऊन पाठांतरास प्रारंभ केला त्या पूर्वी त्याच्या संधा

गुरुजीकडून मला बऱ्याच मिळाल्या होत्या, परंतु तें अद्याप पाठ झालें नव्हतें यजमानाचा शब्द मनाला लागल्याबरोबर पुरुषसूक्त पाठ करण्याचा निश्चय करून त्या कामाला लागल्यावर ते पाठ का होणार नाहीं? सकाळी १० ते सायंकाळी ५।६ वाजेपर्यंत घोकून त्याचें पीठ पाडलें व पाठ झालें किंवा नाहीं हे दोनतीनदा अजमावून पाहिलें आता पाठ झालें असें पक्कें वाटल्यावर खोलीतून बाहेर आलों तों पर्यंत इकडे घरात मी नाहींसा झालों म्हणून रडा-रडी, शोध व गडबड सुरु झाली होती यजमानांकडे घडलेली हकीकत कोणालाच ठाऊक नाहीं दोन तीन वाजल्यावर आईच्या ध्यानांत आलें कीं, निळू अजून जेवण करून कसा परत आला नाहीं म्हणून शोध घेण्याकरिता मोलकरणीस यजमानाकडे पाठविलें. परंतु तेथून निरोप आला कीं, तो तर सकाळीं पूजा न करिता येथून गेला ही बातमी घरीं कळल्यावर मग मात्र सगळ्यांचें धाबें दणाणलें व तपास जारीनें सुरु झाला

मी ज्या खोलींत बसलों होतों ती खोली एकीकडे असून अडगळीची होती दार लावून घेतलें तरी आत उजेड भरपूर येत असे व हवेलाही कांहीं कमी नव्हतें हुडकतां हुडकता मीं लपलेल्या खोलीकडे मंडळींना येण्याला व मी कडी काढण्याला एकच गाठ पडली मी कडी काढून बाहेर पडतांच मडळींत जो काहीं हशा पिकला त्याला पारावारच नाहीं सगळ्यानीं मला प्रश्नावर प्रश्न करून भडावून सोडलें. खरी हकीकत सर्वांना कळल्यावर व आप्पानीं माझें पुरुषसूक्त पाठ म्हणून घेतल्यावर त्यानीं माझी पाठ थोपटली व दुसरे दिवशीं ते स्वत मला घेऊन यजमानाकडे गेले व माझ्याकडून पुरुषसूक्तासह यजमानांचेसमोर पूजा करवून घेतली. तेव्हा यजमानही खूष होऊन मी जमखडीस असेपर्यंत ह्यालाच पूजेस पाठवा असा त्यानी आप्पाना आग्रह केला

## मामे भावाच्या अंगावर जळता हिलाल

त्या दिवसापासून आजोबाचा माझ्यावरचा राग थोडा कमी दिसू लागला ह्या अवधींत आणखी एक विचित्र घटना घडून आली माझा मामे भाऊ शिवराम ( त्या विषयीं उल्लेख आलाच आहे ) आप्पाचा लाडका असल्यामुळे बहुतेक त्यांचे जवळच असे. तो एका लग्नप्रसंगीं यजमानांकडे सर्व मंडळी

बरोबर गेला असताना मुलाजवळ गंमत पाहात उभा होता. त्या हिलालास धक्का लागून तो जळता हिलाल त्याच्या अंगावर पडून त्याचें सर्व अंग होरपळून निघालें पाठ व हात ह्यावर त्याचा विशेष परिणाम होऊन त्या दुखण्यातून जिवंतपणी बाहेर पडण्यास त्याला सुमारें नऊ दहा महिने लागले त्याचा हा एक अपमृत्यूच टळला ह्या त्याच्या दुखण्यानें आजोबांच्या मनाला बराच धक्का बसला काहीं दिवसांनीं शिवरामाचें दुखणें अगदीं बरें होऊन तो चांगला हिंडू फिरू लागला व त्याचीही मुंज माझे मुंजीनंतर लवकरच उरकली

## आईची पंढरपूरची वारी

ह्या अवधींत आईची आणखी एक पंढरपूरची वारी जमखंडीहून निघालेल्या दिंडी बरोबर झाली मुलाचा कांहीं पत्ता न लागल्यामुळें ती निराश होऊन दिंडी बरोबर जमखंडीस परत आली पाठीमागें आजीबाई असल्यामुळें मुलाचें कसें होईल ही काळजी तिला नव्हती मी एकटा होतों तरी वय लहान असल्यामुळें आसपासचे सर्व लोक माझ्यावर प्रेम करीत व जेवणाखाण्याची विचारपूस करून माझा समाचार घेत आमच्या घराजवळच दोन तीन मराठ्यांची घरें असून बाजूला काका रिसबूड, अंताजीपंत रिसबूड, गोपाळराव रिसबूड अशी घरदाज मंडळी असल्यामुळें आमचें खेळणें सवरणें सर्व त्यांच्याच घरीं त्यांचे मुलाबाळांबरोबर होई तीं घरें आम्हास परकी वाटत नसल्यामुळें, आई गावास गेली होती तरी एकटें असें मला कधींच वाटलें नाहीं आई होती त्या वेळीं सुद्धां आमचे घरांत जागा थोडी असल्यामुळें काका रिसबूड यांच्या कुटुंबानीं आग्रह केल्यामुळें आई निजावयास त्यांचेच घरीं जात असे. त्यांचे घरांत त्या दोन प्राण्यांशिवाय तिसरें कोणीच नव्हतें सर्व घर रिकामेंच होतें त्यांची एक मुलगी आपल्या सासरीं असे ती कधीं कधीं जमखंडीस माहेरीं येई ती सासरीं गेली म्हणजे पुन्हा शुकशुकाट म्हणून आमचें निजणें त्यांच्या घरीं होई आई वारीला गेली होती तरी मी तेथेंच निजत होतों व त्यांनींही कधीं माझ्याशीं धुसपूस केली नाहीं. ब्राह्मण म्हणून नेहमीं जेवा-वयास बोलवावें काका कचेरींतून आले कीं त्यांचेबरोबर कधीं कधीं फराळास होई अशा प्रकारानें कालक्रमणा चालली असतां आई वारी करून परत

आली आई जाऊन परत येईपर्यंतचा काळ वरील प्रकारें शेजाऱ्यांच्या प्रेमळ वागणुकीनें केव्हा संपला हें कळलें सुद्धां नाहीं

## अवचित टोळधाड

ह्या अवधींत शिकणें असें माझें मुळींच झालें नाहीं नाही म्हणावयास पुरुषसूक्त मात्र पाठ येऊ लागलें सरकारी शाळा होती, परंतु त्या शाळेंत मला कां घातलें नाहीं हें नीटसें माझ्या लक्षांत येत नाहीं आईला गावठी शाळाच बरी वाटली असावी वर्गामागून वर्ग पार पडत गेल्यामुळें मुलांच्या वेळचें नुकसान होत नाहीं ही कल्पनाच त्यावेळीं दृढ नव्हती तशांत आई नेहमीं आपल्या दुःखांत चूर, मग तिला ही कल्पना कशी यावी ? ह्या आईच्या उदासिनतेमुळें माझें मात्र बरेंच नुकसान होत गेलें

ह्या वेळच्या जमखंडीच्या वास्तव्यांत एक चमत्कार घडला एके दिवशीं दोन तासांचे सुमारास आईनें कांहीं काम सांगितल्यावरून रामभाऊ पोंक्षे यांजकडे मी जात होतों हें आमच्या चुलत आत्याबाईंचें घर इतक्यांत सडकेवर जिकडे तिकडे काळोख पडून दिशा धुंद झाल्यामुळें पुढचें कांहीं दिसेना, म्हणून इकडे तिकडे पाहूं लागलों तों सहज नजर वर गेली लाखों करोडों टोळांचे थवे उडून चालले आहेत व जें वाटेंत मिळेल त्या झाडावर बसून ते खाऊन फस्त करीत आहेत, असें दृष्टीस पडलें इतक्यांत रस्त्यांत जिकडे तिकडे मनुष्येंच दिसूं लागली व जाणत्यांनी हा टोळधाड आहे असें ओळखून त्यांना मारण्याचा सपाटा चालविला पाट्यांच्या पाट्या टोळ मरून खालीं पडूं लागले इतक्यांत दवंडी पिटली कीं, जो कोणी एक पाटीभर टोळ आणून चौकीवर जमा करील त्याला सरकारांतून एक पैसा मजुरी मिळेल. त्या वेळेस शेंकडों मजुरांना तें एक कामच होऊन एका एका मजुरानें एक दोन तासांत आठ आठ, बारा बारा आणे मिळविले इतके टोळ मारले त्याचा एक पर्वतप्राय ढीग चौकी-समोर दिसूं लागला मध्याकाळीं सर्व सामसूम परंतु सकाळीं उठून पाहतात तों शहरांतील झाडावर एक पान दिसेना मग त्यांनी शेतांतील किती नासाडा केला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. असा प्रत्यक्ष प्रसंग कोणावरच येऊं नये अशा प्रकारच्या टोळधाडी त्या वेळीं अधून मधून येत. माझ्याच

पाहण्यात टोळधाडी दोन तीन येऊन गेल्या, म्हणून ह्याचा उल्लेख मी मुद्दाम केला आहे

## पुन्हा तासगांवीं प्रयाण व कांहीं भुताटकीचे प्रसंग

आई पंढरीच्या वारीहून परत आल्यावर आम्हीं दोघे म्हणजे आई व मी परत तासगांवीं आलों ह्या वेळीं आमचा मुक्काम घरींच होता काम पडलें तरच जोगाकडे तिचें जाणें असे माझें जेवण जोगाकडेच होई श्री हणमंतराव उर्फ मामासाहेब (सर्व जण त्याना मामा म्हणत) हेच स्वत देवाची पूजा करीत बाराही महिने ते गुरुचरित्राचें पारायण (सप्ताह) करीत त्याच्या घरीं भुताटकीचा थोडा प्रकार असे कधीं कधीं त्यांच्या मोठ्या सुनेच्या अंगांत येऊन ती आठ आठ दिवस अंथरूणावर पडून असे काहीं खाणें नाहीं, पिणें नाहीं, जवळ जवळ सर्वच विधी बंद तिचे आजे सासरेच तिच्या अंगांत येत त्यांनींच हा गुरुचरित्राचा सप्ताह करण्यास मामाना सांगितलें होतें. त्यांनीं बाराही महिने तो करून जन्मभर त्याचें आज्ञेचें पालन केलें ते कधीं कधीं सुनेच्या अंगांत येऊन सप्ताह ऐकण्यास बसत बरेच दिवस सप्ताह ऐकल्यावर त्यांनीं एके दिवशीं असे सांगितलें कीं, मी देतों हा नारळ जपून ठेवा, व लवकरच काशीस जाऊन ह्या नारळाचें विसर्जन काशीस गंगेंत करा म्हणजे मला मुक्ति मिळेल त्याच्या सांगण्याप्रमाणें ते पुढें लवकरच सहकुटुंब काशीस गेले व तीर्थ विधी वगैरे करून पिशाच्यानीं दिलेला नारळ गंगेंत टाकला सर्व त्रिस्थळीं करून परत तासगावीं आले मग मात्र त्या नंतर सुनेचें अंगात आलें नाहीं.

ओघानें आलेंच आहे म्हणून सांगतो त्यावेळीं त्याचें घरीं काही काही चमत्कार घडत कपड्याचे गाठोडें बांधून खुंटीवर टांगले आहे. परतु वरचे वस्त्र शाबूत असून आंतील कपड्याची राख रांगोळी झालेली आढळून येई. सुनेच्या अंगांत आल्यावर ती अन्नपाण्यावाचून पाच पाच सहा सहा दिवस उपाशी राही पुन्हा भुतांनीं सोडल्यावर नेहमी न थकता कामाला लागे वगैरे गोष्टी मला आज पाहिल्यासारख्या आठवतात. मामाच्या कुटुंबावरही ह्या भुताटकीचा थोडा परिणाम झाला होता त्या भ्रमिष्टासारखें करीत. त्यांचें सोवळें फार कडक असे घरचा स्वयंपाक त्या स्वत:च करीत बायको माणस

पण फार हुशार सर्व संसार पार पडलेला, चार सहा मुलें बाळें पदरीं, घरदाज हसन मुखी, परंतु वृत्ति ही अशी कीं, स्वयंपाक झाल्याबरोबर उष्टीं खरकटीं सर्व कामें करून खाकेंत लुगडें दाबून चालली बाई ओढयावर ! अगदीं वरच्या बाजूस की जिकडे वर्दळ कमी मग तेथें मनसोक्त स्नान करून शुद्ध वस्त्र नेसून सायंकाळीं घरीं सुनेनें पुन्हा केलेला स्वयंपाक, त्यात तिचें भोजन होई काकूच्या बरोबर मला नेहमी सोबत म्हणून ओढयावर जावें लागे सुनेच्या अंगात आलें, किंवा मामाना सुहेर सुतक वगैरे सारखा अटकाव आला, तर देवाची पूजा करून सप्ताहाचें पारायण मलाच करावें लागे त्यामुळें माझे अभ्यासाचे बरेंच नुकसान होई शिवाय गुरुचरित्राचें वाचन कांहीं सोपी गोष्ट नव्हे मोठ्या मोठ्यांना सुद्धा जे वाचावयास जड जातें ते माझ्या सारख्या अल्पवयी मुलानें वाचणें म्हणजे वैतरणी पार करणेंच आहे आणि ज्यांचें गुरु-चरित्र जवळ जवळ पाठच झालें आहे अशा मनुष्यासमोर ' मामा स्वत सप्ताहाच्या वेळीं जवळ बसत. श, ष, स, वगैरे अक्षरांचे उच्चार ठीक करावे लागत व त्यात चूक झाली तर ते सांगत तरी एखादें वेळीं वाचतां वाचता चुकेच मग त्याना राग येई व जें हाताशीं येईल त्याचा प्रहार ते दुरून माझ्यावर करीत अशाच एके प्रसंगीं वाचता वाचतां मी चुकलों, तेव्हां त्यांचा राग अनावर होऊन हाताशीं गधाचें एक मोठें खोड पडलें होतें, तेंच उचलून धाडदिशीं माझ्या टाळक्यावर आपटलें त्यामुळें कपाळाला खोंक पडून त्यातून भळभळा रक्त वाहूं लागलें माझ्या किंकाळीमुळे जवळच मडळी होती, ती धावून आली. लवकर उपचार झाल्यामुळें रक्त वाहणें बद होऊन ते दिवसाचें सप्ताहाचें काम पुरें केले तरी बरें कीं, घाव विशेष खोल नव्हता लवकरच ती जखम बरी झाली पण जन्माची आठवण राहिली पुढे पुढें सवयीमुळें माझेंही वाचन चांगलें होऊ लागले आतां मी चांगलें वाचतों असा भरंवसा त्याना आल्यामुळें मग ते माझ्या वाचण्याचे वेळीं तेथें बसेनासे झाले. जोगांचें घराणें मोठें असल्यामुळें असे अटकावाचे प्रसंग त्याचेवर नेहमीं येत व असे प्रसंग आले कीं, मला पोथी वाचावी लागे. वर लिहिल्यासारखे प्रसंग कधीं कधीं येत रोजचें काम एवढेंच होतें. वेळेवर जेवावयास जावे, वैश्वदेव करावा, चार पत्रावळी लावाव्या, थोडी पत्रावळीचीं पानें भिजवून ठेवावीं, जेऊन घरीं यावें. एखादे वेळीं रविवारीं वगैरे वकीलाबरोबर बाजारांत जावें व ते देतील

तो किरकोळ सामान आणून घरीं पोहोचवावा इतकीं यजमानांच्या घरचीं कामें मला करावीं लागत

## प्राथमिक शिक्षण पुढें चालू

ह्याच्या मोबदला पक्तीस बसून सुग्रास भोजन करावें व शाळेला जावें, अभ्यास करावा ह्या वेळीं नंबर दोनच्या शाळेंतील मास्तरानीं आग्रह केल्या-मुळे माझें नांव त्या शाळेंत दाखल केलें त्या ठिकाणीं माझी दुसरी व तिसरी अशा दोन इयत्ता पार पडल्या येथेंही शिकविण्याचा तोच ढचरा उपरणें आणून खुर्चीवर टाकावें व हेडमास्तरानीं चकाट्या पिटण्याकरितां जे बाहेर जावें ते घटा घंटा त्यांचा पत्ताच नाहीं, तशीच सहाय्यक शिक्षकांची स्थिति कोणी विचारता नाहीं की पुसता नाहीं भोसलेशाहीचा खराच मासला होता तरी बरें कीं, ती सरकारी शाळा होती गांवठी असती तर विचारावयास नको अशा ठिकाणीं आमचा अभ्यास कसा होत असेल ते वाचकांनींच ओळखावें अभ्यास न केल्याच्या तक्रारी मात्र वरचेवर घरीं येत, व त्यामुळें मग मिळून बोलणीही खावीं लागत आईला म्हणजे ह्या गोष्टी ठाऊक नव्हत्या असे नाहीं परंतु मास्तराच्या मर्जीस्तव तिला आम्हाला बोलावें लागे. ह्या कारणानें त्या बोलण्याचा परिणाम तितकाच होई

## शिक्षण चालू असतां मध्येंच एक उठलेली हूल (सोन्याचीं पांखरें)

अशा तऱ्हेनें आमचा अभ्यास सुरू असतां काहीं मुलानीं हूल उठविला कीं, भिलवडी औदुंबराजवळ कृष्णेच्या काटीं सोन्याचीं पांखरें आलीं आहेत आम्ही सर्व घरची मंडळी उद्या पहाटे उठून पाहावयास जाणार आहोंत झालें ' एवढें समजण्याचा अवकाश ? लागलीच शाळेतील काहीं मुलानीं जाण्याचा बेत केला सकाळीं सहाला एके ठिकाणीं जमण्याचें ठरून मुलें आपापल्या घरीं गेलीं ठरल्याप्रमाणें भिलवडीस पाखरें पाहण्यास सुमारें नऊ--दहाचे सुमारास कृष्णाकाठीं जमा झालीं तयार झालेली मुलें काहीं फार नव्हतीं आम्हीं चारजणच होतों बाकीच्या तीन मुलांच्या पालकांना आमचा झालेला हा मनसुबा कळल्यामुळें आमच्या पाठोपाठ पालकही भिलवडीस येऊन पोहाचेले व त्या मुलाना रागे भरून व मला आमच्या आत्याबाईच्याकडे पोहोचवून मुलांना घेऊन ते परत तासगावीं गेले माझ्या घरीं तडका फडकी

येण्याला कोणी नव्हतेंच. परत गेलेल्या पालकानीं माझ्या घरीं जाऊन आईला सांगितलें कीं, मुलगा खुशाल आहे, काळजी करूं नका, आम्ही त्याला त्याच्या आत्याबाईकडे पोहोंचविला आहे. उद्यां तो परत येईल. ह्याप्रमाणें पांखरें पाहण्यास गेलेली आमची स्वारी हिरमुसलें तोंड करून दुसरे दिवशीं परत घरीं आली. त्याच दिवशीं आत्याबाईनीं जाऊं दिलें नाहीं. म्हणून आमचें येणें तेंच दिवशीं होऊं शकलें नाहीं. कारण जेवण्याखाण्याशिवाय मुलाला तसाच कसा परत धाडला, म्हणून लोक नांवें ठेवतील. आत्याबाई चुलत घराण्यांतील होत्या तरी त्या काळचा रिवाजच असा होता कीं, सहसा विपरीत गोष्टी घडत नसत. एकमेकाचें एकमेकाला सहाय्य होई.

## कांहीं कौटुंबिक हकीकत

सर्व मंडळींची एकजूट असे. आमच्या चार आजोबांचे सर्वांचे मिळून नऊ मुलगे. त्या सर्वांचीं बायकामुलें मिळून सर्व घरांत ५०।६० मनुष्यें वावरत होतीं. शिवाय गांवांत दिलेल्या मुलीवाळींचा परिवार निराळाच. लग्नकार्यांत मदतीला आम्हांला दुसऱ्या कोणाला बोलावण्याचा प्रसंग येत नसे. घरांतील सर्व परिवार मिळून शें सव्वाशें मनुष्यें होतीं. त्यांत सर्व प्रकारचीं मनुष्यें असल्यामुळें कोणतें काम अडत नसे. असे प्रसंग पुष्कळदां आले कीं, एखादें कार्य आज मध्याकाळीं ठरलें तर दुसरें दिवशीं संध्याकाळपर्यंत मंडप घालून सर्व जागा साफसूफ होऊन, दळण, कांडण, सांडगे पापड वगैरे सुद्धां सर्व तयारी होऊन जाई. त्या वेळीं माहेरवासणींचा संच चांगला होता व पुरुष मंडळीही वेळेवर उपयोगी पडत. त्यामुळें कधीं कोणत्या कार्यांत उणेपणा वाटला नाहीं. जेवणाखाण्याकरितां घरचींच मंडळी शें सव्वाशें होत. ह्या रीतीनें सर्व बाजूनें संभाळ होत असल्यामुळें गांवांत चार चौघांत प्रतिष्ठा होती, व कार्य केव्हांच उरकून जाई हें कळत सुद्धां नसे.

माझे एक चुलत चुलते असत. त्यांचें नांव मोरभट लिमये. त्यांची व माझी फार गट्टी असे. ते माझ्याशीं फार प्रेमानें बोलून आपल्या बरोबर कधीं फुलें आणण्याकरितां, कधीं एखाद्या मळ्यांत भाजीपाला आणण्याकरितां, कधीं नुसतें सहज फिरावयास म्हणून घेऊन जात. त्यांचे परिचयाचे कांहीं

बागवान असल्यामुळें काकाना ते कधीं भाजी, कधी कांदे, कधी फळें वगैरे मोठ्या आवडीनें देत व त्या बरोबरच काका मलाही त्यांतून कांहीं देत

शिवाय त्याना एक नाद आपली जागा किती आहे ? कोणाची हद्द कोठपर्यंत आहे ? वगैरे ह्या कामांत मी त्याना उपयोगी पडावें. घराच्या झालेल्या फारकतीची प्रत्येक कुटुंबाजवळ एक एक नक्कल असे त्या प्रमाणे आमच्या आईजवळही एक नक्कल होती ती त्यांनीं माझ्याकडून काढवावी व आपली काढावी आपापल्या हिश्शाच्या सर्व जागा नापाव्या किंवा माझ्याकडून नापवाव्या व मग समजावून सांगावें की, ही येथपासून येथपर्यंत माझी जागा ही तुझी ही अमक्याची व ही शेवटली गोपाळ भट यांची आमच्या सर्व कुटुंबाची मिळून होणारी जागा फार मोठी होती त्याच्या मुख्य चार वाटण्या झाल्या होत्या प्रत्येकाचे वाटणीस सुमारें ६० हात रुंद व १०० हात लांब अशी जागा आली होती आमच्या वाटणीचे जागेंतच मोठें फाटक व जाण्याचा शौचकूप असल्यामुळें आमची बरीच जागा वर्दळींतच जाई शिवाय विहिरीवर रस्ताही आमच्याच जागेतून जाई त्या मुळेंही आम्हांस वर्दळ सोसावी लागे. कारण सर्व आळींत आमचाच विहीर चांगली असल्यामुळें आळींतील पुष्कळशी मंडळी आमच्याच विहिरीवर पाणी भरण्यास येत. त्यांत गुरवाचा भरणा जास्त होता त्यांच्याकरितां दुसऱ्या बाजूस गिरीं लावून निराळी सोय करण्यांत आली होती आमच्या घरीं आई व मी दोघेच असल्यामुळें ह्या त्रासाचें आम्हाला मोठें महत्व वाटत नसे पण या त्रासाची जाणीव काकांनीं मला करून दिली होती सर्व गोष्टी गमतीनें होत त्या बद्दल आम्ही कधीं तक्रार केली नाहीं शिवाय आमची कांही जागा पांडुरंग भट वापरीत काहीं जागा दुसरे एक चुलते सदाशिव भट वापरीत थोड्या जागेंत आमच्या आजोबांनीं घर बांधून स्वतःच्या राहण्याची सोय करून ठेविली होती. विहिरीवर पाणी काढण्याकरितां सामाईक दोर लाविला जात असे त्याचें उत्पन्न निराळें लोटून दिल्यासारखेंच होतें तें हें कीं, वर्षांतून दोनदां गणपतीला गणपती अथर्वशीर्षाचा अभिषेक सरकारातून होई अभिषेकाचें काम वंशपरंपरा आमच्याच घराण्याकडे चालत असल्यामुळें त्याची ठरलेली दक्षिणा तेरा आणे असे तें उत्पन्न नऊ भावांत वाटून मिळे त्याच दक्षिणेचा

ढोर विकत घ्यावा, असें सर्वांनीं मिळून ठरविलें होतें ही दक्षिणा वर्षांतून दोनदां मिळे त्याचाच सहा सहा महिन्यांनी एक असे वर्षांतून दोन ढोर येत ते बहुतेक वर्षभर पुरत अशीच दहा बिघे शेतीची विभागणी झाली होती. शेत खडानें दिलें जाई त्यांत सरकारी सारा ९० रुपये देऊन बाकी रकमेचे चार हिस्से होत त्यापैकीं चौथा हिस्सा आमच्या आजोबास एकच मुलगा असल्यामुळें पुरा आमच्या वाट्यास येई. मला तारगाव सोडून जवळ जवळ ५० वर्षें होत आलीं तरी अद्याप तशीच व्यवस्था चालू आहे असें कळतें. सध्या आमच्या वाट्यास आलेल्या घराची वहिवाट दिनकर भटजींचे दोघे मुलगे पाहतात व जें काही उत्पन्न येईल तें तेच घेतात आम्हीं कांहीं देतही नाहीं व घेतही पण नाहीं त्यांनीं घराची डागडुजी करावी आणि रहावें. दिनकर भटजींचा एक मुलगा सावळारामपंत उर्फ तात्यासाहेब जोग ह्याचे चि महादेव-राव जोग वकील यांचेकडे कारकुनी करितो व त्यांचेच घरीं जेवतो. व त्याचा एक धाकटा भाऊ सांगलीस संस्कृत शिकण्याकरिता राहिला आहे त्या मुलांची आई व वडील मरून बरेच दिवस झाले तरी मुलांचा सभाळ जोगांनीं वचन दिल्याप्रमाणें केला आहे आमचे चुलत काका मोरभटजी वारल्यावर त्यांचा वडील मुलगा संभूराम लिमये ज्यांना आम्हीं दादा म्हणत होतो, त्यांची ही वडिलांप्रमाणें माझ्यावर ममता होती वडिलांचा क्रम त्यानीं पुढें तसाच चालू ठेविला होता अशा ह्या ऋणानुबंधाच्या गोष्टी आहेत. वेळेवर जो उपयोगी पडतो तोच सगा सोयरा असे दिवस जातां जातां माझी रंगोपंत सोमण यांचे हाताखालीं नंबर २ चे शाळेंत तिसरी इयत्ता पार पडली

## पुन्हा जमखंडीस प्रयाण व शिक्षणाची हेळसांड

इतक्यांत पुन्हां आम्हांला जमखंडीस आजोबा व आजीबाई आजारी असल्याचें कळल्यावरून जावें लागलें. आमच्या शिक्षणाचा प्रश्न पुन उपस्थित होऊन चौथ्या वर्गाचे शिक्षणाकरिता सरकारी शाळेंत पाठविण्याचें ठरलें त्या-प्रमाणें माझे मामेभाऊ काशिनाथ भट हे आतां बरेच समजूतदार होऊन आपली यजमान कृत्ये पाहू लागले होते ते मला घेऊन शाळेंत गेले त्या ठिकाणी माझे एक चुलत आते भाऊ अताजीपंत पोंक्षे म्हणून चौथ्या वर्गाचे व तुकडीवर मास्तर होते चौथ्या वर्गाच्या दोन तुकड्या होत्या. एका तुकडावर

हेडमास्तर व दुसऱ्या तुकडीवर पोंक्षे मास्तर. हेच दोघे चौथा वर्ग साभाळीत त्या शाळेंत चारच वर्ग असत. चौथा वर्ग झाला म्हणजे मुलें इंग्रजी शिक्षणाकरितां जवळच असलेल्या हायस्कूलात जात काशिनाथ भटजी हेडमास्तरांना भेटले व स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट दाखल केल्यावर माझें नांव चौथ्या वर्गाचे ब तुकडींत दाखल केलें दोन्ही वर्ग मिळून सरासरी ८०, ९० मुलें होतीं दोन मास्तर मिळून त्या वर्गाचें काम करीत. माझे आते भाऊ त्या वर्गाला गणित शिकवीत. मीं नुकताच पास होऊन त्या वर्गात आलों होतों माझा कांहींच अभ्यास झाला नव्हता पुस्तकें वगैरे घेण्यातच दोन दिवस गेले तिसरे दिवशीं वर्गांत व्यवहारी अपूर्णांक हा विषय चालला होता. त्यामध्ये चे, गुणिले, भागिले वगैरे बरींच चिन्हें आहेत असें एक उदाहरण मुलांस करण्यास फळ्यावर लिहून दिलें होते. बिचारीं मुलें त्यानाही त्याची पुरी माहिती अद्याप झाली नव्हती. असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होतें सर्व मुलें पाट्या घऊन स्वस्थ फळ्याकडे पहात बसलीं होतीं तें उदाहरण कोणाला कांहीं सोडवितां येईना मास्तर मोठे रागीट दिसले उदाहरण मुलाना येत नाहीं असें पाहून त्यांनी बेत उचलला व प्रत्येकाला दोन दोन चार चार छड्याचा प्रसाद देत माझे जवळ येऊन पोहोंचले. कोणताही विचार न करिता माझे-वरही त्यांनीं तोच प्रयोग केला, मी नवीन अपूर्णांक कशाशीं खातात ह्याची सुद्धां माहिती नाहीं वर्गांत मुले अनोळखी मास्तर नात्याचेच असल्यामुळें ते मला ओळखत असत परंतु कशाचाहि विचार न करिता माझ्यावरही छडीचा प्रयोग झाल्यामुळें तो मला सहन झाला नाहीं व मी तसाच उठून घरीं आलों. परतु सागण्यास हें आश्चर्य वाटतें कीं, माझ्या घरीं येण्याची चौकशी कोणींच केली नाही मास्तराना तरी काय जरूर? सर्व भाडोत्री शिक्षण, त्यांच्या पगार वाढींत कांहीं खोट आली नाहीं म्हणजे झालें मग कशी बशीं मुलें पास झालीं म्हणजे पुरे मग मुलांना तो विषय समजला किंवा नाही हें कोण पाहतो? ह्याच व्यवहाराला अनुसरून शाळेंतून सुद्धा विचारपूस झाली नाही पुन्हा माझे दिवस फुकट जाऊ लागले त्यावेळीं जमखंडीस असे पर्यंत सुमारे सहा महिने एका नातलगांचे ओळखीनें कानडी शाळेंत नावाला मात्र जाऊ लागलों त्यांत एवढा फायदा झाला कीं, जें कांहीं झालें होते तें विसरून कानडी मुळाक्षरें मात्र पदरीं पडलीं.

## थोडी आजोळची हकीकत

ह्याच संधीस आजोबा व आजीबाईंचा अंत झाल्यामुळें मामा त्यांचा सर्व मसार घेऊन दुसऱ्या एका घरांत राहूं लागले, व आमच्या आईस अण्णाचा मसार साभाळावा लागला आतां काशिनाथ भटजींचेंही लग्न होऊन अण्णाची सून घरीं आली होती ती लहान असल्यामुळें स्वयंपाक पाणी वगैरे सर्व आईसच करावे लागे वेद शाळा अद्याप अण्णांचेकडेच होती दिवसभर अण्णा बहुतेक अंथरुणावर पडूनच असत ते ज्योतिषी असल्यामुळें प्रश्न वगैरे विचारण्यास त्यांचेकडे पुष्कळ लोक येत त्या प्रश्नावरच त्याना रोजची दोन तीन रुपये प्राप्ती होई शिवाय ५०।६० बिघे जमीन असे. तिचेंही उत्पन्न येई घर स्वत चें होतें परंतु अधळेपणामुळें त्यांना नेहमीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागे आम्हांपैकीं जो कोणी त्या वेळीं जवळ असेल त्यानें पंचाग घ्यावें व ते जें जें काही विचारतील त्या त्या प्रमाणे पंचांगांत पाहून त्याना कळवावें. मग त्यानीं आपल्या अडाक्याप्रमाणें विचार करून सर्वांच्या प्रश्नाचीं उत्तरें द्यावीं असा त्यांचा क्रम चाले ते पत्रिका वगैरे करीत तरी त्या दुसऱ्याचे सहाय्य घेऊन कराव्या लागत. पुढें पुढें त्याचा दत्तक मुलगा त्याच्या उपयोगी पडूं लागला

आतां आईला तिच्या मातोश्रींचा आधार नाहींसा झाला म्हणून तिनें एक म्हैस विकत घेतली होती. तिचें दूध काढावें, तें विरजावें, ताक करावें, लोणी काढून विकावें हा तिचा उद्योग सुरू झाला दिवसभर म्हशीची उस्तवारी करण्यांतच तिचा वेळ जाई. आणि दिवसभर करण्यास इतर कामही नव्हतें. कारण स्वयंपाक सायंकाळींच होई अण्णा रात्रीं आठ वाजतां जेवत. त्या बरोबरच आमचींही जेवणें रात्रींच होत दिवसा आम्हांला काही भात वगैरे होई घरची म्हैस असल्यामुळें दूध मात्र खूप प्यावयास मिळे शिवाय दहीं, ताक, लोणी, तूप होतेंच. म्हैसही चागली मिळाली होती ती दर वेळेस सुमारें ४।५ शेर दूध देई इतक्या दुधाची रोजच्या रोज निरवा निरव आईला करावी लागे स्वतंत्र घर असल्यामुळें दुधाची व्यवस्था तिला स्वतत्रपणें लावता आली. दोन दोन शेराच्या दोन बध्या ( रतीब ) ही होत्या ह्या प्रमाणें सहा महिने गोड चाललें परंतु पुढें एका एकीं म्हशीचे रेडकू गेल्या मुळें एकदम म्हैस आटली व दूध देईनाशी झाली मग आईनें विचार केला कीं, आतां थोड्याच

दिवसांत पुन्हां तासगावीं आपणास जावें लागणार ? मग म्हैस ठेवून तरी काय करावयाची ? तिला विकून टाकावी ह्या प्रमाणें विचार होतांच एक गिऱ्हाईक पाहून म्हशीला विकून टाकलें आली ती किंमत घेऊन ती मोकळी झाली पुढें तेथें असे पर्यंत माझें शिकण्याचें जमलें नाहीं तें नाहींच दुसरा कांहीं उद्योग नसल्यामुळें आईला तिच्या कामांत मदत करावी. पाणी भरावें, आपले कपडे वगैरे दूर विहीरीवर जाऊन धुवून आणावे, काशिनाथ भटजींनीं सांगितल्यास यजमानाकडची पूजा करून तेथून भोजन उरकून दोन पैसे दक्षणा घेऊन परत यावें, व सायंकाळीं सीताबाई जोशी म्हणून अण्णाची एक भावजय होती त्यांच्या कडे जाऊन तेथें बसून गोष्टी ऐकाव्या त्यांच्या कडे गप्पा करणारांची एक बैठकच रोज जमे गोष्टी चांगल्या रात्रींपर्यंत होत. मग रात्र झाली कीं, आम्हीं निजावें सीताबाईनाही मूल बाळ कांहीं नव्हतें त्यानीं ही एक मुलगा दत्तक घेतला होता त्याचें लग्न ही झालें होतें व आतां घरांत सून आल्यामुळें घर नांदतें झालें होतें मागें मीं भास्करभट जोशी याचा उल्लेख केलाच आहे त्याचेच वडील चिरंजीव म्हणजे माझे मानलेले मामा वरील बैठकींत नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगत गोष्टींत सर्वच प्रकारचे रस असल्यामुळें त्या त्या रसाचे श्रोते तेथें वेळेवर हजर असत त्यामुळें करमणूक होऊन दोन तास आनंदात जात कधीं कधीं वेळ जाईनासा झाला म्हणजे आम्हीं तेथेंच तात्या सोनार असत ते तेथें सहकुटुंब दुकानासह होते. त्याचेकडे जाऊन बसावें, दुसरा कांहीं उद्योगच नव्हता कसातरी वेळ गेला पाहिजेना !

गेल्या जमखिंडीच्या वास्तव्यांतील एक गोष्ट सांगावयाची राहिली ती सांगून हें जमखिंडीचें तिसरें वास्तव्य पुरें करू आमचे अण्णा गणपती आळींत रास्त्यांच्या वाड्यांत राहात तो वाडा त्यांचेकडे गहाण म्हणून होता आप्पाचे बरोबर त्यांचे एक मित्र चिंतामणराव पुणतांबेकर म्हणून असत तेही त्याच वाड्यांत राहात दोघानीं सामाईक मिळून रास्त्याना कर्जाऊ पैसे दिले असें आमच्या ऐकण्यात असे पुढें आप्पा निवर्तल्यावर तो वाडा रास्त्यानीं सोडविला. व ते स्वतःच जमखंडीस येऊन राहूं लागले आप्पाच्या वेळीं आम्हीं त्या वाड्यात राहात असतांना अण्णाचे घरीं जाण्याचा आम्हांस नेहमींच प्रसंग येई तिकडे जाण्यास जवळच्या व दूरच्या मिळून ५।६ वाटा असत. त्यांतल्या त्यांत अगदी जवळची अशी एक वाट असे ती आमचे पिछाडीस आमचे

गुरुजी जे करंदीकर त्यांचें घरातून होती त्या वाटेनें त्यांच्या घरातून गेलें कीं दोन तीन मिनिटात अण्णाचे पिछाडीचे दारात जाऊन मनुष्य पोहोंचत असे व त्या वाटेचा आम्ही घराचे मालकाचे परवानगीनें सरोस उपयोग करीत असू त्यानीं विद्यार्थांनीं आम्हांस कधींच अटकाव केला नाहीं व बोलाचालीचा तर प्रसंग कधींच आला नाहीं अशी त्यानीं आमची वर्दळ कित्येक दिवस सहन केली. केवळ घरोबा म्हणूनच ते आम्हास जाऊ देत. पुढें हल्लींचे केसरीचे मुख्य संपादक श्रीमान तात्यासाहेब करंदीकर यांचे वडील सखारामपंत कुदगोळाहून बदलून जमखडीस आले व आपल्या घरी राहूं लागले पुढें कांहीं दिवसानीं सवड पाहून विहीरीचें खोदकाम त्यांनीं सुरू केलें कारण त्यांच्या विहीरीला पाणी फार थोडें होतें. व आता घरांत मनुष्यें जास्त झाल्यामुळें पाण्याचा पुरवठा होईना त्यानीं सुरु केलेलें खोदकाम जसें जसें होऊं लागलें तसा तसा त्यावेळीं काळा दगड लागला तो सुरुंग लावल्याशिवाय फुटेना. म्हणून सुरुंग लावण्याचें काम सुरु झालें. अशाच एका सुरुंगाचे प्रसंगीं तो पाहण्या करिता तात्यासाहेबांचे वडील खालीं उतरले असता आमची स्वारी अचानक तेथें पोहोंचली वर मनुष्यें कोणी नव्हतीं सर्व माणसें आपापल्या कामात होती आम्हीं उपद्व्यापी होतों हें ठरलेलें. रिक्त हस्तें कधींच कोठें जावयाचें नाहीं त्यावेळीं आमचे हातीं भला मोठा कांचेचा तुकडा होता आम्हीं खालील भागाचें निरीक्षण करीत असतांना आमच्या हातातील तुकड्यास आमचे हातीं राहणें न आवडून त्यानें तळ पाहण्याचा निश्चय करून तो तुकडा हातांतून निसटला, व खालीं सखारामपंताचे आंगावर पडला परंतु सुदैवानें त्यास फार इजा झाली नाहीं तरी त्याचा परिणाम व्हावयाचा तोच होऊन कांहीं दिवस आमचे स्वतःचे जाणें येणें त्या घरांतून बंद झालें. त्यातल्या त्यांत घाव ओझरताच लागला होता म्हणून बरें नाहीं तर एक जन्माचें दुखणेंच होऊन बसावयाचें. पण थोडक्यात निभावलें पुढें ते बरें झालें व घावही भरून आला आमचें जाणें येणें पुन्हा सुरू झालें, व झालेली गोष्ट सर्व विसरले. तरी त्या घरातून जातांना आम्हांस भीतीच वाटे म्हण आहे ती खरी आहे खाई त्याला खवखवतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं त्यावेळीं हल्लींचे केसरीचे संपादक तात्यासाहेब हायस्कूलांत शिकत असत. ते आमच्याशीं मोठ्या प्रेमानें वागत व नेहमीं आमची विचारपूस करीत जरी

ह्या गोष्टीस आज ५०।५५ वर्षे झालीं तरी ती गोष्ट अजूनही मला चांगली आठवते

## रामतीर्थावरील रमण्याचें वर्णन

श्रीमंत रामचंद्रराव आप्पासाहेब ह्यांचे वेळीं रामतीर्थास ब्राम्हण भोजनें फार होत. कारण त्यांचें दानधर्माकडे विशेष लक्ष असून ब्राम्हणांचें उच्छिष्ट आपल्या घरीं पडावें व त्यांनीं जेवून खाऊन संतुष्ट असावें असें त्यांना नेहमीं वाटे म्हणून वर्षांतून दोन तीनदांतरी अशा सामुदायिक ब्राम्हण भोजनाचा प्रसंग येई त्यात गांवांतील तर सर्व भिक्षुक वर्ग असेच परंतु बाहेरचेही मोठ-मोठे विद्वान ब्राम्हण असत अशा तऱ्हेच्या सामुदायिक पण व्यवस्थेशीर पत्तीचा योग आजकाल राजेरजवाड्याकडे सुद्धां फारच कमी प्रमाणावर दिसून येतो अशा पंक्तींना लागणाऱ्या सामानाचा गंज नेहमीं पाटापासून तो बारीक सारीक सामानापर्यंत नेहमीं जय्यत तयार असे जशी कांहीं लढाईची पूर्व तयारीच पंक्तीची व्यवस्था पाहण्याकरितां म्हणून एक खास पंक्ती कामगार म्हणून जबाबदार अधिकारी नेमला असे त्याच्या हुकुमानें सर्व कामे वेळच्या वेळीं पार पडत पहिली घंटी वाजल्याबरोबर एक कामगार येऊन पाहून जाई कीं, मंडप बिंडप ठीक आहे कीं, नाहीं ? जमीन सारवली व केर काढलेला आहे कीं, नाहीं ! ही त्याची पाहणी झाल्यावर त्यात कांहीं उणेपणा आढळल्यास ताबडतोब ती उणीव भरून निघे सामानाची कांहीं कमी नव्हती सर्व कच्चें सामान तयार असे वहींत सर्व प्रकारच्या नोंदी करून ठेवाव्या लागत. मंडप व जागा दुरुस्त असल्याची वर्दी आल्याबरोबर दुसरी घंटी होई लगेच जिकडे तिकडे पाटच पाट दिसू लागत ठराविक पाटाच्या पंक्तींना दोरी सूत लागल्याबरोबर गुलाल रांगोळीवाले हजर होत लागलीच पानें द्रोण यांची वाटा होई सर्व पानें व द्रोण मांडून झाल्यावर मंडळींना फाटकातून आंत सोडण्याची व पानावर बसण्याची सूचना होई. त्यांत हा मोठा हा लहान हा कांहीं पंक्तिप्रपंच नसे वाटेल त्याने वाटेल तेथें बसावें कोठेंही बसण्यास कोणाला मज्जाव नव्हता श्रीमंतांचा हुकूमच असा होता कीं, लहान मूल असो कीं, कोणी मोठा असो सर्वांनीं सरसकट बसावें कोणाचा अपमान होतां कामा नये एकादा मुलगा मध्येच एखाद्या ठिकाणीं बसल्यास त्याला

तेथून कोणीही उठवीत नसे मंडळी सोंवळें नेसून पानावर बसताच पुन्हा वाढण्याची घटा होई मग वाढणें सुरू होई. पहिल्या प्रथम मीठ तर मीठ सगळ्या पानावर मीठ पडे मग एका मागून एक भाज्या येत, नंतर चटणी कोशिंबिरीचें वाढणें होई, नंतर ठराविक पक्वान्नें व पुऱ्या येत मग भात, वरण व शेवटीं तूप येई. प्रत्येकाचे वाढपी ठरलेले असत ज्या त्या वाढपाचा जो तो जबाबदार ' त्या प्रत्येकावर एकेक मुख्य वाढपी असे. ह्या प्रमाणें सर्व तयारी झाल्या बरोबर श्रीमंतांना सूचना मिळे. ते तयारच असत. लागलेंच उदक सोडलें जाई. उदकाचा मंत्र सांगण्याचें काम आमच्या मामांच्याकडेच असे तें काम उरकल्यावर " पार्वती पते हर हर महादेव " होऊन जेवण सुरू होई मधून मधून श्रीमंत स्वत पक्वान्न वाढावयास घेत व पंक्तींतून स्वतः जातीनें फिरून सर्वांचा परामर्श घेत. आग्रह करीत. श्रीमताचे पाठीवर एक गळूं झालें होते त्यापासून त्याना फार दु ख होई तरीही सर्व पक्तींत ते जातीनें फिरत- विशेष भोक्ता असेल त्यास ते स्वत आग्रह करून वाढीत

अशा पंक्तीस जाण्याचा आमचेवर नेहमींच प्रसग येई आतां ते यजमा- नही नाहींत व त्या पंक्तीही नाहींत. आजकालचा काळच निराळा आहे दानधर्माचा ओघही बदलला आहे सर्वच बाबतींत अंतर पडूं लागलें आहे कालची गोष्ट आज दिसूं शकत नाही रोज काहीं तरी नवा प्रकार दिसून येतो ५०।६० पर्यंत लाडू अगर वेळणी दोन वेळण्या केशरी भात, पाव पाव तूप, तशाच वेळण्या दोन वेळण्या जिलब्या पचविणारे त्या काळीं होते ते नुसते खातच होते असे नाहीं तर प्रसग विशेषीं जबर अग मेहनतही ते करीत.

## पुन्हां तासगांवीं आगमन आणि शिक्षण चरितार्थ या संबंधीं थोडा उहापोह

आजोबा आजी निवर्तले मुख्य आधार नाहींसा झाला अण्णांची सून कर्ती सवरती झाली अण्णाचेंही देहावसान झालें आना "नवी विटी व नवा ससार " तेथे सुरू झाला आईला तेथें राहण्याची काही आवश्यकता उरली नाहीं. म्हणून आईनें विचार केला कीं, आता घरीं जाऊन बसावे व यज- मानाच्या कडे बनतील ते काबाडकष्ट करून चरितार्थ चालवावा मुलांपैकीं

अद्याप संसार चालविण्याजोगता मुलगा कोणीच तयार झाला नव्हता. तेव्हां तिनें तरी दुसरा कोणता विचार करावा? घरीं चार जणांत जाऊन पडलें कीं, कसे ना कसे तरी दिवस निघून जातीलच दिनकर भटजी महिना काठीं सात आठ रुपये मिळवीत ते ते आईला देत अशा सर्वतऱ्हेनें विचार करून आम्हीं पुन्हां तासगांवी परत आलों ते पुन्हां आईचें जमखडीस जाणें कधींही झालें नाहीं हा योगायोगच म्हणावयाचा दुसरें काय! व मामानींही आग्रह केला नाहीं.

पुन्हा आमचे जेवण जोगांकडे सुरू झालें बहुतेक दोन्हीं वेळ मी त्यांचे-कडेच जेवीत असें तात्या साहेब जोग ह्यांनीं पाहिलें कीं, हा मुलगा गेला तसाच परत आला ह्याचा कांहीं अभ्यास झाला नाहीं तेव्हा त्याना त्या बद्दल वाईट वाटून ते स्वत मला घेऊन नंबर १ चे शाळेंत जाऊन हेडमास्तराना भेटले व त्याना त्यांनीं सर्व हकीकत निवेदन केली त्यावेळीं ते म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते, म्हणून हेडमास्तरांनीं तात्या साहेबांचे सांगण्याप्रमाणें माझें नांव चौथ्या वर्गांत दाखल करून घेतलें. पुस्तकें माझें जवळ होतींच तींच पुस्तकें येथें चालत. त्याच वेळीं तात्या साहेबांचा एक पुतण्याही ह्याच वर्गांत शिकत होता आणखी एक त्यांच्या बहिणीचा मुलगा वामन साने म्हणून ह्याच वर्गांत असे असे आम्हीं तिघे मिळून जुटीनें अभ्यास करूं लागलों मी गेलों त्यावेळीं नुकतेच वर्ग बदलले असल्यामुळें अभ्यासास सुरुवात झाली होती त्यामुळें आमचें बस्तान ठीक बसलें त्यावेळीं क्लासचे मास्तरही गरीब, साधे, भोळे, सरळ स्वभावाचे, मेहनती होते. त्यांचें नांव गोविंदराव दिवेकर होते हेड-मास्तराची त्यांच्यावर फार मर्जी होती. त्यानीं मुद्दाम त्याची बदली येथे करविली होती तेच हेडमास्तराचे घरचा बाजार हाट वगैरे सर्व कामें करीत त्याचें अक्षर उत्तम पैकीं नव्हतें तरी ते सुरेख लिहीत हाजरी लिहिण्याचें व दफ्तरचें सर्व काम तेच सांभाळीत शिवाय क्लासही शिकवीत त्याचें काम ठराविक सांच्याचें होत त्याची अभ्यास घेण्याची पद्धत व सांगण्याची ढब प्रेमळ असल्यामुळें ते गोष्टी समजाऊन सांगत असताना मुलें चित्त देऊन ऐकत. त्यामुळें वर्गांत कोणत्याही प्रकारचा गोंगाट कधींही झाला नाहीं मुलांना विषय उत्तम समजे. त्या प्रमाणेंच कवितांचा अर्थ, व्याकरण, भूगोल, तोंडी हिशेब,

वगैरे सर्व विषय वर्गांत आळी पाळीनें होत कोणताहि विषय सोडून दिला असे कधीं झालें नाहीं त्यांची काम करण्याची धाटणी नियमित असल्यामुळें सर्व विषयाची उजळणी होई. त्यावेळीं गणित पोतदार यांचे चाले. त्यांतील चौथ्या वर्गाचा जो अभ्यासक्रम होता तेथील सर्व उदाहरणें मास्तरानीं आमचे कडून दोन तीनदा करवून घेतल्यामुळें अगदी पाठ झाल्यासारखीं झालीं होतीं वर्गांत सुमारें ४० विद्यार्थी असत परंतु सर्वच मुलें सर्व विषयात तरबेज असत वार्षिक परिक्षेच्या वेळीं सर्व मुलें उत्तम पास झाल्यामुळें मास्तरांची फार तारीफ झाली व वरिष्ठांकडे प्रमोशन बद्दल शिफारस होऊन त्यांना दोन रुपयांची बढती मिळाली. पहिले दहा मिळत ते आतां बारा झाले काय हा मोठा पगार! जेम नेम भाजी भाकरी मिळे ह्या वर्गांतील अभ्यास हीच काय ता आमची पुंजी ह्यालाच भांडवल म्हणा पाहिजे तर ' काय वाटेल ते म्हणा जे केले होते तें एवढेंच हीच आमची पुंजी आजपर्यंत पुरली ह्या बद्दल त्या गुरुजींचे आम्ही अत्यंत उतराई आहोंत.

आमच्या वेळी सुद्धा सकाळ सध्याकाळ शाळा चालत सकाळीं दीड तास खर्डे लिहिणें, नतर भाषा विषय, मग शुद्धलेखन, अगर मोडी वाचन वगैरे होऊन सुट्टी होई दुपारी दोन पासून शाळा पुन्हां सुरू होई लागलीच गणिताला सुरवात होई. ते दोन तास गणित चाले अवडंबर फार नव्हतें त्यामुळें विषय चांगला होऊन मुलांना तो कळत असे मग एक तास भूगोल होऊन शेवटीं परवचा झाल्यावर सुट्टी होई चित्रकारी, कवायत, वगैरे विषयाचें त्या वेळीं, महत्व नव्हते साहेब लोक सुद्धा तिकडे दुर्लक्ष करीत मग ते विषय कोण शिकवितो? फक्त नांवाला मात्र ते विषय वेळापत्रकांत असत त्याचा कधी उपयोग मात्र कोणी केला नाहीं.

तात्या साहेबांचा पुतण्या गणपती, त्यांचा भाचा वामन साने, त्याच्याच वाड्यात बिन्हाडास ताटके होते त्याचा मुलगा व मी असे चौघे एकाच वर्गांत असल्यामुळें सर्वांचा अभ्यास एकाच ठिकाणीं होई केव्हां केव्हां तात्या साहेबही आम्हास कांहीं विषय समजावून सांगत ताटके मोठा कल्पक व हुशार असल्यामुळें आम्हाला त्याची फार मदत होई आमचा रोजचा कार्यक्रम ठरल्यासारखा होता सकाळी आम्हीं सर्वजण सहा वाजतां उठत असू. नंतर

शौच मुखमार्जन, आंघोळ, संध्या, नमस्कार, वगैरे सर्वांचे बरोबरच होत मी त्या वेळीं तात्या साहेबांच्याच घरीं राहत होतों त्यामुळें त्यांच्या बरोबर अभ्यास करण्यास सोपें जाई. नंतर सात वाजता शाळा भरे. ते दहा पर्यंत शाळेंत शिकून परत घरीं घरीं आल्याबरोबर कांही खावयास मिळे नंतर मग तास दोन तास करमणूक बारा वाजतां मामाची पूजा व स्नान संध्या आटपे लागलीच मी वैश्वदेव करून पंक्तीची तयारी करी मग सर्वांबरोबर जेवण होई जेवणानंतर दोन तास शाळेचा दिलेला कांहीं अभ्यास असला तर तो करावा लागे व दोन वाजता पुन्हा शाळा शाळेची सुट्टी ५ वाजतां होई. मग थोडें खाऊन आम्ही सर्व मुलें दत्ताच्या माळावर, अगर ओढ्यावर फिरावयास जात असूं. येतांना देव दर्शन करीत करीत आमचे सर्वांचे घरीं येणें होई आल्याबरोबर पाय धुवुन मामांच्या समोर आम्हां सर्वांस संध्या करावी लागे संध्या झाल्यावर ते आम्हांस स्तोत्रपाठही स्वत सांगत व आमचे जें कांहीं पाठांतर झालें असेल तें म्हणवून घेत त्यावेळीं चहाचा प्रत्येक घरीं शिरकाव झालेला नव्हता मुलांना त्यांच्या ऐपती प्रमाणें दूध प्यावयास मिळे. सर्वांनाच दूध कोठलें? त्याच्याकरितां जोंधळ्याच्या लाह्या व त्याचें पीठ ताकांत कालवून, कधीं चिवडा, कधीं थालीपीठ, असे आलटून पालटून जिन्नस मिळत साधारण सुखवस्तु कुटुंबाच्या घरीं रोज जेवणास भात, भाकरी, वरण, आमटी, एखादी चटणी असे जिन्नस असत जोगाकडे मागील भाता ऐवजीं शिजविलेल्या जोंधळ्याच्या कण्या वाढण्याचा प्रघात होतो परंतु त्यात पंक्तिप्रपंच होत नसे. सर्वांस म्हणजे लहानापासून थोरापर्यंत व यजमानापासून आश्रितापर्यंत सर्वांस एकसारखें वाढत असत त्यावेळीं कधीं कधीं मामाचें कुटुंब (आम्ही त्यांना काकू म्हणत असूं) त्या आपल्या बरोबर सांगली, टाकळी वगैरे ठिकाणीं मला घेऊन जात घरच घोडें असल्यामुळें कांहीं त्रास नव्हता. घोडें गरीब होतें परंतु उंच असल्यामुळें मला त्यावर बसावयास पहिल्या प्रथम भिती वाटे मग संवईनें घोड्यावर चांगलें बसता येऊं लागलें सांगलीचें त्यांचें काम झालें कीं, त्या दुसरे दिवशींला लागलीच परत येत. त्या एखादा सुट्टीचाच दिवस पाहून जात म्हणून आमच्या अभ्यासाचें नुकसान होत नसे आम्हाला ते म्हणजे घरच्या सारखेंच वाटे परंतु एकदां गुरुचरित्राचे सप्ताहाचे वेळीं मार मिळाला असल्यामुळें मामांची थोडी भीतीही वाटे मामा

९५००२ २३।९०।५३

आम्हांला सायंकाळीं तोंडी हिशोबही विचारीत अशा रीतीनें त्या वर्षांत मागील झालेल्या नुकसानीचा बराच वचपा निघून आला वार्षिक परिक्षेत आम्हीं चौघेही विद्यार्थी पास होऊन आम्हा सर्वांस ५ व्या वर्गांत बढती मिळाली परंतु पुढे बाकीचीं तिन्हीं मुलें येथे इंग्रजी शिकण्याची सोय नसल्या-मुळें बाहेर गावीं राहू लागली व मीही आपल्या घरीं गेलों ह्या प्रमाणें वर्षभर जमलेला आमचा गट फुटला मी पांचव्या वर्गांत गेलों माझा स्वतंत्र अभ्यास सुरू झाला, तरी माझें रोजचें जेवण जोगाकडेच असे रात्रीं मात्र आता मी घरीं जेऊं लागलों

आता माझें राहणें कायमचें तासगावीं झाल्यामुळें माझा अभ्यास वेळच्या वेळीं होऊं लागला मोर भटजींचा वामन आमच्यापेक्षां बराच मोठा असून त्याचें लग्न वगैरे झालें होतें त्याच्या मार्फत आमच्या शाळेंतील अभ्यासाची चौकशी आई करूं लागली, कारण तो त्या वेळीं सहाव्या वर्गांत होता. शाळेंत झालेल्या सर्व गोष्टी त्यास समजत व तो आईला सर्व हकीकत सांगे त्यामुळें मलाही धाक राहून मी काळजीपूर्वक अभ्यास करूं लागलो ह्या वर्गाचे मास्तर ट्रेनिंगची दुसरी परीक्षा पास असल्यामुळें त्यांना २० रुपये पगार मिळे, व ते आपलें काम नियमितपणें करीत अभ्यास सर्व होई, त्यांत कांहीं कसर राहत नसे ह्या दोन वर्गांत झालेल्या अभ्यासानें मला शेवटपर्यंत हात दिला. नाहीतर माझी फटफजितीच होती व बाकी कोणी आपुलकीनें सांग-णारा नसल्यामुळें भिक्षुकी किंवा धार्मिक बाबींसंबंधीं शिकणें काहीं झालें नाहीं. पूजा, रुद्र, श्रावणी, श्राद्धसंकल्प, अथर्वशीर्ष, वगैरेंच्या कांहीं सथा गुरुजीकडून मिळाल्या होत्या परंतु त्याचा जाच पाठीमागें नसल्यामुळें त्याचें पाठांतर झालें नाहीं त्यात थोडा उणेपणा राहून गेला व तो मला पुढें जन्म-भर नडला तो कसा नडला ह्याचा उहापोह पुढें करण्यात येईलच. त्या अव-धींत जें कांहीं पाठांतर झालें तें झालें

## आनंदाची बातमी

अशा रीतीनें माझा पांचव्या वर्गाचा अभ्यास चालला असताना एक आनंदाची बातमी आली. एका एकीं कांहीं ध्यानी मनीं नसतां दादाचें पत्र आलें कीं मी नाशकास असून आमचे नाशकाचे उपाध्ये दाते भटजी स्टॅपवेंडर

यांचेकडे राहतो अभ्यास चालू आहे तुम्हाला भेट घ्यावयाची असल्यास येथें होईल. आता आईला विचार पडला कीं, कसें करावें? इतके दिवस त्याच्या निमित्त केलेल्या कष्टाला देव पावला व दादाचा शोध लागला परंतु आतां तेथें जावयाचें कसें? गेलें तर त्याची भेट होईल कीं नाहीं? भेट झाल्यावर पुन तो परत तासगावीं येतो का तेथेच राहतो? वगैरे शंका उत्पन्न होऊन तिचे मन बुचकाळ्यात पडलें. शेवटीं सर्व आश्रयदात्याचा विचार घेऊन त्याला नाशकास जाऊन भेटण्याचें ठरलें काकूनी माझा सांभाळ करण्याचें पत्करलें व थोडें बहुत आर्थिक सहाय्यही केलें, व आई नाशकास एकटीच जाण्यास निघाली त्या वेळीं सदर्न मराठा रेल्वे ही नुकतीच सुरू झाली होती त्या गाडीनें पुण्यापर्यंत जाऊन तेथून जी आय. पी नें नाशकास गेली दाते भटजींचा पत्ता काढीत उपाध्याचे घरीं जाऊन पोहोंचली

त्यावेळीं दादा कोठें बाहेर गेले होते त्याना कोणी बाहेरच्या बाहेरच सांगितलें कीं, तुमची आई आली आहे तेव्हां ते घरीं न येता गंगेवर जाऊन रडत बसले रडण्याचें कारण उघडच होतें ते ज्या वेळेला पळून गेले त्या वेळीं आई सौभाग्यवती होती. आता तिचें वैधव्यदशेंत दर्शन होणार! वडिलाची मरणाचे वेळीं भेट झाली नाहीं वगैरे गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून त्यांच्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्यामुळें ते भाबावून गेले व घाबरल्यामुळे त्यांना घरीं येण्याचे धैर्य होईना तेव्हा चार घरची समजदार माणसें घेऊन आई स्वत च घाटावर गेली व दादाना भेटली नानाप्रकारें त्याची समजूत करून त्याना घरीं आणलें पुढें दोनचार दिवस तेथें राहिल्यावर हळूं हळू त्यांचें मन ताळ्यावर येऊं लागलें दादाचे दु खही शमण्यास काळानें मदत केली ते तासगांवीं चलण्यास कबूल झाल्यावर तेथें फार दिवस न राहतां दादांना घेऊन आई तासगावीं परत आली मी त्याना पूर्वी कधींच पाहिले नसल्यामुळें माझी त्यांची ही भेट अगदीं नवीनच होती त्याना पाहून मला त्यावेळीं मोठा आनंद झाला व वाटलें कीं, माझे काकाच बंधूरूपानें येऊन त्यांनीं मला पुन भेट दिली त्यांचा स्वभाव फारच प्रेमळ, शांत व गरीब असा असल्यामुळें रात्रंदिवस मी अगदीं त्याच्या पाठीशीं असें रात्रींचें निजणें सुद्धा त्याचे जवळच ते घरीं होते तों पर्यंत मी त्याना अगदीं विसंबलों नाहीं ही बातमी हा हा म्हणतां

गांवांत पसरली दादांनीं समक्ष जाऊन सर्वांच्या भेटी घेतल्या तात्यासाहेब जोगानाही भेटले. तात्यांनीं त्याची थोडी चांचणी परीक्षाही घेतली. त्यांनीं सरळ उत्तरें दिल्यामुळें त्यांचेंही समाधान झालें कारण ते थोडेसे चिकित्सक बुद्धीचे होते त्यांना मनुष्याची पारख थोड्या वेळात करता येई असा त्याचा लौकिक होता म्हणूनच वकिली यशस्वी झाली ह्या दादाच्या येथील वास्तव्यांत त्यानीं माझ्याही अभ्यासाची चौकशी केली व ते येथें असत तों पर्यंत त्यानी मला माझ्या अभ्यासात बरीच मदत केली ते मला रोज एखादें इंग्रजी पुस्तक घेऊन त्यातील गोष्टी वाचून दाखवीत कधीं माझ्याकडून अभ्यास करून घेत असे आमचे दिवस दादांच्या सहवासात आनंदांत जाऊ लागले.

## दादांचें लग्न

ह्या अवधींत त्याना मुली सागून येऊं लागल्या त्या पैकी जमखिंडीची आपसातीलच एक गरीब कुटुबांतील मुलगी पसत केली आजीबाई होत्या तो पर्यंत आम्हाला कांही काळजी वाटत नव्हती परतु आतां त्यांच्या निधना-मुळें उभारलेलें कार्य कसें पार पडतें ही आईचे भोंवतीं विवचना सुरु झाली. आईनें आपल्या हितचिंतकाच्या भेटी घेतल्या व सर्वांनी स्वसतोषाने आईला कार्यांत मदत देण्याचें कबूल केलें त्यात जोगाच्या काकूंची मदत फार मोठी लागलीच त्यांनीं शभर रुपये काढून आईच्या स्वाधीन केले. त्या प्रमाणेच इतर हितचिंतकांनी स्वखुशीनें दिलेली मदत घेऊन दादाला घेऊन ती जम-खिंडीस गेली विशेष गाजा वाजा न होता कार्य उरकून घरी परत आली दादाला पुन्हां लवकरच परत जाणे आवश्यक असल्यामुळें आईनें तासगांवी येताना सुनेला काहीं परत आणली नाही नंतर दादा तासगांवीं फार दिवस न राहता नाशकास परत गेले आतां पाठीमागें संसाराचा जाच लागल्यामुळें त्यांना नोकरी पहावी लागली खटपट करता करतां त्याच जिल्ह्यात शाळा-खात्यांत त्याची वर्णी लागून त्याची नेमणूक घोटीस झाली. त्याप्रमाणें हुकूम हातीं पडताच ते घोटीस जाऊन आपल्या कामावर रुजूं झाले पुढें ते वर्षभर घोटीस होते. तेथून त्यांनीं एका सोबत्या बरोबर सुमारें तीन शेर तादुळ वानगी म्हणून तासगांवीं पाठविले ते फारच गोड आणि सुवासिक होते. असे तादुळ आमच्या पाहण्यांत कधीच आले नाहीत. इतका तो उत्तम तादुळ

होता त्या तांदुळाची आठवण अद्याप पर्यंत आम्हाला आहे जसें काहीं आतांच ते तांदुळ खाण्यात आले असें वाटते. पुढें पुढें त्याचे कडून थोडें थोडें खर्चासही येऊं लागले

## दिनकर भटजींचें तासगांवीं येणें व सांसारिक थोडी मधली हकीकत व राघोपंताचा आणि माझा थोडा ऋणानुबंध

ह्या अवधींत दिनकर भटजीही तासगावीं येऊन कायमचे येथेंच राहूं लागले आता त्याचा रोज सहवास घडूं लागल्यामुळें मला आणखी एक वडील भाऊ आहेत अशी जाणीव उत्पन्न झाली इतके दिवस माझा त्याचा संबंध येत नसल्यामुळें मला त्याबद्दल काहीं जाणीवच नव्हती. जमखंडीस असताना एके ठिकाणीं असूनही महिन्या महिन्यात त्याचें माझें दर्शन होत नसे आता ते तासगावीं आल्यामुळे रोज गांठ भेट होऊं लागली दिनकर भटजींचे जमखंडी-च्या वास्तव्यांत लग्नमुंजी आदि अंत्येष्टीपर्यंतचे सोळा संस्काराचे प्रयोग, संहिता वगैरे तयार होते ते तासगावीं येताच त्यांची भिक्षुकी येथें चांगली सुरू झाली त्या वेळीं आमच्या शाखेचा भिक्षुकवर्ग तासगावीं फार कमी होता शिवाय दिनकर भटजींना ऋग्वेदी प्रयोगही अवगत असल्यामुळें त्या पंच-क्रोशींत लवकरच त्यांची बोलबाला सुरू झाली व वडिलाप्रमाणें लवकरच तेहि सर्वांस प्रिय होऊन त्यांनींही चार मित्र जोडले आमचे एक चुलत चुलते मोर भटजींचे धाकटे बंधू राघोपंत लिमये म्हणून होते ते मुनसफ कोर्टांत कारकून होते शिवाय थोडा व्याजबट्टाही करीत त्यामुळें त्यांची कुळें फार असत. त्यांची आमच्या दिनकर भटजी वर बरीच मर्जी होती तसें ते स्वभावानें फार आनंदी लोक त्यांना श्रीमंत ह्या नांवानें ओळखत त्याना बायकोमात्र त्या स्वभावाप्रमाणें मिळाली नव्हती. डोळे अधु, काळी कुस जसा कांहीं कोळसा असा रंग परंतु तिच्याशींच त्यांनीं मोठ्या खुशींत संसार केला त्यांना मूलबाळ काहीं नव्हतें म्हणून मोर भटजींचा दुसरा मुलगा चिंतामणी ह्याला त्यांनीं दत्तक घेतलें होतें तो नेहमीं नोकरी-मुळें बाहेरच असे त्याचा हुद्दा सब रजिष्ट्रारचा होता त्यामुळें त्याना नेहमीं फिरतीवर रहावें लागे त्याचें कुटुंबही मोठें प्रेमळ असे त्यांना दोन पेन्शनें मिळत असल्यामुळें त्याचा विनियोगही ते चागला करीत त्यांच्या वडील मुलींचे

लग्न ह्याच वेळीं तासगांवीं झालें तिच्या सासऱ्याचें आडनाव खाडिलकर आता ती सर्व मंडळी नागपुरास आहेत. खाडिलकराची सर्व नोकरी बी एन रेल्वेंत झाली त्यांच्या वशिल्यानें चिंतामणीच्या एका मुलाला खडकपूरला पॉवर हाऊस मध्यें नोकरी लागली तो सध्या चांगल्या स्थितींत आहे सांगण्याचा मतलब एवढाच कीं, त्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लोभ नातवांनीं सुद्धां पुढें चालू ठेविला आहे तो पुतण्या गेल्या सालीं मुद्दाम सहकुटुंब प्रयाग मुक्कामीं येऊन मला भेटून गेला

राघोपत लिमये ह्यांना आम्हीं बाबा म्हणत असूं त्यांच्या कुटुंबाला माजोरी आई ह्या नावानें आम्ही ओळखीत असूं. बावांनीं थट्टेनें असें म्हणण्यास आम्हांला शिकविलें होतें लहान वयांत तें शोभे. मग पुढें आम्हांलाच कळू लागल्यामुळें असें म्हणणें सोडून दिलें आईचाही स्वभाव प्रेमळ असल्यामुळें लहानपणीं माझें जेवण तिच्याच ताटांत झालें कारण त्यावेळीं त्यांना मूलबाळ कांहीं नसल्यामुळें त्यांच्याकडे लहान मुलाची अपुर्वाई होती, म्हणून माझा लळा त्यांना लागला, व त्या मला प्रेमानें लडिवाळपणानें वागवूं लागल्या व मी जें कांहीं मागेन तें मिळूं लागलें. माझे कपडे लत्ते जें कांहीं मला लागेल ते ते त्यांनीं मोठ्या हौसेनें करावें अशी माझी अपूर्वाई होऊ लागली पुढें आम्हीं जमखंडीस गेल्यामुळें विशेष संघटन राहिलें नाहीं, व त्यांचीही बदली मध्यें कांहीं दिवसांकरितां भीमाशंकरकडे झाली. ते आम्हीं पुढें कायमचे तासगांवीं आलों त्यावेळीं बाबाचीही पुन्हां तासगावींच बदली होऊन ते तेथें राहावयास आले ते देव घेव करीत असल्यामुळें पुष्कळ लोक त्यांचे मिंधे होते. तासगावीं आल्यावर त्यांनीं आपल्या घराचें काम सुरू केलें. त्याला लागणारे गवंडी, मजूर, सुतार वगैरे त्यांचे कर्जदार असल्यामुळें व्याजात त्यानीं त्याच्याकडून सर्व कामें करवून घेतलीं लाकूड फांटा, दगड, माती वगैरेचा सर्व त्या कर्जदाराकडून पुरवठा झाला सुताराचें काम तर आमच्या जागेंत दोन तीन महिने चाललें होतें. तो त्यांचा देणेदारच होता. व्याजांत त्यांनीं त्याचे कडून सर्व काम करवून घेतलें मी त्याचे जवळ सुतारी संबंधी बरेंच काम शिकलों. पुष्कळशा सुतारी संबंधी कामाच्या गोष्टी त्या सुतारानें मला त्या वेळीं शिकविल्या होत्या, व गवंड्याचेंही काम बरेंच येऊं

लागले होतें त्या बळावर आम्ही दोघा भावानीं आमच्या पक्क्या घराचे पिछा-डीस थोडी जागा रिकामी होती ती वर एक खोली बांधण्याचें ठरवून कामाला सुरवात केली त्या कामा करितां लागणाऱ्या माती, विटा आम्हीं पूर्वी हळू हळू घरींच तयार करून ठेविल्या होत्या आमच्या मालकीचा एक मोठा मातीचा ढीग आमच्या जागेंत पडला होता ती माती स्वत उकरून भिजवून त्याच्या आम्हीं दोघां भावांनीं विटा तयार केल्या त्या सुमारें दोन अडीच हजार झाल्या त्या सर्व कच्च्याच होत्या त्या बाजूला पक्क्या विटाचा लोक फार कमी उपयोग करीत तिकडील माती पक्क्याच्या बरोबरीनें काम देई विटा तयारच होत्या मलगे, वासे, चौकट, दार वगैरे सामानाची तयारी बाबाकडे लागलेल्या सुताराचे मदतीनें पूर्वीच करून ठेविली होती तात्पुरते किरकोळ कामाकरितां दोन तीन मजूर लावून तिन्हीं बाजूच्या भिंती आम्हींच तयार केल्या, व त्यात चौकटही बसविली दार फक्त सुतार कडून लावून घेतलें, व मलगे वासे वगैरे ही करितां सुतार लावावा लागला बाकी शाकारणीचें काम गिलावा वगैरे सर्व कामें आम्हींच केलीं. आमच्या मोठ्या घरातून त्या खोलींत दार पाडायचें होतें ती भिंत सुमारें दोन हात रुंद होती पूर्वी त्या भिंतींत मोरी होती त्या मोरीवर एक कमान काढून उभे राहण्याची तींत सोय केलेली असे. यामुळें मोरींत पोकळी बराच असल्यामुळें दार पाडण्याकरिता तीच जागा पसंत करून भिंत खणण्यास सुरवात केली, परतु भिंतीवर घाव पडतांच खण असा आवाज आला. आम्हांला वाटलें की, आत एखादा दगड वगैरे बसविला आहे कीं काय ? परंतु तेथें दगड वगैरे कांहीं नव्हतें ती मातीच इतकी पक्की होती कीं दगड सुद्धा त्यापुढें टिसूळ ठरेल दोन हात रुंद, पांच सहा हात उंच अशी ती भिंत खोदण्यास आम्हांला मजूरच लावणें भाग पडलें तरी त्या मजुराना सुद्धा तें काम उरकण्यास तीन दिवस लागले. असे आम्हीं बाबाचे घराबरोबरच त्याच्या सहाय्यानें काम शिकून आम्हास वापरण्याकरिता सोईची अशी एक जागा तयार करून घेतली त्या जागेचा आम्हांला पुढें बरीच वर्षे उपयोग झाला आता मी तासगावीं बरींच वर्षें गेलों नसल्यामुळें ती जागा पडली किंवा काय झालें हे मला कळलें नाहीं. पण आमच्या हातची बांधलेली एक जागा त्या घरात आहे हाच आम्हांला आनंद

## दिनकर भटजींचें लग्न

दिनकर भटजीवर बाबांची बरीच मर्जी होती कारण त्यांचें मोडी अक्षर चागलें असल्यामुळें बाबाचा जमा खर्च वगैरे लिहिण्याचें काम त्याचेकडेंच येई शिवाय घर बाधताना मजुरांवर देखरेख करणें, मजुराचा हिशोब ठेवणें, बाजारातून जें लागेल तें सामान आणून देणें वगैरे किरकोळ कामें त्याच्या कडूनच बाबा करवून घेत ह्या सर्व कामाचें बक्षीस म्हणून देण्याचें त्यानीं आपल्या मनाशीं ठरवून दिनकर भटजींच्या लग्नाची गोष्ट आई जवळ काढली. तेव्हा काय उत्तर द्यावें हा आईला मोठा विचार पडला कारण नुकतेंच दादांचे लग्न झालें असल्यामुळें घरीं सच कांहीच नव्हता. लोकानींही एका कार्यांत नुकतीच मदत केली असल्यामुळें त्याच्या जवळ मागणेंही बरें दिसत नव्हते ह्या सर्व अडचणी आईनें बावाना कळविल्या. ते म्हणाले खर्चाची तुला का काळजी ? ईश्वर सर्व कांहीं पार पाडील तूं कांहीं काळजी करूं नको. असें त्यांनीं आश्वासन दिल्यामुळें तिनें कार्यास होकार दिला त्यानीं आपल्या एका कुळाची साधारण बरी अशी मुलगी पाहून पसत करून ठेविलीच होती. ती मुलगी आमच्याही पाहण्यांत यावी म्हणून आखाड्याहून एका बाजाराला मुलीच्या बापाला मुलगी तासगांवीं घेऊन येण्याबद्दल कळविलें दर बाजाराला कोणीना कोणी बाजारात विक्री करितां म्हणून कांहीं सामान घेऊन आखा-ड्याहून तासगांवीं येत तसेच हे भावी व्याहीही येत. मुद्दाम म्हणजे त्याना यावें लागे असें नाहीं मुलगा पूर्वी व्याह्यांनीं पाहिलाच होता व तो त्याना पसंतही होता मुलगी तासगावीं आल्यावर घरच्या सर्व मंडळींनीं पाहून पसंत केली. झालें ! मुहूर्त वगैरे पाहून कार्य उरकण्याचे ठरलें व बाबांनी म्हणजे राघोपंतानीं कबूल केल्याप्रमाणें सर्व खर्च आपल्या अंगावर घेऊन पुण्याहवाचनापासून सर्व कार्यभाग दोघा नवरा बायकोनीं पार पाडला व कार्य उरकलें ह्या प्रमाणें आणखी एक नवीन मनुष्य घरात आलें, सध्या वहिनीचे वय फार लहान असल्यामुळें त्या माहेरींच असत माहेर जवळच असल्यामुळे वाटेल त्या वेळीं बोलावणें पाठवून त्यांना बोलावून घेतां येई. इकडे दिनकर भटजींची भिक्षुकी बरी चालून त्यानाही थोडी मिळकत होऊ लागली. ह्या प्रमाणें बिघडलेलें गाडें पुन्हा रंगांत येऊन आस्ते आस्ते चालूं

लागलें अशा तऱ्हेनें दोन्हीं कार्ये पार पाडल्यामुळें दादा करितां केलेला नवस फेडण्या करितां म्हणून आडीवऱ्यास जाण्याचा बेत आईनें केला

## नवस फेडण्यास कोकणांतील प्रवास

आम्हीं दोघे भाऊ व आईनें जाण्याचें ठरविलें. आमच्या बरोबर राधाकाकू म्हणून आमची एक चुलत चुलती होती तिनेंहि जाण्याचें ठरविलें, तिचा ही कांहीं नवस फेडावयाचा होता आमची सर्व तयारी झाल्यावर कोल्हापुरापर्यंतची एक भाड्याची गाडी ठरवून निघण्याचें पक्कें केलें, व तिसरें दिवशीं कोल्हापुरास जाऊन पोहोचलों त्या ठिकाणीं एक दिवस राहून सवाष्ण ब्राम्हण करून, महालक्ष्मीचा नवस फेडून, पुन्हा तेथें भाड्याची गाडी ठरवून फोंड्या घाटांतून जाण्यास निघालों. दोनतीन दिवसात जैतापुरास जाऊन पोहोचलों. व तेथून पायरस्त्यानें आडिवऱ्यास आलों व लागलीच महाकालीचें दर्शन घेतलें आम्हीं आल्याचा नाना व वहिनी याना फार आनद झाला दत्तक दिलेल्या बधूना आम्हीं नाना म्हणत असूं त्यानीं आम्हाला पुढें पंधरावीस दिवस ठेवून घेतलें आणखी राहण्याचा ते आग्रह करीत होते पण सवड नसल्यामुळें आमचें राहणें तेथें फार झालें नाहीं त्या अवधींत समुद्र स्नान, राजापूरची गंगा, उष्ण झऱ्याचें स्नान वगैरे सर्व आटोपून घेतलें. तेथील सर्व स्थळें पाहून आनंद झाला. आमचे नाना त्यावेळीं नवे घरांत राहत असत नुकतेच त्यानीं आपलें घर नवें बांधलें होतें तेथून समुद्र जवळच घर एका टेकडीच्या पायथ्याशींच होतें. जवळच पाटाचें पाणी वाहत असून घराच्या आसपास आंबा, फणस, केळीं, आळू वगैरेचीं झाडें होतीं, व शेतीची जमीनही घराचे आसपासच होती आमच्या नानाच्या घराजवळच आणखी चार कुटुंबे रहात होती सर्व देखावा मोठा रमणीय होता गुराच्या गोठ्याला सुद्धां लोखंडाचे छड लावून जागा बंदोबस्ताची केली होती भीति ही कीं, केव्हा वाघरू येईल, व एखादें जनावर पळवील ह्याचा नियम नाहीं म्हणून ही खबरदारी घ्यावी लागे सध्याकाळ झाली कीं, सर्व द्वारें वगैरे बद होत. नंतर सहसा कोणी बाहेर जाण्यास धजत नसे खाणें मुख्य तांदुळाचें, सर्वभर भातावर, त्याच्याच भाकरी, आळवाची भाजी सायंकाळींही तेच जिन्नस. तेथें पोहे मात्र फार रुचकर, ते खाण्याचा कधीं कंटाळा आला नाहीं पक्कानें सुद्धा तांदुळाचीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९९५४४

रोज महाकाळीचें दर्शन होत असे. देवळाजवळ, बाजार लागत असे. मुलाची शाळा घरापासून बरीच दूर होती गडी रोज मुलाला खांद्यावर बसवून शाळेंत पोहोंचवीत असे त्यावेळीं त्यांचा एक मुलगा शाळेंत जाण्यासारखा होता त्याचें वय सात वर्षांचें होतें दुसरा मुलगा चिंतामणी हा तीन चार वर्षांचा असेल. ह्याप्रमाणें आमचे १५, २० दिवस कसे गेले हें आम्हास कळलें सुद्धां नाहीं. पुढें परत जाण्याचें ठरलें येतांना मुंबईहून परत येण्याचा बेत होता. ह्या बेताला अनुसरून आगबोट गाठण्याकरिता जैतापूर बंदरापर्यंत गेलों. पण आगबोट नुकतीच निघून गेली होती दुसरे दिवसापर्यंत तेथें रहावें लागले असतें, म्हणून आगबोटींच्या भानगडींत न पडतां पुन आलेल्या रस्त्यानेंच परत जावयाचें ठरविलें आगबोटींत बसण्यास राधाकाकूही नाखुश होत्या कारण वातीची त्याना फार भीति वाटे. म्हणून बैलगाडीनेंच परत जाण्याचा बेत करून गाडी ठरविली व आल्या रस्त्यानें परत तासगावीं आलों

## एक दुःखकारक प्रसंग

घरीं आलों तों वाड्यातील सर्व मंडळी मोठ्या चिंतातुर स्थितींत दिसली. सहा दिवसापूर्वी वामननें घरात कांहीं धूसपूस झाल्यामुळें विहरींत जीव देऊन आत्महत्या केली होती सर्व लोक सुतकांतच होतें त्याचें लग्न झालें होते. ह्या त्याच्या अपमृत्युमुळें त्याची बायको मात्र नाडली गेली. पुढें सर्व क्रियाकर्म होऊन जगरहाटी प्रमाणें सर्व लोक उद्योगास लागले हळू हळू दुःखाचा विसर पडत चालला. त्याची बायको माहेरींच राहिली. आतां आमचा पाचव्या वर्गाचा अभ्यास संपत आलाच होता वर्षाचे अखेरीस डेप्युटी आले व परीक्षा उत्तम प्रकारें पास होऊन सहाव्या वर्गात प्रमोशन मिळालें. ह्या प्रमाणें ह्या दोन वर्षात अभ्यास उत्तम रीतानें पार पडल्यामुळें मन आनदांत होतें

## कांहीं किरकोळ सांसारिक गोष्टी

ह्या अवधींत आम्हीं व्यापाराचे पाढेही घेण्यास सुरवात केली होती केव्हां केव्हां एखादें आगकाड्यांचें बडल ठोक किंमतीनें आणावें. सोमवार अगर गुरुवारच्या बाजारांत बसून किरकोळ विक्रीनें विकावें कधीं कागद, पेनसली, शाई, ठोक किंमतीनें आणून शाळेंत विकावी अशा रीतीनें विक्री करून आठ बारा आणे मिळवावेत ह्या प्रमाणें आपलीं पुस्तकें, पाट्या, कागद

वगैरेस लागणारा खर्च बाहेर पाडावा दुपारचें आमचें जेवण बहुतेक घरीं नसेच दोघे दोन यजमानाकडेच जेवावयास जात असू. संध्याकाळचें जेवण घरीं पड केव्हां केव्हां आईला शिजावयाचें नसल्यास तिच्याकरितां भात, आमटी, भाकरी, वगैरे जिन्नस करावे लागत. हा प्रसंग नेहमीं येत नसल्यामुळें त्यांत आम्हीं तरबेज होतों. ह्या बाबतींत कधीं दुसऱ्या कोणास त्रास द्यावा लागला नाहीं. आमच्या आजीबाईंचा कित्ता आईनें गिरविला होता त्यांच्याप्रमाणें सर्व धान्याच्या चार चार महिने बेगमीच्या पिशव्या शिवून भरलेल्या आईच्या संग्रहींही असत. त्यामुळें एक सोय होई ती ही कीं, 'लागला जिन्नस धाव बाजारांत' असें करावें न लागतां वेळेचा उरक होई. आम्हीं पावभरच दूध घेत होतों. तरी त्याचें विरजण वेळच्या वेळीं होऊन दहीं ताक, थोडें लोणी खावयास मिळे. लहानपणापासून मला ताक भात खाण्याची संवय झाली होती

## चालत्या गाड्याला खीळ पडली

साधारणत आपल्या कोंकणस्थ कुटूंबांत सर्व जेवणानंतर थोडा तरी ताकभात खाण्याचा प्रघात असल्यामुळें ताकाची सोय करावी लागे ताक मिळालें नाहीं तर त्या दिवसाचें जेवण बेसूर झालें असें वाटे. हें मध्येंच थोडें विषयांतर झालें पण त्याचीही थोडी आवश्यकता होतीच आतां आपल्या मुख्य विषयाकडे वळू. माझी पांचव्या वर्गाची परीक्षा पास होऊन सहाव्या वर्गांत प्रमोशन मिळालें शाळेची इमारत शाळेस अपुरी पडत असल्यामुळें एका जवळच असलेल्या भाड्याचें घरात कांहीं वर्ग लागत. सध्यां आमचाच सहावा वर्ग त्या घरात लागत होता हेडमास्तर शाळेसंबधीं कांहीं काम करीत मुख्य इमारतींतच बसले होते व मधून मधून पांचव्या वर्गांतील मुलांचे खर्डे लेखन पाहत होते आमचा वर्ग शिक्षकाशिवाय तसाच होता कोणी पाहणारे तेथें हजर नसल्यामुळे आपसांत थट्टा मस्करी करून मुलें गोंधळ करीत होतीं परतु गोंधळही मोठ्या शिस्तीनें चालला होता. हेडमास्तर साहेबांची शिस्त मोठी कडक असे. सर्व मुलें त्यांना भीत. तसेंच ते प्रेमळही पण असत त्यांची शिकविण्याची धाटणी उत्तम होती आणि अधिकारी वर्गांत त्यांना मान असे परंतु योगायोग असा की, त्या दिवशीं आम्हाला काय दुर्बुद्धि सुचली कोण जाणे ? आम्हीं आपली जागा सोडून एका मित्राच्या समोर जाऊन बसलों, व

'येरे येरे माकडा तू आहेस फाकडा' असें कांहींतरी तोंडानें बडबडत त्याच्या समोर आपले नाक खाजवू लागलो सर्वच मुलें दांडगाई करीत होतीं मी म्हणजे कांहीं मुलखा वेगळा होतो असे नाहीं! नुकतीच परीक्षा आटोपून प्रमोशन झालें होतें अशा आनंदात मुलें थट्टा मस्करी करीत असतांना अचानक हेडमास्तर साहेबाची स्वारी दारांत येऊन उभी राहिली व त्यांची नजर माझ्यावर गेली मी समोरच्या मुलाजवळ बसून आपली जागा सोडून नाक खाजवून त्याला चिडवीत आहे, असें त्यांनीं पाहिलें. तेथें तर ते कांहीं बोलले नाहींत. क्लासांत जिकडे तिकडे झगाटा होऊन सर्व वर्ग चित्रा सारखा स्तब्ध राहिला व हेडमास्तर आले तसे निघून गेले व मागे सांगितल्याप्रमाणें पुन आपल्या कामांत निमग्न झाले आता पुढें कोणावर काय प्रसंग येतो तो भोगण्याची तयारी करीत मुलें कांहीं चुळबुळ न करितां स्वस्थ होतीं सुमारें अर्ध्या तासानें मास्तरांचें काम झाल्यावर त्यांनी एका मुलाला पाठवून मला शाळेंत बोलावून घेतलें, व कोणतीहि विचारपूस न करिता जवळच एक रूळ पडला होता तो सपासप माझ्या पाठीवर, खांद्यावर, जिथें जागा मिळेल तिथें ओढला. त्या जबर मारानें माझ्या डोळ्यातून पाणी तर आलें नाहींच पण बेशुद्ध होण्याचे स्थितींत पण जरा सावध असा मी जमीनीवर पडलों पुढें सर्व मास्तर जमा होऊन पाण्याचे हबके तोंडावर, डोळ्यावर, मारून कोणी वारा घालून कसें बसें त्यांनीं मला सावध केलें माझ्या अंगावर वळ असे फार उठले नव्हते. पण मानेच्या खालचा भाग सर्व लाल झाला. त्या तिरमिरींत मी कोणाशीं कांहीं न बोलतां पाटी दप्तर घेऊन शाळेंतून घरीं आलों व जसें शाळेंत कांहीं घडलेंच नाहीं, म्हणून इकडे तिकडे वावरूं लागलों कदाचित् ही गोष्ट पुढें कोणाला कळलीही नसती, पण इतक्यात आमचा नेहमींचा न्हावी हजामती करतां म्हणून घरीं आला तेव्हा आई मला म्हणाली, "अरे निळू' तुझी हजामत फार वाढली आहे, करून घे," म्हणून अंगांतील कुडता काढून त्याचे जवळ बसलों इतक्यात डोक्याला पाणी लावतां लावतां त्या न्हाव्याची नजर माझ्या पाठीकडे गेली व तुला हे पाठीवर काय झालें ? म्हणून तो मला विचारूं लागला मी कांहींच बोललो नाहीं. पण त्यानें आईला बोलावून आणून तिला हा प्रकार दाखविला तेव्हां ती घाबरली, व हें काय झालें म्हणून तिनें मला विचारलें. इतक्यांत शाळा सुटली व माझे मित्र घरा आले व त्यांनीं

झालेली सर्व हकीकत आईस सांगितली. असा प्रकार आजच्या काळांत झाला असता तर ही गोष्ट करणाराला जबर शिक्षा होऊन कदाचित् त्याच्या नोकरीवरही पाणी आलें असतें. परंतु तो काळच असा होता कीं, गुरूवर सर्वांची भक्ति असे. त्यानें कितीही मारलें, झोडपलें, तरी जिवाला कांहीं धोका पोहोंचला नाहीं, तों पर्यंत तिकडे कोणी लक्ष देत नसे. त्याला अनुसरून झालेल्या गोष्टीकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं शिवाय हेडमास्तर शिकविणारे चांगले असल्यामुळें गावात त्याचें वजन होतें. केवळ शिस्त म्हणून ही जबर शिक्षा केली असावी असेंच सर्वांना वाटलें जातां जातां तात्या साहेबाच्या कानावर ही गोष्ट गेली, व त्यांनीं खाजगी रीतीनें जी कांहीं विचारपूस केली असेल तेवढीच परंतु माझ्यावर त्या माराचा परिणाम होऊन त्या शाळेस मी अतरलों, व पुन्हा मीं कांही त्या शाळेंत गेलों नाहीं. त्यामुळें चालत्या गाड्याला खीळ बसून माझें मात्र शिक्षण अंतरलें, शाळा बुडाली.

## एक भुताटकीचा प्रसंग

ह्याच संधीस सांगलीजवळ हरीपूर म्हणून एक गांव आहे. तेथील एका श्रीमत बाईनें अधिक मासानिमित्त, एक ताब्या, पळी पंचपात्र, ताम्हण, एक धोतरजोडा, कांहीं दक्षिणा तीस तीन ब्राम्हणास देण्याचें ठरवून त्या प्रमाणें आमत्रणें पाठविलीं. दिनकर भटजींच्या ओळखीचे तें यजमानकुल्य असल्यामुळें आम्हा दोघांही भावांना तें आमंत्रण होतें व आमच्या बरोबरच गांवांतील आणखीही १०–१२ भिक्षुक जाणार होते. सर्वांनी एकदमच जाण्याचें ठरवून सुमारें मध्यरात्रीं बरोबर एक दोन कदील उजेडा करितां म्हणून घेऊन सर्वजण सोबतीनें बरोबरच निघालों. तासगांवाहून सांगली सुमारें दहा बारा मैल लांब आहे तेथून हरिपूर तीन मैल असा एकंदर तो प्रवास चौदा पधरा मैलांचा होता इतकी जागा सहज चालून पाच सहाचे सुमारास हरिपुरास पोहोंचू असा आमचा अदमास होता. जातां जाता बिन्हाड सिद्धाचें कवठें तर पार झालें पुढें कोलापूरची हद्द लागली. ती ओलांडून तीनचे सुमारास बुधगांवच्या रानांत आलों तों काय ? एक चमत्कार दृष्टीस पडला. तो हा की, अतिशय पांढरा शुभ्र पोषाख केलेला, अंगात शुभ्र अंगरखा, डोक्यात पांढरी शुभ्र पगडी, पायांत दक्षिणी जोडा, अंगावर शुभ्र उपरणें व हातांत

पांढऱ्या रंगाचीच काठी अशी एक उंच आकृति आमच्या समोरून पंधरा-वीस हातावर रस्ता ओलांडून पुढें निघून गेली सर्वांचें लक्ष एका एकीं त्या आकृतीकडे लागलें त्यात मोठ्या धीराचीही कांहीं मंडळी होती, व कांहीं मुलें होतीं व कांहीं मध्यम वयाचेंही होते परंतु त्या आकृतीकडे पाहून सर्वांचे कांगेटे ढिले झाले कोणाचेंही पाऊल पुढें पडेना. जो तो भिऊन एका जागीं स्तब्ध उभा तोंडातून ट ट फ फ अक्षरें निघू लागलीं एकाचे सुद्धा तोंडातून धड शब्द निघेना!

अशा रीतीनें आम्हीं सर्व त्या आकृतीकडे पाहतां पाहता ती आकृति कशी गुप्त झाली हें आम्हा कोणाला कळले सुद्धां नाहीं. आता पुढें जावें तरी पंचाईत, मागें परतावें तरी पंचाईत, अर्ध्या वाटेपेक्षां जास्त अंतरावर आलेलों. काय करावे हा विचार सुरू झाला इतक्यात बुधगावच्या स्टेशनवरून पास होणाऱ्या गाडीची शिटी ऐकूं आली. तेव्हां आता मागें फिरण्यात कांहीं अर्थ नाहीं पुढें जावें असें ठरून पुढें निघालों. आतां पांच वाजलेच आहेत. लवकरच उजाडणार ही खात्री होतीच शिवाय एकटे दुकटे मनुष्य हिंडू फिरू लागले होते. भीति बरीच कमी होऊन सर्वांच्या जीवास थोडी स्वस्थता मिळाली व मग जो तो आपल्या धैर्याच्या गोष्टी सांगू लागला. परंतु नुकताच प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळें त्यांच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नव्हता प्रसंग पडला म्हणजे मनुष्य किती धैर्यवान आहे हें सहज कळतें. नुसत्या वायफळ बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं मग जो तो आपल्या अनुभवाच्या गोष्टी सांगू लागला आता तास दोन तास तो एक करमणुकीचा विषयच होऊन बसला अशा तऱ्हेनें गप्पा करता करतां सकाळीं साताचे सुमारास सांगली गाठली, व लागलेच हरीपुरास जाण्यास निघालों तों आठ-नऊचे सुमारास हरीपूर गाठलें तेथलि मंडळी आमची वाटच पाहत होती. त्याच्या आधीं आम्ही ठरलेल्या वेळीं तेथें सहज पोहोंचलो असतों, परंतु वाटेंतील अडचणीमुळे दोन अडीच तास उशीर झाला उशीर होण्याचें कारण आम्ही त्याना सांगितले, तेव्हां तेथील मंडळींनी सांगितलें कीं, त्या रानांत असेंच चमत्कार मागें एक दोनदां घडले आहेत आतां दिवसभर त्याच संबंधीच्या गोष्टी! सांगली, मिरज येथील बोलाविलेले ब्राम्हण आमचे पूर्वीच

तेथें येऊन पोहोंचले होते. आम्हीं लागलेच नदीवर जाऊन स्नानें वगैरे उरकून बिन्हाडीं आलों संकल्प वगैरे झाल्यावर मागें सांगितलेल्या वायनाचा एक एक गठ सर्व ब्राम्हणास देण्यात आला बारा वाजता पंगत जेवावयास बसली आनदानें जेवणें वगैरे होऊन तासगांवची आलेली मंडळी प्रवासानें व जागरणानें वरीच दमली असल्यामुळें त्यानीं पथारी पसरली, व लागलेच घोरूं लागले सर्वांना निद्रेनें केव्हा गाठलें हें कळलें सुद्धा नाहीं. आतां तेथील काम संपलेंच होतें. तेव्हां रात्रभर विश्राति घेऊन पहाटे स्नान वगैरे उरकून तेथून कूच केलें, ते बाराचे सुमारास वाटेंत कवठ्यास बिन्हाड सिद्धाचें दर्शन घेऊन तासगावीं येऊन पोहोंचलों.

## ब्राम्हणांची गरीबी व त्या करितां सोसावे लागणारे कष्ट व पूर्वींच्या रमण्यांचा एक प्रसंग

अशाच पुन्हा एका कार्य प्रसगीं (तें कार्य आता मला आठवत नाहीं) मिरजेस जाण्याचा प्रसंग आला त्या कार्याच्या आनदाप्रित्यर्थ एकेक रुपया दक्षिणा मिळणार अशी बातमी सर्व पचक्रोशींत पसरली त्या एक रुपया दक्षिणेकरितां पंधरा पधरा, वीस-वीस, मैलांवरील ब्राम्हण मिरजेस जमू लागले वाटेंत जातांना ब्राम्हणांच्या झुंडीच्या झुडी दिसू लागल्या आमच्या गावातीलही असेच पांच पन्नास ब्राम्हण एक जुटीनें मिरजेस जाऊन पोहोंचले. सर्वांच्याच घरची गरीबी असल्यामुळें एक रुपया म्हणजे परब्रम्ह वाटे रुपया मिळणार ' ह्या आनंदा पुढें चालण्याचे श्रम काहींच वाटले नाहींत ठरलेल्या दिवशीं सायंकाळीं ५ पासून दक्षिणेस सुरूवात झाली. किल्ल्याचे मोठे फाटकावर दक्षिणा देणारे मुत्सद्दी कारकून रुपयाच्या थैल्यांच्या थैल्या घेऊन बसले होते. शिपायांचा बदोबस्त उत्तम होता सर्व ब्राम्हणांना दक्षिणा मिळावी, कोणीही चुकून राहूं नये व दुबाराही लुच्चेगिरीनें कोणी त्या फंदांत पडूं नये म्हणून एक एक ब्राम्हणास दक्षिणा देऊन आंत सोडीत. अशी दक्षिणा देण्याची व्यवस्था काम लवकर आटपावें म्हणून चार ठिकाणीं करण्यांत आली होती दक्षिणेचे काम सकाळीं आठ नऊ पर्यंत चाललें होतें किल्ल्याचे मोठें विस्तीर्ण पटांगण होतें तरी तें सर्व सकाळ पर्यंत ब्राम्हणांनी फुलून निघालें. जिकडे पहावें तिकडे ब्राम्हणच ब्राम्हण दिसत ब्राम्हणांत

किती कंगाली आहे ह्याचा तो एक देखावाच होता त्यांत आम्हींही होतोंच दक्षिणा झाल्यावर जेवणाचीही व्यवस्था तयार होती लागलचि सर्वांचीं जेवणें होऊन सायंकाळीं आलेले ब्राम्हण आपापल्या गांवीं जाण्यास परतले. असाच योग सांगलीसही त्याच सुमारास आला होता. प्रसंग मात्र मला सध्यां आठवत नाहीं. स्वराज्यमुळें व ब्राम्हणावर भक्ति असल्यामुळें असे प्रसग नेहमीं घडत. आतांही तींच राज्यें कायम असलीं तरी अशा तऱ्हेचे प्रसंग झाल्याचें फारच क्वचित आढळून येतें

## आणखी एक दुःखकारक प्रसंग

अशा प्रकारें आमचे दिवस चालले असता, एका एकीं कांहीं ध्यानीं मनीं नसतां दादाचें कुटुंब वारल्याचें जमखडीहून पत्र येऊन धडकलें. ताप आला व एका एकीं अंत झाला असें पत्रात लिहिलें होतें अद्याप कार्याला वर्षभर सुद्धा पुरें झालें नव्हतें तासगांवातील मंडळींनीं कोणी तिला पाहिलें सुद्धा नव्हतें इतक्यात हा प्रसंग यावा ! आमच्या सारख्या गरीब व निराधार कुटुबावर हें एक संकटच होतें आधीं गरीबीमुळें कार्य जुळून येणें कठीण, जवळ पैसा नाहीं, लोकांनीं मदत करुन कार्य पार पाडलेलें, तशांत हा प्रसंग, त्यामुळें आईला फार वाईट वाटलें. परंतु योगायोगा पुढें कोण काय करणार ? ईश्वर जसे ठेवील तसें राहिलें पाहिजें आतां तिची क्रिया वगैरे नानांनाच करावी लागली, कारण दादा फार दूर, परक्या ठिकाणीं, शिवाय पगार थोडा वेळ नाहीं म्हणून त्यांचें लिहून आलें. सर्व काम तिकडे होत असल्यास आट-पून घ्यावें म्हणजे मला इकडे त्रास पडणार नाहीं असें त्यानी कळविलें इकडे दिनकर भटजींना सर्व माहिती होतीच. शिवाय एक दोन भिक्षुकही त्यांचे मित्र होते. त्यांना मदतीला घेऊन कसेंबसें हा प्रसंग उरकला गेला. पुनः ते फकीरच्या फकीर बनलेले आता पुनः त्यांच्या द्वितीय संबंधाची काळजी सुरू झाली

## इंग्रजी शिक्षणास सुरुवात

इकडे आतां माझें शिक्षण सुटून बरेंच दिवस फुकट गेल्यामुळें आतां काय करावे ह्या विषयीं घरात ऊहापोह सुरू झाला. जमखंडीस फी एक आणा व गरीब विद्यार्थ्यांस माधुकरीची सोय ह्या मुळे जमखंडीस जाणें

निश्चित होऊन लागलीच जमखडीस रवाना झालो दादासाहेब काळे हेच त्यावेळीं कारभारी होते आमचे मामा हेच त्याचे उपाध्ये असल्यामुळें आमची वर्णी लागण्यास वेळ लागला नाहीं लागलीच हुकूम होऊन माधुकरीचे विद्यार्थ्यांत नाव दाखल केलें. मी लागलेच शाळेंत जाऊन मास्तराना भेटलों त्यांनीं माझी चाचणी घेऊन त्यांत त्यांना माझी हुशारी दिसून आल्यामुळे लागलेच माझें नांव त्यांनीं पटावर दाखल करून घेतलें व अभ्यास सुरू झाला गणित, भाषा, भूगोल, वगैरे विषय माझे तयारच होते. फक्त इंग्रजीचा अभ्यास करावयाचा होता तोही मी झपाट्यानें सुरू करून सर्व मुलांच्या बरोबर येऊन मास्तराची मर्जी सुप्रसन्न करून घेतली त्यांना वाटलें कीं हा मुलगा बराच हुशार दिसतो ' पुढें होणाऱ्या इन्स्पेक्टरचे परीक्षेस बसवि ल्यास पास होईल, म्हणून त्यानीं कायम विद्यार्थ्यांतही माझें नाव रजिष्टर केलें त्यावेळीं सीताराम विश्वनाथ पटवर्धन हे दक्षिण भागाचे सर्कल इन्स्पे- क्टर होते ते परीक्षेस आले, परीक्षा सुरू झाली पहिल्या वर्गाची परीक्षा पण बरीच कडक दिसली मी इंग्रजी, भूगोल, इतिहास वगैरे सर्व विषयात चांगल्या रीतीने पास झालो पण माझा जो चागला विषय गणित, ज्यावर मास्तर खुष होते त्या विषयानें शेवटीं दगा दिला नापास झालों म्हणून स्कॉलरशिप गेली, व मास्तरही नाखुष झाले त्यानीं बोलून दाखविलें कीं, कां लिमये? आम्हीं तुला हुशार म्हणून परीक्षेला बसविलें व ज्या विषयांत आम्हाला खात्री त्याच विषयात तूं दगा दिलास पांच उदाहरणा पैकी फक्त एक बरोबर बाकी सर्व चूक ' त्याला इलाज नव्हता.

## त्या वेळची दिनचर्या

त्यावेळीं माझा जमखंडींतील रोजचा कार्यक्रम ठरल्या सारखाच होता आण्णांचे घराला शाळा जवळ म्हणून मी त्यांचेकडेच होतों सकाळीं सहा वाजता उठावें, शौचमुखमार्जनादि विधी आटोपून अभ्यासाला बसावें, मग नऊ वाजतां आंघोळ करावी, व वाऱ्यांत माधुकरीस जावें माधुकरी घेऊन साडेनऊ पावणेदहा वाजेपर्यंत परत यावें, व जेवून बरोबर अकराला शाळेंत जावें पाच वाजेपर्यंत शाळा लागे. मग सुट्टी होई. घरीं येऊन लागलीच जेवण उरकावें, व धुवावयाचे कपडे घेऊन रामतीर्थाचे वाटेवर तळ्याजवळ विहीर

होती त्या विहिरीवर धुण्यास जावें कपडे वगैरे धुऊन साडेसहाचे सुमारास परत यावें मग ९–९॥ पर्यंत अभ्यास होऊन दहाला निद्रा अशा प्रकारें ठराविक कार्यक्रम होता. त्यात बहुतेक जमखंडीस असे पर्यंत बदल झाला नाहीं माधुकरींत रोज एक मोठी भाकर, सुमारें अर्धा पाऊण पाव तांदूळाच्या भाताची मूद, ओगराळभर आमटी, व अर्धा ओगराळभर ताक आणि दोन चमचे तूप, कधीं कधीं सणावाराचे दिवशीं पक्वान्नही मिळे ह्या प्रमाणें पोट चांगल्या तऱ्हेनें भरेल इतकें अन्न असे माझा व कारकुनाचा रोज खटका उडे मी त्याला प्रार्थना करी कीं, मला तुपाची शिसारी आहे तरी माझ्या मुदेवर तूप वाढूं नको त्याला वाटे हा कांहीं तरीच सागतो तूप कोणाला नकोसे कां आहे? पुन हें तूप साजूक असे. कोणालाही नांवें ठेवण्यास जागा नसावी म्हणून नेहमीं डॉक्टराकडून अन्नाची व तुपाची जाचणी होई. तेव्हा तेथील सगळ्या कामगार मडळींना सावध असावें लागे कोणत्या वेळीं परीक्षा होईल कोण जाणे? म्हणून अन्नात कधीं भेसळ झाली नाहीं. तादुळही उत्तम असें. न खाईल तो अभागी अशी स्थिती होती.

रोजच असा प्रसंग घडूं लागल्यामुळें वरील वरील भात कांहीं दिवस काढून ठेवावा व खालील खावा. तरी तें तूप सर्व मुदेंत मुरलेलें असल्यामुळें सर्वच भातास तुपाचा वास येई एक दोनदा वांतीही झाली. पुढें पुढें संवयीनें शिसारी कमी होत चालली मग कांहीं विशेष अडचण पडेनाशी झाली असो अशा रीतीनें जेवणाचें गाडें एकदा जमलें. त्याच वेळीं गोपाळ केळकर म्हणून काशिनाथ भटजींचा एक चुलत शालकही माझ्यासारखा शिकण्यास जमखंडीस राहिला होता तो माझ्या पेक्षां मोठा असून पांचव्या वर्गांत होता. आम्हीं दोघानींही बरोबरच अभ्यास करावा. मला जें कांहीं अडेल तो तें समजावून सागत असे. विहिरीवर कपडे धुण्यासही दोघांनी बरोबरच जावे आम्हा दोघाना मिळून माडीवर एक स्वतंत्र जागा देण्यात आली होती आतां त्या वाड्यात काशिनाथ भटजींचें कुटुंब एकटेंच असल्यामुळें आणि काशीनाथ भटजींचें जेवण दोन्हीं वेळ यजमानाकडेच होत असल्यामुळें घरीं स्वयंपाक पाण्याचा फार त्रास नव्हता ह्या करितां त्यांनी आपल्याकडे थोडी जागा ठेवून बिऱ्हाडाना राहण्याकरितां कांहीं जागा दिली

होती मी होतों त्यावेळीं तीन बिन्हाडें तेथें भाड्यानें होतीं. त्यांत एक बिन्हाड आपल्या 'अंग वस्त्रा'सही एका खोलींत राहत असे तें अंगवस्त्र फार धूर्त, हात चलाखींत प्रवीण होतें पुढें त्या चलाखीचें फळ अंग वस्त्राला मिळून त्याला दोन वर्षाकरिता हवा खाण्यास जावें लागलें. तें बिन्हाड आणखी काहीं दिवस तेथें राहातें तर इतर बिन्हाडांना बराच उपसर्ग सोसावा लागून सर्वच नुकसानींत आलें असतें. ईश्वराचीच कृपा म्हणून त्यांचा ग्रंथ लवकर आटोपून सर्व बिन्हाडें त्रासांतून वांचलीं अशा विचित्र तऱ्हेचींही मनुष्यें असतील असें त्यांच्या चेहऱ्यावरून कोणालाच वाटत नसे.

आम्हीं दोघेही विद्यार्थी एका विचाराचे असल्यामुळें आम्हांला रोजच्या खाण्याचा कंटाळा येऊन एखादा नवीन जिन्नस खावा सारखा वाटल्यास आम्हीं आमच्या जागेंत एक चूल मांडली होती कढई, तवा, एक दोन पातेलीं अशीं भांडीं जमविलीं होतीं त्यांच्या सहाय्यानें आपल्या आवडीचा लागेल तो पदार्थ आम्हीं करून खात होतों कधीं कधीं कांद्याचीं भजीं करावींत, कधीं भाजी करावी, कधीं कांद्याचें पिटलें करावें. हें जिन्नस करणें फक्त सुट्टीच्या दिवशीं मात्र साधे इतर दिवशीं वेळच नव्हता मग करणार कधीं ? अशा रीतीनें आनंदात दिवस जात असता वर्ष होऊन वार्षिक परीक्षा झाली व त्यांत पास होऊन दुसऱ्या वर्गांत बढती मिळाली व दुसऱ्या वर्गाचा अभ्यास सुरू झाला. पुढें उन्हाळ्याची सुट्टी दकबल दीड महिन्यांची असल्यामुळें त्या अवधींत राहण्यास तासगांवीं गेलों व सुट्टी संपतांच परत जमखंडीस जाऊन अभ्यास करूं लागलों.

## परान्नाचा एक प्रसंग व माझी फजीती

जन्मापासूनच हा माझा देह दुसऱ्याच्या अन्नावरच जवळ जवळ पोसला गेल्यामुळें सर्व हाडीमांसीं परान्नाचाच विषय घोळूं लागल्यास नवल नाहीं लहानपणी लोकांकडे जेवावयास जाण्याची मोठी हौस. अद्यापही ती संवय मोडली आहे असें नाहीं थोड्या फार प्रमाणांत चालूंच आहे संवयच ती ! ती कशी मोडणार ! प्रयत्न केल्यास थोडा बहुत आळा बसेल इतकेंच आमचे एक काका आम्हांला एक श्लोक म्हणून दाखवीत असत "परान्नं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि" जन्म हा कार्य सृष्टि नियमाप्रमाणें नेहमीं प्राप्त

होणारा आहे, परतु पराज्ञ हें ह्याच लोकात मिळणारें आहे दुसऱ्या लोकांत तें मिळणारें नाहीं तेव्हां आलेलें आमंत्रण वाया दवडू नये असें आपले थेटेंन म्हणत. लहानपणच तें. काहीं अनुभव नाहीं. थोडीशी ऐट वरून सोंगांची बतावणी करण्यांत प्रवीण होतों, व हौसही होती अशा संधींत आमच्या आक्काच्या घरीं श्राद्ध तिथी पडली म्हणून आमचे मेहुणे विठ्ठल भटजी काळे आमच्या घरीं आले व उद्यां आमच्या घरीं श्राद्ध आहे जेवावयास या असे सांगून घरीं निघून गेले. त्यावेळीं आई घरीं नव्हती. मला वाटले कीं, त्यांनी मला ब्राम्हणांत बसण्याचें आमन्त्रण दिले, त्यामुळें मी मोठ्या आनदात होतों. त्या प्रमाणें आईलाही सांगितलें कीं मला उद्या ब्राम्हणात आक्काकडे जावयाचें आहे आतांच विठ्ठल भटजी सागून गेले. तिलाही वाटले असेल! चांगले वैदिक कुटुंब वत्सल ब्राम्हण गावांत असतांना एवढ्या अपढीक मुलाला ते ब्राम्हण कशाला सांगतील म्हणून तिनें शंका काढली मी म्हटलें नाहीं ग आई मला ते खरेंच सागून गेले तेव्हां ती गप्प बसली उद्या श्राद्धीं जावयाचें म्हणून धोतर बितर धुवून वाळत घातले, व पाघरण्याकरिता एक धोतर वाळत घातलें. मग दुसरें दिवशीं वेळेवर आंघोळ पूजा वगैरे आटोपून सोवळ्यांतच एकीकडे पाट मांडून बोलावण्याची वाट पाहत बसलों अकरा झाले, बारा झाले, एक वाजला बोलावणें कांहीं येईना. मग मात्र मला आईची शका बरोबर वाटूं लागली खरेंच सर्व ब्राम्हण सोडून मला तें ब्राह्मणात कसें सांगतील? मला नुसतें 'उपव्हये' हें सूक्त सुद्धां ह्मणतां येत नव्हतें परतु अज्ञान दशा फार वाईट असते हेंच खरें माझ्या सारख्या मूर्खानें काहीं विचार करावयास पाहिजे होता तरी शंका निवृत्ति करिता मीच पळी पंचपात्री घेऊन सोवळ्यानेंच आक्काचें घरी गेलों, तों आंत सर्व मडळी आपापले उद्योगांत होती. ब्राह्मणांचें जेवण उरकून पिंडदान होऊन ब्राह्मण आशीर्वादाचे मंत्र ह्मणत बसलेले बाहेरूनच ऐकू आले लागलीच आंत घरांत न जाता त्याच पावलीं परतलों, व अंथरूण घालून स्वस्थ निजून राहिलों. अशा तऱ्हेनें एका माणसाची फजीती झालेली पाहून वाड्यांतील सर्व मंडळी हसूं लागली, व कशी एका माणसाची फजीती झाली ह्मणून मला चिडवूं लागली मग त्यांचे कडचे दुसऱ्या पंक्तीचें जेवावयाचें बोलावणें शिरस्त्याप्रमाणें आलें, परंतु काहींतरी सबब

सांगून ते दिवशीं मी त्यांचेकडे जेवावयास गेलों नाहीं. आईनें भात पिठलें करून मला वाढलें. ह्याप्रमाणें आयुष्यांतील हा एक फार्स पार पडला

## एक हातचलाखीचा खेळ व त्यामुळें घडलेली अद्दल

सुट्टी संपल्यावर जमखंडीस परत आल्याचें मागें सांगितलेंच आहे. वर्ष अखेर दुसरी इयत्ता संपली व तिसऱ्या वर्गात प्रवेश झाला लागलीच सुट्टी झाली व आतां येथें महिना दोन महिने राहून काय करावयाचें म्हणून परत तासगांवीं जाण्याची तयारी केली गोपाळ केळकर ह्याचीही परीक्षा संपली होती म्हणून तोही मजबरोबरच जाण्यास तयार झाला आम्हीं दोघांनीं वाटेंत खाण्याकरितां दुधाच्या दशम्या, कांद्याचें पीठलें, भाजी, मर्जी असे जिन्नस करून बरोबर घेतले, पायींच जाण्याचें ठरवून सकाळींच निघालों. सडक चांगली पक्की होती वाटेंत रबकवी, तेरदाळ वरून कुडचीस जावें लागे अंतर सुमारें पन्नास एक मैल असेल. रबकवीच्या जवळ सुमारें दहावाजतां पोहोचलों वाटेंत एक मोह उत्पन्न करण्यासारखा खेळ चालला होता, तो म्हणजे एक्का, राजा, राणी असे तीन पत्ते घेऊन हातचलाखी चालली होती. जुवाच तो! खेळ खेळताना दोन तीन मनुष्यें हारलीं, कोणी जिंकलीं, त्याना बरेच पैसे मिळाले हें पाहून मला मोह न आवरून बरोबर भाज्याकरिता जे कांहीं पैसे होते ते सर्वच्या सर्वच कांहीं विचार न करिता तो एक्का असें जाणून त्यावर ठेवले. परंतु खेळणें वाल्यांनीं जाणलें कीं, सावज पक्कें जाळ्यात अडकलें मग फसविण्यास काय उशीर ? लागलीच त्यांनी पान उलटून दाखविलें तों काय तें दुसरें पान निघालें ? हें पाहून एकदम डोळे उघडले व रडूं लागलों त्यानें तूं ह्या भानगडींत पडूं नको म्हणून मला सुचविलें होतें. परंतु मी त्याचें न ऐकतां पैसे ठेविले व हारलों हें पाहून त्याला वाईट वाटलें. परंतु आता उपयोग काय ? पैसे परत थोडेच मिळणार होते ? इतक्यांत माझें रडणें ऐकून आणखी एक तमासगीर मंडळी तेथें जमा झाली. मी लोकांच्या हातापाया पडलों, खेळणें वाल्यांच्या पायां पडलों, तेव्हा खेळणें वाल्यास माझी दया येऊन त्यानें मीं हरलेले सर्व पैसे मला परत दिले, व मला बजावले कीं, अशा खेळांत तूं कधीं पडूं नको. ही निव्वळ फसवेगिरी आहे. तुम्हां लहान मुलानाच काय पण

मी मी म्हणणारे असे फसतात तो मनुष्य मला फार दयाळू दिसला. व मी त्यानें सुचविलेल्या प्रमाणें करण्याचें कबूल करून, आम्हीं दोघानीं पुढें प्रयाण केलें पुढें एका थंड अशा जागीं विहिरीवर बसून झाडाखालीं पथारी पसरली व फराळ केला भूक सपाटून लागलीच होती मग दोन तास विश्रांती घेऊन रात्रीं तेरदाळास येऊन रात्र झाल्यामुळें पुढें न जातां तेथील धर्मशाळेंत रात्र काढली व पहाट होतांच तेथून कूच करून गाडीचे वेळेस कुडची स्टेशनावर येऊन गाडी गांठली लागलीच तिकीटें काढून गाडींत बसलों व मिरजेस उतरलों

## मिरजेस झालेली जेवणाची सोय

कुडचीस पोहोंचण्यापूर्वी वाटेंत आम्हांला असें कळलें कीं, कोल्हापूरच्या महाराजाचें नुकतेंच लग्न होऊन त्या निमित्त जेवणावळी चालल्या आहेत व ब्राह्मणांना रुपरुपया दक्षिणा मिळणार आहे असें समजल्यामुळें आम्हीं मिरजेचीच तिकीटें काढलीं, व मिरजेस सुमारें एकाचे सधीस पोहोंचलों आता पोटांत तर भूक लागलेली, जवळच्या दशम्या संपलेल्या, दुसरें खाण्यास कांहीं नाहीं, म्हणून गावात गेलों आणि वाटेंत भेटलेल्या एका ब्राह्मण सद्‌गृहस्थास येथें कोठें जेवण्याची सोय होईल काय? असें विचारलें, तर त्यानें सांगितलें तुम्ही वाड्यांत गेला तर तुमची सोय होईल तेथें गेलेला कोणी पाथस्थ विन्मुख परत जात नाहीं, अशी माहिती मिळाल्यामुळें आम्हीं थेट वाड्यांत गेलों, व कामगारास भेटलों त्यांनी म्हटलें जरा बसा, मी वर्दी देतों त्याप्रमाणें त्यानें आमची वर्दी पोहोंचवून परवानगी मिळविली त्या वेळी वाड्यांतील जेवणें होऊन झांकापाक चालली होती तरी आमचे कारता भात पिटलें होऊन आम्हांस स्नान करण्यास ऊन पाणी दिलें आमची स्नानें होतांच पानें मांडली, व आम्ही यथेच्छ भोजन उरकलें. जेवणास भात, पिठलें, एक भाजी, भाकर, वाडगाभर उत्तम ताजें ताक याप्रमाणें थाट होता. दोन पैसे दक्षणा मिळाली जेवण उरकल्यावर मग गावांत कोठें ही न रमतां तसेंच पायीं निघालों तों वाटेंत कोल्हापुरास जाणाऱ्या वाटसरूंची रीघच लागली हाती त्यांचे बरोबरच सोबतीनें निघून सकाळीं कोल्हापुरास जाऊन पोहोंचलो

## कोल्हापुरांतील एक रमण्याचा प्रसंग

त्याच दिवशीं पंगत होती दक्षिणाही पण पंक्तींतच देणार अशी दवंडी पिटली होती, म्हणून बारा वाजेपर्यंत सारखे ब्राह्मण येत होते एवढा मोठा भव्य मंडप पूर्वी कधीं पाहिला नव्हता. मोठ मोठ्या इंजीनियराच्या देखरेखी-खालीं बांधलेला तो मंडप, मग काय विचारावें ? तशांत छत्रपतीच्या घरचें कार्य मंडपाला सर्व सामान अगदीं नवीन वापरलें होतें. जिकडे तिकडे सडे घालून जागेला थंडावा आणला होता मधें मधें अन्नाच्या सांठ्याचीं कोठारें केलीं होतीं मोक्या मोक्यावर भाताच्या राशीच्या राशी लागल्या होत्या तशाच सर्व जिनसाच्या राशीच्या राशी मोक्या मोक्यावर ठेवल्या होत्या एका जागेवरून दुसऱ्या जागेकडे सामान वाहून नेण्यास रुळाची व्यवस्था केली होती त्यावरून लहान लहान ग्यागिनी चालवून जिकडे तिकडे अन्नाचा पुरवठा होई. आचारी, वाढपे, पाणके हजारों होते, आणि कामें इतक्या सफाईनें उरकत कीं, कोणाला नांवें ठेवण्यास जागाच उरत नसे. महिनाभर आधींपासून सर्वांकडून कामाच्या तालमी करून घेतल्या होत्या जेवणास सुमारे ४०,००० पान झालें अशी वार्ता आहे दक्षिणेचें कामही मोठ्या कुशलतेने पार पडलें कोणाला विन्मुख जावें लागलें असा बोभाटा कोठेंही कानीं आला नाहीं

## प्रवासांतील एक हास्यकारक प्रसंग

पुढें आणखी एक दिवस तेथें राहून देवींचें दर्शन घेऊन सोबतीनेच निघालों रात्रीं उदगांवचे धर्मशाळेंत येऊन निजलों पडल्या बरोबर गाढ झोप लागली सकाळीं जागे होऊन पाहतों तों रुमालांत बांधलेला रुपया त्या जागीं नसून एक कथलाचा खोटा रुपया कोणीतरी बदमाशी करून, आम्हाला झोप लागलेली पाहून, बांधून ठेवलेला आढळला ! झालें- ज्या रुपया करितां एवढा मोठा प्रवास पायीं केला व कष्टानें रुपया मिळविला तो असा नाहींसा झालेला ! माझ्या मनाला त्यावेळीं काय वाटले असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. ज्याच्यावर असा प्रसंग आला असेल त्यालाच ह्याची कल्पना येईल. "ज्याको न फटे बिमाई, वो क्या जाने पीर पराई" कारणखरेंच आहे. दुसऱ्याला

त्याचें काय सुख दु ख? ज्याच्यावर बेतली तो समजतो आतां भाड्याला सुद्धा पैसे नाहींत सांगलीपासून तासगाव स्टेशनपर्यंत आगगाडी होती स्टेशनापासून गांव आणखी ५ मैल लांब होतें. गाडींतून उतरल्यावर पुन चालावें लागणारच तेव्हा सांगलीहून परभारें कोलापुरावरून तासगांवीं गेल्यास काय वाईट ? आणखी ६।७ मैल जास्त चालावे लागतील इतकेंच ! आणि आगगाडीनें जाणार तरी कसे? जवळ पैसे कोठें होते म्हणून पाय-रस्त्यानेंच जाण्याचा विचार करून स्नान करून निघालों, व गांवांत व कोणाकडे न जाता परभारेंच रस्त्याला लागलों. गोपाळ सांगलीचाच राहणारा असल्यामुळें तो आपल्या घरीं गेला माझीही नातलग मंडळी तेथे होती परंतु मी कोणाकडे गेलो नाहीं वाटेनें खाण्याकरिता थोडे मुरमुरे, भाजलेल्या शेंगा, दाणे, थोडा गूळ असे बाजारांतून विकत घेऊन वाट धरली हळू हळू रमत गमत सायंकाळचे सुमारास गावीं येऊन पोहोंचलो. ह्या प्रवासांत चालण्याचे फार कष्ट झाले, व मिळविलेला रुपयाही गेला, त्यामुळेंही बरेंच वाईट वाटलें

## एक जबर दुखणें

ह्या वेळचें जमखंडीचे राहणें मला कांहीं सुखकारक असें झालें नाहीं एक मोठें काळजी करण्यासारखें दुःख उत्पन्न झालें, ते हें कीं, उत्तम सुग्रास अन्न जेवावें पण तें पचू नये. लागलेंच वांती होऊन पडावें हा प्रकार सुमारें महिना दीड महिना झाला शरीर थकत चाललें अंगांत उत्साह राहिला नाहीं. परंतु तरुण वय असल्यामुळें त्याचा विशेष विचार कोणी केला नाहीं. कदाचित् तुपामुळें अशी वांती होत असेल म्हणून तूपही खाणें बंद करून पाहिलें, परंतु वांतीचें प्रकरण थांबेना. एके दिवशीं मी अगदीं स्वस्थ असा एका बाजूला पडलेला असताना संभूदादाची स्वारी एका एकीं तेथें आली, व त्यांची नजर माझेकडे जाताच त्यानें आईला हाक मारिली, व माझ्या विषयीं चौकशी केली त्यावरून त्याला कळलें की, मी आज दीड महिन्यापासून आजारी आहे. अन्न पचत नाहीं, खाल्ल्याबरोबर वांती होते, तेव्हा तो म्हणाला हें ह्याचें दुखणें बरेंच विकोपाला गेलेलें दिसतें लवकर नजरेला आलें म्हणून बरें. नाहींतर पोरगा हातचा जात होता. लागलीच त्यांनीं आपलीं सर्व

कामें बाजूस ठेवून त्याचे एक मित्र गणपतराव नाझर वैद्य म्हणून असत, त्यांचेकडे दादाचें जाणें येणें फार असे गणपतराव हे नांवाजलेले वैद्य म्हणून प्रसिद्ध होते ते चिकित्सा चांगली करीत, व त्यांच्या हाताला यशही असे ते मोठी काळजीपूर्वक योजना करीत. आमची स्थिती त्यांना ठाऊक होती. गरीबाकडून ते मोबदला न घेता उपचार करीत आणखी समूदादाची व त्याची मैत्री. त्यांनीं मला पाहतांच सांगितलें कीं दुखणें बरेंच विकोपाला गेलें आहे, मी औषध देतो, पथ्य मात्र मी सांगीन तसें कडक केलें पाहिजें, म्हणजे हें दुखणें कष्टसाध्य आहे. घाबरू नका ह्याला फक्त दुधावर कांहीं दिवस राहिलें पाहिजे. इतर सर्व पदार्थ वर्ज्य तर मीं औषध देतों, नाहींतर अपयश पदरीं घ्यावें लागेल त्यांचे म्हणणें आईनें कबूल केलें व त्यांची औषध योजना सुरू झाली आमचे पथ्य सुरू झालें पहिले दोन-तीन दिवस पाव अर्ध पाव दुधावरच भागलें. वांती कांहीं झाली नाहीं तें दूध पचलें गेलें ह्या प्रमाणें दोन सप्तकें औषध पोटात गेल्यावर थोडी थोडी भूक वाढूं लागली अर्धा शेर दूध पचूं लागलें. आता अर्धाशेर, पाऊणशेर, तशांतच तें गाईचे निर्मळ दूध कोठून आणणार? पण ईश्वर सहाय्य असला म्हणजे कोणीना कोणीतरी दाता उभा राहतोच काळे फडणीस म्हणून असल्या जमखंडींतील आजोबाचे एक यजमान तासगावीं असत. त्यांच्या कुटुंबांनी आईला बोलावून सांगितलें कीं, तुम्हांला लागेल तितकें दूध माझ्याकडून नेत जा. दुधाची तुम्हीं कांहीं काळजी करू नका. असें त्यांचे आश्वासन मिळालें मग आईलाही तसेंच हातचें काम टाकून वेळेसर त्याच्या मदतीस जावें लागे ह्या गोष्टी परस्परांवर अवलंबून असतात. दोघांनाही चांगूलपणा घ्यावा लागतो. आतां गणपतराव नाझराच्या हाताला यश येत चाललें दुधाचें प्रमाण वाढत चाललें, सुमारें शेर सव्वाशेर दूध पचूं लागलें सुमारें सात सप्तकें औषध दिलें व वैद्यांचे मर्जीप्रमाणें पथ्यही कडक रीतीनें पाळलें गेलें तेव्हां प्रकृती कोठें ताळ्यावर येत चालली. मिठाचा संपर्क नसल्यामुळें पहिलें १५–२० दिवस तर कांहीं वाटलें नाहीं, पण पुढे दुधाचा कंटाळा येऊं लागला. भात खाण्याची इच्छा होऊं लागली, परंतु वैद्यांनीं बजावलें! रोग्याला सांभाळाव्याची हीच वेळ आहे. त्यात कां थोडी

कसर झाली तर दुखणें पुन पूर्व पदावर येईल. ! तेव्हा संभाळा ! हयगय होऊ देऊं नका थोडी कसर आहे ती एकदां निघून गेली म्हणजे मिळविली, मग मी तुम्हांस वाटेल तें खाण्यास परवानगी देतों तेव्हा माझ्यावर कडक पहारा राहूं लागला सर्व खाद्य पदार्थांना कुलूपें पडलीं मिठाला तर आई फार जपूं लागली. या नतर मीही फार हट्ट केला नाहीं केव्हां केव्हां डोळयांत पाणी येई तेव्हा आईनें समजावून सागावें, आतां थोडी कसर आहे, लवकरच तूं बरा हो, म्हणजे तुला सर्व मिळेल नुसत्या शाब्दिक सहानुभूतीनें का कोठें समाधान होतें ?

आता दोन शेरपर्यंत दूध पचूं लागलें ह्या दोन महिन्यात वांतीचें नाव नाहीं ! भूकही लागूं लागली, व दोन मैल फिरावयास जावूं लागलों. त्या मुळें अंगांत थोडी थोडी शक्तिही येऊं लागली मग त्यानी आता भात खाण्यास काहीं हरकत नाहीं असे कळविलें, परतु मिठाला अजून थोडे थांबा असें म्हणताच पुन माझ्या पोटात धस्स झालें तिखट मिठावर इच्छा होऊ लागली भात खाण्यास सागितला पण तो मिठाशिवाय–नुसता दूध भात. आता तो काय घशा खालीं उतरतो. पुनः खटपट सुरू झाली असें करतां करतां त्यांनीं सागितलेले दिवस पार पडले व एकदाची सर्व पदार्थ खाण्याची परवानगी मिळाली मी उत्तम रीतीनें पथ्य पाळलें ह्या बद्दल वैद्यबुवांनी माझी फार तारीफ केली खरोखरच बरा झाल्यावर त्यांनी मला आपल्या पत्नीचा लाभ देऊन कृतार्थ केलें माझ्याकडून त्यांना प्राप्ती काय झाली तर नुसती कृतज्ञता ? ह्या त्यांच्या औषधानें मला आज पन्नास वर्षात कोणतेंही विशेष आजाराचें दुखणें झालें नाहीं. एक दुखणें जडलें पण तें पुढें फार वर्षांनीं तें दुखणें आतां मला जन्माचें झालेलें दिसतें त्या दुखण्यावर ऑपरेशन करावें असे लोक म्हणतात माझ्या एक दोन मित्रानीं ह्या दुखण्यावर ऑपरेशन करविलें पण त्याचें तें दुखण ठीक झालें नाहीं, असे ते मला सागत मीं एक दोन डॉक्टर मित्राची सलाह घेऊन पाहिली त्याचेंही मत असेंच पडलें कीं, ह्यातारपणीं थोडासा त्रास होईल पण ऑपरेशन करण्याचें कांहीं कारण नाहीं त्यांच्या सागण्याप्रमाणें मला अनुभवही तसाच येत आहे. ह्या बाबतींत १५-२० वर्षांपूर्वी मी डॉक्टरांचाही सल्ला घेतला होता. माझ्या दुखण्यापासून मला

आज पर्यंत कधीं त्रास झाला नाहीं माझ्या कोणत्याही कामात व्यत्यय आला नाहीं सर्व संसार सुखानें झाला ५–१० मैल चालावें लागे तरी त्यापासून कधीं दु ख अगर त्रास झाला नाहीं म्हणून मी ऑपरेशनच्या भानगडींत पडलों नाहीं आजही मी आपल्या समोर आहेंच. माझीं ठरलेलीं कामें मी वेळच्या वेळीं करितों कोणत्याहि कामात हयगय करीत नाहीं काम नसलें तर उलट मला त्रास होतों सध्या इतकेंच पुरे

## पुनश्च हरिः ॐ

ह्या प्रमाणें मीं बरा झाल्यावर आतां पुनः पुढें काय करावयाचें हा प्रश्न उपस्थित झाला ह्याच संधीस आमच्या रासगांवांस इग्रजी शिक्षणाची सोय नसल्यामुळें पुष्कळ विद्यार्थ्यांना त्या शिक्षणाकरितां जमखंडी, मिरज, सागली अगर पुणें येथपर्यंत मजल मारावी लागे ही अडचण पाहून रासभाऊ लागू, आबासाहेब काळे, जमखंडीचे आबासाहेबांचे एक मित्र रा. कुळकर्णी अशा तिघांनीं मिळून एक इंग्रजी शिकण्याची सस्था एका शुभ मुहूर्तावर सुरू केली तिघेही गृहस्थ घरचे खाऊन पिऊन सुखी असल्यामुळें त्याना पोटापाण्याची काळजी नव्हती तिघे स्वतत्र वृत्तीचे नोटीस फडकली हळू हळू मुलेंही जमा होऊं लागली पहिल्या वर्षी एका वर्षात दोन इयत्ता करून देण्याचे निश्चित होऊन वर्ग सुरू झाला. फी आठ आणे ठेविली, व कांहीं गरीब मुलांस नादार घेण्याचेंही ठरविलें. ही बातमी मला कळल्यामुळें मलाही त्या शाळेंत जावेसें वाटूं लागलें. परंतु त्या शाळेचें पहिलेंच वर्ष असल्यामुळें माझें नुकसानच होणार होतें मी जमखंडीहून आल्यावर आजारीच पडल्यामुळें ६-७ महिने मी पुस्तक सुद्धा उघडलें नव्हतें. त्यामुळें जे काहीं माझें इग्रजी झालें होतें तें सर्व मी विसरून गेलों होतों त्यावर पुन उजळणी होईल व झालेला अभ्यास पक्का होईल अशी आशा बाळगून मीं त्या शाळेंत जाऊं लागलों. चालकानीं मला नादार घेण्याचें ठरविलें. होतां होता त्या मुलांचे बरोबर अभ्यास होऊन सहा महिन्यानंतर पहिलीची परीक्षा झाली. त्यांत मी उत्तीर्ण होऊन माझा दुसरे वर्गाचा अभ्यास सुरू झाला २५ सां पैकीं काहीं मुलें म्हणजे सुमारें १२–१३ मुलें गळालीं तीं पुनः पहिलींतच राहिलीं जीं पास झालीं त्यांच्या करिता दुसरा वर्ग सुरू झाला अशा तऱ्हेने शाळेंत आता दोन वर्ग सुरू झाले आता आणखी एक

मास्तर त्यांना येऊन मिळाले. गोपाळराव कालगावकर ते मोठे हुषार मुखी असून आपलें कामही चोख करीत. त्याचेकडे मराठी असून ते इतिहासही शिकवीत. भूगोल वगैरे आणखी किरकोळ विषय जमखंडीचे नवीन आलेले मास्तर शिकवीत. रा. कुळकर्णी हे मास्तरही मोठे प्रेमळ असून आपलें काम चोख करीत. पुढें पुढें शाळा निघालेली ही बातमी सर्वांना कळल्यामुळें बाहेर गेलेलीं मुलें सुद्धा आतां परत येऊं लागलीं, व ह्या शाळेंत भरती होऊं लागलीं. त्यामुळें त्यांच्या खर्चात बचतही होऊं लागली, व तीं मुलें एक रुपयापर्यंतही फी देऊन शिकण्यास तयार झालीं. होतां होतां शाळेंत सुमारें ५०।६० मुलें झालीं, व दोन वर्ग चांगल्या रीतीनें सुरू झाले. उत्पन्नही बरेंच होऊं लागलें. आतां ह्या शाळेस सुरू होऊन वर्ष होत आलें. वर्षाचे अखेरीस शाळेची पहिल्या व दुसऱ्या वर्गांची परीक्षा होऊन चांगल्या तऱ्हेनें पास झालेल्या मुलांना पुढील वर्गांत प्रमोशन मिळालें. अशा रीतीनें आता शाळेंत तीन वर्ग सुरू झाले. शाळेस सुरू होऊन वर्ष झाल्यामुळें वार्षिक बक्षिस समारंभ करण्याचें ठरून त्याप्रमाणें बक्षिसें देण्याकरितां लागणारीं पुस्तकें मुंबईहून मागविलीं, व त्या बरोबर विक्रीकरिताही मुलांच्या अभ्यासास लागणारीं सर्व प्रकारचीं पुस्तकें मागविलीं गेलीं. त्या सर्व पुस्तकांची सर्व प्रकारची व्यवस्था आम्हां दोन मुलांकडे दिली. आम्हीं दोघांनीं मिळून ती पुस्तकें विकावीं व रोजच्या रोज हिशेब करून पैसे रामभाऊ मास्तरांचे स्वाधीन करावेत, व पैसे पावल्याबद्दल सही घ्यावी. असा सुरळीत कारभार सुरू झाला. श्रीमान पानसे असिस्टंट कलेक्टर साहेब यांचे हस्तें बक्षीस समारंभ मोठ्या आनंदानें पार पडला, व शाळेचें पाऊल पुढें पडलें.

## मध्येंच घडलेला एक प्रेमळ पाहुणचार

आता शाळेस एका मोठ्या घड्याळाची आवश्यकता भासूं लागली, म्हणून मास्तरांची कमेटी होऊन घड्याळ मागविण्याचें ठरविलें. तें आणण्याकरितां आमची चार मुलांची नेमणूक केली. घड्याळ आणण्याकरितां सांगलीस जाण्याचें ठरून तेथील दुकानदारास त्यांनीं एक पत्र लिहून दिलें. तें घेऊन खाण्यापिण्याची सोय करून घेऊन आम्हीं सांगलीस पोहोंचलों, व दुकानाचे मालकास

भेटलों पत्राप्रमाणें लागलीच दुकानदारानें प्याकींग करून एक उत्तम पैकीं घड्याळ आमचे स्वाधीन केलें, व घड्याळ पावल्याबद्दलची आमची सही घेतली.

नंतर आम्हीं कृष्णेवर जाऊन स्नानें आटोपून पोटपूजा केली, व गणपतीचे देवळात येऊन घंटा दोन घंटे स्वस्थ पडलों, त्यामुळें आम्हास हुशारी येऊन पुन परत निघण्यास ताजे तवाने झालों. सायंकाळींच निघण्याचें टरून वाट चालूं लागलों बरोबर दिवा वगैरे कांहीं नव्हता वाट चालतां चालतां त्याच कौलापुरच्या रानांत येऊन पोहोंचलों, तों मागील एका प्रसंगाची आठवण होऊन मनात एक प्रकारची धाक धुक सुरू झाली मागें घडलेला इतिहास त्याच वेळीं मी मुलाना सांगितला तेव्हां सर्वांची धाबीं दणाणलीं इतक्यात चंद्राचा अस्त होऊन जिकडे तिकडे अंधार गुडूप झाला, आणि मनातील भीतिमुळें पुढें पाऊलही पडेना ! तशांत थंडी वाजूं लागली. थंडीच्या अखेरचे दिवस म्हणून कपडेही विशेष बरोबर घेतले नव्हते अंगात फक्त एकेक कुडता होता ही आमची स्थिती जवळच्याच शेतात काम करीत असलेल्या एका शेतकऱ्याच्या नजरेस आली तो शेतकरी कापणीचे दिवस जवळ आल्यामुळें शेतांतच राहत होता त्यानें शेतांत तात्पुरती झोंपडी तयार केली होती शेतकऱ्यानें आम्हांस हाक मारिली, व बसण्यास घोंगडी घालून जागा करून दिली व आमची सर्व हकीकत ऐकून घेतली तो शेतकरी मोठा दयाळू होता असें दिसलें. त्यानें झट उठून चार लांकडे गोळा केलीं. थोडा पालापाचोळा विस्तव पेटविला, व आगटी तयार केली, व आमच्या जवळ बसून गप्पा सुरू केल्या, व म्हणाला आतां रात्रीचे पुढें न जातां रात्र येथेंच काढा व उजाडल्यावर वाटेस लागा ह्या त्याच्या प्रेमळ वागणुकीमुळें आमची भीती कोठल्या कोठें पळाली. मग माझ्या अनुभवास आलेली ह्याच रानातील गोष्ट मी त्या शेतकऱ्याजवळ काढिली, तर तो म्हणाला, होय दादा असा चमत्कार ह्या रानांत केव्हां केव्हां दिसतो खरा परंतु आह्माला त्याचे कांहीं वाटत नाहीं नवीन मनुष्य मात्र घाबरून जातो त्यानें घातलेल्या झोंपडींत आमची निजावयाची सोय करून दिली त्याच्या जवळ धान्य भरण्याकरितां आणलेली बरींच पोतीं होतीं तीं जमिनीवर आंथरून व पांघरण्यास एक दोन कांबळी देऊन त्याच्यानें होईल तितकें सहाय्य त्यावेळीं त्यानें आह्मास केलें. समजा अशा वेळीं तो

शेतात नसता, घरीं गेला असता, किंवा भेटला नसता, तर आमची काय दशा होती ? प्रसंगीं ईश्वर सहाय्य करितो तो हें असें आमच्या आईनें आम्हास एक मंत्र शिकविला तो असा, "कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने, प्रणत क्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः" हा मंत्र जेव्हां संकट प्राप्त होईल तेव्हां म्हणावा व त्याचा जप करावा म्हणजे मनुष्य संकटांतून मुक्त होतो निष्ठा मात्र पाहिजे. निष्ठेनें आपल्या हातून कांहीं वाईट न घडतां आपण संकटातून निभावून जातों. आईचा त्या मंत्रावर निष्ठा असल्यामुळें त्या त्या संकटांतून ती निर्विघ्नपणें पार पडेही. आईच्या उपदेशाप्रमाणें मीही अशा संकट प्रसंगीं ह्याच मंत्राचा उपयोग करतों, व त्या मंत्राच्या सामर्थ्यानें त्या विघ्नातून पारही होतों अशा ह्या मंत्रावर विश्वास असल्यामुळे मी मनांतल्या मनांत वरील मंत्राचीं कित्येक पारायणें केलीं, त्याच मंत्राच्या प्रभावानें शेतकरी भेटून आलेल्या त्या संकटातून आमची सर्वांची मोकळीक झाली झालें एकदाचें उजाडलें आम्हीं त्याच रानात मुखमार्जन वगैरे विधी आटोपून जाण्यास तयार झालों, असें पाहून त्या शेतकऱ्यानें आम्हास थोडें थांबण्याची विनंति केली, दादा मीं थोडा पाहुणचार करितो, त्याचा स्वीकार करून पुढें जा असें त्यानें म्हटल्यावर आम्हांस पुढें जाववेना त्याच शेतांत त्याच्या गाईवगैरे पुष्कळ जनावरें होतीं. त्याचें दूध रात्रीच त्यानें काढून तापवून ठेविलें होतें तें थोडें थोडें आम्हास प्यावयास देऊन त्यानें आमची बोळवण केली. आम्हीं तेथून पुढें निघालों ते बरोबर नऊ वाजतां शाळेंत येऊन पोहोंचलों घड्याळ पाहून मास्तरांना फार आनंद झाला, व आम्हां सर्वांची त्यांनीं पाठ थोपटिली. त्या दिवशीं मास्तरांकडेच जेवलों व शाळा करून मग सायंकाळीं आपापल्या घरीं गेलों. वाटेंत घडलेली सर्व हकीकत मास्तरांना सांगितली तेव्हा त्यानाही त्या शेतकऱ्याचे आभार मानून मनापासून त्याला धन्यवाद दिले

## शाळेंतील कांहीं किरकोळ गोष्टी

[ १ ]

त्यावेळीं आमच्या शिक्षकांना मेस्मेरिझमचे प्रयोग करण्याचा नाद लागला, व त्या विषयांचीं पुस्तकें मागवून त्याचा त्यानीं अभ्यास सुरू केला. प्रयोग

करण्याकरितां शाळेंतीलच आपल्या पसतीचा एकएक विद्यार्थी निवडून काढला, रामभाऊ लागूंनी मला पसंत केलें. शाळा लागूंच्या वाड्यांतच लागत असे, व सायंकाळीं आम्हीं चार विद्यार्थी अभ्यासाला मास्तरांच्या कडेच जावून रात्रीं तेथेंच निजत असू. सुमारें आठ साडेआठ वाजतां प्रयोगास सुरवात होई. आम्हाला भिंतीला टेकवून मांडी घालून बसवावें व आपण समोर मांडी घालून बसून नाना तऱ्हेचे हातवारे आमच्या डोक्यावरून, हातावरून, सर्व अंगावरून करावे, असे पुष्कळदा हातवारे झाल्यावर सहजच आम्हांला वाटे कीं, आतां आपण खालीं पडतो, व आपल्यास झोंप येते, असें होऊन एखादे वेळीं, खाली पडून झोपल्या सारखें वाटावें निजलों कीं, त्यांना वाटावें कीं, आपला मेस्मरिझमचा प्रयोग ह्या मुलांवर खास लागू होणार. कधीं कधीं मास्तरांच्या मर्जी प्रमाणें ही झोंपेचें सोंग घेऊन पडावें, मग त्याना वाटावे कीं, आपला प्रयोग यशस्वी झाला परंतु असें मास्तरांना फसविणें योग्य नाहीं अशी उपरती लागलीच होऊन ऊठून बसावें अशा तऱ्हेनें उठल्यामुळें त्यांचा विरस होई. असा त्यांनी पुष्कळ दिवसपर्यंत आमच्यावर प्रयोग केला, पण एकाग्र होऊन त्यांचा प्रयोग आमच्यावर लागू झाला नाहीं बाकी सर्व मुलांची स्थिती माझ्या प्रमाणेंच होती. मग मास्तरांनीं त्यांना स्वतःलाच कटाळा आल्यामुळे ते प्रयोग करणें साडून दिलें अनायासें आमच्या मागचा त्रास चुकला, व मास्तरांना फसविण्याची जी एक खोड आम्हाला लागणार होती तींतून सुटका झाल्याबद्दल आम्हीं मास्तरांचे मनातल्या मनात आभार मानले.

[२]

ह्याच संधीस तासगांवच्या पब्लिक लायब्ररीच्या सेक्रेटरीचे काम रामभाऊ लागू यांचेकडे आलें. त्या वेळेस लायब्ररीची अस्ताव्यस्त अशी स्थिती होती न धड यादी आहे न सर्व पुस्तकें व्यवस्थेशीर लागलेलीं आहेत ! तेव्हां त्यांनी यादी तयार करण्याचें काम माझेकडे दिलें. त्या लायब्ररींत त्यावेळीं पांच सहा हजार पुस्तकें होतीं सात आठ कपाटें होतीं. सर्व पुस्तकांची सिलसलेवार कच्ची यादी तयार करून मी मास्तरांना दाखविली. ती पाहून ते फार खुश झाले, व पक्की यादी तयार करण्याचा त्यांनी मला हुकूम दिला. मला यादी करण्यास

सुमारें आणखी तीन महिने लागले पण काम चोख झालें. त्यांत माझा एक मोठा फायदा झाला. मला लायब्ररींतील बरींच पुस्तकें वाचता आलीं. त्या वेळच्या प्रसिद्ध झालेल्या व त्या लायब्ररींत यादीवर नमूद असलेल्या बऱ्याच कादंबऱ्या मी वाचून टाकल्या. यादी लिहिण्याची मेहेनत म्हणून त्यानीं मला दहा रुपये बक्षीस देवविले, व ते सेक्रेटरी असे तों पर्यंत मोफत वाचनाची परवानगी देवविली.

[ २ ]

इकडे आतां आमच्या वर्गांत सुमारें तीस मुलें होतीं. शाळेंत डिबेटिंगची ही व्यवस्था केली होती. साप्ताहिक सभा होऊन त्यांत एखाद्या विषयावर चर्चा होई. कोणी निबंध लिहून आणी कोणी व्याख्यानें देण्याचा उपक्रम करी, कोणी नुसत्या गोष्टीच सांगे, कधीं एखादें पुस्तक वाचून त्यावर चर्चा चाले कधीं आता आपण पुढें काय उद्योग करावयाचा याचा उहापोह होई आपल्या बुद्धीप्रमाणें व कलाप्रमाणें जो तो आपलीं मतें सभेपुढें मांडी त्याला म्हणजे कांही मूर्त स्वरूप होतें असें नाहीं. कोणी म्हणे मी वकील होणार, कोणी म्हणे मी डॉक्टरी करीन, कोणी म्हणे मी आपला मास्तरच होईन, अशा तऱ्हेनें जो तो आपलीं मतें सभेपुढें ठेवी त्यांत दोनचार मुलें अत्यंत बुद्धिमान, मेहनती, आणि चतुर अशीं होतीं तीं पुढें चांगला अभ्यास करून प्रसिद्धीस आलीं. त्यात गोविंद चर्वे नावाचा मुलगा चौथ्या वर्गापासून आमच्या बरोबरच शिकत असे त्याची आमची साथ इंग्रजी चौथ्या वर्गापर्यंत राहिली पुढें तो पुण्यास शिकण्यास गेला. तो मुलगा गरीब स्थितींतच वाढलेला, आम्हीं सर्व एके ठिकाणीं खेळलेलों, पण तो पुढें उदयास येऊन सांगली संस्थानचा कारभारी बनला, व नुकताच दोन तीन वर्षांपूर्वी मरण पावला त्याचा एक मुलगा सध्या आय. सी एस ची परीक्षा पास होऊन मोठ्या हुद्यावर काम करीत आहे आणखीही कांहीं मुलें लौकिकवान झाली असताल परंतु पुढें कित्येक वर्षांत त्यांची काहींच माहित न कळल्यामुळें त्या संबंधीं मीं कांहीं लिहू शकत नाहीं एक उदाहरण डोळ्यासमोर होतों म्हणून सांगितलें. कारण वर्तमान पत्रात बऱ्याच्या संबंधीं बरीच हकीकत नेहमीं प्रसिद्ध होई. होतां होता आमचा तिसऱ्या वर्गाचा अभ्यासही संपत आला, व त्यात आमची

प्रगती दिसूं लागली पुढें वेळेवर वार्षिक परीक्षा होऊन क्लास प्रमोशन होऊन मी चौथ्या वर्गांत गेलों.

[ ४ ]

ह्याच संधीस न्यायमूर्ति श्रीमंत रानडे साहेब हे तपासणी करिता तासगावीं आले होते. त्यावेळीं फिरतीचें काम त्यांचेकडे होतें मास्तर मंडळींनीं त्याना शाळा पाहण्याचा आग्रह केला, त्या वरून त्यानीं येऊन शाळा पाहिली. आमच्या चौथ्या वर्गाची परीक्षा झाली भाषांतराचीं कांहीं वाक्यें आमच्या कडून त्यानी करवून घेतलीं. व दुसरेही आणखी बरेच प्रश्न विचारले. त्यांचा भव्य चेहरा, विद्वतेचें तोंडावर तेज, हंसत मुख, वगैरे पाहून आमच्या सर्व मुलाच्या मनात त्यांचे विषयीं अत्यंत पूज्य बुद्धि उत्पन्न झाली, व आम्हीं सर्वांनीं मनांतल्या मनांत ईश्वराची प्रार्थना करून त्याला आळविलें कीं, देवा अशीच तूं आमच्या कडून देशसेवा घडवून आण, व आह्मांला कांहीं चांगलीं कामें करण्याची बुद्धि दे आमच्या पैकीं एखाद्याची तरी अशी कीर्ति होऊं दे.

## दादाचें दुसरें लग्न

इकडे आता थोडें घरगुती विषयाकडे वळावें दादाचें पहिलें कुटुंब वारून वर्ष होत आलें होतें आईला दादाच्या दुसऱ्या लग्नाची काळजी उत्पन्न झाली होती, व त्या दृष्टीनें तिनें प्रयत्नही सुरू केला होता. मुली पाहतां पाहतां मंगळवेढ्याचे रामभाऊ खार्डीकर जे सध्यां सांगलीस राहत होते, त्यांची एक मुलगी लग्नाची होती ती पाहण्यास मी व आई सांगलीस गेलों मुलगी आम्हास पसंत पडली. दादा फार दूर असल्यामुळें त्यांना मुली संबंधीं सर्व हकीकत पत्रद्वारें कळविली त्याचें लिहून आलें कीं, तुम्हीच पाहून पसंत करा. गरीबाची का असेना पण कुटुंबवत्सल घराण्यांतील असून सच्छील असावी त्यांचेकडून कांहीं मिळण्याजोगें नव्हतेंच त्यांची गरीबी असून पदरीं चार मुलें बाळें आणखी होतीं. आम्हीं कांहीं आग्रह धरला नाहीं. पत्रिका पाहून कार्य करण्याचें ठरविलें, व तसें दादांना कळवून वेळेवर निघून येण्यास लिहिलें त्या प्रमाणें ते दोन दिवस आधीं रजा घेऊन येऊन पोहोंचले. त्यावेळीं ते मनमाड येथील शाळेंत मास्तर होते. आतां दादांनाही दोन पैसे मिळत दिनकर भटजींचे त्या मानानें बरें चाले, म्हणून ह्या वेळीं कोणाकडे

याचना करण्याचा प्रसंग आला नाहीं गरीबींतल्या गरीबीत दोघांचें काम होऊन कार्य निर्विघ्नपणें पार पडलें किडूक मिडूक वगैरे सर्व दागिने नुकतेच केलेले तयारच होते फक्त त्यास उजळा द्यावा लागला इतकेंच

## दादांचा रेल्वेंत प्रवेश

ह्या प्रमाणें आह्माला आतां दोन वहिनी आल्या. दोघीही सुना आतां घरीं राहूं लागल्या. त्यामुळें आईलाही त्यांची थोडी मदत होऊं लागली दादाची सुट्टी संपत आल्यामुळें ते परत मनमाडास गेले शाळाखात्यात पगार फारच थोडा. जेमतेम संसार चाले ह्मणून दादांनीं रेल्वेंत शिरण्याची खटपट सुरू केली त्यावेळीं तेथें इंजिनियरींग खात्यात काम करीत असलेले एक गृहस्थ उपयोगी पडून रेल्वेच्या साहेबांकडे दादांची शिफारस करून दादाकडून नोकरी करितां एक अर्ज करविला. त्या अर्जाचा विचार होवून लागलीच फडक्याच्या शिफारशीला यश येऊन मनमाड येथीलच मालगुदामात फोरमेन म्हणून त्यांना कायम केल्याचा हुकूम मिळाला. पुढे ते मनमाड येथें दोन तीन महिने होते. नंतर त्यांची बदली जबलपुराजवळ शाहपुरा नांवाच्या स्टेशनवर झाली, व त्याप्रमाणें ते त्या ठिकाणीं जाऊन रूजू झाले मधें कांहीं दिवस त्यांना नरसिंगपुरास काम करावें लागलें होतें

## माझी कपाळदुखी व अभ्यासास खो व पुढील कथानकास अनुसरून घडलेल्या किरकोळ गोष्टी

ह्या अवधींत शाळेंत असतांना कपाळदुखीचा एक नवीन रोग होऊन मला त्रास देऊं लागला. डोकें इतकें हलकें झालें होतें कीं, थोडा जरी कांहीं त्रास झाला तर एकदम कपाळ दुखावयास लागून हैराणगत व्हावी त्यामुळे अभ्यासातही व्यत्यय येई. जो पर्यंत या रोगाचा प्रादुर्भाव नव्हता तो पर्यंत अभ्यास बरा चालला होता परंतु या दुखण्यानें कच खाऊं लागलों एकदा कपाळ दुखूं लागलें, कीं मग दुसरें कोणतेंही काम होत नसे आतां हे ऐन अभ्यासाचे दिवस, मागें लहानपण व कोणी पाहणारा नाहीं, आता हें कपाळ दुखणें मध्यें जो काय अभ्यास झाला तोच पदरीं पडला त्याच अभ्यासावर जन्म काढला कपाळदुखीमुळें पुढें कांहीं अभ्यास होईना, व मी मुलाच्या

मागें पडूं लागलीं मधें मधें प्रकृति चांगली असे आठ पंधरा दिवसांनीं एकदां तरी कपाळ दुखें पुष्कळ औषधें झालीं, पण कशानें गुण आला नाहीं. अशीच ही कपाळदुखी पुढें पुष्कळ दिवस पर्यंत चालली ह्या वेळेचाही दिनक्रम बहुतेक ठरल्या सारखा होता सकाळीं उठावें, शौच मुखमार्जन करावें, सात वाजता अभ्यासाला बसावें, नऊ वाजे पर्यंत अभ्यास करून आंघोळ करावी, नंतर घरची पूजा करून एका यजमानाकडची पूजा करावयास जावें लागे ती करून दहाला जोगाकडे जेवावयास जावें लागे. कारण त्यांच्याकडचाही एक मुलगा शाळेंत जागारा होता वकील साहेबांनाही कोर्टांत जाणें असल्यामुळें त्यांचेंही जेवण आमच्या बरोबरच होई मुख्य मालक, त्याची पूजा, वगैरे, झाल्यावर भोजन करीत. आमचें जेवण झालें कीं, शाळा मधें एक तासाची सुट्टी असे त्या सुट्टींत मी शिकवणी करी गणपती स्थानमोर आपळींत एक रामभाऊ राजवाडे म्हणून गृहस्थ राहत असत त्यांनीं तेथें झोपडी बांधली होती त्या झोपडींतच त्यांचें वास्तव्य होतें त्यांनी आपल्याजवळ एक मुलगा बाळगला होता. कारण त्याना मुलबाळ कांहीं नव्हतें त्या मुलाला शिकवण्याकरितां म्हणून मी त्यांचेकडे जात असे एका मासाचे आठ आणे मिळत. त्या मुलाचें नांव आतां मला आठवत नाहीं पण पुढें मला अशी माहिती लागली कीं, ज्या मुलाला मी शिकवत होतों त्याला त्यांनीं दत्तक घेतलें नाहीं त्याच्या लहान भावाला घेतलें. त्या भावाची व माझी पुढें जबलपुरात गांठ पडली त्यांचेकडे शिकवणी होती हें मात्र खरें पुढें पाचाला सुट्टी होई मग कांहीं मुलें मिळून दत्ताच्या माळावर फिरावयास जात असूं. येताना देवाकरितां एका बागेंतून मिळाल्यास कांहीं फुलें आणावीं, व ओढ्यावर सन्ध्यावंदन करून घरीं यावें सायकाळीं ओढ्यावर बरीच मंडळी फिरावयास जात असे आमची मास्तर मंडळीही जात असे तेथें त्यांच्या ज्योतिष, ग्रह, तारे, पृथ्वी वगैरे संबंधीं गोष्टी चालत. त्याही केव्हां केव्हां ऐकाव्या क्रिकेट वगैरेचा प्रचार त्यावेळीं फार नव्हता फार झालें तर वकील लोक टेनीस खेळत विद्यार्थी बहुत करून आट्यापाट्या, विटी दांडू, लगोऱ्या, हुतुतू हेच खेळ खेळत जमखंडीस असतानाही सुट्टींत आम्हीं रामतीर्थाचे खालील कडपट्टीचे मैदानांत एक मोठें पटांगण होतें तेथें खेळत होतों

त्या पटांगणावर पुष्कळ मुलें सुट्टीचे दिवशीं दोन तीन पासून जमत, व आपापल्या पार्ट्या करून खेळत त्यात मीही पण जात असे. तसेच खेळ तासगावींही होत. ओढ्यावर सायंकाळीं पार्ट्यांना रंग फार चढे, व मेहनत ही फार चांगली होई कधीं कपडे धुण्याकरितां ओढ्यावर अगर विहीरीवर जावें लागे ओढ्यांत पाणी असल्यास त्यांतच डुबक्या माराव्या, आंघोळ करावी, एका रविवारीं अशीं कांहीं मुलें जमलीं असतां ज्यांना पोहावयास येत होतें त्यानी भराभर पाण्यांत उड्या टाकल्या, व ते पोहूं लागले मला पोहावयास बिलकूल येत नव्हतें त्यामुळें मी त्यांच्याकडे नुसता पाहात एका पायरीवर उभा होतों, इतक्यांत एका मुलानें मागून येऊन मला जोरानें धक्का दिला तसा मी पायरी चुकून एका दगडावर आपटला गेलों, व पाण्यांत पडलों हें पाहून जवळच आणखी कांहीं मुलें, पोहावयास आलेलीं उभी होतीं, त्यानीं भराभर पाण्यांत उड्या टाकून मला बुडूं न देतां अलगच उचलून काठावर आणलें खोंक बरीच जबर होती तिला बरी होण्यास पुढें पुष्कळ दिवस लागले. पण मला पाण्याची जी भीति बसली ती कायमची. ती मुळें मला पोहावयास आलें नाहीं तें नाहींच. कारण पाण्यांत उतरण्यासही पुढें पुढें भिऊं लागलों. ही भीति मला अद्यापही आहे वरील सर्व खेळ वगैरे आटोपल्यावर देव दर्शन करून घरीं यावें, त्यावेळीं बहुतेक मुलाना स्नान संध्या, सायंकाळीं देव दर्शन, वगैरे करण्याची संवयच लावीत मग मुलें न चुकतां त्या गोष्टी करीत आतां इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावामुळें व आयुष्याचा क्रम बदलल्यामुळें त्या गोष्टींची आठवण सुद्धां होत नाहीं परंतु ज्यांचे अंगीं ह्या गोष्टी बिंबल्या आहेत त्यांचे हातून उतारवयांत सुद्धा ह्या गोष्टी सहज घडून येतात, व त्याना त्या कराव्या अशा वाटतात

आई व मी होतों तों पर्यंत सर्व कारभार आमचाच होता आमचेंच घर, आमचेंच काम, म्हणून सर्व गोष्टी कराव्या लागत आतां भाऊ आले. त्यांना दोन पैसे मिळूं लागले साहजिकच आईच्या वृत्तींत सुद्धा फरक पडूं लागला पुढें मोठ्या मुलाचा पत्ता लागला त्याला नोकरीही लागली थोडकीच कां होईना प्राप्ति ! पण ती मिळविता असें नामाभिधान त्याला मिळालेलें त्याचीं ही दोन लग्नें झालीं. सुना घरांत आल्या त्यांच्याही दुसऱ्यांच्या मुली म्हणून

घरात बडिवार सुरू झाला. तें मिळवितें ह्मणून त्यांचेच हे सर्व असे आवाज घरच्या घरींच उठूं लागले. सुनानाही बरें वाटावें ह्मणून आईकडूनच ह्या गोष्टी होऊं लागल्या "हे सर्व दिनकर भटजीचेच आहे, तुझें कांहीं नाहीं, तुला कांही येत नाहीं" अशा गोष्टी आईचे तोंडूनच कधीं कधीं निघू लागल्या.

लहानपणी मला पुराण वगैरे ऐकण्याचा बराच नाद असे तसेच सर्कस नाटकेंही पाहण्याचा होता त्यावेळीं आजच्या सारखीं सामाजिक नाटकें नसत. पौराणिक नाटकें फार असत कोणीना कोणी कंपनी तासगांवीं पडलेलीच असे. संगीत नाटकेंही होतीं. त्यांत 'किर्लोस्कर' ही कंपनी प्रसिद्ध त्यांचीं नाटकें मिरज, सांगली येथें होत आमच्या सारखीं गरीब माणसें त्यांना तीं श्रीमंतीचीं नाटकें कशी पाहावयास मिळणार! कारण त्या नाटकांना तिकीटें फार किंमतीचीं असत पौराणिक नाटकें चार पैशांत पहावयास मिळत, व कांहीं कंपन्या खेळही फार चांगले करीत, त्यामुळें लोकांचें मनरंजन बरेंच होत असें श्रीमंत नाटकें दुसऱ्या गावीं जाऊन पाहावीं लागत. असेही नाटक पाहणारे शौकीन तासगावीं होते. ते दर शनिवारी भाडें खर्चून सांगलीस जाऊन नाटक पाहून दुसरें दिवशीं तासगावीं परत येत. आमची बाहेर गावीं जाण्याची ताकद नसल्यामुळें आम्हीं दूधाची तहान ताकांवर भागवावी! परंतु तेंच ताक आम्हांला चागलें लागे त्यांत आम्हींही त्याची नक्कल घरीं करावी, थेटर उभारावे, पडदे बांधावे, गिऱ्या लावून ते ओढण्याची व्यवस्था करावी, आणि मुलें जमवून नाटकें करावींत पण तीं तात्पुरतीच. खरोखरीचे स्टेज बांधून आम्ही नाटक करण्याचे भानगडींत कधींच पडलों नाहीं आज कालच्या गोष्टी सहज झाल्या आहेत थोडा बहुत हा शिक्षणाचाही प्रभाव आहे त्यावेळीं कोठें ह्या नवीन शिक्षणाची सुरुवात झाली होती हळूं हळू मुलें बाहेर पडूं लागलीं होतीं सर्कस कंपन्या करिताही तासगाव पुढें प्रख्यातीस आलें माझ्या वेळेला पांडु कुंभार वगैरे दोन-चार मुंडळींनी नुकतीच सुरुवात केली होती. पुढें ४।६ कंपन्यानी चागलेंच नांव मिळविलें

वर उल्लेखिलेल्या घरच्या परिस्थितीमुळें मी जरा त्रासूं लागलों.

95002
23/10/57B

# भाग २ रा.

## जबलपूर

## सन १८९३ ते १९३२

## मी घर सोडलें

वाढता वाढतां मी जरी कोणाच्या जीवावर त्यावेळींही नव्हतों तरी माझ्या मनावर त्याचा परिणाम होऊन, मला आता कोठें बाहेर जाऊन कांहीं उद्योग पहावा व पुढील अभ्यासाचें जुळल्यास तो करावा, असें माझ्या मनात येऊं लागलें ह्याच वेळीं माझ्या कपाळ दुखीमुळें माझ्या पाठातरांत उणेपणा येऊं लागला होता. पाठ केलेलें मी विसरूं लागलों असें माझें मलाच वाटू लागलें. तरी ही गोष्ट मी लोकांच्या दृष्टोत्पत्तीस अद्याप आणली नव्हती. शिकावयाला जावयाचें असेंच म्हणत राहिलों. चौथीनंतर तरी बाहेर जावेंच लागणार होतें. परंतु सध्यां तशी कांहीं सोय नसल्यामुळें गप्प होतो. इतक्यांत दादाचें पत्र आलें कीं, "आईला व वहिनीला कोणीतरी चागली सोबत पाहून पाठवून द्यावें. मी पास पाठवितों माझे इकडे हाल होतात वेळेवर जेवण मिळत नाहीं" वगैरे लागलेच त्यांचे पासही आले. आईचें व वहिनींचें जावयाचें ठरलें आता माझें येथें कसें जमेल? आईवाचून आजपर्यंत मी एकटा असा कधींच राहिलों नव्हतो. करितां मी बरोबर येतों असा हट्ट मी आईजवळ धरून बसलों. मग शाळेकडे माझें लक्ष लागेना मी आईला म्हणालों तुम्हांला कोणीतरी सोबत पाहिजेच आहे तर मीच सोबत म्हणून तुमच्या बरोबर येतो तेथें कोठें माझें शिक्षणाचें नच जमलें तर सुट्टी संपल्याबरोबर इकडे परत येईन. माझ्या येण्याजाण्याचें थोडें भाडें खर्च करावें लागेल इतकेंच! पुढे माझा हट्टच पाहून आईनें मला नेण्याचें कबूल केलें, परंतु दिनकर भटजींना मला पाठविण्याची इच्छा नव्हती मग प्रेमामुळें तसें होतें कां आणखी कांहीं दुसरें कारण होतें हें मला कधींही पुढें कळलें नाहीं पुढें त्यांची माझ्याशीं वागणूक मात्र तिऱ्हाईताची दिसली. ही त्यांची वृत्ती लहानपणा पासूनच होती जमखंडीस आम्हीं सहा सात वर्षें एका ठिकाणीं होतों, परंतु माझी व त्यांची भेट होण्याचा सुद्धां प्रसग फार क्वचितच येई. ह्याप्रमाणें सूत! मग आता तर आम्हीं दोघे समजूतदार झालेलों दोघानाही आपलें बरें वाईट कळू लागलेलें मग त्या वेळची स्थिती काय विचारावी? परंतु माझें जाण्याचें ठरलें इतकें मात्र पक्कें कोणीतरी माझ्या जाण्यात व्यत्यय उत्पन्न करील म्हणून मी ही जाण्याची गोष्ट मुद्दामच कोणाला सांगितली नाहीं.

ह्या माझ्या गुपचुप जाण्याचाही एका हितशत्रु मित्रानें फायदा घेतला हें मागाहून मला कळलें मी एक खास युक्ति केलेली त्याला झोंबली' आम्हां दोघामित्राकडे शाळेंतील विक्रीच्या पुस्तकाचा चार्ज होता. विक्राचे पैसे कधींच आम्हीं आपल्या जवळ ठेविले नाहींत. तावडतोब मास्तरांजवळ देत असूं. पुस्तकाच्या कपाटाच्या किल्ल्या माझ्या जानव्यालाच असत परंतु कशी कोण जाणे ? माझ्या त्या मित्रानें एक दोन पुस्तकाची अफरातफर केली, असा मला संशय येऊं लागला सर्व पुस्तकें मोजून यादी प्रमाणें आहेत किंवा नाहींत हें पाहण्यास आता वेळ नव्हता अशा कामाला दहा पाच दिवस मोडणार होते मला तर आई बरोबर लवकर जावयाचें होतें, कारण त्याच्या पासाची मुदत लवकरच संपणार होती माझा पास नव्हता तरी त्यांचे बरोबर जावयाचे असल्यामुळें इलाज नव्हता मित्रा जवळ किल्ली देतों तर तो आणखी किती पुस्तकें गहाळ करता कोणास ठाऊक! मास्तरांना जाऊन सागतों तरी ते म्हणणार कीं सोबत्याला चार्ज देऊन जा परंतु मला इतका वेळ कोठें होता ? माझें जाणें थांबणार बरें तशीच मित्राजवळ किल्ली न देतां व कोणालाही न विचारता तसाच गाडींत बसलों व पुढे मास्तराचे पत्र आल्यावरून किल्ल्या दिनकर भटजी द्वारें मास्तरांकडे पाठविल्या ह्या पासून मास्तराची तर थोडी बहूत नाराजी झालीच, परंतु त्यात माझाही एक फायदा झाला किल्ल्या मिळाल्याबरोबर पुस्तकें यादी प्रमाणें तपासली गेलीं सर्व हिशेबही तपासून पाहिला सर्व बरोबर होतें पण दोनच पुस्तकें गहाळ झाली होतीं. आता दोन पुस्तकावरच भागलें! किल्लीच स्वाधीन केली असती तर न जाणों किती पुस्तकें गेलीं असतीं ? त्या दोन पुस्तकाची किंमत आम्हां दोघांनाही भरून द्यावी लागली माझ्या नावावर निघालेली रकम मी लगेच पाठवून दिली मित्रानें काय केलें हें काहीं मला कळलें नाहीं व मीही त्याची चौकशी केली नाही पुण्यास उतरल्यावर एका नातलगाकडे जेवण होऊन पुन रात्रीचे गाडीनें पुढें निघालों ते दौंड मनमाड मार्गानें मनमाडास जाऊन पाहोंचलों मनमाडची माहिती आईला होती. कारण दादा मनमाडास असताना आई एकदा तेथें गेली होती, म्हणून आम्ही मनमाडास उतरलों नदीवर जाऊन स्नान वगैरे उरकून आईनें स्वयपाक केला व आम्ही

जेवणें उरकून सायंकाळपर्यंत स्टेशनावर येऊन पोहोंचलों व रात्रीं आठाचे गाडीनें पुढें जाण्यास निघालों. तो सकाळीं सातचे सुमारास इटारसीच्या जवळचें स्टेशन भिलाखेडीस गाडी येऊन पोहोंचली तेथल्या स्टेशन मास्तरांना दादानें आम्हीं येणार हें पूर्वीच कळविलें असल्यामुळें मास्तर गाडीवर आले व आम्हाला पुढें जाऊं देईनात. आग्रह करून त्यांनीं आम्हाला तेथेंच उतरून घेतलें मास्तराकडेच जेवण खाण झालें सायंकाळपर्यंत भिलाखेडीस मुक्काम करून रात्रीं नऊ वाजता तेथून निघालों तों प्रातःकाळीं सात आठचे सुमारास दादा ज्या स्टेशनावर होता त्या शाहपुरा नांवाच्या स्टेशनावर येऊन पोहोंचलों मास्तर, पोर्टर, वगैरे मंडळी गाडीवर हाजरच होती गाडींतून उतरल्या बरोबर स्टेशन मास्तर साहेबाकडेच आमचे सर्वांचें चहा पाणी झालें तों पर्यंत पोर्टर लोकांनीं आमचें सामान दादाच्या बिऱ्हाडीं नेऊन ठेविलें होतें. सर्वांशीं गप्पा गोष्टी झाल्यावर आम्ही बिऱ्हाडीं जाऊन पोहोंचलों सर्वांची ओळख होण्यास दोन चार दिवस लागले आमच्या झोंपडींत जागा फारच थोडी होती. सावळारामपंत ठिपसे नांवाचे स्टेशन मास्तर त्यावेळीं तेथें होते त्यांचा स्वभाव मनमिळाऊ व गमत्या होता माझ्याच वयाचा त्यांचा एक मुलगा व त्याचे आणखी दोघे लहान भाऊ हे जबलपुरास शिकावयास राहिले होते सुट्टीच्या दिवशीं स्टेशनावर येत त्या मुदतींत त्या मुलांची व माझी बरीच गट्टी जमली पुढें ते बदलून गेल्यावर सुद्धां माझा ते समाचार घेत मुजुमदार नांवाचे एक असिस्टंट स्टेशन मास्तर होते, त्यांच्या कुटुंबाची व आमच्या कडील बायकामंडळीची बरीच ओळख होऊन त्यांच्याकडे आमचें जाणें येणें सुरू झालें पुढें त्यांची मर्जी इतकी प्रसन्न झाली कीं, त्यांनीं आपल्या टाकींत दादाची निजावयाची सोय करून दिली कारण त्याची रात्रपाळी असल्यामुळें रात्रीं ते आठ नऊ तास स्टेशनावरच असत त्यांच्या कुटुंबाला सोबत म्हणून आईही केव्हां केव्हां तेथें बसावयास जाऊं लागली अशा तऱ्हेनें दोन्हीं कुटुंबांचें संघटण बरेच वाढले ओळख देख नसता परदेशांतही अशी मंडळी भेटतात अशा ह्या ऋणानुबंधाच्या गोष्टी आहेत

पुढें पुढें स्टेशन मास्तरांचे परवानगीनें आम्हीं त्यांचें काम थोडें थोडें शिकूं लागलों त्या अवधींत स्टेशनचें बरेच काम आम्हीं अवगत केलें. अशा

तऱ्हेनें आम्हीं त्यांच्या उपयोगीं पडूं लागल्यामुळें दोघां मास्तरांचीही मर्जी माझेवर सुप्रसन्न होती. मग आह्मांला कोठें अटकाव नव्हता पहिल्या प्रथम आमच्या स्टेशनवर निजण्यानें असिस्टंट स्टेशन मास्तरांना त्रास होत होता तो होईनासा झाला, व माझी त्यांनी तेथें उत्तम सोय करून दिली

स्टेशनचा एक बाजाराला जाण्याचा पास होता तो घेऊन कधीं कधीं जबलपुरास जाऊन बाजार करून यावा कधीं कधीं दादाही बरोबर असत शहापुरा येथें आठवड्यांतून एकदा बाजार भरे. तो सोमवारच्या सोमवारीं त्या बाजारांत जाऊन आठवड्याची सर्व बेगमी करून ठेवावी, बहुतेक सर्व जिन्नस त्या बाजारांत मिळत. क्वचितच जबलपुरास जावे लागे. तेथून नर्मदाही जवळच होती. कधी स्टेशनची सर्व मंडळी मिळून स्नानास नर्मदेवर जावें अशा तऱ्हेने दोन महिने तर व्यतीत झाले. सुट्टी संपत आली आतां आम्हीं पुढें काय करावें याचा ऊहापोह सुरू झाला कोणी म्हणे जबलपुरास शिकावयास ठेवावें, कोणी म्हणे त्याला हिंदी कांहीं समजत नाहीं तेव्हां येथील शाळेंत त्याचा अभ्यास कसा होईल ? कोणी म्हणे अशी उमेदवारी करतां करता कोठें तरी रेल्वेंत जमून जाईल. त्यावेळी दादाला काय ते ३० सच रुपये मिळत होते त्यात आमचे चौघांचे कसें भागेल ? वगैरे भानगडी होत्याच त्यावेळीं आजच्या सारखी महागाई नव्हती धान्यें वगैरे स्वस्त होतीं कपडालत्ताही आजच्या सारखा महाग नव्हता दीड पावणे दोन शेर उत्तम तूप, तीस शेर हरभरे, दहा-बारा शेर तांदूळ, वीस शेर पर्यंत गहूं पधरा सोळा शेर डाळी, मनुष्य किती खाईल ? तीन रुपयांत पोट भरत असे चहाचा प्रचार नव्हता दूध दहा–अकरा शेर मिळत असे तेव्हां त्या तीस रुपयांत साधारण तीन चार मनुष्यें ज्या कुटुंबांत आहेत अशाचा संसार बरा चाले. मुख्य गोष्ट विशेष गरजा वाढल्या नव्हत्या त्या दृष्टीनें दादाची इच्छा होती कीं, मी तेथेंच राहून काम शिकावें व रेल्वेंतच कोठें तरी नोकरी पहावी, परंतु माझें मत असे पडलें कीं, असें कुचंबत राहण्यापेक्षा जबलपूर शहरासारख्या शहरांत राहण्याची सोय झाल्यास बरी कारण तेथें राहिल्यास चार लोकांच्या ओळखी होऊन शिकणें जमल्यास बरेच नाहींतर कोठेंतरी वशीला लाऊन धंद्याची सोय झाल्यास त्या पेक्षाही उत्तम

अशी भवती न भवती चालू असतां कर्मधर्म संयोग असा कीं विनायक-राव ताबे नांवाचे एक गृहस्थ रिलिव्हिंग स्टेशन मास्तर म्हणून कांहीं दिवस कामा निमित्त त्या स्टेशनवर आले होते कारण तेथील नेहमींचे अ स्टेशन मास्तर सुट्टी घेऊन आपल्या घरीं गले होते त्या मुदतींत ताबे ह्यांच्याशींही आमचें बरेंच संघटण होऊन गप्पागप्पा सुरू झाल्या. त्यानाही बोलावयास बरेंच हवें होतें त्याना मी कामांत मदत करावी दोनचार दिवसानंतर त्याची जेवण्याची सोयही आमच्या कडेच झाली ह्या गोष्टीचा त्यांचे मनावर परिणाम होऊन त्यांचे मनांत कांहीं एक विचार घोळूं लागले. बोलतां बोलतां त्यांनी गोष्ट काढली कीं, ह्या प्रांतांत मराठी भाषा प्रचारांत नसल्यामुळें दक्षिणी मुलांचें फार नुकसान होते कोणी शिकविणारा नसल्यामुळें मुलाना आम्हाला हिंदी शिकवावें लागतें त्यामुळें मुलें मातृभाषेस मुकतात. काय करावें? आम्हीं मोठ्या विचारांत आहोत कोणी एखादा तुमच्या सारखा तरुण मनुष्य मिळाल्यास आमचे मोठें काम होईल ते जरी ह्या प्रांतांतीलच राहणारे होते, पण त्यांची मातृभाषा मराठी असल्यामुळें त्याना मराठीची फार आवड होती. त्यावेळीं जबलपुरास घरोंदारीं हिंदीचाच प्रचार सुरू होता. ' चिटीयाची टांग पकडकर त्याला बाहेर खींचून टाका अशा तऱ्हेच्या मराठी भाषेचा प्रचार फार होता हा कांहीं त्यांचा दोष नाही कारण सर्वत्र हिंदी असल्यामुळें अशी खिचडी होणें स्वाभाविकच होतें अशा तऱ्हेची आणखी कांहीं भडभडही त्याचे मनाची होती ह्या प्रमाणें आमचें त्याचे ह्या विषयावर दोन चार वेळां बोलणें झाल्यावर आमच्याही मनांत येऊं लागलें कीं, संधी बरी आहे. ह्याचा उपयोग करून घ्यावा एकदां हुकलें तर असा प्रसंग पुन येणार नाहीं. निदान राहावयास जागा मिळून काही तरी उद्योग पाहण्यास वाव मिळेल तेव्हां आलेली संधी दवडूं नये मग मी दादांचा विचार घेऊन त्यांना लागलीच होय म्हटलें त्याचा एक मुलगा, त्याच्या भावाचीं तीन मुलें, त्याच्या एका मित्राचीं चार मुलें, अशा आठ मुलास सकाळीं दोन तास शिकवावें व दोन वेळां आमचेकडे जेवावें, राहण्यास जागाही फुकट. सायंकाळींही आपल्या सर्व मुलावर नजर ठेवून त्याचा शाळेंतील अभ्यास त्याच्याकडून करून घ्यावा, व बाकी राहिलेल्या वेळांत तुम्हीं शाळेंत जावें किंवा दुसरा

कोणताही उद्योग करावा त्याला आमची ना नाहीं ह्याप्रमाणें त्यांचा व आमचा ठराव झाला त्यास तेथील स्टेशन मास्तरांचीही संमती मिळाली लागलीच आमचें जाण्याचें पक्कें होऊन त्यांच्या बरोबरच निघून सन १८९३ च्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यास जबलपुरास पोहोंचलों व दुसऱ्याच दिवसापासून आपल्या ठरलेल्या कामास सुरुवात केली.

## जबलपूर शहराचें थोडेसें वर्णन

पन्नास वर्षांपूर्वी ज्यानें जबलपूर पाहिलें तो कदाचित प्रसंगवशात् ह्या ठिकाणीं येऊन आज पोहोंचला तर त्याला असें वाटेल कीं, आपण चुकून मुंबई, पुणें, नागपूर सारख्या एखाद्या महारराष्ट्रांतील शहरांतच येऊन पोहोंचलों कीं काय? जबलपूरच्या आसपास लहान लहान डोंगर, बाजूला नर्मदा, शहाराच्या आसपास पेरूचे सुंदर बाग, शहरात रस्त्याच्या मोठमोठ्या हिरव्यागार अशा झाडांच्या रांगा, तें भव्य स्टेशन, असा रमणीय देखावा, आतांतर आहेच पण पूर्वीही होता. आतां ज्याला गोलबाजार, राईटटाऊन, जार्ज टाऊन वगैरे म्हणतात तो भाग पूर्वी बागबगीचे पेरूचीं झाडें वगैरेंनी परिपूर्ण असा होता. आतां ती सर्व पेरूचीं झाडें तोडून तेथे वस्ती आहे ह्या नवीन वस्तीमुळे पूर्वीच्या सुंदरतेंत आता चागलीच भर पडली आहे आपल्या सर्व महाराष्ट्रीय संस्था याच भागात पसरल्या आहेत ह्या एक्स्टेंशनमुळेंही वस्ती मदन महाल स्टेशन गाठून पुढें मदन महाल पर्यंत जाईल असा आजचा रंग दिसूं लागला आहे. पूर्वी ह्या भागांत जाण्यास भीती वाटत असे नर्मदेच्या स्नानास जावयाचें असल्यास चोर सहाजण मिळून जात परंतु आतां जवळ जवळ नर्मदे पर्यंत वस्ती पसरल्यामुळें तशी काहीं भीती उरली नाहीं अशा सुंदर शहरात मी रा तांबयांच्या बरोबर प्रवेश केला, व आपल्या कामास सुरुवात केली.

शिकविण्यास सुरवात तर केली मुलांना शिकविणे हें जरूरच होते कारण तो पोटापाण्याचाच प्रश्न होता तें काम सांभाळून कांहीं अभ्यास झाल्यास पहावा (कारण तो होईल अशी माझी मलाच खात्री नव्हती, कारण कपाळ दुखी व हिंदी भाषेचें अज्ञान) ह्या हेतुनें हितकारिणी हायस्कूल मध्यें विनायकरावांच्या ओळखीचे एक चौथ्या वर्गाचे भय्यासाहेब फणसळकर शिक्षक

होत त्यांना जाऊन भेटलों सर्व औपचारीक बोलणीं झाल्यावर ते म्हणाले सध्या ह्याला वर्गांत बसू दे मग पाहू

## कांहीं तुलनात्मक विवेचनपर घडलेल्या गोष्टी

त्यावेळीं महाराष्ट्रातील माझ्या पाहण्यात जी कांहीं शिक्षण पद्धति आली व त्या वेळच्या ज्या ज्या मुलांशीं माझा सबध आला त्यांत संभाषण म्हणजे इंग्रजींत एकमेकाशीं बोलणें हा विषय सर्वांचा कच्चाच आढळून आला. लेखी परीक्षेंत उत्तम गुण मिळविणारीं मुलें बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे मागे पडत ह्याला कारण काय असेल तें असो मी माझा अनुभव सांगितला तीच मध्यप्रांतातील शिक्षणाची तऱ्हा पाहिली तर असें आढळून आलें कीं, तिसऱ्या चौथ्या वर्गांतील मुलें भराभर मास्तरशीं इंग्रजींत बोलून उत्तरें देत. ह्यामुळे आमच्या सारख्या इंग्रजी बोलता न येणाऱ्या मुलाला लाजऱ्यासारखे वाटे सांगण्याची मुख्य गोष्ट म्हणजे इंग्रजी विषय त्यांचा उत्तम होता बंगाल, युक्तप्रांत वगैरे कडील नुकती मॅट्रिक पास झालेली मंडळी मध्यप्रांतात येऊन हायस्कूल मध्यें इंग्रजी विषय उत्तम रीतीनें शिकवात, व प्रसंग पडल्यास कॉलेजच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीही शिकविण्याची धमक ठेवीत असे एक दोन उत्तम नावाजलेले शिक्षक माझे पाहण्यांत तेथें त्यावेळीं आले, व त्याचा माझा परीचय झाला ते शिक्षक म्हणजे कालीबाबू या नावानें प्रसिद्ध असत त्यांनी हितकारिणी हायस्कूलची हेडमास्तरकी पुष्कळ वर्षे केली, व त्या हायस्कूलला नांवारूपास आणलें. कालीबाबूची माझ्यावर बरीच मर्जी असे, व माझी ते विचारपूसही करीत.

फणसळकर मास्तरांच्या सांगण्याप्रमाणें रोज शाळेंत जाऊन बसूं लागलों शाळेंत जो कांहीं अभ्यास होईल तो फक्त ऐकावा अभ्यासक्रमध्येही फरक होता ह्या प्रांतांत इंग्रजी दुसरी तिसरी पासूनच बीजगणित, भूमिती वगैरे शिकविण्यास सुरुवात होई तर मुंबई प्रांतात चौथी पासून वरील विषय शिकवींत म्हणून इकडील मुलांचे विषय तयार असत त्या मानानें मुंबईकडील विद्यार्थी इकडे आल्यास त्याला अर्थातच तो विषय जड जाई तेथें बुद्धि तरी काय काम देणार ? एखादें वर्षाचें तरी त्याचें नुकसान होईच. माझी ही अशीच दशा झाली आम्हाला ते विषय कांहीं समजेनात अर्थात् मास्तरचें मत

आमच्या विषयीं प्रतिकूल बनू लागलें, त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तशात आम्हाला हिंदी येत नव्हतें

एका रविवारीं विनायकराव मला बरोबर घेऊन श्रीमंत राजे साहेब सागरवाले यांचेकडे भेटी करितां घेऊन गेले सर्व महाराष्ट्र मंडळींचे पुढारीपण त्यावेळीं त्यांचेकडेच होतें, व सर्व लोक त्याना मानीत एक सागर प्रांताचे राजे म्हणून व दुसरें म्हणजे ते एक बरेच शिकलेले, विद्वान, बहुगुणी, असे सन्माननीय गृहस्थ होते. त्याना पोलिटीकल पेन्शनही मिळत असे. अशा पुढारी गृहस्थास त्या वेळीं भेटणें आवश्यक होते आम्ही भेटीला गेलों त्यावेळी, भैय्यासाहेब फणसळकर तेथेंच बसले होते औपचारिक बोलणीं झाल्यावर विनायकरावांनीं त्यांना विचारलें कीं, तुमचा विद्यार्थी कसा आहे ? वर्गात चालूं शकतो किंवा नाहीं ? तेव्हा त्यांनीं झटकन् उत्तर दिलें 'ही इज् नॉट फिट फॉर धिस क्लास' (तो ह्या वर्गास लायक नाहीं) ह्या त्यांच्या उत्तराचा माझ्या मनावर बराच परिणाम झाला. त्या वेळीं मला असें वाटलें कीं पहा मी जमखंडीस दोन-अडीच वर्षे व तास गावांस दोन-अडीच वर्षे शिक्षण घेऊन चौथ्या वर्गात सुद्धा चालू नये, हे केवढें आश्चर्य ? एकंदरींत मीं आपल्या मनाशीं असा निष्कर्ष काढला कीं, आपल्या हातून आता विद्या होणें शक्य नाहीं कारण असें कीं, लहानपणापासूनच तें सरळ न होतां त्यांत खो बसत आला कांहीं माझे हितचिंतक त्या वेळी मला असे आढळले कीं, ते म्हणत कीं, 'टवाळ्या करीत आज पर्यंत दिवस घालविले, अभ्यास केला नाहीं, कपाळ दुखण्याचा बहाणा केला, आतां बसले रडत' त्यांचे म्हणणें एका अर्थी खरें होतें ते डोकें दुखीमुळें हैराण झाले नाहींत. त्यांच्या शाळेंत जाण्यात कधीं विघ्न आलें नाही ... बरोबर मिळत गेलें, बुद्धीची जोड मिळाली, नशीबानें हात दिला, कांही संकटे न येता शिक्षण पार पडले. आमची स्थिती त्यांच्या अगदी उलट वडीलांचे दर्शन नाहीं सगळे जिणे दुसऱ्याचे गुलामगिरीत आज येथे तर, उद्या दुसरीकडे. एका ठिकाणी बूड स्थिर नाहीं, कोणी काळजीपूर्वक वेळो वेळीं टोचणारा ही नाहीं. मग शिक्षण होते कसें ? असें झालें खरें ! त्याला तुम्ही वाटेल तें नावे द्या ! हलगर्जीपणा!

दैव योग ! दुर्दैव !!! कांहींही. जो दिव्यांतून पार पडला तोच शहाणा बाकीचे सर्व हतभागी ! आपापल्या परीनें ज्याला जसा अनुभव आला तशी त्यानें ह्या गोष्टींची विल्हेवाट लावावी. त्या त्याच्या बोलण्याचा माझे मनावर परिणाम होऊन आतां उद्या पासून शाळेंत जावयाचें नाहीं, असाच मी निश्चय केला

## मराठी शाळेच्या स्थापनेची पूर्व तयारी

[१]

एक ध्येय मनापुढें ठेवून ईश्वराची प्रार्थना केली कीं, " देवा आज पर्यंत माझे हातून जो हलगर्जीपणा झाला तो झाला पण आतां तूंच मला सहाय्य होऊन मी केलल्या निश्चया प्रमाणें माझीं कार्यें पार पाडण्यास मला मदत दे. " ते कार्य म्हणजे माझ्या आटोक्यांत असलेलें प्राथमिक शिक्षण देणारी, जिची या शहरांत उणीव आहे अशी एक संस्था स्थापन करून तिजसाठीं आपले आयुष्य खर्ची घालणें तन मन धनें करून हें कार्य चालवावें, एक मराठी शाळा स्थापावी असा निश्चय ठरवून त्या उद्योगाला लागलों हेंच एक असे कार्य होतें कीं, ईश्वराचे सहाय्य झाल्यास लोकांत मान मिळून व त्यांत परोपकारही होऊ शकून पोटाची विवंचनाही दूर झाली असती. आतां भोजनाची तर सोय जमलीच होती व राहण्यासही स्वतन्त्र व सोईस्कर अशी जागा मिळाली होती

आतां मी माझ्या नेहमींच्या सवयी प्रमाणें एक कार्यक्रम निश्चित करुन त्या प्रमाणें वागूं लागलों. सकाळीं सहा वाजतां उठावें, शौच मुखमार्जन करून सात वाजता मुलांना बोलावून त्यांचा अभ्यास, शाळेंतील अडचणी समजावणें, व मराठी भाषेचे ज्ञान करुन देणें, हें नऊ वाजेपर्यंत करावें अभ्यासाकरितां मुंबईचींच पुस्तकें मागविलीं व त्या बरोबरच मोडी वाचनही सुरू केलें अशा तऱ्हेनें नऊ वाजेपावेतों अभ्यास झाल्यावर मुले आपापल्या घरीं जात मग मी आंघोळ करीं. मला ऊन पाण्याची संवय असल्यामुळें आंघोळीस ऊन पाणी मिळे नंतर मुलांबरोबर किंवा कधीं विनायकराव घरीं असल्यास त्यांच्या बरोबर जेवण होई मी कधीं वामकुक्षी करीत नसे जेवणानंतर कधीं एखादें पुस्तक वाचावें, कधीं वर्तमानपत्र मिळाल्यास वाचावें अशी एक ताम करमणूक करून ज्या मुलांना शिकवीत होतों त्यांच्या शाळेंत

जाऊन बसावें. दोन चार दिवस तर कोणाचीच ओळख नसल्यामुळें मास्तर-लोकांशीं बोलणें चालणें कांहींच झालें नाहीं मास्तरांची शिकविण्याची धाटणी कशी आहे ती पहावी, असें सुमारें आठ-दहा दिवस चाललें मग घरीं यावें, भाजी वगैरे कांहीं आणावयाची असल्यास आणावी सायंकाळ झाल्यावर संध्या वगैरे करून पुन मुलांना शिकवावयास तयार व्हावें. तोंपर्यंत मुलेंही जेऊन तयार असत सातला पुन घरच्याच मुलांना अभ्यासाला घेऊन बसावें व त्यांचा शाळेचा अभ्यास करवून घ्यावा. उदाहरणें समजावून सांगावीं. अशा तऱ्हेनें त्यांच्या अभ्यासांत त्यांना मदत करावी. इतक्यांत मालकांची संध्या, स्तोत्रपाठ वगैरे होऊन ते जेवावयास तयार होत त्याचे बरोबर भोजन करावें व पुन थोडें मुलांकडे पाहून साडे नऊचे सुमारास स्वस्थ झोंपीं जावें असा कार्यक्रम सुरु झाला. मंडळींशीं ओळख होण्याकरिता केव्हां केव्हां त्याचे कडे बसावयास जावें. व आपला शाळा स्थापण्याचा विचार त्यांच्या समोर मांडावा पुष्कळ लोकांना वाटे कीं, आपल्या येथें मराठी शिकण्याची सोय असावी पण कांहीं असेंही भेटत कीं, 'हमको मराठी पढके क्या करना है ? नौकरी तो हिंदी प्रानमे करना तो मराठी को क्या चाटना है ? बडे आये मातृभाषाके पढानेवाले. हमारा जो चला है वह अच्छा है. कुछ रोज टांय टांय करोंगे और फिर निकल जावोगे. फिर हम ना इधरके ना उधरके ' त्याचें म्हणणें थोडें खरें ही होतें. कारण ह्या पूर्वी असा प्रयत्न येथील एक दोन व्यक्तींनीं करून पाहिला होता. त्यांतल्या त्यांत थोडा नाव घेण्याजोगा प्रयत्न गंगाधर चिंतामण उर्फ गुरुसाहेब यांच्या मार्फत झाला. हे गृहस्थ मोठें कार्य कुशल, विद्वान व गणितांत प्रवीण असून जी आय. पी रेल्वेंत इंजिनीयरिंग खात्यान हेडक्लार्क होते पगारही त्यांना चांगला मिळे. त्यामुळें लोकांत त्यांचा मान मान्यता फार होई, व ते म्हणतील त्याप्रमाणें लोक वागण्यास तयार होत. त्यांनीं कोंकणांतून गरीब होतकरू असे विद्यार्थी आणावे, आपल्या घरीं ठेवावे, शिकवावे, जेवावयास घालावे, नोकरीला लावावे, असे पाच पन्नास विद्यार्थी तयार करून नोकरीला लावले ते त्यांना अद्याप दुवा देत आहेत त्याच कोंकणांतून आणलेल्या लोकांकडून त्यांनीं मराठी शाळेचा उपक्रम करून पाहिला परंतु निकडून आलेल्या लोकांचें मन अशल्या क्षुल्लक बाबीकडे वळेना

कांहीं दिवस गुरू साहेबांच्या मर्जीखातर ते शाळेचें काम करीत. व ज्या उद्देशानें ते येथें आले तो उद्देश सफल होताच नोकरीच्या मार्गाला लागत त्याना मोठी नोकरी लागून त्यांचें कल्याण होई. मग दोन चार रुपड्यांची शाळेची भिकार नोकरी कोण करणार ? हें शाळेचें न जमण्याचें मुख्य कारण होतें. माझ्या सारखा गरजू मनुष्य त्याच गोष्टीला वाहिलेला असा त्यांना मिळाला नाहीं. कारण त्यांच्या हातात त्यवेळीं नोकरी लावून देण्याचें सामर्थ्य असल्यामुळें तेही मग उमेदवार मंडळींना फार आग्रह करीत नसत साहेब लोकही त्यांचें म्हणणें ऐकत कारण आपल्या कामांत ते मोठे तरबेज होतें. दिसण्यांत ते अगदीं साधे भोळे व गबाळ असे दिसत. त्याची राहणीही अगदीं साधी होती कोणालाही असें वाटणार नाहीं कीं, हा मनुष्य दोनशे रुपये मिळविणारा असेल ह्यांची कल्पकशक्ति फार दांडगी होती. आतां असे पुरुष फार थोडे पाहण्यांत येतात माझ्यावरही त्यांचा फार लोभ होता मी केव्हां केव्हा त्यांस भेटावयास जाई तेव्हां मोठ्या प्रेमानें माझी विचार-पूस करीत. व शाळेचें काम कोठवर आलें ह्याचा तपास करीत व म्हणत तूं हें काम नेटानें कर, माझ्याकडून जें कांहीं सहाय्य होईल ते मी तुला करीन हिंमत सोडू नको तूं ह्या कामाला योग्य दिसतोस मी तुला रेल्वेत कोठेंतरी चिकटवून दिलें असतें, परंतु तुझे इंग्रजी कच्चें असल्यामुळें तुझ्या हातून रेल्वेची नोकरी होणार नाहीं. तूं हेंच काम कर. ह्यांतच तुला चार पैसे मिळून तुझा संसार सुखानें चालेल काहीं कमी पडणार नाही हा त्याचा उपदेश माझ्या अत्यंत उपयोगी पडला व मी त्यांच्या उपदेशाप्रमाणें आपलें ध्येय पुन निश्चित करून अंगिकृत कार्यास जोरानें चालना दिली

## [ २ ]

आणखी एका गृहस्थानीं असाच प्रयत्न केला होता. ते गृहस्थ म्हणजे माधव भटजी आठले हे होत त्यांचा मुख्य धंदा स्टँप वेंडरचा. काहीं व्यापारही करीत. पत्रावळी लावून विकीत थोडी भिक्षुकीही पण करीत, व बसल्या बसल्या मुलेंही पण शिकवीत. मी ज्या मुलांना शिकविण्याकरिता आणून आलों तीं मुलें माझ्या येण्यापूर्वी त्याच्या कडेच शिकत होतीं मी आल्यानंतर त्यांच्याकडे त्यांचें जाणें बंद झालें, व तो त्यांचा प्रयत्न तितकाच राहिला कारण उघडच

होतें. शाळेच्या मिळकतीवर त्यांचा कांहीं चरितार्थ चालणारा नव्हता मग ते ह्या भानगडींत कशाला पडतील 'बैठेसे बिगार भली' ह्मणून त्यांनी हें काम तात्पुरतें पत्करलें होतें. त्यांना ह्या कामाची विशेष जरूरी नव्हती स्टँप विक्रीचा धंदा त्यावेळीं बराच जोरांत होता. त्याच्याकडेही जाऊन मी त्याची सहानु-भूति मिळवावी त्यांच्याकडे नेहमीं जाऊन बसावें. गप्पा गोष्टी कराव्या त्या मुळें त्यानांही मी यावेसें वाटूं लागलें. त्यांचें मोडी अक्षर फार सुंदर असे व ते कान्कुनी वाण्याचे गृहस्थ असून मोठे हिशेबी होते. जमाखर्च फार चोख लिहीत. त्यांचे दुकान पुढें पुष्कळ वर्षे चाललें होतें मग ते आपला जबलपूर येथील सर्व व्यवहार आटोपून प्रयाग येथें अखेर पर्यंत राहिले त्यांचीहि सल्ला-मसलत मला त्यावेळी फार उपयोगी पडली सर्व गोष्टींत मला सहाय्य करण्यांस ते तयार असत. ह्याप्रमाणें ज्या ज्या लोकांकडून माझ्या कामांत व्यत्यय येईल असें मला वाटलें त्या त्या मंडळीचीं मनें मी सुप्रसन्न करून घेऊन माझ्या कार्यास मला सहाय्य करण्याचें कबूल करून घेतलें ह्या लोकांनीं जर विरोध केला असता तर माझें काम कधींच यशस्वी झालें नसतें. हें मी प्रांजलपणें कबूल करतों कीं, त्यावेळीं ते म्हणतील ती गोष्ट त्याच्या वजनानें होण्याजोगी होती. असा त्यांचा गांवांत मान होता मग मी म्हणजे कोण ? पण मला मोठ्या उदार अंतःकरणानें सहाय्य करण्याचें कबूल केलें असे एक एक क्षेत्र काबीज करतां करतां ह्या शाळेच्या कामीं पुष्कळ लोकांची सहानुभूति मी मिळविली.

त्या वेळचे महाराष्ट्र समाजाचे पुढारी श्रीमंत राजासाहेब सागरवाले ह्या गोष्टीस पहिल्यापासूनच अनुकूल होते. कारण ह्याच संधीस त्याना पुत्ररत्न होऊन गांवात साखर वाटली गेली व पुढें मागें चिरंजीवाची शिक्षणाची सोय आपल्या आवडी प्रमाणें होऊन दुसऱ्या कोठल्या शाळेंत मुलाला जावें लागणार नाही अशी एखादी संस्था स्वतंत्र असावी असें आतां त्याना वाटूं लागलें होतें अर्थात त्यानीं कधीं मला विरोध केला नाहीं. त्यावेळीं माधवराव परांजपे यांचें ही वजन महाराष्ट्रीय मंडळींत विशेषेंकरून दीक्षित पुऱ्यांत बरेंच होतें, आणि सागरवाल्याकडेही त्याची बैठक नेहमीं असे आतां त्या बैठकींत शाळेसंबंधी उहापोह सुरू झाला व माझ्या मनाला चालना मिळूं लागली. असे करतां करतां दोन महिने तर लोटले

## मराठी शाळेचा पाया

जुलै महिन्याच्या अखेरीस एके दिवशीं मी जाऊन माधवरावास विनंती केली कीं, सध्या मी दहा पांच मुलें शिकवीत आहेच तर त्याला अनुसरून एक चांगलासा दिवस पाहून शाळेचा पाया तर घाला म्हणजे मला लोकाना शाळेचें आश्वासन देण्यास अडचण पडणार नाहीं व माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेऊन लोक आपली मुलें पाठविण्यास सुरुवात करतील नाहींतर माझी खटपट व्यर्थ जाईल असा एखादा लहानसा समारंभ कोणी करून जर मनापासून उपक्रम केला नाहीं तर माझा येथें राहून काय उपयोग ? माझें शिक्षण नाहीं व शाळाही नाहीं मी आपला आलों तसा परत जातों असें माझें निर्वाणीचें भाषण ऐकून त्यांच्या मनाला काय वाटलें कोणास ठाऊक. लागलीच त्यांनीं एक कागद काढला नोटीस लिहीली व त्यावर सर्व मंडळींचीं नावें लिहून राजासाहिबाकडे मला घेऊन गेले, व या कागदावर सही करावयास त्यांना विनती केली त्या गोष्टीस ते पहिल्या पासूनच अनुकूल होते लागलीच त्यांनीं त्यावर सही केली, व आपल्याच मनुष्याकडून सर्व गावांत ती फिरविली. तारीख १ आगस्ट १८९३ ला समारभाचा दिवस निश्चित झाला, व तो भाऊसाहेब खेर यांच्या वाड्यांत करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें सकाळीं आठ वाजता राजेसाहेबांकडून बिछाईत पानसुपारी वगैरेची व्यवस्था करण्यांत आली व मी वेळेवर मुलाना घेऊन तेथें हजर झालों एका मागून एक अशी गावांतील बरीच प्रतिष्ठित मंडळी जमा होऊं लागली भिक्षुक वर्गही बराच आला होता मग वे. रा. ग. दादा हर्षे, अण्णा परांजपे, यांचे हस्तें सरस्वती-पूजन होऊन यथाविधी शाळेचा पाया श्रीमंत राजासाहेब सागरवाले यांचे हस्तें घातला गेला, नतर प्रार्थना होऊन मिठाई वाटली मोठ्या आनंदानें समारंभ पार पडला त्या वेळीं मला वाटलें कीं, १ ऑगस्ट १८९३ हा दिवस सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे कारण ह्या दिवशीं झालेल्या शुभमुहूर्तावर माझ्या अंगीकृत कार्याचे भवितव्य ठरणारें आहे. तेव्हा अशा दिवसाची आठवण कोणास राहणार नाहीं ! मग दुसरें दिवशीं एक कमेटी नेमिली एक आणा, दोन आणे, अशी वर्गणी देण्याचेंही कांहीं मंडळींनीं कबूल केलें माधवरावांनीं आपल्याकडे सेक्रेटरीचें काम घेतलें, व सुरुवातीस

मला तीन रुपये देण्याचें ठरविले, व सांगितलें कीं, वर्गणी जास्त जमा होऊं लागल्यास तुमच्या पगारांतही वाढ होत जाईल. सध्या तुम्हीं ज्या ठिकाणीं शाळा लावतां त्याच ठिकाणीं शाळा सुरू ठेवा, व जीं येतील त्या मुलांना शिकवा. विनायकरावांची तर या सर्व कामात मदत होतीच पण त्यांना नेहमीं बाहेर गावीं जावें लागत असल्यामुळें ह्या गोष्टीकडे त्याना वेळ खर्च करतां येईना आपल्याकडून होईल तितकें सहाय्य देण्याचें त्यांनीं कबूल केलें जेवणाची फिकीर मिटलाच होती आणि आता वर खर्चा करिता ३ रुपये मिळूं लागले त्यानें माझा कपडे, न्हावी, परीट वगैरेस लागणारा खर्च भागूं लागला. सध्यां मी मंडळीच्या आवडीप्रमाणें ते जसें सांगतील त्या प्रमाणें शिक्षणाची व्यवस्था ठेविली व माझा मागें वर्णन केलेला कार्यक्रम तसाच चालू ठेवला. लोकाना सागाव्यास मला जागा झाली कीं, मुहूर्तमेढ तर रोविली आता मुलें पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं!! तरी सुद्धां कोणा-च्या ध्यानीं ही गोष्ट येईना व मुलांची वाढ कांहीं होईना.

होतां होतां हिंदी शाळेंतील मास्तरांची व माझी चागली ओळख होऊन मी शाळेंत गेलों तर ते आतां मला मान देऊन आपल्या जवळ बसवूं लागले त्यांत माणिक लाल व मन्नू लाल ह्या मास्तर द्वयाचा मला फारच उपयोग झाला कारण त्यावेळीं हिंदी शाळेंत त्यांचें वजन फार असे व सर्व पालक त्यांना मान देत, व ते म्हणतील ते ऐकत मी आपला हेतु त्यांच्या पुढें माडताच त्यांना तो फार पसत पडला, व मला जें लागेल तें सहाय्य देण्यास ते तयार झाले मी त्याचे पुढें एक योजना मांडली ती अशी कीं, त्याच्या शाळेंत जाणाऱ्या महाराष्ट्रीय मुलांनीं नेहमी प्रमाणें त्यांच्या शाळेंत तर शिकावेंच पण सकाळीं माझे शाळेंत येऊन महाराष्ट्र भाषेचाही थोडा अभ्यास करावा ह्या रीतीनें दोघाचें काम होऊन मुलाचेंही नुकसान होणार नाही. असें मी म्हणतांच "वाहवा' पडितजी आपने क्या तरकीब निकाली! हम लोकोंको यह बात बहोत ही पसंत है हम पालकोंके पास जाकर इस बातको समझा देवेंगे. और उनको राजी करेंगें. इसमे कोईका नुकसान है ही नहीं फिर क्या बात है? हमारा कहना आपके बिरादरी वाले सब मानेंगे ?'' ह्या आश्वासनाप्रमाणें त्या दोघांनीं मला त्यावेळीं बरीच मदत केली. त्या खटपटी

मुळें दहा-पंधरा मुलें शिकण्या करितां आणखी मिळालीं सकाळा माझ्या जवळ मराठी शिकत व दहा वाजतां शाळेंत जात इकडे समारंभाच्या वेळीं जी तात्पुरती कमेटी नेमिली होती तिच्या कडून वर्गणी वसूल करण्याचें काम होईना कारण त्याना आपला व्यवसाय सांभाळावा लागे. फुकट मेहनत करतो कोण ? मींच वर्गणी गोळा करून आणावी. परांजपे याचे स्वाधीन करावी, मग त्यातून त्यानीं पगार म्हणून ठरलेली रकम द्यावी. ज्या महिन्यात वर्गणी जमली नाहीं त्यांत पगार ही नाहीं. पण पगार मिळाला नाहीं तरी मी शाळा चालूं व ठेवून मुलाचें शिकविणें सोडलें नाहीं असे चार सहा महिने काम चाललें

## शाळा रजिष्टर होण्याचा विलक्षण योगायोग

पुढें लग्न सराईत त्या वेळचे डे. इन्स्पेक्टर साहेब जयदेवराव दिक्षित हे मुलांचे लग्नानिमित्र भोजनास निमंत्रण देण्यास म्हणून मी रात्रीचें वेळीं मुलांना शिकवित असता येऊन पोहोंचले. त्यानीं मला प्रश्न केला, काय मास्तर आपण हें काम करतां आहां ? मी त्याना म्हणालों साहेब हीं चार मुलें घेऊन पाटाचा उद्योग करीत बसलों आहे, आणि अनायासें त्याना माझा उद्देश समजावून मागितला त्यांनीं माझ्या गोष्टी ऐकून घेतल्या व ते म्हणाले, " आता मला कामाचा घाई आहे मी जातों आमच्या घरचें हें कार्य आटोपल्यावर मी एखादे दिवशीं सकाळी तुमची शाळा पाहण्यास येईन तयारी ठेवा उद्यां जेवण्यास मात्र जरूर या." असें सांगून ते निघून गेले आमचा अन्नोदक ऋणानुबंध शाळा खात्यातच पक्का असल्यामुळें हा योग घडून त्यांना ईश्वरानेंच प्रेरणा करून आमचे येथे आणलें व त्यांना सुबुद्धि देऊन आमची शाळा रजिष्टर करून घेण्याची प्रेरणा केली नाहींतर दोन चार वर्षे प्रयत्न करूनही जी गोष्ट साध्य होणारी नाहीं ती चुटकी सरसी एका एकीं घडून आली. त्यामुळे माझ्या कार्याला स्थिरत्व प्राप्त झालें

झालें ! इन्स्पेक्टर साहेबाकडच कार्य आटोपलें व मला त्यांनीं एके दिवशीं निरोप पाठविला कीं, मास्तर मी उद्या तुमची शाळा पहावयास येतों. तयारी ठेवा. मी म्हटलें बरें आहे ! सरकार ! आपल्या हुकूमा प्रमाणें सर्व व्यवस्था ठेवितो. घरी आलो, विनायकरावांना सर्व हकीकत कळविली. माझ्या

गोष्टी ऐकून तांब्यांना मोठा संतोष झाल्या सारखा दिसला ते म्हणाले 'तुमच्या कार्याला ईश्वर जरूर सहाय्य आहे आता तुमचें काम झालें. तुम्हीं भिऊं नका तुमचे जरी शिक्षणाचे जमत नाहीं तरी ह्या शाळेचे कामात तुम्हां यश खास मिळविणार! असा रंग दिसतो नेटानें काम चालूं ठेवा. माझ्या जीवांत जीव आहे तो पर्यंत मी कांहीं तुम्हांला अंतर देणार नाहीं हें तुम्ही पक्कें समजा." ह्या आश्वासनाप्रमाणें त्या प्रेमळ दांपत्यानें माझी आपल्या एका मुलाप्रमाणें जोपासना केली. मीही मग त्यांचें पडेल तें काम करण्यास मागें पुढें पाहत नसे आता मी त्यांच्या घरातलाच एक असे ते सर्व कुटुंब मला मानूं लागलें.

उद्या इन्स्पेक्टर शाळा पाहण्यास येणार! पण आमच्या शाळेंत काय होतें? हाजरी नाहीं, रजिष्टर नाहीं, त्यांना बसावयाला खुर्ची नाहीं टेबल नाहीं, कांहीं नाहीं मी शाळा खात्यात नोकरी अशी केली नव्हती तरी शाळे संबंधी काय काय गोष्टींची आवश्यकता असते ह्या गोष्टी मला माहित होत्या व थोड्या गोष्टी तर्कानेंही साधाव्या लागतात झट बाजारांत गेलो एक तात्पुरती चार पैशाची वही विकत आणली तिचीं पानें रजिष्टर प्रमाणें आंखून घेतली वर महिना सन वगैरे घालून मुलाचीं नांवें (सध्या जी शाळेंत येत होतीं त्याचींच) घालून एक रजिष्टर दाखविण्याकरिता तयार केलें. एकाकडून एक खुर्ची मागून आणला, दुसऱ्याकडून तात्पुरते एक टेबल मिळविलें, व मुलांना जमवून वर्ग लावून इन्स्पेक्टर साहेबाची वाट पहात बसलों आठ वाजले आणि इन्स्पेक्टर साहेबांची स्वारी येऊन थडकली औपचारिक गोष्टी झाल्यावर ते विनायकरावांना म्हणाले "तुम्हीं शाळा अशीच चालूं ठेवा मी पुढें रिपोर्ट करितों, व एकदा सर्कल इन्स्पेक्टर साहेबांना शाळा पाहण्यास घेऊन येतों त्यानीं शाळा पाहिल्यावर आपलें काम पक्कें झालें." आळींतील आणखीहा चार माणसांना इन्स्पेक्टरचें स्वागताकरितां बोलाविले होतें. अशा त्यांच्या व इन्स्पेक्टर साहेबांच्या गोष्टी झाल्यावर साहेबांनीं मुलांना थोडे प्रश्न विचारले, व मुलांनींही पटापट उत्तरें दिलीं तीं ऐकून साहेब खूष झाले व आमच्या शाळेच्या 'व्हिजीटर' बुकांत एक्सलेंट असा शेरा देऊन पान सुपारी, हार तुऱ्यांचा स्वीकार करून ते निघून गेले आतां

मात्र त्या दिवसापासून रीतसर हाजरी बुक लिहीण्यास आरंभ केला. आतां हयगय करणें ठीक नव्हतें म्हणून शाळला आवश्यक लागणारीं सर्व पुस्तकें बाजारातून आणून नियमाप्रमाणें भरून तयार करून ठेवलीं, व रोजच्यारोज येणाऱ्या मुलांची हाजरी भरीत गेलों. त्या दिवसापासून शाळेचें ठराविक काम सुरू झालें त्यावेळीं ब्रौनिंग साहेब सर्कल इन्स्पेक्टर म्हणून जबलपूर सर्कल-मध्यें काम करीत होते. ते मोठे कडक शिस्तीचे आहेत असा त्यांचा लौकीक होता. व ते शाळा पाहण्यास येणार ! मी स्वतःच टापटीप, व्यवस्था वगैरे ठेविण्याचा अभ्यास सुरू केला व मुलांनाही ह्या गोष्टींतले थोडे धडे देऊन तयार केलें

## शाळा रजिष्टर झाली

एके दिवशीं जयदेवरावाकडून निरोप आला कीं, उद्या सर्कल इन्स्पेक्टर साहेब तुमची शाळा पाहण्यास येणार ! चांगली तयारी ठेवा ह्या सर्कल इन्स्पे-क्टर साहेबांच्या मुलाखतीवरच शाळेचें पुढचें भवितव्य सर्व अवलंबून होतें. ह्या वेळी साहेबाच्या मनात जशी प्रेरणा होईल त्या प्रमाणें शाळा रजिष्टर होणें किंवा न होणें हें अवलंबून होतें मी मागाल खेपेप्रमाणेंच चार चौघां-कडून भीक मागून सामान जमविलें. चार प्रतिष्ठित मंडळीही जमा केली. राजासाहेबांनाही बोलावून घेतलें. ज्या खोलींत शाळा लागत होती त्या खोलीला सफेदी वगैरे देऊन खोली साफसूफ केली. समोरची जागाही साफसूफ करून पाणी शिंपडून आनंददायक असें वातावरण उत्पन्न केलें. ते सर्व नाटकच! आंतां स्टेजवर येणारीं पात्रें कसें काय कामें करतात हेंच पाहण्याचें राहिलें ठराविक वेळीं डेप्युटी इन्स्पेक्टर साहेब ब्रौनिंग साहेबाना घेऊन आले स्वागताकरितां राजासाहेब वगैरे सर्व मंडळी खालीं पटांगणांत तयारच होती हस्तांदोलन वगैरे सर्व विधी झाल्यावर साहेबाना घेऊन मंडळी माडीवर आली आसपासचें प्रसन्न वातावरण पाहून साहेब मोठे खुष झालेले दिसले, व म्हणाले " वो स्कूलके लिये बहोत उमदी जगह है. राजासाहीब आप इस स्कूल को जरूर चलाना मेरे तरफसे जो कुछ होगा वो मैं करूंगा मास्तर भी अच्छा मालूम होता है. और तरुण भी है " नंतर त्यानीं शाळेंत हजर असलेल्या मुलांशीं गोष्टी केल्या. त्यांनीं

विचारलें " क्या तुम हिंदी स्कूलमें पडने जाता है ! ओ ! यहां तुम मरहटी पढोगे ' " मग त्यांनीं मुलाना विचारलें " सब विषय मरहटी भाषामें ही पढना तुम नही चाहाते ? " मग मुलें म्हणालीं " हम पढना तो चाहते है लेकीन हमारे बाबा कहते है कीं, जबतक ये स्कूल पक्का नही हुवा तबतक हिंदी छोडना अच्छा नही जब मराठी स्कूल पक्का होयगा। तब तुमको यहा जरूर भरती करेंगे. " अशा तऱ्हेच्या मुलाशीं गोष्टी करून त्यांचे कडून थोडें मोडी वाचून घेतलें व शाळेसंबंधी जरूर ती विचारपूस करून हार तुरे वगैरे झाल्यावर ते निघून गेले आठ दहा दिवसानंतर शाळा रजिष्टर झाल्याचा हुकूम येऊन थडकला, व शाळेसंबधी माहवारी रिटर्नस् वगैरे पाठविण्यास सागण्यांत आले त्या दिवशीं वे मुलाना मिठाई वाटण्यांत आली पुढें लागलीच डेप्युटी इन्स्पेक्टर साहेब वार्षिक परीक्षेस आले त्या वेळीं ग्रँट इन एड सिस्टिम चालू होती. आमच्या शाळेला फक्त मराठी, मोडी, वगैरे विषयांतच परीक्षा घेऊन त्या विषयाच्या ठरलेल्या दरा प्रमाणें ग्रँट मिळूं लागली त्या वेळीं ठराविक रकम एकदम मिळत नसे तर प्रत्येक विषयाची निरनिराळी ग्रँट मिळे ह्या त्यांच्या हिशेबानें पहिले वर्षी आमच्या शाळेस १६ रुपये ग्रँट मिळाली ही गोष्ट १८९४ साली घडली दुसरे डेप्युटी इन्स्पेक्टर साहेबांनींही उत्तम शेरे दिले ठरलेल्या नियमाप्रमाणें मीं माहवारी पाठवूं लागलों पुढें जयदेवराव दिक्षित हे सहा महिन्याच्या सुट्टीवर गेले व त्यांच्या जागी श्री. लज्जाशंकर झा (सध्या रिटायर्ड असलेले मॉडेल हायस्कूलचे हेडमास्तर) हे त्यांच्या जागी काम करू लागले. ह्या साहेब हे नुकतेच त्यावेळीं नोकरींत शिरून नॉर्मलस्कूलमध्यें मास्तर होते आतां तात्पुरते डे इन्स्पेक्टर झाल्यामुळें आमच्या शाळेची वार्षिक परीक्षा घेण्याचे काम त्यांच्याकडे आलें १८९५ सालची वार्षिक परीक्षा त्यांचेच हातून झाली व तेही शाळा पाहून खुष झाले. ह्या वर्षी शाळेला २८ रुपये ग्रँट मिळाली त्यानीं लिहून ठेविलें कीं, हे शिक्षक तर उत्तम आहेत परंतु त्यांनी नॉर्मलस्कूलची परीक्षा देण्याचा प्रयत्न करावा म्हणजे त्यांच्या नोकरीला शाश्वती येईल.

स्थळ

आतां नेहमींचे जे इन्स्पेक्टर यांची रजा संपल्यामुळे ते आपल्या कामावर परत आले ९६ सालीं जयदेवरावांनीच परीक्षा घेतली व ३६ रुपये ग्रँट मिळाली पुढे पुढें नियमितपणें शाळा सुरू असल्यामुळें मुलें जरा जास्त जमूं लागलीं व २५–३० ची हजरांची सरासरी पडूं लागली आतां कमेटी फक्त कागदावरच राहिली नुसत्या जेवणावरच मी काम करूं लागलों पैशाचे रुपानें अद्याप जनतेकडून काहीं मदत होईना. नुसत्या जेवणावारी असें माझें आतां किती दिवस चालणार ! मुख्य काम तें होऊन गेलें आतां तिला चालविली तर पाहिजेच नाहींतर विनाकारण मिळणारी ग्रँट बंद होऊन इतके केलेले श्रम फुकट जाणार ! आतां ग्रँटच्या पैशातून एक खुर्ची, एक दोन नकाशे, असे मीं विकत घेतले कारण त्या वस्तूंची गरज भासू लागली सर्व विषय मराठींत शिकणारी हीं मुले आता आमच्या येथे येऊं लागली त्याची सर्व विषयात परीक्षा होई त्या करितां नकाशे पाहिजेत बाकी आणखी बरेंच सामान पाहिजे तें आणावयाचे कोठून ? जो तो आंग काढून मोकळा होऊं पाहात होता त्याच वेळेला मला एक दोन चांगल्या शिकवण्या मिळाल्यामुळें आठ–दहा रुपये शिकवणीचे मिळूं लागले. पगार मिळाला नाहीं तरी ह्या शिकवण्यामुळें माझी पैशाची बाजू थोडी सावरली माझा खर्च थोडा भागू लागला अशा वेळीं १८९७ सालीं जी आय पी रेल्वे तारवाल्यांनी संप पुकारला. सुमारें ७००–८० लोक घरीं बसले त्यांत आमचे मुख्य आश्रय दाते विनायकराव तावे हेही सापडले मग आम्हांला मोठीच विवंचना सुरू झाली. आता त्यांच्याच अन्न पाण्याची पंचाईत तर ते आमची परवरिश कशी करणार ? परंतु त्या प्रेमळ दापत्यानें मला अशाही स्थितींत सोडलें नाहीं खरेंच तो त्यांच्यावर आणीबाणीचा प्रसंग होता. संकटांत सुद्धां मित्र उपयोगी पडतात ते असे ! हें एक उदाहरण माझ्या आयुष्यांत घेण्यासारखें आहे दुसरा कोणी असता तर केव्हाच त्यांनीं मला रजा दिली असती, व शाळा वगैरे सर्व जेथल्या तेथेंच राहिली असती. परंतु तसें घडलें नाहीं. पुढे त्यांना बी एन रेल्वेंत आश्रय मिळून त्यांची घसरलेली गाडी पुन रुळावरून चालूं लागली त्यांना फक्त ३० रुपये मिळत त्यावर कसा बसा संसार चाले पुढे पुन काही रदबदली

होऊन जी आगगाडीच्या कंपनीने जुने नोकर परत कामावर घेतले त्यांत यांचीही वर्णी लागली व ते जबलपुरास येऊन पहिल्या कामावर रुजू झाले परंतु पगार मात्र कमी मिळू लागला. असें त्यावेळीं लोकांचे बरेंच नुकसान झाले मला ही लोक म्हणत, असे आपले दिवस फुकट कां घालवितोस ? थोडेसें तारेचें काम शीक म्हणजे आम्ही तुला कोठेंही लावून देऊं ह्या वेळीं रेल्वेला नोकरांची फार जरूरी आहे. तुझी सोय कोठें ही होईल पण मी विचार केला पांचसहा वर्षे तर ह्या खटपटींत घालविलीं त्याला थोडें मूर्त स्वरूपही येत चाललें पत्करलेलें काम कायम न मिळणाऱ्या पगाराच्या कमतरतें मुळें सोडून जावें हें मला बरें दिसेना त्यावेळीं मी सर्वांचें म्हणणें ऐकून घेतलें. अशी एक म्हण आहे कीं, 'ऐकावें सर्व जनाचें पण करावें मनाचें' ह्या युक्तीला अनुसरून सर्वांचें ऐकून तर घेतलें, परंतु मनांतल्या मनांत मोठी काळजी उत्पन्न झाली कीं, आपलें आतां पुढें कसें होणार ! आयुष्याला काय मार्ग लागणार ? का असेच कांहीं उद्योग न मिळतां चिरडून जाणार ? परंतु अशाही स्थितींत निराश न होतां पुन प्रयत्न करून पहा त्या म्हणी प्रमाणें पुन उद्योगास लागलों चार कार्यकर्त्या मंडळीकडे जावें, त्यांना आपला हेतु समजावून सांगावा किती कार्य झालें आहे हेंही सांगावें, व आता ह्या गोष्टीला कांहीं चिरस्थाईत्व मिळावें म्हणून आपलेकडे आलों आहे, तर ह्या संस्थेला तुम्हीं पदरांत घेऊन पुढें तिचें संरक्षण, पालन करावें कांहीं लोक ऐकून घेत कांही भुडकावून लावीत. कांहीं धूर्त असत ते दुसऱ्या शिळोप्याच्या गप्पावर परत लावीत पण जम कोठेंच बसेना.

## शाळेच्या कमेटीची कायमची स्थापना

असे प्रयत्न करतां करतां एके दिवशीं मला अशी बुद्धि झाली कीं, माधवराव डोळे यांचे कडे जावें ह्या वेळीं ते एक्साईज डिपार्टमेंट मध्यें दरोगा होते. मग पुढें स्मॉल कॉज कोर्टाचे सुपरिंटेंडेंट झाले. ते फार धिमे असत विशेष कोणाशीं बोलणें चालणें त्यांचें नसे आपल्या कामांत हुषार पण एकदां जे एकदां मनांत शिरलें तेंच घेऊन बसणारे. असा त्यांचा लौकिक होता त्यांना मी जाऊन भेटलों. त्यांना सर्व हकीकत सांगितली माझे म्हणणें त्यांनी स्वस्थपणें ऐकून घेतलें मला पूर्वी समजलें होते कीं, त्यांनी एक मुलगा

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ९१८९७ १०१

आपल्या जवळ बाळगिला आहे त्यांना स्वतःला मुलबाळ नाही त्यामुळें अशा ते त्याला दत्तक घेण्याच्या विचारांत आहेत आणि त्या मुलाला इतर भाषेचें ज्ञान नसल्यामुळें त्याच्या शिक्षणाची तजवीज काय करावी ह्या विचारांतच ते आहेत तेव्हा मी विचार केला की, ही संधी बरी आहे. आपण आपलें घोडें अशा वेळीं पुढें दामटावें जमली सही तरी बरेंच, नाहीं जमली तर एखादी शिकवणी तर लागेल? मग पुढें पाहतां येईल. सध्या एवढें पुष्कळ अशा हेतूनें मी त्याची वर सांगितल्या प्रमाणें भेट घेतली.

माझें सर्व म्हणणें त्यानीं ऐकून घेऊन पुन कधीं तरी भेटा असें सांगून वाटेला लावलें तसा मी घरीं आलो, पण पाठोपाठच त्यांचा चपराशी माझ्या दारात येऊन उभा राहिला व म्हणाला साहेबानीं तुम्हांला आताच्या आतां बोलाविलें आहे मी त्याला म्हटलें कायरे काय काम आहे? तर तो म्हणाला नाहीं बाबा मला काहीं ठाऊक नाहीं ते एवढेंच म्हणाले कीं, मास्तरांना घेऊन ये तसाच मी परत त्यांचे कडे गेलो तो ते पहिल्या प्रमाणेंच खुर्चीवर बसलेलेच होते. मी जाऊन पोहोंचलों तसे ते मला म्हणाले मास्तर आम्हीं उद्या तुमची शाळा पाहावयास येऊं. हेंच सांगण्या करितां तुम्हांस आताच्या आतां बोलाविले आणखी दुसरें काहीं काम नाहीं आतां तुम्हीं आपल्या घरीं जा असे ते म्हणतांच मी बरें म्हणून घरीं आलो शाळेचीं पुस्तकें वगैरे व्यवस्थेशीर लिहीलीं आहेत किंवा नाहींत हें पाहून ठेविलें मग प्रत्येक मुलाचे घरीं जाऊन सर्व मुलाना ही बातमी कळवून उद्यां जरूर शाळेंत या गैरहाजर राहूं नका असें सांगून परत घरीं आलों, व माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें खुर्ची, टेबल, मुलांना बसावयास पोतीं वगैरेची व्यवस्था करून, न आलेल्या मुलाना पुन बोलावणें पाठवून त्यांची वाट पाहात आपलें काम करीत बसलों. अगा काहीं वेळ गेल्यावर ते बाळकृष्णपंत क्षीरसागर उर्फ ड्राईंग मास्तर याना घेऊन शाळेंत येऊन पोहोंचले दोघानीं मिळून मुलांची परीक्षा घेतली सर्व रजिष्टरें तपासलीं. हिशेब असा काहीं नव्हताच आम्हीं मुलांचे कडून फी घेतच नव्हतों. कमेटी नव्हती कोणा कडून वर्गणी घेत नव्हतों स्वत च्या हिंमतीवरच शाळा चालविली होती एकंदर व्यवस्था पाहून ते घरीं गेले, व दुसरे दिवशीं मला बोलावून सांगितलें कीं, तुमची शाळा आम्हीं आपल्या

ताब्यांत घेतों. आम्हीं सांगूं त्या दिवशीं ठरविलेल्या जागेंत शाळा लावण्याची तयारी ठेवावी. लागलीच त्यांनीं एक कमेटी बोलावून तिच्या पुढें ह्या विषय मांडला श्रीमंत राजासाहेब सागरवाले, प्रेसिडेंट रावबहादूर वामनराव कोल्हटकर, व्हाइस प्रे गणपतराव साने, कृष्णराव खेर, बाबुराव चाफेकर, विनायकराव तांबे, जयरामपंत हर्षे, बाळकृष्णपंत क्षीरसागर, रामकृष्ण हरी हेडसिमलर, लक्ष्मणराव पुरोहित, मुकुंदराव लोकरस, वगैरेंची एक कमेटी स्थापिली व सर्वांच्या विचारें ठरलें कीं, शाळा आपल्या ताब्यात घेऊन चालवावयाची काम करावयाचें असें ठरल्यावर मग त्यांनीं काम करण्यांत हयगय केली नाहीं स्वत सर्व ठिकाणीं फिरून वर्गणीदार गोळा केले सर्व पालकांच्या घरीं जाऊन त्यांचीं मनें वळविलीं त्यांना मुलाना शाळेंत पाठविण्यास राजी केलें, व मध्यवर्ती अशी एक जागा पाहून डिसेंबरच्या सन १८९३ च्या पहिल्या तारखे पासून ह्या जागेंत शाळा लावा असें मला फर्माविलें.

## शाळेची जागा

ठरलेली जागा म्हणजे आज ज्या घरांत कै. विश्वनाथराव पराजपे याचे चिरंजीव चिंतामणराव पराजपे राहतात त्या घरांतील अगदीं समोरची जागा त्यावेळीं आंतील भागात वेदमूर्ति बाळाभाऊ तापीकरांचे वडील कै वेदमूर्ति नागेश्वरराव तापीकर राहात असत आम्हाला बाहेरील जागा शाळा लावण्याकरितां मिळाली आतां मध्यवस्तींत शाळा असल्यामुळें ही मुलेंही बरींच येऊं लागली डिसेंबरचे अखेरीस ५० पर्यंत नंबर गेला मग ती जागा आम्हांला अपुरी पडूं लागली आता दुसऱ्या जागेचा शोध सुरु झाला आतां सेक्रेटरीच स्वतः खटपटी असल्यामुळें माझ्यावरची जबाबदारी बरीच कमी झाली एक दिवस ते मला घेऊन हितकारणीचे हेडमास्तर कालीबाबू यांचेकडे गेले, व कोल्हटकर साहेबाना त्याच ठिकाणी आठ वाजता येण्याबद्दल विनंति केली होती त्या प्रमाणें कोल्हटकर साहेबही वेळेवर कालीबाबूकडे येऊन पोहोंचले, व त्यांना त्यांनीं शाळेसंबंधी सर्व वृत्तात कळविला, व आम्हाला तुमच्या मेन ब्रॅचच्या इमारतींत शाळा लावण्यास जागा द्या अशी विनंति केली बाबू साहेबानीं सर्व वृत्तात ऐकून घेतल्यावर एक दोन दिवसांत आपल्याला मी उत्तर देतो असें सांगितलें त्याप्रमाणे त्यांनीं आपले सेक्रेटरी अंबिकाचरण बाबू व

प्रेसिडेंट खजाजी साहेब ह्यांना विचारून त्यांच्या संमतीनें आमच्या सेक्रेटरी साहेबांना कळविलें कीं, तुमच्या विनति प्रमाणें तुम्हास शाळेकरितां आम्हीं जागा देतों त्या जागेंत तुम्हीं शाळा लावावी आमच्याकडून काहीं हरकत नाहीं मोठ्या कडून काम सुरू झालें म्हणजे ते कसे झपाझप होऊं लागतें त्याचें हें एक ढळढळीत उदाहरण आहे हा सर्व वामनराव साहेबांचा प्रताप. मोठ्यांना कोणीही नम्र असतात आम्हांला हुकूम झाला कीं, त्यावेळचे हितकारणी मेन ब्रँचचे हेडमास्तर मन्नूलाल ह्यास जाऊन भेटावे. ते सागतील त्या शाळेंत शाळा लावावी व आम्हांकडे रिपोर्ट करावा हुकूमाप्रमाणें मी जाऊन मन्नूलाल ह्याना भेटलों त्यांना त्या सर्व गोष्टी ठाऊकच होत्या लागलीच त्यानीं जागा दाखविली, व उद्यांपासून येथें क्लास लावा असें सांगितलें. दुसरे दिवसापासून पोहनकर यांचे वाड्यात दुसऱ्या मजल्यावर आमची शाळा भरू लागली

आतां शाळेची वेळ बदलली, व शिक्षणक्रमही बदलावा लागला. आतां सर्व विषय मराठींतच शिकणारीं मुलें मिळाल्यामुळें पूर्वीच्या पद्धतींत बदल करणें आवश्यकच होतें. त्या पद्धतींची आता आवश्यकता नसल्यामुळें पूर्वीची पद्धती बंद केली, व इतर सर्व शाळा प्रमाणें पूर्ण विषय शिकविण्याची प्रथा सुरू केली. आता पूर्वी प्रमाणें विषयवारी ग्रँट न मिळतां ठोक ग्रँट सुरू झाल्याचें सर्क्युलर निघालें आतां आमचे शाळेस दर वर्षी ९० रुपये ग्रँट मिळणार असें लिहून आले

## सेक्रेटरी साहेबांचा व माझा खटका

मध्येंच एक विचित्र ध्यानीं मनीं नसलेली अशी घटना विनाकारण उपस्थित होऊन माझे विषयीं सेक्रेटरींच्या मनांत एक किल्मिष उत्पन्न झालें ते असें शाळा ज्या वेळेस दुसऱ्या जागेंत आणण्याचा हुकूम त्यानीं मला दिला त्या बरोबर त्यांनीं मला हेंही सांगितलें कीं, शाळेचें जें कांहीं सामान असेल तेंही बरोबर घेऊन जा मी बरें असें म्हटलें व दुसरे दिवशीं, एक नकाशा जो शाळेचा होता तो, एक हाजरी रजिष्टर व शेरे बुक अशी दोन रजिष्टरें इतकें सामान शाळेचें असल्याचे सांगितलें मग ते म्हणाले खुर्ची, टेबल, पट्ट्या कोठें आहेत? असे सामान शाळेंत कधीं नव्हतेंच! ते मला देणार

तरी कोण ? मी जमिनीवर बसवूनच शिकवीत होतों तेव्हां ते म्हणाले वा! असे कसे ? आम्हीं शाळा पाहिली त्या दिवशीं तर खुर्ची व टेबल होते मी त्याना सांगितलें साहेब मी तें तात्पुरतें दुसऱ्या कडून मागून आणलें होतें. शाळेंत नाहीं, म्हणून, असा कोणी आला तर भीक मागावी लागते तसे शाळेंत कांहींच सामान नाहीं. कोणी पैसा देत नाहीं तर ते विकत आणावे कसे ? कोणा मुलांकडून मी फी सुद्धा घेतली नाहीं वगैरे हकीकत मी पूर्वी आपणास कळविली होती आतां आपण सामान मागतां हें कसें ? शाळेचें काम सुरळीत चाललें असतें तर मी आपल्याकडे आलोंच कशाला असतों ? हें माझें बोलणें त्याना न रुचून ते कांही तरी अद्वातद्वा बोलू लागले. मग मी त्यांच्याशीं न बोलतां घरी निघून आलों माझ्या जवळ कांहींही सामान नव्हतेंच तर मी देणार कुठलें ? दुसरें दिवशीं ड्राईंग मास्तराना बरोबर घेऊन पुन्हां त्याचेकडे गेलों त्यांच्या मार्फत सर्व शाळेसंबंधीं खरी हकीकत त्यास कळविली त्यांचे ही म्हणणें सेक्रेटरी साहेबाना पटलें नाहीं. पूर्वी त्यांचे म्हणण्यात असें आलें होतें कीं, ते मला पगार १० रुपये देणार. पण त्याची मती बदलली आतां ८ रुपयेच ऐकूं येऊं लागले. खटपट झाल्यामुळें ८ रुपये तरी पदरांत पडतात किंवा नाहीं ही भिती मला वाटूं लागली, म्हणून एके दिवशीं कमेटी भरलेली असतांनाच मी पगाराची गोष्ट मुद्दाम काढली व सर्वांच्या मतें ८ रुपये पगार देण्याचें ठरलें असे १० चे ८ होण्याला त्यांचीच कारवाई कारणीभूत झाली पुढें मला जे ह्या वर्षी ५६ रु. ग्रँटचे मिळाले होते ते कमेटीचे स्वाधीन करा असे माझ्या पाठीमागे टुमणे लाविलें. डे इन्सपेक्टरचेंही म्हणणें असेंच पडलें कीं, ग्रँटचे मिळालेले रुपये कमेटीच्या स्वाधीन केले पाहिजेत मग कमेटी तरी त्यांच्या उलट न्याय कसा करणार ? सगळेच विचित्र मी मनांत विचार केला आज पर्यंत आपल्यास कोठे पगार होता. सगळे काम फुकटच केलें कीं नाहीं. तर आणखी चार सहा महिने तसेच काम फुकटच केलें असें समजावें शाळा तर सुरू होईल. विनाकारण तंटा कशाला ? सध्या आपण मुख्य हेतुकडे लक्ष द्यावे हें बरें माझा जर अन्नोदक ऋणानुबंध येथेंच पक्का असेल तर मला कोणी काढूं शकत नाहीं तसे नसेल तर मी कितीही धडपडलों तरी माझें काय चालणार ? जाणून

बुजून दुसऱ्याच्या स्वाधीन संस्था केलेली मग आपले काय चालणार? म्हणून गप्प बसलों त्यांनी आपल्या मता प्रमाणें माझ्या पगारात ग्रँटचे सर्व पैसे वसूल करून घेतले मी हात पाय चोळीत स्वस्थ बसलों, दुसरें करणार तरी काय? पुढें काय ह्या प्रमाणें सर्व शाळांना उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली सेक्रेटरी साहेबांची इच्छा दिसली कीं, उन्हाळ्यात सुद्धां शाळा ठेवायची तेव्हां मी त्याना म्हणालों कायद्या प्रमाणें माझी ग्रँट आपण पगारात कापून घेतली तर आतां कायद्या प्रमाणें सुट्या देण्यात कसूर कां करिता? सर्वच ठिकाणीं कायदा लावा हेंही माझें म्हणणें त्याना बरेंच झोंबलें सुट्टी न देण्याचेच त्यांनीं ठरविलें त्यावेळीं माझें घरचें म्हणजे तासगांवचें बोलावणें आल्यावरून तिकडे जाणें मला जरूर होतें. म्हणून मग मला मनुष्य ऐवजी देऊन एक महिन्याची सुट्टी काढावी लागली. माझी सुट्टी मंजूर झाल्यावर मी घरीं गेलों त्या अवधींत माझ्या हातून आणखी एक चूक झाली होती हीं चूक मात्र खरी होती ती चूक अशी कीं, पहिल्या वर्गातील एका मुलाची फी अजिबात लिहावयाचें मी विसरलों होतो बाकी सर्व फीचा हिशेब बरोबर होता त्या मुलाचा फीचा दर, वसूल, वगैरे कोणताही खाना भरण्यांत आला नव्हता. मी फी जमा केली तेव्हा सेक्रेटरीच्या लक्षांत हीं गोष्ट आली नाहीं पुढें मी सुट्टींत बाहेर गांवीं गेलों असतांना माझ्या जागेवर जे आपटे नांवाचे मास्तर नेमण्यांत आले होते, त्यानी ही गोष्ट सेक्रेटरी साहेबांचे नजरेस आणली. सेक्रेटरी साहेबानीं ह्याही गोष्टीचा बराच गवगवा करून मला दोषी ठरविण्याचा प्रयत्न केला परंतु कोल्हटकर साहेबानीं परस्पर त्याचा समजूत पाडल्यामुळें मग त्यांनी ही बाब कधीं पुढे आणली नाहीं ह्याच वेळेस आणखी एक गमत पाहण्यात आली. ती माझ्या विषयींच असल्यामुळें येथें नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं. एके दिवशीं मी आणि माधवराव डोळे म्हणजे शाळेचे सेक्रेटरी हे काहीं कामा-निमित्त डे इ जयदेवराव दिक्षितांकडे गेलो होतों त्या ठिकाणीं ग्रँट संबंधानें व सामाना संबंधानें इन्स्पेक्टर साहेबाच्या व सेक्रेटरीच्या बऱ्याच गोष्टी झाल्या मी आपला चूपचाप ऐकत होतों कारण त्या सर्व गोष्टा माझ्या समोरच होत होत्या परंतु त्यांत मुत्सद्दीपणा असल्यामुळें आडून आडून पडद्या आड अशा बोलण्या होत होतीं शेवटीं त्या सर्वांचे सार काढून इन्स्पेक्टर

साहेबांनीं बोटावर बोट मारून एकच उत्तर दिलें म्हणजे काट मारला तेव्हा सेक्रेटरी म्हणाले असें तर आम्हीं करणारच आहोंत. ही सर्व कारवाई माझ्या लक्षांत त्या वेळींच आली व मी मनांत समजलों कीं, आतां हें मला लवकरच काट देणार ' ' त्याचा पुरावा लागलीच आला. दुसरेच दिवशीं अचानक डे इन्स्पेक्टर साहेब शाळा पाहण्यास आले. आतां त्यांनी आपला पवित्रा बदलला. ज्यांनीं ह्या पूर्वीचा शेरा एक्सलेंट लिहिला, त्यानीं पुढें त्याच मास्तरला खाईत लोटण्याचा प्रयत्न करावा !!! हें केवढें आश्चर्य !!! ईश्वर सांभाळणारा असला म्हणजे कोणाचें कांहीं चालूं शकत नाहीं. त्याचा हा एक प्रत्यंतर पुरावा आहे माझें अन्नोदक येथें पक्कें असल्यामुळें अघटित घटना घडून आली वरील दोघांही गृहस्थांच्या बदल्याचे अचानक हुकूम येऊन त्याचे हातीं पडले मी सुट्टीहून परत येण्यापूर्वीच आपापल्या बदलीच्या जागीं ते दोघेही निघून गेले.

## शाळेचे सेक्रेटरी बदलले तरी ससेमिरा मागेंच राहिला

जातांना त्यानीं सेक्रेटरीचा चार्ज बापुराव चाफेकर ह्यास दिला चाफेकरांच्याही कानात ते थोडें विष ओकून गेले गोपाळराव सेक्रेटरी होते तो पर्यंत वर्गणी वसुलीचें काम ते स्वत च करीत. मला फक्त शाळा पाहिली कीं, झालें. आता ते बदलून गेल्यामुळें व बापुराव चाफेकराला वेळ नसल्यामुळें तें काम माझ्याकडेच आलें. आता शाळेची व्यवस्था सुरळीत चालूं झाल्यामुळे माझी जी एक इच्छा ती पूर्ण झाली माझ्या पोटापाण्याचा प्रश्न बराच सोपा झाला. मला आठ रुपये पगार मिळू लागला. पुढें एक वर्षानें नऊ झाले. मी माझ्या सर्व नोकरींत पैशाची हाव अशी मुळींच धरली नाहीं. जें कांहीं ज्या वेळीं मिळेल त्यात खुष राहिलों मा बढती करितां कधीं अर्ज केला नाही. वेळ आली म्हणजे मला थोडीबहुत बढती मिळच

आतां शिकविण्या शाळा मिळून २०-२५ रुपयाची प्राप्तिही मला होऊं लागली अशा तऱ्हेनें बस्तान बरेत जाऊन शाळेला स्थिरत्व येत चाललें, १८१८ सालची वार्षिक परीक्षा जयदेवरावांनींच घेतली होती तींत सर्व मुलांची सर्व विषयात परीक्षा घेण्यांत आली व ६८ रुपये ग्रँट मिळाली. प्रायमरी परीक्षेसही एक मुलगा बसविला होता तो पास झाला. त्या मुलाचें नांव

काशिनाथ नोडूरीकर असे आहे. हे गृहस्थ सध्या ताराशेनीस वकिली करतात हे एम. ए., एल्. एल्. बी. असून ह्यांचें बाळापाटला मोठें घर व जमीन जुमला आहे. ह्या वार्षिक परीक्षेच्या आधीं थोडे दिवस नवीन सेक्रेटरीची माझ्याशीं थोडी खटखट झाली. त्यावेळीं माझे वडील बंधू आजारी होऊन इर्वीला औषधोपचाराकरिता जाऊन राहिल्याचें एका एकीं पत्र आलें. तेव्हां त्यांच्या बोलावण्याप्रमाणें तिकडे जाणें मला आवश्यक होतें. कायद्याप्रमाणें सेक्रेटरी साहेबांना विचारावयाचें परंतु ते आपल्या कचेरींत प्रेसीडेंटहीं भेटीलीस गेलेले. अशा स्थितींत काय करावें हा प्रश्न उत्पन्न झाला. शाळेंत मी एकटाच शाळा पाहण्यास दुसरे कोणी नाहीं. गाडीची वेळ ४ ची साधते कशी ही विवंचना मला पडली. तेव्हां हिंदी मेन ब्रँचचे हेडमास्तर मन्नुलाल ह्यांची सलाह मी घेतली. त्यांनीं सांगितलें चार पर्यंत आम्हीं तुमची शाळा सांभाळतों. उद्यां सुट्टीच आहे. सोमवारीं आपल्या बंधूंची प्रकृती पाहून लवकर परत या. सोमवारीं आला नाहीं तरी आम्ही तुमच्या शाळेचें नुकसान होऊं देणार नाहीं. मी तुमचा वर्ग सांभाळतों. तुम्हीं खुशाल माझ्या जवळ अर्ज लिहून द्या व जा. अशा अडचणीच्या वेळीं तुम्हांला गेलें हें पाहिजेच. एक दोन मेंबर जे जवळ होते त्यानाही मी कळविलें. अशी सर्व व्यवस्था करून लागलीच स्टेशनवर गेलों. आतां स्टेशनवर आलोंच आहे, जाता जाता ऑफिसांत जाऊन सेक्रेटरी साहेबांना प्रत्यक्ष भेटून विचारून जावें असा विचार करून पूल उतरून रस्त्यावर जो येतो तोंच समोरून सेक्रेटरी साहेबाची स्वारी येतांना दिसली, व माझें कांहीं बोलणें ऐकून घेण्यापूर्वींच वसकन् ओरडून शाळा सोडून ह्या अशा वेळीं तुम्हीं इकडे कोणीकडे? शाळा कोणाच्या स्वाधीन केलीत? ह्याला जबाबदार कोण? शाळा सोडून असेंच तुम्हीं फिरतां कीं, काय? मला ही गोष्ट कमेटी पुढें ठेवावी लागेल? गोंधळराव सांगत त्या प्रमाणेंच तुम्हीं बेपर्वा दिसता? जा मी तुमचें काहीं ऐकून घेत नाहीं.

आता ह्या भोगाला काय करावें? त्याना मी सांगितलें माझा भाऊ आजारी आहे. मला गेलें पाहिजे. मी कायदेशीर अशी शाळेची सर्व व्यवस्था लावून अर्ज देऊन आलों आहे, तो माझा अर्ज उद्यां आपणास मिळेल सोमवारीं मीं

परत येतोंच आहे. परंतु त्यांनीं माझें म्हणणें बिलकूल ऐकून घेतलें नाहीं, व आपले जवाबदारीवर वाटेल तें करा असे सांगून आपल्या कामाला निघून गेले मग मी स्टेशनवर न जातां परत शाळेंत गेलों मन्नूलाल मास्तरांना सर्व हकिकत कळविली. पण त्यापूर्वीच मन्नूलाल पंडतजींनी दीडच्या सुट्टींत काली बाबूजवळ जाऊन माझ्या अर्जावर, त्यांना सुट्टी मिळावी त्यांचे भाऊ खरेंच आजारी आहेत अशा अर्थाची शिफारस करवून लिहून आणलें होतें. तोच अर्ज घेऊन मी पाच सहा वाजतां वामनराव साहेबांकडे गेलों व इतर झालेला सर्व वृत्तांत त्यांना सांगितला व अर्जही दिला अर्जावरील कालीबाबूचा शेरा वगैरे पाहून ते ह्मणाले पाहिली गाडी चुकली तरी हरकत नाहीं प्यासेंजरनें जा व आपल्या वधूची प्रकृती पाहून सोमवारीं सकाळीं परत या तुमच्या शिवाय शाळेंत दुसरें कोणी नाहीं मुलांचें नुकसान होईल व पालकही ओरड करतील तेव्हा होता होई तों पर्यंत सोमवारी याच म्हणजे विनाकारण बोभाटा होणार नाहीं व कामाची व्यवस्थाही लागेल मी चाफेकरांना समजावून सांगतों तुम्हीं भिऊ नका तें मीं मान्य केलें व त्यांच्या मता प्रमाणें रात्रीचे गाडीनें हर्दास जाऊन वधूची प्रकृती पाहून पुनः रात्रीचेच गाडीनें परतलों, व शाळेंत सोमवारी हाजर झालों असेंच जर सेक्रेटरी साहेबांनीं माझें ऐकून घेऊन मला जाण्याची परवानगी दिली असती तर माझाही मान राहून त्यांचेंही ऐकल्या सारखें झालें असतें. परंतु वाईटपणा यावयाचा असला म्हणजे अशा गोष्टी नेहमीं उत्पन्न होऊन कार्यात कांहीं तरी बिघाड हा होतोच तो असा. झाली गेली गोष्ट तेही विसरले मीही विसरलों. तसे ते स्वभावानें फार चांगले असत परोपकारीही होते. पुढें त्यांच्या घरीं तीन वर्षे मी त्यांच्या मुलांना शिकविलें माझें शिकविणें त्यांना पसंत होतें. महिन्यांतून चार दोन दिवस एखादे वेळीं गेलों नाहीं तर कधी धुसपूस न करतां पैसे कापले नाहींत, व कधीं वेळेचीही तक्रार केली नाहीं. तीन वर्षांनंतर त्यांची बदलीच झाल्या-मुळें त्यांच्याकडील शिकवणी बंद पडली, व सेक्रेटरीही दुसरे झाले त्यानंतर मग कधीं कोणाशीं धुसपूस झाली नाहीं, व शाळेचें कामही सुरळीत चाललें माझा पगारही १० रुपये झाला. १८९९ पासून ग्रँट ९० रुपये मिळूं लागली, व इन्स्पेक्टरचा चार्ज हनुमान प्रसाद यांनीं घेतला.

## माझी दिनचर्या

आता माझ्या दिनक्रमांत थोडा बदल झाला तो असा सकाळीं सहा वाजतां उठावें, स्नान करावें, शिकवणीस जावें सात ते आठ पर्यंत एक शिकवणी व आठ ते नऊ पर्यंत दुसरी शिकवणी करून साडेनऊला परत यावें मुलांच्या बरोबरच जेवण करावें १०॥ ला शाळेंत जावें. ४ वाजेपर्यंत शाळा करून पुन. ४॥ ते ५॥ एक शिकवणी व ५॥ ते ६॥ पर्यंत दुसरी शिकवणी करून घरीं यावें मधें मधें थोडें वसुलीचेंही काम उरकावें घरीं आल्यानंतर जेवण उरकून तांब्याच्या कंदील जी आता तुमती मराठीची शिकणारीं मुलें होतीं त्यांना शिकवावें आणि बरोबर १० वाजतां झोंपेचें स्वाधीन व्हावें त्या वेळेपासूनच मला अशी एक संवय लागली कीं, आज आपण कोणतीं कामें ठरावलीं होतीं त्या पैकीं, पार किती पडलीं. उद्या आपल्याला काय काय करावयाचें ह्याचा आढावा ध्यावा तीच संवय आजपर्यंत मी तंतोतंत पाळली आहे आतां तर मी माझ्याकडून उद्या व या वाईट गोष्टा घडल्या त्या आठवून त्या बद्दल रोज चिंतन करून व मग झोंपी जातों वर लिहिलेला दिनक्रम पुढें थोड्याफार बदलानें बरोबर ४० वर्षें अव्याहत चालला त्यात काहीं अंतर पडलें नाहीं.

## माझें लग्न

ह्या मधल्या अवधींत सांगण्यासारखी घरगुती अशी एक महत्वाची गोष्ट घडून आली आता माझा जम बसला २०।२५ रुपयांची मिळकतही होऊं लागली तसें माझ्या लग्नाची गोष्ट लोक बोलूं लागले. मुलीही सांगून येऊं लागल्या अशा त्या संधीस नारायण भय्यासाहेब परांजपे ह्यांचे मुकुंद ह्या नांवाचे एका मुलास मी शिकवण्याकरतां म्हणून त्यांचे घरीं जात होतों. तेथेंच बाळकृष्णपंत परांजपे यांचा मुलगा मनोहर हा आपल्या काकाकडे म्हणजे रामचंद्रराव परांजपे त्यांचेकडे आपल्या आई बहीणीसह राहत होता त्या मनोहरलाही मी हिंदी शिकवीत होतों कारण तो मुलगा मराठी शाळेंत न येता हिंदी शाळेंत तिसऱ्या वर्गांत शिकत असे ह्याप्रमाणें त्या घरांत माझें रोजचें जाणें असल्यामुळें माझा स्वभाव, माझी इतर आप्त मंडळी ह्या विषयीं परांजपे मंडळीला बरीच माहिती झाली होती. रामचंद्रराव हे आपल्या पुतणी

करिता स्थळें पाहतच होते तशात मीही त्यांच्या डोळ्यापुढे होतोंच मुलीची आईही त्यावेळीं तेथें होतीच. त्या मंडळींनीं आपसांत विचार करून रामचंद्ररावांनीं मुलीच्या वडीलांना म्हणजे बाळकृष्णपंताला माझ्या विषयीं लिहिलें कीं, हा मुलगा तुम्हांला पसंत असल्यास तसें कळवावें, म्हणजे आम्हीं पुढील वाटाघाट त्यांचेशीं करूं बाळकृष्णपंताची व माझी ओळख शहापुरापासूनच होती. कारण ते पोष्टात सॉर्टिंग क्लार्क होते. व त्या निमित्तें त्यांना जबलपूर ते भुसावळ पर्यंत प्रवास करावा लागे. वाटेंतच शहापुरा स्टेशन लागत असल्यामुळे आठवड्यातून दोनदां तरी त्याची आमची भेट होईच मग पुढें पुढें त्याचे व माझे बरेंच सख्य झालें कारण माझे एक स्नेही गोपाळपंत भिडे यांचे बैठकींत खेळण्या करितां म्हणून ते नेहमीं येत गोपाळपंताच्या मुलालाही मीं शिकवीत होतों. तेंही शिकविणें त्यांनीं पाहिलें होतें आतां तर त्यांच्या स्वत च्या मुलालाच हिंदी शिकवीत होतों. तेव्हां असा परिचयाचा मुलगा मिळत असल्यास उत्तमच, जरूर प्रयत्न करावा असें त्यांचे भावाला लिहून आलें रामचंद्ररावांनीं मला लागलीच विचारलें कीं, निळकंठराव, लग्न करण्यास तयार आहात काय ? तेव्हां मी त्याना उत्तर दिलें माझी आई, भाऊ, वडील भाऊ सर्व मंडळी तासगांवीं व इटारशीस आहेत त्यांना आपण पत्र पाठवा, त्यांचें जसें लिहून येईल त्या प्रमाणें करण्यास मीं कबूल आहें. लागलेच त्यांनीं तासगावास दिनकर भटजींना पत्र लिहिलें. व इटारशीस जाऊन दादाना भेटले. आठ–दहा दिवसांत तासगांवाहून उत्तर आलें कीं, आमच्या कडून कांहीं हरकत नाहीं मुलगी पसंत असल्यास आम्हीं कार्य करण्यास तयार आहोंत दादांनींही त्या प्रमाणें सांगितल्यावर पत्रिका वगैरे पाहून मूहुर्त निश्चित केला रिवाजा प्रमाणें सर्व धार्मिक विधी पार पडून ता १९ मार्च १८९९ मंगळवारीं शुभ-मुहूर्तावर आमच्यावर अक्षता पडून आम्हीं दोघे विवाह रज्जूनें बांधले गेलों. ह्या मंगल कार्यास आई, दिनकर भटजी, दादा वहिनी वगैरे सर्व वडील मंडळी जबलपुरास आली होती त्यांनीं जातीनीं ह्या मंगलकार्यांत भाग घेऊन कार्य पार पाडलें पूर्वी जबलपुरांत माझ्या एकट्याचीच मला काळजी होती त्यांत आतां आणखी मनुष्याची भर पडली कार्य संपल्यावर भावजयीला घेऊन दादा इटारशीला गेले. आईही त्याचे बरोबरच

गेली दिनकर भटजी व त्यांचें कुटुंब यांचेकरितां म्हणून प्रयाग, काशी, गयेकडे गेले माझें जेवण अजून विनायकरावाकडेच होते. तांच्याकडील सर्व मंडळींनीं कार्यात भाग घेऊन आपलेपणानें सर्व कामे बिनबोभाट पार पाडिली, व आपलें बोलणें खरें केलें.

## मी निराळें बिऱ्हाड केलें

असें होता होतां १८९९ साल संपलें १९०० ला सुरवात झाली आता विनायकरावांचा असा विचार पडला कीं, मी निराळें बिऱ्हाड करून संसार थाटावा आतां कांहीं त्याना दुसऱ्यावर अवलंबून राहण्यास नको असें म्हणून लागलीच संसारास लागणारीं सर्व भांडी कुंडी आणखी किरकोळ सामान देऊन स्वतंत्र अशी एक निराळी जागा जी मोडकळीस आली होती ती दुरुस्त करून तींत सर्व सामानाची सिद्धता करून अशी सर्व प्रकारची सोय त्यानी लावून दिली मित्र जोडावा तर असा. पुढें दिनकर भटजी यात्रेहून परत आल्यावर दोन तीन महिने जबलपुरासच होते मध्यंतरी आमचे एक दूरचे चुलत बंधू भोंडोपंत लिमये हेही येऊन काहीं दिवस माझे जवळ राहिले होते पुढें त्याची वामनराव पंडिरियावाल्याकडे सोय जमल्यामुळें मरे तों पर्यंत त्याच्याकडेच ते होते दिनकर भटजीही चार महिने राहून परत तासगांवीं गेले. ह्या चार महिन्यांत दिनकर भटजीनी येथें बराच जम बसविला होता ते पुन कधी इकडे आले नाहीत आतां कुटुंबाला आणावयाचें सर्वांचें मत पडल्यामुळें तिला आणण्याकरितां नारायणराव ताब्यांना इटारशीस दादांच्याकडे पाठविले त्या प्रमाणें ते जाऊन कुटुंबास घेऊन आले त्या प्रमाणें आतां आमच्या नव्या संसारास सुरवात झाली. आता आमचा स्वयंपाक निराळा होऊ लागला

## नवीन फायदेशीर गोष्ट

पाच सहा शिकवण्या, शाळा, वर्गणी वसूल करणें, शिवाय प्रपचाचें थोडें काम ह्यामुळें तेरा चवदा तास माझे कामांत जाऊ लागले एकदर माझ्या पांच सहा वर्षांच्या कामाची धाटणी पाहून लोकानाही विश्वास उत्पन्न होऊन लोक आमच्या मराठी शाळेंत तर मुलें पाठवूं लागलेच, परंतु घरींही शिकविण्यास येण्याकरितां आग्रह करूं लागले गेलों नाहीं तर लोक नाराज

होत इतकें काम पडत होतें म्हणून मी कधीं आपल्या कामांत टंगळ मंगळ केली नाहीं. ५०–६० मुलांना मला एकट्यालाच शिकवावें लागे शिवाय शाळेंत चार वर्ग व अ, ब, तुकड्या असे मिळून सहा वर्ग असत. सर्व मुलांचे नियमाप्रमाणें शिक्षण हें झालेंच पाहिजे एकदा कां लोकांत शिक्षणासबंधीं गवगवा झाला तर सर्व घडी बिघडून कदाचित् शाळेस धोका पोहोंचणार, व आमच्या पोटावर पाय येणार म्हणून डे. इन्स्पेक्टर साहेब यांचें निरीक्षणांत शेरा चांगला मिळण्याबद्दल फार जपावें लागे पोटा करतां निदान काम केलेंच पाहिजे होतें. त्यांत आतां डे. इन्स्पेक्टर नवीन आलेले शिवाय त्यांना मराठी समजत नाहीं तेव्हां शिक्षकालाच दुभाष्याचें काम करावें लागणार. आतां ही एक नवीनच काळजी उत्पन्न होऊन जीव धाकधूक करूं लागला शिवाय नवीन साहेब हे फार कडक शिस्तीनें वागणार आहेत असा लौकीक गांवांत पसरलेला तेव्हां आपला कसा निभाव लागतो ही भीति वाटूं लागली होती. होता एके दिवशीं अचानक इन्स्पेक्टर साहेबांची स्वारी परीक्षेकरितां शाळेंत येऊन थडकली. सर्व वर्गाची एकदम परीक्षा सुरू झाली. चौथ्या वर्गाला एक उदाहरण सांगितलें, तिसरीस शुद्धलेखन, दुसरी पहिलीचें वाचन याप्रमाणें भराभर मुलांची जाचणी घेत घेत दोन तासांत परीक्षेचें काम आटोपलें. उदाहरणें वगैरे त्यानीं हिंदींत सांगावी त्याचे मराठी करून आम्हीं मुलांना सांगावें. असा क्रम सुरू होता. एकंदर चाचणी झाल्यावर त्यांचें मन प्रसन्न असे दिसलें. सर्व रजिष्टर वगैरे त्या तारखेपर्यंत लिहिलेलीं मिळालीं कोणत्याही बाबतींत कमीपणा असा आढळला नाहीं. त्यामुळें साहेब खुष होऊन आपका स्कूल अच्छा है असे म्हणून व्हिजीट बूक घेऊन निघून गेले. मग मला अंमळ धीर आला कारण प्रथमग्रासे मक्षिकापातः असे कोठें न होवो! पुढें वार्षिक परिक्षाही उत्तम होऊन बहुतक सर्व मुले पास झाली चौथ्या वर्गांत दोन मुलें होतीं तीं दोन्हीही पास झाल्यामुळें त्यांना सर्टिफिकेटे मिळालीं आता ग्रँट नक्की झाली होती. तिचा कांहीं प्रश्नच नव्हता आणखी एक मास्तरही मदतीस मिळाला. असे आता आम्हीं दोघे मास्तर झालों. सन १९०० पासून १९०३ पर्यंतच्या अवकाशांत बरेच मास्तर आले आणि गेले कायमचा असा कोणीच टिकला नाहीं. कारण येथें पगार मिळणार थोडा मग राहतो कोण ?

आमच्यासारखा एखादा गरजूच प्राणी ह्या कामाकरितां पाहिजे किंवा ज्याला कोठें दुसरा कोणताही आधार नाहीं असा तरी पाहिजे

## एक उत्साही सेक्रेटरी शाळेला मिळाले

बाबुराव चाफेकराची बदली पुण्याला झाल्यामुळे ते मुलाबाळासकट तिकडे गेले त्यांचे जागी रंगोपंत भट ह्यानीं सेक्रेटरीचें काम करण्याचें पत्करून चार्ज घेतला. रंगोपंत भट ह्यानीं मात्र शाळेचें काम निरपेक्ष बुद्धीनें झटून केलें पुष्कळसे नवीन वर्गणीदार वाढविले. स्वत त्यांचेकडे जाऊन वर्गणी वसूल केली भोजन प्रसंगीही लोकांकडे जाऊन दक्षिणा गोळा केल्या. लग्न कार्यांतही लोकांकडून पैसे वसूल करून आणले अशा तऱ्हेनें श्रम करून शाळेच्या गंगाजळींत त्यानीं बरीच भर टाकली व शिक्षक लोकांवर विश्वास ठेवून त्यांचें कडून कामें करून घेतलीं ते आर्य समाजी असल्यामुळें आमच्या दंडास व हातात काहीं गंडा बिंडा पाहिल्यास ते हसत एवढाच एक विरोध. पण आमच्या कामावर ते खुष असत १९०१ पासून राजेसाहेब यांच्याकडची शिकवणी मला सुरू झाली. पुढें मुलगाही शाळेत येऊं लागला त्यामुळें त्यांनाही शाळेचें अगत्य जास्त वाटू लागलें शाळेच्या कामांत ते उत्साहानें भाग घेऊं लागले. ही राजेसाहेबांकडील शिकवणी एका मागून एक विद्यार्थी मिळत गेल्यामुळें पुढें लागोपाठ सव्वीस वर्षें सुरू राहिली इतक्या दीर्घ काळपर्यंत शिकवणी टिकल्याचा योग फार क्वचित येतो. माझ्या पाहण्यांत तरी असें उदाहरण एकही आलें नाहीं

## शाळेचे वार्षिक परीक्षेचें घटनात्मक विवेचन

आतां राजेसाहेबांचा मुलगा चौथ्या वर्गांत आला होता. त्यावेळीं वार्षिक परीक्षा ऑक्टोबर मध्ये होई. बाकीच्या शाळांच्या परीक्षा मार्च मध्यें होत. ह्यामुळें आमच्या येथील मुलाना सहा महिने थांबावें लागून त्याचें अभ्यासाचें विनाकारण नुकसान होई पहिल्या प्रथम एक दोन मुलेंच परीक्षेस असल्यामुळें त्यांचे काहीं विशेष महत्त्व वाटलें नाहीं पण पुढें जास्त होऊं लागल्यामुळें हा प्रश्न कमेटी पुढें मी ठेविण्याचें योजिलें व त्याप्रमाणें उद्योगास लागलों त्याच सुमारास हनुमान प्रसाद हे सुट्टीवर जाऊन त्यांचे जागीं सहा महिन्या करितां निवारी म्हणून एक डे इन्स्पेक्टर आले त्यांनी सहामाहि परीक्षा घेऊन,

जातांना असें सांगून गेले कीं, मैं वार्षिक इमतिहान के समय नहीं आ सकता. तो आप कोई स्कूल कमेटी के मेंबर द्वारा परीक्षा लेकर क्लास प्रमोशन करवाई कीजियेगा एवढ तोंडी सांगून शेरा लिहून ते चालते झाले पुढें त्यांचे सहा महिने पुरे झाल्यावर आपल्या जागीं ते वापस गेले आम्हाला त्यांनीं तोंडी सांगितल्या प्रमाणें मी ही गोष्ट कमेटी पुढें ठेवली तरी आम्हीं पुनः कांहीं हुकूम होतो कीं काय ह्याची वाट आणखी दोन तीन महिने पाहिली कोणीच परीक्षेस आले नाहीं, किंवा कांहीं हुकूमही आला नाहीं. तेव्हां आता कोणी मागें सांगितल्या प्रमाणें परीक्षेस येणार नाहीं असें समजून कमेटीच्या हुकूमानें कृष्णराव पराडकर रिटायर्ड तहसीलदार साहेब ह्यांना बोलावून त्यांचे कडून वार्षिक परीक्षा घेवविली, व क्लास प्रमोशन केलें. व नवीन वर्ग नेहमीं प्रमाणें बनवून अभ्यास सुरू केला. परंतु आतां प्रायमरी सर्टिफिकेट कोण देणार हा प्रश्न उत्पन्न झाला कमेटी सुद्धां विचारांतच पडली. कारण परीक्षेचा लेखी हुकूम कांहींच नव्हता मग हें परीक्षेचें काम तुम्हीं कशाच्या आधारावर केलें ? असेंच कोणीही म्हणणार ! आतां सर्वांनाच विचार पडला. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें स्वतः डे इन्स्पेक्टर हनुमान प्रसादच एका एकीं शाळेंत येऊन परीक्षा की फेरीस्त कहा है ? हजर करो असा आल्या बरोबर हुकूम देऊन मुलांना पाट्या घेण्यास सांगितलें. व चौथा क्लास कौन सा ? अशी पृच्छा केली. मी नवीन बनलेला क्लास दाखविला. ते म्हणाले इनका गणित का अभ्यास कहां तक हुवा है ? मी म्हणालों अभी भिन्न चल रहा है तेव्हा ते रागानें माझ्याकडे पाहतात व म्हणतात क्या तुम सोते हो या होश में बोल रहे हो ? मी म्हणालों नही हुजूर अभी तो साल तमामका इमतिहान होकर क्लास चढाये गये है तेव्हां म्हणाले क्या ? क्लास प्रमोशनका इमतिहान हुवा. मी म्हणालों हां हुजूर ते म्हणाले किसने लिया मी म्हणालों तिवारीजी कह गये थे की साल तमाम को मेरा आना नही होगा इसलिये आप कोई सज्जनोंसे इमतिहान लेकर क्लास प्रमोशन करा दिजीये. मैंने कहां ठीक है. उस आज्ञाके अनुसार कमेटीको पुछकर पराडकर रिटायर्ड साहेबको बुलाकर उनसे सालाना इमतिहान लिवाकर प्रमोशन दिया. मग साहेब म्हणाले आपके पास कुछ लिखा है ? हो तो बताओ जिसने लिखा हुवा हैं उनकी बी खबर

ली जायगी मैंने कहा नहीं हुजूर मेरे पास कुछ लिखा हुवा नहीं है मूह-जबानी आर्डर दिखाया इसमें मेरा कसूर हो तो माफ किजीये यहांमें ऐसा न होगा मग ते कांहीं बोलले नाहींत, व शांतपणानें सभाकाळ पर्यंत बसून अ, ब तुकडी पासून ३ ऱ्या वर्गापर्यंत त्या वेळेला जीं मुलें हाजर होतीं त्या सर्वांची त्यांनीं वार्षिक परीक्षा पुन घेतली. रिझल्ट चांगला निघाला मग त्यांचा राग शांत झाला. आतां राहिला चौथा वर्ग, त्या वेळेला ती मुलें हाजर नव्हतीं परीक्षा झाल्यामुळें सर्व मुलें इंग्रजी शाळेंत गेली होतीं. मग मी साहेबांना म्हटलें साहब चौथ्या वर्गाचीं मुलें आज हाजर नाहींत तीं इंग्रजी शाळेंत गेलीं आहेत तेव्हां ते म्हणाले कल सुबह सात बजे उन सब लडकोंको हजर करो कल उनका इमतिहान लिया जायगा असें सांगून ते निघून गेले इकडे मी प्रत्येक मुलाचे घरीं जाऊन उद्या सकाळीं सात वाजतां शाळेंत हाजर राहा असें सांगून सर्व कमेटीच्या मेंबरानाही परीक्षेच्या वेळीं हजर राहण्यास विनंति केली. चौथ्या वर्गांत त्यावर्षी आठ मुलें होती. त्यांत राजासाहेबाचाही वडील मुलगा होता. सांगितल्याप्रमाणें साडे सहालाच मुलें हाजर झालीं सर्व मेंबरही सात वाजेपर्यंत आले सर्व तयारी झाली, व इन्स्पेक्टर साहेबांची वाट पाहत बसलों सात वाजून पांच सात मिनिटें होतात न होतात तोंच हनुमान प्रसाद यांची स्वारी दारात येऊन थडकली राजे साहेबांनींच स्वत स्वागत केलें. मग सर्व मंडळी स्थानापन्न झाल्यावर परीक्षेस सुरुवात झाली. लिस्ट वगैरे तयार होतीच. चार उदाहरणें एकदम दिलीं. तीं सर्व मुलानीं वह्यावर करून वह्या तपासण्याकरिता साहेबांजवळ दिल्या मग वाचन, कविता, अर्थ, तोंडचे हिशेब, भूगोल, सर्व विषयांत परीक्षा घेतली. ११ वाजून कांहीं मिनिटांनीं सर्व काम आटोपलें. पहिल्या परीक्षेंत ८ पैकीं ६ मुलेंच पास होऊन २ मुलें नापास झाली होतीं. परंतु साहेबाचे परीक्षेंत त्या दोन नापास मुलांपैकीं, गोविंद तापीकर नांवाचा नापास झालेला मुलगा पास झाला. मग ते म्हणाले, देखो ? हमारे परीक्षामें तुम्हारा फायदाही हुआ एक और ज्यादा लडका पास हुआ ह्याप्रमाणें साहेबांचें परीक्षेंत आमचें कांहीं नुकसान न होता फायदाच झाला, व साहेबांनी विशेष कांहीं न लिहिता शेरा उत्तम दिला, व तेव्हांपासून सर्वांबरोबर आमच्या

शाळेची वार्षिक परीक्षा मार्च मध्येंच होऊं लागली आणि मुलांचें सहा महिन्याचें जें नुकसान होत होतें त्यातून तीं वाचलीं त्या परीक्षेंत शाळेचा एकंदर रिझल्ट व त्याचा स्वतःचा मुलगा पास झाला हें पाहून राजे साहेबांनाही बरें वाटून घरच्या शिकवणींत त्यांनीं मला एक रुपया प्रमोशन दिलें

## शाळेची जागा बदलली व एक नवीन उपक्रम

आतां हितकारिणी मेन ब्रँच मध्यें जागा पुरेनाशी झाल्यामुळें वरील परीक्षेच्या वेळीं दिक्षित पुन्यात फत्तेचंद मिंगई ह्यांच्या वाड्यांत जागा भाड्यानें घेऊन शाळा आणावी लागली अद्याप शाळेंत दोनच मास्तर होते मला १० रुपये, व अ मा ला ५ रुपये, जागेचें भाडें ३॥ रुपये, काँटिजन्सी आठ आणे असे १९–२० रुपये खर्च होत. बाकी ७–८ रुपये शिल्लक पडत. कमेटीच्या ताब्यांत शाळा गेल्यापासून चौथ्या वर्गाला चार आणे, तिसऱ्या वर्गाला तीन आणे, दुसऱ्या वर्गाला दोन आणे, बाकी सर्व मुलांना एक आणा या प्रमाणें फी वसूल होई. एकंदर फीचें उत्पन्न सरासरी पांच सहा रुपये पर्यंत होई. १५–२० रुपये वर्गणी पासून मिळत. व ग्रँट ९० रुपये एवढ्या मिळकतीवर शाळेचा खर्च भागून कांहीं शिल्लकच उरे तीं सर्व राजा साहेब यांचेकडे जमा होई ह्या प्रमाणें शाळेला स्थिरत्व येत चाललें. मग मला असें वाटलें कीं, मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण दिल्यास काय वाईट? अशा प्रकारची कल्पना माझ्या मनांत उत्पन्न होतांच त्या उपक्रमाला मी लागलों. माझा उपक्रम म्हणजे पालकांचीं मनें आधीं राजी करुन घेणें त्या प्रमाणें मीं माझें म्हणणें ऐकून माझ्या विनंतीस मान देणारे असे जे पालक होते त्यांच्या समोर मी ही गोष्ट काढली ते म्हणाले ह्यात वावगें कांही नाहीं आतां पुढें पुढें मुलींनाही शिक्षण दिलेच पाहिजे इतर प्रांतांत तें सुरुही आहे प्रश्न एवढाच कीं, मुलांबरोबर मुलींना शिक्षण द्यावें कीं, नाहीं. ते म्हणाले आम्हाला कांहीं हरकत नाहीं परंतु कांहीं मंडळी ह्याला विरुद्ध जातील. तेव्हां तुम्ही जपूनच ह्या गोष्टीचा उपक्रम करा आम्हीं आपल्या मुली जरूर पाठवूं अशीं वऱ्याच जणांची मते घेऊन मीं ही गोष्ट कमेटी पुढें ठेविली. कमेटीनेंही त्या बाबतींत कांहीं आढे वेढे घेतले नाहींत मोठ्या खुषीनें त्यानीं परवानगी दिली परंतु त्यांत मुलींकडून फी घ्यावयाची नाहीं हें ठरलें मुलींकडून फी घ्यावयाचें ठरलें असतें तर

मुली मुलींच आल्या नसत्या मुलींनीं शाळेंत यावें म्हणून ही त्यांना सवलत होती हा उपक्रम लोकांपुढे ठेवण्याचाच अवकाश ! लागलीच त्या महिन्यापासून १०–५ मुली शाळेंत येऊंही लागल्या झालें ! आतां मुली व मुलें मिळून ७०–८० मुलें शाळेंत येऊं लागलीं आतां दोन शिक्षकांनीं भागेनासें झालें.

## माझें ट्रेनिंग

ह्याच वर्षीं आक्टोबर मध्यें नॉर्मल स्कूलची परीक्षा दर वर्षीप्रमाणें होणार होती. त्या परीक्षेस खासगी रीतीनें बसण्याची परवानगी मिळावा म्हणून मीं अर्ज केला होता त्याचें उत्तर येऊन परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. ग्रँट-इन एडच्या नियमाप्रमाणें प्रत्येक शाळेंत नॉर्मलस्कूल पास असा कोणीतरी मास्तर पाहिजेच असा नियम होता त्या नियमाला अनुसरून माझ्या पाठी-मागें परीक्षेस बसण्याबद्दल तगादा सुरू झाला आतां आपल्यास जर शाळा-खात्यांतच दिवस काढावयाचे तर परीक्षेस अवश्य बसून पास झालेंच पाहिजें त्याशिवाय हेडमास्तरी टिकणें अशक्य. म्हणून परीक्षेची तयारी जारीनें सुरू केली, व परीक्षेस बसलों व त्याच वर्षीं सेकंड क्लास मध्यें पासही झालों. गॅझेटमध्यें सेकंड क्लासांत माझें नाव आलेलें पाहून राजेसाहेबानी मला मुद्दाम त्या दिवशीं बोलावणें पाठवून कळविलें व दोन पेडेही मला खावयास दिले. त्यांनाही बरें वाटलें मग मला बरें वाटलें असेल हे विचारावयास नकोच.

## प्लेगचें संकट

ह्याप्रमाणें आम्हीं आनदांत आहोंत इतक्यांत गांवात उंदीर पडून माणसें तापानें पटापट मरूं लागलीं ह्यामुळें जिकडे तिकडे गडबड उडून सर्व लोक हवाल-दील दिसू लागले रोज मरणाची संख्या वाढूं लागली. उपाय सुरू झाले. घरे धुणें वगैरे क्रिया होऊं लागल्या ह्या वेळपर्यंत प्लेगची ह्या शहरावर कृपा झाली नव्हती, व त्याचा अनुभवही नव्हता परंतु ऐकून ऐकून काहीं माहिती झाली होती त्याप्रमाणें गांवाबाहेर झोपड्या बांधून कांहीं लोक झोंपड्यांत राहावयास गेले. काहीं लोक बाहेरगावीं आपल्या सोईप्रमाणें निघून गेले धार्मिक विधी कित्येक ठिकाणीं सुरू होऊन नाम सप्ताहही कित्येक ठिकाणीं बसले त्याची सांगताहि झाली परंतु उपशम कांहीं न होतां मृत्यूची संख्या वाढतच चालली. डिसेंबर मध्यें तर शंभराच्या वर मृत्यूचा आंकडा गेला पटापट शाळा बंद

होऊं लागल्या आमची शाळा बेमुदत बंद झाली मी आपल्या कुटुंबास इटारसीस दादांच्याकडे पाठविलें त्यावेळीं कुटुंबास कांहीं दिवस गेले होते. पुढेंही पाठवावें लागणारच तेव्हां आयत्यावेळीं पाठविण्यापेक्षा आतांच पाठविलेलें बरें नाहींतर येथें कोठेंतरी झोंपडी बांधून राहण्याची सोय करणें भाग होतें. इतक्यांत दादांचेंही पत्र आलें तुम्हीं दोघे इकडे निघून या मग मी लागलाच विचार करून मंडळीची तर रवानगी करून दिली आता मी राहिलों एकटा त्यावेळींही मी भैय्यासाहेब परांजपे यांजकडे शिकवणीस जातच होतों आतां तर जावयाचें नातें. शिवाय भाऊची मैत्री भाऊनें आग्रह केला की, मास्तर तुम्हीं आमचे बरोबर बांद्यासच चला तेथें कांहीं दिवस राहून मग तुम्हीं इटारशीस भावाकडे जा त्यांचे म्हणणें मला मोडवेना लागलेच मीं होय म्हटलें व आपली तयारीही केली तयारी ती काय करावयाची? माझ्याजवळ विशेष सामान असें त्यावेळीं कांहीं नव्हतेंच थोडें बहुत जें कांहीं होतें तें खोलींत बंद करून दाराला कुलूप लाविलें व जाण्यास तयार झालों भैय्यासाहेब, त्यांचें कुटुंब व लहान मुलें राजा साहेबांबरोबर भटोलीस त्यांच्या गांवीं जाऊन राहिली. मोठी तैय्या, भाऊ व भाऊची आणखी एक बहीण व मी असे चौघेजण बांद्यास रहावयास गेलों. माझें बांद्यापर्यंतचें भाडेंही त्यानींच दिलें आम्हीं डिसें बरच्या २२ तारखेपर्यंत जबलपुरास होतों. तों पर्यंत जवळ जवळ दीडशें-पर्यंत रोजचा मृत्यूची संख्या येऊन पोहोचली होती ताब्याच्या घरातही उंदीर पडूं लागले होते. तरी त्या मंडळीचा बाहेर कोठें जाऊन राहण्याचा रंग दिसेना ताब्याच्या घराच्या आसपास मुसलमान बंधूंची बरीच वस्ती होती ते लोक घर सोडून कोठें बाहेर गेले नाहीत इतक्यांत विनायकरावाचें कुटुंब हेंगनें लागल्याचें दिसलें मी त्याना म्हटलें अशा वेळेस उंदीर पडणाऱ्या घरात राहणें बरें नाही पण ती सर्व मंडळी जरा हट्टी स्वभावाची असल्यामुळें वडील बंधूच्या मर्जी प्रमाणें चालत शिवाय सर्वांचीच गरीबी. बाहेर जावयाचें म्हणजे तात्पुरते ४०-५० रुपये खर्च केले पाहिजेत थंडीचे दिवस, कच्च्याबच्च्यांचीही व्यवस्था पाहिजे म्हणून त्या सर्वांनीं घरींच राहण्याचा विचार केला माझ्या देखतच ५, ५० उंदीर त्या घरात मेलेले निघाले भराभर ते विनायकरावाच्या मुलानें उचलावेत, बाहेर फेकावेत,

आणि त्याचा विधी निषेधही बाळगू नये, कारण आतां ते जरा इंग्रजी शिकल्यामुळें स्वतंत्र विचाराचे झाले होते, व आमच्याशीं जरा रुष्टच होते. तशात आई आजारी पडली. मग आता ते कोठें जातात घरच्या घरींच औषधोपचार सुरू झाले. त्यांच्या दुखण्यास कम दिसेना तरीही मी तेथें होतोंच रोज नवीन नवीन भयंकर अशा बातम्या ऐकावयास याव्या त्यामुळे मन गोंधळून जावें आज ८-९ वर्षांचा विनायकरावाचा व माझा घरोबा म्हणून अशा सधीस त्या सर्वांना सोडून बाहेर जाववेना परतु जीव हा सर्वांनाच प्यारा असतो मनुष्य जों पर्यंत बनेल तों पर्यंत त्याचें रक्षण करूं पाहतो शिवाय आतां मी एकटा नव्हतों दुसऱ्याची मुलगी घरांत आणलेली मनुष्य केव्हातरी मरणारच तो तरी मरावयासच उत्पन्न झाला आहे. तरी कांहीं कार्य करतां करतां मरावें. अशा सर्व बाजूंनीं विचार करून मी भाऊ-परांजपे बरोबर बायास गेलों त्या ठिकाणीं नारायण भट जोशी आमच्या कुटुंबाचे आते सासरे यांचेकडे मुक्काम होता त्यानी मला मोठ्या आग्रहाने १५-२० दिवस ठेवून घेतलें १५ दिवसांनतर तेथें बातमा कळली कीं, तांब्यां-कडची बरीच मंडळी मृत्यूमुखीं पडली त्यांत नारायणराव, विनायकराव, दोघाच्या बायका, विनायकरावांचा वडील मुलगा दत्तु, मोरू काका, अशी सर्व करती सवरती मंडळी गेल्यामुळें तें सर्व घरच्याघर खालीं बसलें त्यात विनायकरावांचीं दोन मुलें फक्त वाचलीं. त्या दोन मुलांचें पालन पुढे त्याचे चुलते जनार्दनराव तांबे त्यावेळीं झांशीस होते त्यानीं केलें त्यांपैकीं एक मुलगा पुढें मेला व दुसरा आज आकोल्यास वकीली करीत असून चांगल्या स्थितींत आहे अशी ताब्यांच्या घरची वाताहात झालेली ऐकल्यावर आता बांयास मला करमेना. म्हणून भाऊ पराजपे यास विचारून मी झाशीस जनार्दनराव तांबे याचेकडे गेलो, व तेथें त्यांनीं ठेवून घेतल्यावर ८-१० दिवस झांशीस राहिलों. येथील बऱ्याच्या जोगत्या गोष्टी सर्व पाहिल्या झांशी हें एक ऐतिहासिक शहर असल्यामुळे त्याला पाहिल्या बरोबर नाना प्रकारच्या भावना मनामध्ये उत्पन्न होतातच. मन भांबावून जातें. व आपण होतों कोण ? आज आपली स्थिती कशी आहे ?? हें असेच चाललें तर आपल्या देशाचें पुढें काय होणार ??? वगैरे विचार मनात उभे राहून एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न

होतें, व भवितव्यावर हवाला ठेवून स्वस्थ बसावे लागतें दुसरें आम्हीं काय करणार ? पराधीनता ही मोठी कठीण आहे आठ दहा दिवस झाशीस राहून मग दादाकडे इटारशासच होतों मार्च महिन्याचे अखरीस एकदा जबलपुरास जाऊन जबलपुरची काय हकीकत आहे ती पाहून पुन इटारशीस आलों तों तांब्याच्या घरची सर्व वाताहात झालेली होती त्याच वर्षी भाऊ पराजपे ह्याचे लग्न ठरल्यामुळें ती सर्व मंडळी बाद्याहून रावेरीस गेली मलाही बोलावणें असल्यामुळें मीही रावेरीस जाऊन पोहोचलों भैय्यासाहेब व त्याच कडील सर्व मंडळी जबलपुराहून रावेरीस आली भाऊचे लग्नाचा उत्तम सोहळा होऊन लग्न पार पडलें. जबलपुरचा प्लेग आतां अगदीं कमी झाल्यामुळें आम्हीं सर्व मंडळी आता जबलपुरासच आलों पुढें लवकरच शाळाही सुरु झाल्या.

## मी घर बदललें व शाळेसबंधीं थोडी विस्तृत हकीगत

आतां तांब्यांचे घरांत कोणीच नसल्यामुळें सर्व घर भयाण दिसत होतें आता तेथें राहणें मला शक्य नव्हते. म्हणून मी भैय्यासाहेब पराजपे यांच्या कडेच थोडी जागा भाड्यानें घेऊन त्या घरात राहूं लागलों. तांब्याच्या सर्व मंडळींची वाताहात झाल्यावर सर्व घर रिकामेच पडलें होतें. बिसन कक्का फक्त एकटेच राहिले होते ते सखाराम बुवाकडेच बहुधा असत. माझे सामान असें फारसें नव्हतेंच. कांहीं चार भांडीं-कुडीं मडकीं-पलंग वगैरे जे थोडें सामान होतें तें घेऊन मीं भाऊंकडे राहूं लागलो ह्याच वेळेला कुटुंब प्रसूत होऊन कन्यारत्न झालें. परतु ते लवकरच आटापलें व कुटुंब मोकळें झालें तरी दोन तीन महिने झाल्याशिवाय आणणें बरोबर नाहीं असें सर्वांचे म्हणणें पडलें म्हणून मी बोलाविण्याची घाई केली नाहीं पुढें जुलै महिन्यांत कुटुंबाला घेऊन आई जबलपुरास आली पुढें आई आणखी चार सहा महिने माझ्या जवळ होती. श्रावण महिन्यांत मगळागौर वगैरे झाली त्या वेळेला बरेच पान झालें. शाळेंचीही पुष्कळशी मुलें जेवावयास सांगितलीं होती. कारण त्या मुलांवर आता आमची सर्व मदार होती. मुलांचेही माझेवर प्रेम असल्यामुळे त्या मुलांच्या घरीं हव्य कव्य होऊन त्यांच्या घरीं चार पानें झाल्यास एक पान मास्तराकरितां राखून ठेवल्याशिवाय त्यांचे पालक राहिले नाहींत इतका घरोबा आतां माझा जबलपुरात उत्पन्न झाला होता ह्या वेळेस मुजुमदार

# मराठी शाळेचे अभिमानी व सल्लागार



श्री भिकाजीपंत डगवेकर



कै भास्करराव चितळे

पहिले आश्रयदाते व सभासद



कै. केशवराव परांजपे

# प्राथमिक शाळा–समिति, जबलपूर

कै. डॉ. हर्षे



सभासद

कै. जनार्दनराव परांजपे



सभासद

श्री. नारायणराव जोशी



सभासद

रा. रा. रघुनाथराव काणे



सुपरवाइझर

नावाचे एक मास्तर माझे सहकारी होते. सध्या शाळेचे सेक्रेटरी जरी रंगोपंत भट होते तरी ह्या वेळेला मुकुंदराव लोकरस हे येथें बदलून आल्यामुळें व ते राजासाहेबांचे जीवश्च कंठश्च मित्र असल्यामुळें राजासाहेबांच्या सांगण्यावरून रंगोपंतांनीं त्यांना आपल्या मदतीस घेण्याचें ठरविलें व त्या प्रमाणे आता सेक्रेटरीचें बहुतेक काम लोकरसच पाहू लागले कमेटीचें प्रोसिडिंग लिहाणें, हिशेब पाहणें, मास्तरांना मदत करणें, सुट्या वगैरे देणें, हीं सर्व कामें आता मुकुंदरावांमार्फतच होऊं लागलीं. त्यांची कामाची शिस्त मोठी समाधानकारक होती वृत्ती आनंदी, काम चोख करण्याची हौस. ह्यामुळें आम्हाला कोणत्याही प्रकारची अडचण उत्पन्न न होतां आमचेकडून काम उत्तम होत गेलें. ही एक लोकरसाची कृपाच होय अशा तऱ्हेचे अधिकारी लाभणे ह्यालाही थोडेसे भाग्य लागतें ते आमच्या सर्व गोष्टी ऐकून घेत, व आमचें म्हणणें राजासाहेबाना नीट समजावून सांगत मग कमेटीपुढेंही ती बाब नीट मांडून त्या बाबींचा सर्वांना समाधानकारक असा निकाल लावीत ह्याच वेळेस ह्या प्लेगच्या गडबडींत कोणाच्यातरी विसरणामुळें ग्रँटचें बील पाठविण्याचें राहून गेलें, व त्या वर्षाची ग्रँट रद्द झाली. त्यात कोणाच्यातरी कारवाईमुळें ही हेडमास्तरची चुकी म्हणून तें खापर हेडमास्तरचें डोक्यावर फोडण्यात येऊं लागलें, व त्याबद्दल हेडमास्तरास जाब विचारावा अशी सलाह एका अहंमन्य अधिकाऱ्यानें त्याला विचारल्यावरून दिली परंतु आमचे डे. इन्स्पेक्टर साहेब हनुमान प्रसाद यांनीं मला आश्वासान दिलें कीं. डरोमत हम तुम्हारी ग्रँट लॅप्स नही होने देऊंगा खरेंच, सांगण्यास मोठा आनंद वाटतो की, त्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणें ही बुडूं पाहणारी ग्रँट मिळवून दिली. मग सर्व गप्प बसले हेंही आलेलें संकट दूर झालें नाहींतर विना कारण ९० रु बुडून माझ्यावर हलगर्जीपणाचा धब्बा लागला असता तो निराळाच आता माझे सहाय्यक शिक्षक मुजुमदार म्हणून होते त्यांना दुसरी नोकरी लागल्यामुळें ते राजीनामा देऊन आपल्या नोकरीवर गेले. आतां शाळेंत मी एकटाच राहिलों मुलें पुष्कळ वाढलेलीं, तींत शिक्षकांची गरज भासूं लागली. अशात दोन शिक्षक होते. त्यांतूनही एक गेलेला तेव्हा मी एकटाच सर्व काम कसें पार पडतें ही विवंचना मला आतां सुरू झाली. इतक्या थोड्या पगारावर कोण राहण्यास तयार होतो

## एक कायमचे शिक्षक शाळेला लाभले

इतक्यात शाळेच्या नशिबाने म्हणा, किंवा आमच्या प्रारब्धानें म्हणा माझ्या सारखेच भटकत फिरणारें एक कोंकणचें भूत एका एकीं येथें येऊन पोहोंचलें त्याचे नांव गणपतराव करमरकर. त्यांची एक म्हातारी अशी एक आजी येथें पराजप्याकडे होती. तिच्याकडे ते आले होते. आजीच्या मदतीनें येथें काही उद्योग जमल्यास पहावा, व आजीच्या जमीनीची व्यवस्था पाहावी, आणि येथें राहावें अशा हेतूनें ते इतक्या दूर आले होते आमची मित्र मडळी (त्यात बाबासाहेब कुकडे पोस्टल इन्स्पेक्टर हे प्रमुख होते) सर्व आम्हां दोघाना कोंकणचीं भुतें म्हणून थट्टेनें हाक मारीत, व म्हणत, हीं भुतें कोठें कशी आग लावतील व आपला कार्यभाग उरकून घेतील हें चित्र तुम्हाला सुद्धां कळणार नाही अशी ही जोडी प्रतापी आहे. अशी ही, आतां सागण्यास मला मोठा आनद वाटतो कीं, आमची जोडी पुढें अशीच टिकली, व मी रिटायर्ड होऊन अलाहाबादला येण्यास निघालों त्यावेळेस त्यांच्या डोळ्यातून पाणी आलें आम्हां दोघे भाऊ भाऊ आहोंत असेंच सर्वांना वाटे आम्हीं जर रस्त्यानें दोघे कधीं एकत्र चाललों तर लोकानीं म्हणावें आज ह्या दोघा बधूची ही जोडी कोणत्या मोहीमेवर निघाली आहे ! ! असें आम्हां दोघांचें मित्रत्व पुढें बरेंच दिवसपर्यंत टिकलें. पुढें पुढें आमचें हें मित्रत्व काहीं जणाना न पाहवल्यामुळें लोकानीं त्यांत विघ्न घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्याना विशेष यश आलें नाहीं वेळ प्रसंगीं मी त्यांना व त्यानीं मला साथ देणें कधीं सोडलें नाही क्वचित् प्रसंगीं शत्रूचा वर पगडा होऊन ते हुकल्या सारखे वाटत पण पुन ते लागलेच मार्गावर येत, व कधीं ही गोष्ट झालीच नाही असें वागत सांगण्याचा मतलब हाच कीं, ही त्यांची माझी मैत्री शेवट पर्यंत टिकली

असे हे गणपतराव करमरकर आलेले मला कळल्याबरोबर मी त्यांच्या कडे गेलों गप्पा सप्पा झाल्यावर त्यांची सर्व हकीकत मी समजावून घेतली, व त्यांना विचारलें एखादा धंदा कोठें मिळाल्यास पत्कराल काय ? असा प्रश्न केला त्यांना येथें राहावयाचेंच होतें, व त्यातल्या त्यांत थोडी पोटाची सोय अनायासें होत आहे तर ते नको कशाला म्हणतील. लागलीच त्यानीं रुकार

दिला व होय म्हटलें मला शाळेला मनुष्य पाहिजेच होता. लागलीच त्यांचे कडून एक अर्ज लिहून घेऊन तो सेक्रेटरी साहेबाजवळ नेऊन दिला त्यांना म्हटलें अद्याप हे गृहस्थ नवीन दिसतात शिकविण्याचा कांहीं अनुभव नाहीं. दुसरा कोणी असला तर पहा जर आणखी कोणी नाहींच मिळालें तर पुढें पाहू त्यांनींही शोध केला. परंतु त्यांच्या पसंतीचा असा कोणीच मनुष्य सेक्रेटरी साहेबांच्या आढळांत न आल्यामुळें मला त्यांनीं सांगितलें तीन महिन्यांकरितां करमरकराची नेमणूक मी करतों काम पाहून रिपोर्ट करा. मी म्हटलें बरें आहे झालें! माझी शिफारस लागू पडली एकदा शिरकाव तर झाला तीन महिन्यानंतर पाहता येईल हे तीन महिने केव्हांच निघून गेले, कळलें सुद्धा नाहीं नतर मीं रिपोर्ट केला कीं, हे इसम मेहनती असून काम चालविण्यास योग्य असेच आहेत तेव्हां मग सेक्रेटरींनींही कांहीं आढे वेढे न घेता त्याची नेमणूक कायम केली. ह्यावेळीं कमेटींतील जुने मेंबर जाऊन बरीच नवी मंडळी त्यात आली होती. त्यांत परांडे जज्ज साहेब, पोहनकर, लोकरस मास्तर, राजासाहेब, जयरामपत हर्षे, बाळकृष्णपत क्षीरसागर वगैरे मंडळी प्रमुख होती

## शाळेचें दृत्तविधान

अशी ही आमची शाळा प्रगती पथावरून आक्रमण करीत असता इकडे हितकारिणी हायस्कूल हें त्यावेळीं एका भाड्याचे बंगल्यात लागत होतें. ती जागा हायस्कूलला पुरेना. म्हणून शाळेकरितां एखादी मोठी जागा पाहून त्या करिता फंड गोळा करण्याचें काम सुरू झालें होते. होतां होता बराच फंड जमा झाला व सरकारनेही योग्य ती मदत देण्याचें आश्वासन दिलें. आतां प्रश्न असा पडला कीं शाळेच्या सोईची अशी जागा कोठें मिळते? बरीच मोठी जागा पाहिजे. ती कोणती पाहावी? होता करतां भर वस्तींत असलेली अशी एक राजासाहेबाची जागा कमेटीच्या डोळ्यांना दिसूं लागली अशी जागा त्यांचे समोर येतांच त्या कमेटीनें चार जणांच्या मध्यस्थीनें त्याना हव्या असणाऱ्या ह्या जागेची मागणी श्रीमंत राजासाहेबांकडे केली आता राजासाहेबांना एक मोठा प्रश्न पडला कीं, नाहीं म्हणावें कीं, होयं म्हणावें? नाहीं म्हणावें तर सरकारच्या मदतीनें पुढें मागें

ही जागा जबरदस्तीनें मागण्यांत येणारच होय म्हणावें तर २०–२५ हजारांचें नुकसान सोसणें, आज भाग आहे. आम्हीं कितीही आडे वेडे घेतले तरी जागा ही आपल्यास द्यावी लागणारच तर मग त्यांतल्या त्यांत आपण आपला एक फायदा का न करून घ्यावा? असें आपल्या खाजगी बैठकींत ठरवून हा आपला हेतु त्यांनीं हितकारिणी कमेटीस कळविला तो हेतु हा कीं, आमची एक मराठी शाळा आहे, तिला सरकारनें मंजुरी देऊन ग्रँटही सुरू केली आहे व ती आज १०–१२ वर्षे उत्तम रीतीनें चालू आहे अशी ही शाळा तुम्हीं आपल्या ताब्यात घेऊन जर आपल्या दोन हिंदी शाळांप्रमाणें चालवाल व तिचा सर्व खर्च सोसाल तर मी आपली तुम्हांला हवी असलेली सर्व जागा तुमच्या हायस्कूलकरितां देण्यास तयार आहे आतां हें त्यांचें म्हणणें हायस्कूलच्या कमेटींत जाऊन त्यावर चर्चा सुरू झाली. एवढी मोठी जागा पुढें मागें ३००–४०० रुपये भाडें उत्पन्न होणारी, मोक्याची, अशी अनायासें पदरीं पडत असता, नाहीं कोण म्हणणार? लागलीच त्यांनींही राजासाहेबांची अट मान्य करून आमची मराठी शाळा आपल्या ताब्यात घेण्याचें ठरविलें व नियमा प्रमाणें इन्स्पेक्टर साहेबाचे मार्फत हें प्रकरण डायरेक्टर साहेबाकडे मंजुरी करिता पाठविलें गेलें. लागलीच ह्या गोष्टीस मंजुरी मिळून तसें त्यांनी राजासाहेबांस कळविलें कीं, आम्हीं तुमची संस्था आपल्या ताब्यांत घेतों व चाल विलों त्या करितां तुम्हीं आम्हास वर्षाकाठीं नावाकरिता म्हणून ६० रुपये द्यावे झाले? हा करार होऊन हितकारिणी कमेटीनें आमची संस्था आपल्या ताब्यांत घेतली अशा रीतीनें शाळेचा भाग्योदय होऊन पुनः तिचें पाऊल स्थिर होऊन तिला पक्केपणा आला. आतां मुलें मुली मिळून शाळेंत ८० संख्या झाली, व तिसरा आणखी एक शिक्षकही मिळाला. ते आमच्या शाळेंतूनच पास झालेले एक विद्यार्थी नारायण महादेवकर हे होत त्यांनाही पगार ५ रुपये देण्याचें ठरलें असें आतां आम्हीं तिघे मिळून शाळेचें काम पाहूं लागलों. ह्या सुमारास शाळेचा ग्रँटही वाढून तिचा आंकडा १४० रु. पर्यंत गेला व म्युनिसिपालटी कडून ही ६० रुपये निराळी ग्रँट मिळूं लागली. इकडे शाळेच्या नियमा प्रमाणें सर्व प्रायमरी शाळांचे एक आणा फी घेण्याचें ठरल्यामुळे आमच्याही शाळेंतील मुलांचीं फी कमी होऊन सर्वांची सरसकट एक आणा फी घेण्यांत येऊं लागली.

ही गोष्ट १९०४ ह्या सालीं घडली. आतां हितकारिणी कमेटीकडून शाळेची तपासणी होऊं लागली. आमचे पहिले सुपरव्हायझर गंगाधरराव साने हे होत. आतां ह्या नंतर आम्हास थोडें थोडें त्यांच्याही तंत्रानें चालावें लागे व हायस्कूलच्या हेडमास्तर साहेबांचीही मर्जी सुप्रसन्न ठेवावी लागे. ह्यावेळीं रघुवीर प्रसाद द्विवेदी हे हितकारिणी हायस्कूलचे हेडमास्तर होते. ते बरेच मेहनती असून स्वभावानें आनंदी असे होते. सरळ मार्गी असल्यामुळें कधीं कोणाच्या आध्यांत मध्यांत पडत नसत. मधून मधून केव्हां केव्हा तेही शाळेची पाहणी करीत. आतां आमचा पगार वगैरे हितकारिणी संस्थेच्या सर्व शिक्षकांबरोबरच मिळूं लागला. शाळेची रिटर्न्स हेडमास्तरांच्या मार्फतच जाऊं लागलीं. आमच्या शाळेची पूर्वीची कमेटी आतां हितकारिणीची सहाय्य कमेटी म्हणून काम पाहू लागली. आतां राजासाहेबांचीं आणखी दोन मुलें शाळेंत येऊं लागल्यामुळे त्यांचेंही लक्ष शाळेकडे विशेष लागून ते जातीनें त्यांत भाग घेऊं लागले. ह्यावेळीं हितकारिणीला त्यांनी आपली जागा देऊन केवढा मोठा स्वार्थत्याग केला. त्यात आमच्या शाळेची वर्णी लागून आमचेंही मोठें काम साधलें. ही गोष्ट सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी घडली. ह्या बद्दल राजासाहेबांचें जितके अभिनंदन करावें तितकें थोडेंच होणार आहे. अशा ह्या विद्यादानाकरिता म्हणून त्यांनीं २०–२५ हजारांच्या मिळकतीवर उदक सोडलें, व हायस्कूलचे रूपानें त्यानीं आपलें चिरस्मरणीय असें स्मारक करून ठेविलें. असें हें स्मारक आज इमारत रूपानें टाऊन हॉलच्या समोर उभें आहे, व म्हणत आहे कीं, केवढा हा स्वार्थत्याग? धन्य ते राजपुरुष आणि धन्य ते लोक.

## सर्कल इन्स्पेक्टर शार्प साहेब शाळेंत येऊं पाहतात

असे हे आमचे दोन कमेटींच्या नियंत्रणाखालीं शाळेचें तारूं धीमे धीमे, मार्गक्रमण करीत असतां आमच्या कानीं अशी बातमी येऊन थडकली कीं, सर्कल इन्स्पेक्टर शार्प साहेब हितकारिणीच्या सर्व शाळांची तपासणी करणार आहेत. अशा ह्या वेळीं आम्हाला एक मोठी काळजी उत्पन्न झाली ती ही कीं, आमची शाळा सुरू होऊन आज बारा वर्षें पूर्ण झालीं होतीं. इतक्या अवधींत ब्राऊनिंग साहेबांशिवाय कोणीही यूरोपियन अधिकारी शाळा पाहण्यास आला नव्हता. ब्राऊनिंग साहेब आले तरी काय? त्या वेळीं आमची शाळा अगदींच

नवीन म्हणून विशेष अशी पाहणी काहींच झाली नाहीं. ती वेळ निभावली पण आतांचा प्रसंग निराळा होता. आतां हितकारिणीच्या दोन शाळा, बरोबर चढाओढीचा प्रसंग होता. त्या शाळांचे सर्व शिक्षक अनुभवी. पुष्कळ युरोपियन इन्स्पेक्टराच्या कारकीर्दींत त्यांनीं काम पार पाडलेलें. मला तसा अनुभव मुळींच नाहीं. तेव्हां हें तपासणीचें काम माझे हातून पार पडून त्यांतून मी कसा काय पार पडतो ह्याची चुटपुट मला लागली. आता तीन चार दिवसांनीं इन्स्पेक्टर साहेब शाळा पाहण्यास येणार म्हणून आधीं तीन दिवस शाळेला सफेदी देऊन शाळेसंबंधीं माहिती दर्शविणारे सर्व तक्ते नवीन तयार करून म्हणी, काही देवादिकांचीं चित्रें वगैरे लावून शाळा उत्तम प्रकारें सजविली व कोठेंही उणेपणा राहूं दिला नाहीं. कारण ऐकून ठाऊक होतें कीं, ते सफाईचे फार शौकीन आहेत. तसेंच राजासाहेब वगैरे मेंबर मंड-ळींनींही येऊन सर्व हाजीरी रजिष्टर्स, पुस्तकें, मुलाच्या काप्या, ड्रेस वगैरे ठीक आहेत किंवा नाहींत हें पाहून ठीक असल्याची आपली खात्री करून घेतली. रा. रा. श्रीधरराव पुरोहित हे त्यावेळीं सर्कल इन्स्पेक्टर साहेबाच्या ऑफिसचे हेडक्लार्क होते. ते राजासाहेबांचे आश्रितही असत. त्यामुळें राजा-साहेबांनीं श्रीधररावाना विनंति केली कीं, मराठी शाळेंत शार्प साहेब येणार आहेत तर तुम्हीं एकदां शाळेंत जाऊन सर्व शाळेची चाचणी करून कांहीं उणीव असल्यास भरून काढण्यास शिक्षकांना मदत करा. त्याप्रमाणें त्यांनींही येऊन सर्व शाळा तपासली व त्यांच्या मताप्रमाणें ज्या ज्या उणीवा त्यांना भासल्या त्या सर्व मीं यथायोग्य भरून काढल्या. हेतु इतकाच कीं, आपली ही संस्था ह्या प्रांतात एकच. तिला जर कोणत्याही तऱ्हेनें खो बसला तर पुन: डोकें वर काढण्यास वाव राहणार नाहीं, व आपल्या समाजाची थोडी नाचक्कीच झाल्यासारखी होईल. अशा समजुतीनें आपल्याकडून होईल तितकी काळजी घेऊन त्यांनीं आम्हांला मोठें सहाय्य केलें. त्यावेळीं सर्वच कामात राजासाहेब स्वतः पुढाकार घेत. तेव्हां मेंबर लोकांनींही जातीनें येऊन त्याना मदत करावी लागे.

अशा प्रकारें सर्व जय्यत तयारी करून साहेबाची वाट पाहात आम्हीं राहिलों. तो अचानक उद्यां तुमच्या शाळेंत साहेब येणार अशी वर्दी

हितकारिणीच्या हेडमास्तराकडून आली व आम्हाला सांगितलें कीं, शाळा चांगली ठेवा कोणत्याहि प्रकारें उणेपणा भासूं देऊं नका आम्हीं आधींपासून सर्व तयारी करून बसलोंच होतों सर्व मुलांना ताकीद दिली कीं, उद्या सकाळीं साडेसहाला सर्व मुलांनीं उत्तम कपडे वगैरे करून शाळेंत हाजर व्हावें तसेंच मेंबर लोकांनाही कळविलें कीं, उद्या सात वाजता आपण सर्वजण शाळेंत साहेबांच्या स्वागताकरितां हजर राहा आम्हीं सर्व शिक्षक मंडळी सकाळीं ६ ला आंघोळ वगैरे करून आपापल्या कामावर हाजर राहिलों सात वाजले तसे सर्व मेंबर मंडळी मोठ्या फाटकापाशी साहेबांची वाट पाहात स्वागताकरितां उभी राहिली ७ वाजून ५ मिनिटांत साहेब सायकल वरून दारात येऊन थडकले खालीं उतरल्यावर राजासाहेबाशीं हस्तांदोलन करून सर्व मेंबर लोकांचीही त्यांनीं माहिती करून घेतली. पहिल्या प्रथमच दारांत शिशुवर्ग बसविला होता आंत येताच शिशु क्लासच्या विद्यार्थ्यांनीं रोजच्या प्रार्थनेचें गाणें म्हटलें, व ड्रीलच्या पद्धतीनें पूर्वीं शिकविल्याप्रमाणें साहेबांचें स्वागत केलें नतर साहेबांनी मुलांना काहीं प्रश्न केले त्यांची मुलानी न भिता ठीक उत्तरें दिलीं ते पाहून प्रथमच साहेबांचें मन प्रसन्न झालेलें दिसलें लागलेच माडीवर बाकीचे सर्व वर्ग लागत, तेथेंच बैठकीची व्यवस्था केली होती वर आल्याबरोबर आधीं सर्व खोल्यांतून हिंडून, भिंतीवरून नजर फिरवून एका टांगलेल्या चित्राकडे बोट दाखवून म्हटलें, मास्तर हें कोणाचें चित्र आहे ? मी म्हणालों महिषासुर मर्दिनीचें. मग हें चित्र शाळेंत कशाला लाविलें ? त्याचा येथें काय उपयोग ?? मी म्हणालों तें आमचें आराध्य दैवत आहे व ती आमची कुलस्वामिनी असल्या मुळें रोज तिला वंदन करून आम्हीं आपल्या कामाला लागतों. मग राजा साहेबांनींही त्या चित्रासंबंधीं काहीं त्यांना इंग्रजींत समजावून सांगितले ती माहिती ऐकत ते मनातल्या मनात हंसत होते. अशा रीतीनें तें चित्राचें प्रकरण संपल्यावर मुलांच्या परीक्षेस सुरुवात झाली साहेबाचा कॅपक्लार्कहा बरोबर आला होता दोघानी मिळून सर्व विषयांत परीक्षा घेतली अकरा वाजले तरी ते स्वत कंटाळले नाहीत मग म्हणाले आतां ड्रील दाखवा. मीं म्हटलें येथें जागा कमी आहे मुलांना ड्रील करण्यास त्रास पडतो, तर ते म्हणाले चला, आपण जवळच हितकारिणी शाळेचें कंपाऊंड

आहे तेथें जागाही विपुल आहे तेथेंच जाऊ सर्व मुलाना तेथें नेऊन उभे करा तोंवर आम्ही आलोंच असें म्हणून आम्हाला तिकडे पाठवून आपण मेंबर लोकाशीं गप्पा करीत तेथेंच बसले. आम्ही मुलांना नेऊन नीट उभे केल्यावर ड्रीलच्या पद्धतीप्रमाणें हुकूम देऊन सर्वांना रांगेत उभें करून साहेबाची वाट पाहात स्वस्थ राहिलों. इतक्यात साहेब आलेच. राईट टर्न, लेफ्ट टर्न, एक्सटेंशनमोशनच्या कांही प्रॅक्टीस, साधी बैठक, हनुमान दंड वगैरे १०-५ प्रकार मुलाकडून करवून घेतले परंतु ते पाहिजे तसे वठले नाहींत परंतु तेवढ्यावरून ते कांहीं नाराज झालेले दिसले नाहींत. आतां सर्व मुलाना सुट्टी द्या व मेंबर व तुम्हीं सर्व शाळेंत चला असें सांगून मेंबर मंडळीला बरोबर घेऊन ते पुन: शाळेंत जाऊन खुर्चीवर बसले इकडे मुलाना सुट्टी देऊन त्यांना मी घरीं पाठविले. आतां साहेब मला म्हणाले तुमचें सर्टिफिकेट कोठें आहे ? ते मला द्या माझी अशी समजूत कीं, मी सर्टिफिकेट शाळेंतच फडताळांत ठेविले आहे. ह्मणून ते काढण्याकरितां फडताळ उघडले, जवळच साहेब बसले होते. फडताळात मी पुष्कळ हुडकलें. सर्व कागद एक एक करून पाहिला परंतु सर्टिफिकेट कांहीं सांपडेना. पधरावीस मिनिटें झालीं साहेबही कंटाळले परंतु योगायोग असा कीं, तें सर्टिफिकेट दाखल खारीज रजिष्टर मध्यें पहिल्याच पानात घालून ठेविलें होतें. सर्व पुस्तकें पाहतां पाहता दाखल खारीजही उघडलें तों पहिल्याच पानांत सर्टिफिकेट मिळालें. तेव्हां साहेबांना म्हटलें हें घ्या सर्टिफिकेट. साहेब न रागावता स्वस्थ बसून ही गंमत पाहत होते अर्थात् मेंबरानाही बसावें लागले सर्टिफिकेट मिळाल्यावर शेरे बुक व तें सर्टिफिकेट आपल्या कारकुनाच्या स्वाधीन करून सर्वांशीं हस्तांदोलन करून साहेब खुशीनें निघून गेले. झालें ? परीक्षा आटोपली आतां धाकधुक लागली कीं, काय लिहून येतें कोण जाणे ? सर्वांनांच थोडी काळजी उत्पन्न झाल्या सारखी दिसली पुढें ५-६ दिवसांनीं शिपाई शेरे बुक घेऊन आला. त्यावर हितकारिणीच्या हेडमास्तरांचीही निरीक्षण केल्याची सही होती असे तें शेरे बुक हातीं येतांच आधीं सर्व शेरा वाचून सर्व मास्तरांनाही दाखविला .शेरा फारच उत्तम होता. जनरल रिमार्क फार संतोषदायक असा होता. कवायत, कसरत ह्याच्याकडे जरा जास्त लक्ष दिलें पाहिजे, ती कमजोर आहे असें लिहीलें

९५००२
२३।१०।७३

श्री. गो. ना. हर्डीकर



सभासद

श्री. सदाशिवराव परांजपे



भालदारपुरा मराठी
शाळेचे मुख्याध्यापक

श्री. नी. ग. लेले



माजी चिटणीस व अध्यक्ष, शाळा-समिति

श्री लक्ष्मणराव मुनळे



सेवानिवृत्त मुख्याध्यापक


# प्राथमिक शाळा-समिति, जबलपूर

कै. राजासाहेब सागरवाले



अध्यक्ष

कै. बाळकृष्णपंत क्षीरसागर



सभासद व चित्रकला शिक्षक

कै. जयरामपंत हर्षे



चिटणीस

कै. कृष्णाजी हरी दाते



जुने सभासद

होतें एकंदरीत शेरा पाहून राजामहिंनही खुश झालेले दिसले. सर्व मेंबरानाही आनंद झाला सर्वांनीं केलेल्या श्रमाचें सार्थक झालें पुढें कांहीं दिवसानीं सहामाही परीक्षेकरितां श्री. हनुमान प्रसाद शाळेंत आले. ते शाळेंत आले त्याच वेळीं त्याचा मर्जी मोठी प्रसन्न असलेली दिसली, व लागलीच ते म्हणाले "मास्तर आता आज मी विशेष कांहीं पाहात नाहीं तुमचें काम ह्यावेळीं फार चागलें निघालें आहे. अशीच नेहमीं तयारी ठेवीत जा " म्हणून सागून कांहीं माहिती घेऊन ते निघून गेले त्यांनीं शाळेंत बसून व्हिजिटर बुक लिहीलें, व काम उत्तम असल्याबद्दल त्यांत उल्लेख केला साहेब येणार! येणार! म्हणून वाटत होते. ते साहेब यऊन परीक्षा घेऊन गेले सुद्धा मग आम्हाला थोडी स्वस्थता आली शाळेलाही स्थिरत्व मिळाले ह्या वर्षीं वार्षिक परीक्षाही वेळेवर होऊन रिझल्ट चागला लागला हिंदी शाळेच्या चढाओढींत कोणत्याही रीतीनें कच न खातां आम्हीं पाठीमागें राहिलों नाहीं अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं यश मिळत गेल्यामुळें लोकातही मान मान्यता वाढू लागली ज्याला त्याला शिक्षक वर्ग प्रिय असा वाटू लागला ह्या योगाने शिकवण्याही चांगल्या प्रतीच्या मिळू लागल्या शाळेंत पगार कमी होता तरी त्या बद्दल आम्हीं कधीं तक्रार केली नाहीं तें आमचे सौभाग्य होतें

## शाळेंतील शिक्षकांचीं कामें कशीं असत

आता करमरकर हे मास्तर शाळेला लाभल्यामुळें व माझ्याशीं ते मिळून मिसळून वागत असल्यामुळें मला त्यांची बरीच मदत होऊं लागली. इतके दिवस हाजरी लिहीणें, दाखल खारीज रजिष्टर नियमाप्रमाणें भरून तयार ठेवणें, मुलांची कोंडक्ट बुक्स वेळचेवेळीं भरणें वगैरे सर्वच कामें मला एकट्यालाच करावीं लागत आता गणपतराव आल्यामुळें व त्याचे बालबोध अक्षर व मोडीही अक्षर फार सुरेख व रेखींव असल्यामुळें मी त्यांना हाजरीबुक लिहीण्याची विनंति केली ती विनती त्यानीं मोठ्या आनंदानें मान्य करून त्या दिवसांपासून शेवटीं अंतकाळ होईपर्यंतची त्यांच्याच हातचीं हाजरी रजिष्टरें लिहीलेलीं आज आपल्यास पाहावयास मिळतील. त्यात त्यांचे हातून कधीं खंड म्हणून पडला नाहीं व कशीही अडचण प्राप्त झाली तरी मी आतां हें काम करीत नाहीं असें त्यांनीं

चुकून सुद्धा म्हटल्याचें मला आठवत नाहीं इतकें त्यांनी तें काम निभावलें अशी १९०४ पासून ते १९३४ पर्यंतची त्याच्या हातचीं लिहिलेली रजिष्टरें शाळेंत आहेत ही एक ध्यानात ठेविण्यासारखी गोष्ट आहे. अशी दीर्घकाळ पर्यंत तडीस नेलेलीं उदाहरणें फार थोडी आढळतात. पहिले वर्षी मात्र त्याचे हातून थोडा हलगर्जीपणा झाला तो असा १९०५ सालीं मे महिन्याची सुट्टी संपल्यानंतर जूनच्या १५-१६ तारखेस पुन: शाळा सुरू झाली ह्या वेळेला सर्वच आम्हीं शिक्षक शाळा चागली निघाल्यामुळें मोठ्या आनंदांत होतों, किंवा थोडा गर्व झाल्यामुळें म्हणा थोडी बेफिकीरीही होती. त्यामुळें वेळच्या वेळीं होणारीं कामें करण्यांत आळसामुळें थोडा व्यत्यय येऊ लागला इतके दिवस माझा असा नियमच होता कीं, हें वेळच्यावेळीं झालेंच पाहिजे त्यांत कसूर होता कामा नये परतु वरील कारणामुळें ह्या वर्षी काम करण्यात थोडी दिरंगाई झाली गणपतरावांनी मुद्दाम कसूर केली असें नाहीं, कांहीं कारणामुळेंच तें काम वेळेवर झालें नाहीं हें खरें! तें काम मी करावें परंतु त्याच वेळी माझ्या उजव्या हाताला फोड झाल्यामुळें माझा हात बेकाम होता जुलैची पहिली तारीख आली, दुसरी गेली, तिसरी उजाडली, तरी हें हाजरी लिहीण्याचें काम झालें नाहीं चार तारखेस तें काम करण्यास गणपतराव बसले परतु एका दिवसांत कां तें काम होतें? चागलें लिहावयाचे म्हणजे निदान दोन दिवस तरी पाहिजेतच मला धाकधुक वाटतच होती कीं, कोठें अशा वेळीं हनुमान प्रसाद यांची स्वारी एका एकीं न येवो परंतु खाई त्याला खवखवतें असें म्हणतात तेच खरें इतक्या लवकर ते कधीं येत नसत सप्टेंबर अगर आक्टोबर हा महिना परीक्षेचा ठरलेला असे परतु काय दैवयोग जाणें! आम्ही हाजरी लिहीत गप्पाष्टकें करीत शाळेंत बसलों असतां एका एकीं डे. इन्स्पेक्टर यांची स्वारी जुलैच्या ५ तारखेस दारांत येऊन उभी राहीली त्यांना पाहतांच काम तयार नसल्या-मुळें, माझे अंगावर तर रोमांच उभे राहिले, व भिती थोडी कमी व्हावी म्हणून लघुशंकेचें निमित्त करून मी त्यांना विचारून बाहेर गेलों इतक्या अवधींत गणपतराव व दुसरे मास्तर आपआपल्या जागीं जाऊन काम करू लागले होते मी बाहेर जाताच ते उठून वरील मास्तराच्या वर्गांत जाऊन

त्या मुलाची परीक्षा घेण्यास त्यानीं सुरवात केली. मी बाहेरून जरा स्वस्थ होऊन परत आल्यावर मला त्यानी सर्व रजिष्टरें घेऊन ते जेथे बसले होते तेथच बोलाविलें. सर्व रजिष्टरें घेऊन मी त्याच्या जवळ जाऊन पोहोचलों. एकही रजिष्टर पुरें झालें नव्हतें सर्व काम बाकी होतें. कॉडक्ट बुक्स भरलीं नव्हती. अशा तऱ्हेची कधींच न मिळणारी अव्यवस्था त्यांना दिसून आल्यामुळें मग मात्र ते फार चिडले व म्हणाले, "क्या यहा भोसलेशाही मचाई है ? साहेब आने वाले थे इस वास्ते उतना काम अच्छा करके बतलाया ? और अब खेलते रहे ?" असे तसे बरेंच बोलून थोडी परीक्षा घेऊन निघून गेले, व जातांना मी त्याना पोहोंचवावयास बाहेर गेलों असतां मला ते म्हणाले, "निळकंठ इस वखत मैं तुमसे नाराज हूं आगे काम समालके करना" असें म्हणून निघून गेले मी मनात समजलों कीं विशेष काहीं न होतां, झाला तर थोडा दंड होईल त्या माझ्या तर्का प्रमाणें मला त्यांनी फक्त दोन रुपये दंड केला. बाकी शेरा विशेष काहीं वाईट लिहीला नाहीं. फक्त काम तयार नसल्याचें लिहून ते लवकर संपविण्याची ताकीद दिली. त्या दिवसा पासून मी कानाला खडा लाविला कीं, कसेंही संकट येवो हाजरी वगैरे लिहीण्याचें काम कधींही दिरंगाईवर टाकावयाचें नाहीं. या पुढें मात्र गणपतरावानीं त्या कामात कधीं दिरंगाई केली नाहीं हा झालेला दंड मला जाचतच होता अद्याप तो माझे कडून वसूल करण्यात आला नव्हता. फक्त मला कमेटी कडून वार्निंग मिळाली होती कीं पुढें जर कामांत अशी कुचराई झाली तर हा दंड वसूल करण्यात येईल आता वार्षिक परीक्षेपर्यंत ही स्वारी येणार नव्हती वार्षिक परीक्षेचे वेळीं मी मुद्दाम सर्व मेंबरांना बोलावून हजर ठेवलें व त्यांच्या समोरच परीक्षा घेवविली त्यावेळीं तयारी चागली असल्यामुळें अप्पर प्रायमरी परीक्षेस बसलेलीं सर्वच्या सर्व मुलें पास झाल्यामुळें साहेब खुश होऊन व कमेटीच्या मेंबर लोकानीं शिफारस केल्यामुळें त्यानीं शेरे बुकांत असें लिहीलें कीं, मागें मी हेडमास्तरांविषयीं केलेल्या दंडाचे प्रकरण आतां मागें घेतों. मी त्याना तो झालेला दंड माफ केला आहे. हे त्यानीं आज दाखविलेल्या चागल्या कामाचे फळ आहे. आयुष्यात अशा बऱ्या वाईट गोष्टी नेहमीं घडतातच नेकीनें काम करावें ईश्वर त्यांत सहाय्य करितोच. तो कधींही जिवाला विसंबत नाही त्यावर निष्ठा मात्र पाहिजे.

## थोडी सांसारिक हकीकत व घडलेले गमतीचे प्रसंग

आता थोडे सासारिक हकीकतीकडे वळून तिचा थोडा परामर्श घ्यावा १९०३ चा डिसेंबर आला. पुन प्लेगचीं चिन्हें दिसू लागलीं गावात उंदीर पडू लागले शाळा बंद होऊ लागल्या आमचीही शाळा बंद झाली. त्याच संधीस सौभाग्यवतीस कांहीं दिवस लोटल्यामुळें बाळंतपणास तिला कोठें पाठवावी ह्या फिकीरीत मीं पडलों. इतक्यात आमच्या श्वसुरांचें पत्र आलें कीं, बिहीस बाळंतपणाकरितां आमच्याकडे पाठवा त्यावेळीं ते बऱ्हाणपुरास होते लागलीच तिची तयारी होऊन तिला डाकगाडींत बसवून दिलें बायकांच्या डब्यांतच एक दोघी बऱ्हाणपुरासच जाणाऱ्या बाया हात्या. त्यांची सोबत मिळाल्यामुळें थोडीशी काळजी दूर झाली सौभाग्यवतीस पोहोंचवून घरीं आलों. मनाला थोडी चूटपूट लागूनच राहीली होती. दूरचा प्रवास एकटी पाठवली तशी काळजी नव्हती पण मन चिंती तें वैरी न चिंती या म्हणी प्रमाणें नाना तऱ्हेचे तर्क वितर्क मनात येऊं लागले म्हणून मनाची समजूत करण्याकरितां तार करण्याचें ठरविलें. पोष्टांत गेलों तर तें बंद. रविवारीं सुट्टी असल्यामुळें ब्रँच आफिसांतून तार घेत नाहींत असें समजल्यामुळें आता काय करावें अशा विचारांत मी होतों इतक्यात धुंडीराजपंत परांजपे त्यावेळीं बी. ए वर्गांत शिकत होते. ते अनायासें वाटेंत भेटले व मास्तर काय विचारांत आहात ? म्हणून त्यांनीं मला प्रश्न केला. मी त्यांना सर्व हकीकत सांगितली तेव्हां ते म्हणाले आतां तुम्हांला जरूरी तार केली पाहिजे. ऑर्डिनरी तार कोठें घेणार नाहींत. तिला दोन रुपये लागतील व ती तार करण्यासाठीं मोठ्या तार ऑफिसात तुम्हांस गेलें पाहिजे. चला मीही तुमच्या बरोबर येतों ते असें म्हणताच मीं म्हटलें चला, आयती सोबत झाली मग आम्हीं दोघे मोठ्या ऑफिसात गेलो. त्यांनीं फॉर्म मागून घेतला, व तो त्यांनींच भरला, व पाठविण्याची दोन रु फी व फॉर्म तार मास्तरजवळ देऊन त्यांच्याकडून मिळालेली रसीद घेऊन घरीं आलों तार केली हें बरें झालें. कारण बऱ्हाणपूर स्टेशनापासून गांव दोन तीन मैल दूर असल्यामुळें तेथून शहरांत जाण्यास सौभाग्यवतीस अडचण पडली असती. वेळेवर तार दादांना मिळाल्यामुळें गाडीच्या वेळेवर ते स्टेशनवर आले होते. मग त्यांचें सुखरूप पोहोंचल्याचें पत्र आलें तेव्हा

काळजी दूर झाली सौ. योग्य वेळीं प्रसूत होऊन मुलगी झाली तिचें नांव यमुना असें ठेविलें आमची शाळा बंद झालीच होती. आता गावात प्लेग असल्यामुळे राहावयाचें कोठें म्हणून त्यावेळीं मी आणखी कोठें न जातां इटारशीस दादाकडेच जाऊन राहिलों. त्याचें पत्र आलें कीं, प्लेगमध्ये तूं तेथें राहूं नकोस इकडे निघून ये. मी गेलों त्यावेळीं वहिनाहो बाळंत होऊन मुलगा झाला होता. घरांत करणारें कोणी नसल्यामुळे आम्हीं सर्व खानावळींत जेवावयास जात होतों. परंतु ते दोघे नवरा बायको माझ्या राहण्याबद्दल कंटाळले नाहींत. मलाच संकोच वाटे पगार थोडा विनाकारण माझा भार त्यांच्यावर पडणार परतु त्या जोडप्यान कधीं तक्रार केली नाहीं मी जबलपुरास आल्यापासून शाळेच्या व्यवसायांत होतों तरी जोड धंदा म्हणून थोडी भिक्षुकी चालू ठेविली होती. विशेष मला काहीं येत नव्हतें. तरी एकादशणी, पूजा, श्राद्धसंकल्प, वगैरे थोडें थोडें मी पोथी-वरून अवगत करून घेतलें होतें इकडील प्रांतांत थोडी भिक्षुकाची वाणच असल्यामुळें अडीअडचणीच्या वेळीं लोक माझा उपयोग करून घेत. त्यातही मला दोन पैसे प्राप्ती होई. असे रावसाहेब दाते यांचें यजमान कृत्य मला शवदपर्यंत पुरलें. बहुतेक कृत्यांत ते मला बोलावीत जें काहीं भाग येतच नव्हतें त्यावेळीं ते दुसऱ्या ब्राह्मणाला बोलावीत. परंतु दुसरा ब्राह्मण आला तरी माझा कधीं त्यांनीं अव्हेर केला नाहीं. अशीच आणखी दोन चार यजमान कृत्यें मी संपादन केलीं होतीं. ती ओक साहेब व साने कॅंट्रॅक्टर हीं प्रामुख्यानें होत इटारशीस असतांना तेथेंही एक यजमान कृत्य संपादून दत्त जयंतीचे वेळीं गुरुचरित्राचा सप्ताह व एक लघुरुद्र केला त्या पासून ८–१० रुपयांची प्राप्ति झाली. मग तेथून बऱ्हाणपूर जवळच असल्यामुळें व मुलीला पाहून यावें असें वाटल्यामुळें तिकडे गेलोंच व चार आठ दिवस तेथें राहून मग इटारसीस परत आलों ह्या वेळेस रा. रा भैय्यासाहेब पराजंपे यानीं रावेर येथील आपल्या व्याह्यांच्या साह्यानें मांडव्यास पुष्कळशी जमीन खरेदी करून लागवडीस आणण्याचा प्रयत्न चालविला होता. ह्मणून बऱ्हाणपुराहून इटारशीस परत येतांना मांडव्यास उतरलों परतु परांजपे यांचेकडून नेण्यास कोणी मनुष्य न आल्यामुळें लागलीच तेथून निघून इटारशीस परत आलों.

आता इटारशीस चैन पडेना ह्मणून जबलपुरास जाऊन प्लेगची काय हाल हवाल आहे ती प्रत्यक्ष पाहून यावी ह्मणून मिरगंज स्टेशनजवळ वरखेडा म्हणून एक गाव आहे तेथें गणपतराव करमकरांची शेती असल्यामुळें प्लेगचे दिवसांत कम्मरकर येथें येऊन राहिले होते. त्यांचे कडेच आलों. एक दिवस तेथें राहून मग दोघे बरोबरच जबलपुरास गेलों. आपल्या ओळखी अनेक आहेत कोठेंही जेवणाची सोय होईल म्हणून खाण्याचें बरोबर कांहींच घेतलें नव्हतें कोठें सोय लागते कां ह्याची परीक्षा पाहण्याकरिता म्हणून स्टेशन जवळच नर्मदेच्या रस्त्यावर प्लेग कँप होता तेथें गेलों विशेष परिचयाच्या अशा लोकांना जाऊन भेटलों गप्पा गोष्टी झाल्या व जाण्यास निघालों. मनात आशा कीं, आतां कोणी ना कोणी तरी, आतां कशाला जातां उन झालें आहे. येथेंच जेवा मग कोठें जावयाचें तेथें जा असें म्हणेल परतु सांगावयास मोठें आश्चर्य वाटतें कीं, कोणीही त्या गोष्टीबद्दल चकार शब्द ही काढला नाहीं. असा हा विलक्षण अनुभव आल्यामुळें आणखी एका ठिकाणीं परीक्षा पाहण्याचें ठरविलें ते ठिकाण म्हणजे राजासाहेब सागरवाले यांचा कँप सध्या तो आम्हीं असलेल्या ठिकाणापासून ४ मैल दूर नर्मदेच्या कांठी भटोलीस होता तेथें जाऊन पोहोंचलों नमस्कार चमत्कार झाले आणि आतां आम्ही परत निघालों परंतु तेथेंही कोणी असा प्रश्न केला नाहीं कीं, तुमचीं जेवणें झालीं कीं, तुम्हीं उपाशी आहात कोठें जेवणार ? वगैरे कांहीं नाहीं ! ! सब चुप ! ! ! आम्हाला परीक्षाच पाहावयाची होती म्हणून कोणाकडे आम्हीं- हीं गोष्ट काढली नाहीं. तसेंच उठून जबलपूरचा रस्ता धरला. व तीन चारचे सुमारास मोठ्या स्टेशनवर येऊन पोहोंचलों व सहज फिरत फिरत वर्कशॉप मध्यें जाऊन पोहोंचलों असे आम्ही दोघे वाटेनें चाललो असतां सहज एका मित्राची गांठ पडली, लागलींच त्यानीं प्रश्न केला मास्तर आज इकडे कोणीकडे झुकले आहेत ? आम्हीं त्यांना सांगितलें जबलपुरची कशी काय हाल चाल आहे ती पाहण्याकरिता आज मुद्दाम इकडचा दौरा केला. आम्ही सध्या बाहेर गांवीं आहोंत त्यानीं आमच्या तोंडाकडे पाहिलें व तर्क केला कीं, ह्या दोघांचें अजून जेवण खाण कांहीं झालेलें दिसत नाहीं हे खास उपाशी आहेत म्हणून त्यांनीं आम्हांस प्रश्न केला की का मास्तर

अजून तुमचें जेवण खाण झालेलें काहींच दिसत नाहीं ! तर आतां असें करा हा नळ आहे आंघोळ करा व ह्या मी खाण्याकरितां पोळ्या व भाजी आणली आहे ती दोघे खा उपाशी राहूं नका त्या वेळेला आम्हांला तर सपाटून भूक लागलीच होती आम्हाला वाटलें कीं, आमच्या पुढें प्रत्यक्ष अन्नपूर्णाच अन्न रूपानें येऊन उभी राहिली. मग आम्हीं त्यानीं दाखविलेल्या नळावर स्नान वगैरे केलें, व त्यांचा डबा उघडला व कोणताही विचार न करता त्यांतल्या पोळ्यावर व भाजीवर दोघांनीं मिळून ताव मारला, व ढेकर दिली तेव्हां कोठें थोडा जीवात जीव आला इतकें आम्हीं त्या वेळीं भुकेनें अस्वस्थ झालों होतों व मेहनतही बरीच पडली होती आमच्यावर उपकार केलेल्या अशा त्या अन्नदात्यावर शतश आशीर्वाद टेकून त्याची रजा घेतली. ते जर गृहस्थ त्या वेळीं तेथें भेटले नसते तर ते दिवशीं कांहीं खावयास न मिळता उपाशीच रात्र काढावी लागली असती जवळ एक पैसाही जास्त नव्हता कीं, झट जाऊन बाजारातून आणावें व पोटपूजा करावी आम्हीं ह्याच भरंवशावर होतों कीं, इतके लोक ओळखीचे आहेत, कोठें ना कोठें तरी सट्टी जमेलच. परंतु पाहतों तों अनुभव हा असा आला रात्रीं ९-९॥ ला गाडा असल्यामुळें स्टेशनवर जाऊन पडून राहिलों. मग गाडीची वेळ झाल्यावर तिकीट घेऊन गाडींत बसून मिरगजला उतरलों स्टेशन पासून गांव बरेंच दूर, जवळ दिवा नाहीं, रात्र अंधारी, कच्ची सडक, तेव्हां विचार केला अशा अंधरांत खेड्यावर न जाता तेथें वेटिंग रूम मध्येंच रात्र काढावी, व उजाडल्यावर पुढें जावें. अशा अपरात्री आता पुढें कोठें जाणार ? स्टेशन मास्तरांना वेटिंग रूममध्यें रात्रभर राहाण्याची परवानगी विचारली. त्यानीं आमची विचारपूस करून होय म्हटलें हे मास्तर तेथें नवीनच आले होते आमची त्यांची ओळख अद्यापी झाली नव्हती तरी त्यांनी नकार न देतां वेटिंग रूम उघडून दिली त्या स्टेशनवर भेडाघाटला जाण्याकरिता म्हणून युरोपियन लोक नेहमीं उतरत म्हणून फर्स्ट क्लास वेटिंग रूमची व्यवस्था मुद्दाम तेथे करण्यांत आली होती व आम्हीं गेलों त्या दिवशीं कोणी युरोपियन उतारूही तेथें नव्हता म्हणून मास्तरानीं आम्हांला नाहीं म्हटलें नाहीं. कोणी युरोपियन असता तर आम्हांला त्या दिवशीं उघड्यातच पडाव लागले असतें थंडीचे दिवस असल्यामुळे

जरी सर्व दारें बंद केलीं होतीं तरी थोडें बहुत तरी थंडीनें कुडकुडावें लागलेंच असतें. फक्त एक एक उपरणेंच आंगावर होतें. सकाळ होतांच उठलों व सात आठला खेड्यास जाऊन पोहोंचलो. झालें! हें वरखेडा पुराण आटोपल्यावर आतां तेथें राहण्याची कांहीं आवश्यकता नव्हतीच. मग दिवसभर तेथें राहून सायंकाळीं दिवसा उजेडीस स्टेशनवर येऊन बसलों व रात्रीचे गाडीनें इटारशीस रवाना झालों. आतां जबलपुरांतील प्लेग कमी होऊं लागला होता. लोक गावांत येऊं लागले होते. तरी अद्याप एक दोन केसेस होतच होत्या. अद्याप शाळा उघडल्या नव्हत्या. मार्च अखेर पर्यंत इटारसीस राहिलों. आता पहिल्या तारखेपासून शाळा सुरू होणार असा हुकूम आल्यामुळें ब्ऱ्हाणपुरास जाऊन मंडळींना घेऊन जबलपुरास येऊन पोहोंचलों, व शाळेचें काम व शिकवण्या पूर्ववत् सुरू झाल्या.

## आर्य बालसभा व आमचें गांवांतील वजन

आतां आम्हीं म्हणजे गणपतराव कम्मरकर, मी स्वतः, भास्करराव चितळे, काशीनाथ जोगळेकर, दिघे, दत्तोपंत मटंगे, भाऊ परांजपे, गोपाळराव नावलेकर, मारुतीराव सोनक, वैद्य अशा कांहीं मंडळींनीं एक आर्य बालसभा नांवाची एक संस्था सुरू केली. तिचा उद्देश हाच कीं, आपली भाषा सुधारावी, वडल्यास कांहीं देशसेवाही करावी. एखादा सार्वजनिक उत्सव करावा वगैरे. त्यापूर्वी तरी सार्वजनिक असा गणपती उत्सव हर्षे वकील यांचे नेतृत्वाखालीं सन १८९७ पासून होतच होता. परंतु पुढें पुढें कार्यकर्त्यांची उणीव भासूं लागल्यामुळें आम्हीं सर्व मित्रांनीं मिळून कार्य करण्याचें ठरवून हर्षे वकील यांचे नेतृत्वाखालीं पुढेंही तो चालूं ठेविला. अशी ही सभा आम्हीं ७-८ वर्षे चालविली. त्यांत एक नाटकही केलें, तें इतकें लोकप्रिय झालें कीं, तिकीट लावून पुनः करा अशी लोकांनीं मागणी केली. लोकांच्या इच्छे प्रमाणें पुन: नाटक केलें व ५०-६० रुपये उत्पन्नही झालें. आयत्या वेळीं पाऊसही आला. तरी सुद्धां लोक न उठतां कामें आनंदानें पहातच बसले होते. इतकें तें नाटक लोक प्रिय झालें.

१९०४ चे संधीसच येथें एक सांगलीकर संगीत नाटक मंडळी येऊन पोहोंचली. त्या नाटकांतील मालक आणखी बरीच मंडळी निकट परिचयाची

निघाली, घरचीच मंडळी, परदेशात आलेली, तेव्हां त्यांना जागा पाहून देण्यापासून मॅजिस्ट्रेटची परवानगी मिळून देण्यापर्यंत सर्व प्रकारची मदत करावी लागली स्टेज बांधलें. सर्व व्यवस्था लागली. नाटकें सुरु झालीं. त्यांनी इकडच्या प्रांताकरितां म्हणून हिंदी नाटकें बसविलीं होतीं. त्यांत तीन चार नाटकें उत्तम होत. त्या तीन नाटकांवरच त्यांना येथें बराच पैसा मिळाला. त्यांनीं एक दोन मराठी नाटकें केलीं. कधीं वस्त्र प्रावरणें ह्या सुद्धां मदत करावी लागली. त्या वेळीं लोकांत आमची ओळख चांगली असल्यामुळें लागेल तें सामान मिळण्यास अडचण पडत नसे. मागितल्या बरोबर लोक जें सामान त्यांच्या जवळ असेल ते काढून देत. इतका आमच्यावर त्यांचा विश्वास होता ही मंडळी येथें सुमारें चार महिने राहिली. मग पुढें काशी-कडे निघून गेली. आमच्या सर्व शिक्षकांना व मी ज्या घरांत भाड्यानें राहात होतों तेथील सर्व मंडळींना नाटकें पाहण्यास कधीं मज्जाव झाला नाहीं मराठी त्यांना एक मेजवानी करावी लागली. त्यानंतर मी तेव्हां १९०६ सालीं तासगांवीं गेलों. तेव्हां हरिपुरास जाऊन सर्व मंडळींना मुद्दाम भेटून आलों. तेथें माझेंही त्यांनीं चांगलें स्वागत केलें. त्यानंतर मात्र त्यांची कोणाची गांठ पुन: पडली नाहीं. अशा ह्या गर्दीत दोन वर्षे केव्हांच निघून गेलीं हें कळलें सुद्धां नाहीं.

## १९०६ सालांतील प्लेग

पुन: प्लेग महाराजाची स्वारी दिसूं लागली. इकडे आमच्या घरीं सौभाग्यवतीचे बाळंतपणाचे दिवसही भरत येत चालले. प्लेग व बाळंतपण ह्यांची जशी कांहीं स्पर्धा लागली होती. एक मागून एक संकटें जशी कांहीं डोकावून पाहात. तो म्हणे मी आधीं का तूं आधीं? झालें! गांवांत उंदीर पडूं लागले. मृत्यूंची संख्या झपाट्यानें वाढूं लागली शाळा बंद होत आल्या. आमच्या येथें बाळंतपणाची गर्दी उडाली. आमचा वाडा सर्व खाली झाला. मी एकटा त्या वाड्यांत राहिलों अशा अडचणी संधीस सौभाग्यवती प्रसूत होऊन गंगूचा जन्म झाला. वाड्यांतील सर्व मंडळी बाहेर गेलेली. घरीं करावयास कोणीच नाहीं एवढें बरें होतें कीं, शाळा व शिकवण्या बंद होत्या. परंतु अशा संकटाच्या वेळीं मोठी तैया हिनें मात्र आम्हांला सोडलें नाहीं हें

तिचे आमच्यावर फार मोठे उपकार झाले आहेत आमचे कुटुंब नेहमीच तैयाच्या सल्ल्याने वागे व निच्याच शिकवणीमुळे सौभाग्यवती सर्व कामांत तरबेज होऊन लहान वयांत संसारदक्ष अशी झाली तैयाने अकराव्ये दिवशीं पाणी घालून शुद्ध करून घतले १२ वे दिवशीं बारसें करून मुलाला पाळण्यांत घातल्यावर लागलाच त्याच दिवशीं गाड्या बोलावून भैयासाहेबाकडे भटोलीस तावडतोब आम्हीं निघून गेलो आतां गावांत राहणे फार धाक्याचें होते. धन्य त्या माऊलीची कीं, जिच्या घरचा सर्व मंडळी बाहेर गेलेली पण आम्हांला उघडे टाकून ता गेली नाहीं. त्याच प्रमाणें श्रीधरराव परांजपे यांच्या मातोश्रींनींही ८–१० दिवस स्वयपाक पाणी करून पथ्याचें करून आम्हांला साथ दिली मला कोणतेंही काम करावें लागलें नाहीं. सकटाच्या वेळीं अशी कांहीं मंडळी फार उपयोगी पडतात. भैयासाहेबांना भटोलीस राहण्यास जी जागा मिळाली होती ती त्यांनाच पुरत नव्हती. तरी त्यातल्या त्यांत त्यानीं आमच्याबद्दल त्रास सोसून दोन महिने पर्यंत कुटुंबाचे पथ्य पाण्याचे करून आम्हांला जेवणही करून घातलें अशी ती सर्व मंडळी वेळेवर फार उपयोगी पडली. वेळ निघून गेलो आज ते दिवस आठवले म्हणजे वाटतें कीं, अशा अडचणीच्या वेळीं कोणाची मदत मिळाली नसती तर आपली काय दशा होती ? पण ईश्वर सांभाळणारा समर्थ असला म्हणजे त्याचें कांहीं वाटत नाहीं सुखा समाधानानें दिवस निघून जातात. असा आम्हीं तो प्लेग भटोलीस काढला. पहिल्या प्रथम आमचा कांहीं भटोलीस जाण्याचा बेत नव्हता म्हणून आम्हीं राजासाहेबांना कांहीं विचारून ठेवले नव्हतें. आयत्या वेळीं आमचा बेत झाला म्हणून ते कुरकुर करूं लागले तरी भैय्यासाहेब व लक्ष्मी काकू ह्यांच्या आश्वासनामुळें पुढें विशेष कुरकुर न होता आम्हांला थोडी निराळी जागाही देण्यांत आली

## माझा नवीन धंदा (व्यापार)

योग्यवेळीं प्लेग संपून शाळा सुरू झाल्या, व आम्हीं गावांत राहावयास आलो सांगण्या सारखी राहिली ती गोष्ट अशी कीं, ह्याच सुमारास आम्हीं थोडा व्यापारही सुरू केला होता. साबण, स्टेशनरी, वगैरे सामान विकून [illegible] कांहीं नफा मिळवावा. पुनः माल मागवावा असें थोडें थोडें बस्तान

बसत चाललें होतें. जळगावाहून दाणे मागवावेंत ते विकावेत. त्याप्रमाणें अमसुलें, भगर, कुंकू, उदबत्ती, वगैरेहि माल मागवून विकावा. त्यात चार पैसे मिळवावे. असे शाळा, शिकवण्या, व्यापार, व भिक्षुकी अशा चतुरस्त्र दळावर आम्हीं आपला संसार थाटून शनैः शनैः आता मनुष्यात येऊं लागलो. प्लेगचे वेळीं बाकी सर्व कामें बंद असल्यामुळें भटोलीहून २०–२५ शेर ओझें घेऊन ४, ६ मैल चालून कँप मध्यें ते सामान विकावें, व पुन. परत भटोलीस जावें. अशी मेहनत त्यावेळीं केली. तेव्हा कोठें पैशाचा थोडा पुरवठा पडून जबलपूर सारख्या शहरात नादार मंडळींना ओझें निभाव काढता आलें. व थोडा क्रम चालला तशी आमची शाळा ही नावारूपास येत चालली. वेळोवेळीं परीक्षाही चांगल्या होऊन शाळेच्या कीर्तितही भर पडत चालली.

## आमचे पहिले सुपरवायझर रघुनाथराव काणे

१९०३ ते ४ सालची गोष्ट–रघुनाथ काणे हे त्यावेळीं हितकारिणी हायस्कूल मध्यें शिकत होते. ते व त्याचे एक मित्र विष्णुपंत मंडपे असे दोघे आमची शाळा ज्यावेळीं सकाळची असेल त्यावेळीं आमच्या शाळेंत येऊन बसत असत व आमच्या पाशी गप्पा गोष्टी करून कांहीं वेळानें परत जात. अशा प्रकारें वाढत वाढत त्याचे आमचें बरेंच सघटन वाढलें. त्याचें रूपांतर मैत्रींत झालें. ही त्या दोघांची व माझी मैत्री बरींच वर्षें टिकली. पुढें एका एकी प्लेग मध्यें गंगाधरराव लाले वारल्यामुळें रघुनाथराव काणे ह्यांना सुपरवायझरी मिळून आतां ते आमचे अधिकारी म्हणून शाळेंत येऊं लागले. पूर्वी मित्र म्हणून येत, व आता अधिकारी म्हणून येत. पूर्वी जडलेल्या मैत्रींत कधीं व्यत्यय आला नाहीं. तीच मैत्री त्यांनीं आज पर्यंत कायम ठेविली आहे. ते आमचे सुपरवायझर झाल्यावर अधिकारी या नात्यानें आम्हांला त्यांची सलाह घेण्याला वेळोवेळीं त्याचेकडे जावें लागे. पण त्यांनीं पूर्वीचें तें मित्रत्व कायम ठेवून व योग्य ती सल्लामसलत देऊन प्रेमानें सर्व गोष्टी आम्हांला समजावून सांगून आमच्या कडून कामें पार पाडिलीं आहेत. आम्हांला ज्या गोष्टी समजत नसत त्या त्यांना विचारल्या असता त्या त्यांनीं आम्हांला सोप्या भाषेंत समजावून सांगून आमचें काम त्यांनीं बरेंच हलकें करावें. अशा शंका विचारण्याचा प्रसंग आम्हावर नेहमीं येई. त्या त्या वेळीं न त्रासतां मोठ्या खुबीनें

व हसत आमचें समाधान करून आम्हांला त्यांनीं वाटेला लावावें पुढें पुढें तर कित्येक प्रसंगीं वार्षिक परीक्षेच्या वेळींही इन्स्पेक्टर साहेबाचे मदतनीस म्हणून मराठी विषयाची परीक्षा घेण्याचें काम सुद्धां त्यांना करावें लागून आम्हांला मोठी मदत त्यांचे कडून झाली आहे. त्याची परीक्षा घेण्याची हातोटाही मोठी उत्तम असून मनमोकळेपणा असल्यामुळें मुलांना कधीं भीति वाटली नाहीं, व त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांची मुलांनीं सरळ उत्तरें देऊन त्यांना वेळों वेळीं संतुष्ट केलें आहे त्यांच्या परीक्षेंत नापास झाला असा एकही मुलगा मला आढळला नाहीं. हे त्या त्या वेळचे परीक्षेचे तक्ते आपण पाहिलें असता आपल्या सहज लक्षांत येईल अशाच ऋणानुबंधाच्या गोष्टी असतात. त्या सांगून येत नाहींत. तेव्हां मुद्दाम जमवूं म्हटलें तर कोठलें जमणार ?

## जन्म भूमीचें दर्शन व थोडा प्रवास

१९०८ च्या मे महिन्यांतील गोष्ट—माझे एक मित्र शंकरराव लेले हे सुट्टी घेऊन वाईस जाण्यास निघाले त्यांनीं मला विचारलें तुम्हीं आमचे बरोबर प्रवासास येतां कां ? तेव्हां मी त्यांना म्हटलें कुटुंबाचा विचार घेऊन काय तें कळवितों घरीं येऊन दोघांनी मिळून विचार विनिमय केला व ठरविलें कीं, एकदां मातृभूमिचें दर्शन घेऊन यावें. अनायासें सोबत आहेच विचार पक्का झाला. ते रेल्वेंत नोकर असल्यामुळें आमचीही त्यांनीं जाण्यायेण्याची तीन तिकीटांची सोय करून दिली. असे त्यावेळचे लोक वेळेवर उपयोगी पडत असत. त्या योगानें आमचे ५०–६० रुपये वाचले. इतकी मदत कोण करणार ? जातांना आम्हीं सर्वजण वाठार पर्यंत बरोबर गेलों, व ते वाईस जाण्याकरितां म्हणून वाठारास उतरले पुण्यास त्यांची सोय होती, तरी आम्हीं बरोबर असल्यामुळें ते तेथें न उतरतां आमचे बरोबरच पुढें आले वाईस त्यांचें घर असल्यामुळें काहीं कार्यानिमित्तानें ते तेथें गेले होते ते वाठारास उतरल्यावर आम्हीं पुढें गेलों मी, कुटुंब व दोन मुलें असे आम्हीं भिलवडी स्टेशनवर उतरलों त्यावेळीं त्या स्टेशनला तासगांव रोड असें नाव होतें तेथून तासगाव ५ मैल असल्यामुळें गाडी केली व घरीं येऊन सुखरूप पोहोंचलों आई वगैरे सर्व मंडळी भेटली. दिनकर भटजी कांहीं भिक्षुकी करितां बाहेर गांवीं गेले होते आमचे आश्रयदाते जे जोग

त्याना मंडळींना नेऊन भेटविलें. त्यावेळीं त्याचे कडील सर्व मंडळी हयात होती. आणखी पारबगांवची नातलग मंडळीही होती, त्यांच्यही भेटी घेतल्या दत्ताचें, गणपतीचें, शिरोबाचें वगैरे देवाचीं दर्शनें घेतली अशा रीतीनें मातृभूमीचें, मातोश्रीचें दर्शन घडल्यामुळें जिवाला जरा बरें वाटलें, व जबलपुरास घडलेली सर्व हकीकत मातृचरणीं सादर केली. सर्व वृत्तान्त ऐकून आईला बरें वाटल्यासारखें दिसलें. ज्या मुलाला अगदीं गचाळींत काढलें होते तो मुलगा आपल्या कर्तबगारीनें थोडा पुढें आलेला पाहून कोणत्या मातृ-हृदयाला संतोष वाटणार नाहीं? तासगांवांस राहिलों असतों तर कांहीं कार्य करण्यास वावच मिळाला नसता. अशाच कांहीं गुलामगिरींत दिवस कसेतरी गेले असते. पुढें थोडी कां होईना पण देशसेवा माझे हातून घडली होती. ह्मणून मला १८९३ सालीं तासगांव सोडण्याची ईश्वरानेंच बुद्धि दिली व आलेल्याच विद्येंत पोटाची सोय करून माझें कार्य यशस्वी केलें. ह्या पूर्वी मी एक दोनदां तासगांवीं एकटाच गेलों असतांना लोक विचारीत कीं काय निळू? तूं काय रोजगार करितोस? तुला काय मिळतें? ह्यावेळीं मला कांहा मिळतच नव्हतें तर मी त्यांना सांगणार तरी काय? मी म्हटलें सध्यां तर मला कांहीं मिळतच नाहीं जेवणाची सोय आहे हें माझें भाषण ऐकून ते माझा उपहास करीत, व म्हणत इतक्या दूर गेलास त्यावेळीं तर येथेंही कोठें पाणी भरून तुझें जेवण पार पाडतां आलें असतें त्या करितां इतक्या दूर जाण्याचें काय कारण? मी म्हणे तुमची गोष्ट खरी आहे. मला ईश्वरानें प्रेरणा केली, गेलों, झालें पुढें ईश्वर काय करतो पाहूं आज मला कांहींच सांगता येत नाहीं. आतां ह्याच तिसऱ्या वेळीं गेलों तेव्हां कुटुंब दोन मुलें बरोबर होतीं. चार पैशांची प्राप्ती ही होऊं लागली होती. सर्व लोकांना हवासाही वाटूं लागलों. त्याच लोकांनीं आतांचा माझा वृत्तान्त ऐकल्यावर तेच म्हणूं लागले, अरे निळू गांव सोडून गेलास बरें केले बाबा? तिकडे तुझा नांव लौकिक ऐकून आम्हालाही बरें वाटलें. चार पैसे मिळवूं लागलास, बायकोचें पोट भरण्याचें सामर्थ्य तुझ्यांत आलें, उत्तम झालें. येथें काय फार झालें तर नाक्यावर ५-६ रुपये मिळाले असते आतां आईचा ही कांहीं परामर्श घेत जा. तिनें बिचारीनें फार कष्टांत दिवस काढले आहेत. पुढें दिनकर भटजी होते तों पर्यंत त्यांनीं आईच

चांगला सांभाळ करून तिला कोणत्याहि प्रकारें दुःख होऊं दिलें नाहीं आईला मी आपल्या जवळ राहण्या करितां बोलावित होतों परंतु तिला इकडची थंड हवा मानवेना, व तिचा ओढा ही दिनकर भटजींकडेच जास्त असल्यामुळें तिला तासगाव सोडणें प्रशस्त वाटेना. मी कांहीं तिला पाठवावें तर माझी तिला रोख पाठविण्या इतकी मिळकत अद्याप नव्हती सध्यां जें कांहीं मिळे त्यांत जेम तेम संसार चाले. शहरची वस्ती, भाड्याची जागा वगैरे मिळून हातां तोंडाशींच गांठ पडे. जितका पैसा मिळवावा तितका कमीच वाटूं लागतो पुढें पुढें प्राप्ती चांगली होऊं लागली, परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आईचा अंतकाळ झालेला मी मग कोणाला पाठविणार ? योगायोग तितकाच होता हीच गोष्ट खरी

सुमारें १५ दिवस तेथें राहिलों तरी दिनकर भटजी कांहीं आले नाहींत आणखी कांहीं भिक्षुकी आल्यामुळें त्यांनीं पत्रद्वारें कळविलें कीं, माझें येणें सध्यां कांहीं होत नाहीं. तेव्हां त्यांच्या भेटीविषयीं मी निराश होऊन परत निघालों. वाटेंत मला वाईस जावयाचें असल्यामुळें वाठारास उतरलों व एक बैलगाडी करून वाईस लेले यांचे घरीं येऊन उतरलों आम्हीं आलेले पाहून लेले शास्त्री यांना फार आनंद झाला. व त्या सर्व मंडळींनी आमचें उत्तम प्रकारें स्वागत केलें आम्हां सर्वांना त्यांनीं ५–६ दिवस ठेवून घेतलें जवळच धोम महाबळेश्वर असल्यामुळें तेथील देवाचें दर्शन घेऊन आलों. मी गेलों त्यावेळीं नरसिंह जयंतीचा उत्सव असल्यामुळें प्रसादाचा ही योग आला. जिलब्याचें उत्तम सुग्रास भोजन मिळालें कृष्णाबाईचें स्नान झालें नंतर शंकरराव जबलपुरास जाण्यास निघाले आतां बरोबर त्यांची सर्व मंडळी होतीच परत जाते वेळीं पुण्यास शंकररावाचे शालक दत्तोपंत लिमये केसरीचे सह संपादक ह्यांनीं लेल्यांना पुण्यास उतरण्याचा फार आग्रह केल्यामुळें आम्हीं सर्वच त्यांच्याकडे उतरलों आतां शंकररावाना व त्यांनीं आपल्या बहीणीला फार आग्रह केल्यामुळे ती मंडळी आणखी ८–१५ दिवस पुण्यास राहिली. कारण अद्याप शंकररावांची सुट्टी बाकी होती. ती सर्व सुट्टी त्यांनी तेथेंच काढण्याचा विचार केला. मग आम्हीं शंकररावांना विचारून दुसरेच दिवशीं जबलपुरास जाण्यास निघालों आमची गंगु त्यावेळीं सुमारें वर्ष सव्वा वर्षाची होती

वाटेंत जाता जातां कल्याणच्या पुढें गेल्यावर मगुला एका एकीं गाडींतच दस्त सुरु झाल्यामुळें आम्हीं घाबरलों आता काय करावें हा विचार पडला. त्याच वेळीं एक २०–२५ वर्षे वयाची श्रीमंत बाई मुंबईहून इंदुरास चालली होती. आम्हीं ज्या डब्यांत बसलों होतों त्याच डब्यांत ती बसली होती. त्या बाईच्या बरोबर त्यांना पोहोंचविण्यास म्हणून निघालेला त्यांचा एक कारकून ही होता ती बाई मोठी दयाळू अशी दिसली लहान वय असून पोक्तपणा वाखाणण्याजोगा होता आमची झालेली अवस्था लागलीच तिच्या दृष्टीस पडून तिनें आम्हांला धीर दिला, व तिनें आपल्या ट्रंक मधून कांहीं औषध काढून लागलीच मगूला दिलें व आम्हांला सांगितलें कीं, घाबरूं नका मुलीला इतक्यात बरें वाटेल. सांगण्याचें आश्चर्य कीं, लागलेच तिचे दस्त बंद होऊन तिला चांगली झोंप लागली त्या बाईनीं गाडींत आम्हांला फार मदत केली. पुढे त्यांची सोबत आम्हाला खांडव्या पर्यंत होती तेथें त्या बाई इंदुरला जाण्याकरितां म्हणून उतरल्या व आम्हीं पुढें निघालों वाटेंत आमच्या मेहुणीचं लग्न असल्यामुळें आम्हांला हर्द्यास उतरावें लागलें. त्या पूर्वीच आमचे श्वशुर वगैरे मंडळी हर्द्यास येऊन पोहोंचली होती. तेथे लग्न सोहळा उत्तम प्रकारें कांहीं विघ्न वगैरे न येतां पार पडल्यावर योग्य वेळीं आम्हीं जबलपुरास येऊन पोहोंचलों अशा तऱ्हेनें आमचा हा लांबचा प्रवास पार पडला

## आठ घटकेचा आनंद

आम्हीं कार्याला उद्युक्त झालों. ह्याच संधीस पुनः बाळंतपणाचा योग दिसूं लागला पुढें योग्य वेळीं सौभाग्यवती प्रसूत होऊन मुलगा झाला. तीन मुलींवर मुलगा झाल्यामुळें मग त्या आनंदाला काय विचारता? पेढ्याकरिता मित्र मंडळींनीं पुरें पुरें करून सोडलें ह्या वेळी प्लेगची वगैरे संधीं नसल्यामुळें घरीच बाळंतपण झालें परांजपे यांचेकडील सर्व मंडळींनीं मदत करून कोणत्याहि बाबतींत उणेपणा भासूं दिला नाहीं. ह्यावेळीं मला स्वतः कांहीं करावें लागलें नाहीं स्वयंपाक पाण्यापासून तों सौभाग्यवतीच्या पथ्य पाण्यापर्यंत सर्व कामें त्यांनीं बिन बोभाट पार पाडलीं. महिना सव्वा महिना केव्हां निघून गेला हें मला कळलें सुद्धां नाहीं. षष्ठीपूजन ही मोठ्या धडाक्याचें

झाले १०–१५ रुपयांचे पेढे वाटावे लागले. हा मुलगा मोठा बुद्धिमान होता. त्याची बुद्धी दिवसें दिवस दृष्टोत्पत्तीस येऊं लागली. जसजसें त्याला बोलतां येऊं लागलें तसतसें त्याला दारांत बसून जो कोणी ओळखीचा जाईल त्याला हाक मारावी, नमस्कार करावा. मुलांचे पाहून पाहून नकाशा तर त्याला इतका पाठ झाला कीं, नकाशावरील कित्येक गोष्टी तो पटापट सांगे. इतकी त्याची लहान वयांत प्रगती झाली होती ह्याच मुलाला आम्ही आईशिवाय दोन वर्षांचाच असतांना तासगांवास घेऊन गेलों होतों. बरोबर त्याच्या दोन बहिणी फक्त होत्या. परंतु तो आईकरितां वाटेंत रडला नाहीं, कीं कोणत्याही गोष्टींचा हट्ट केला नाहीं. वाटेंत लोक व बाया बापड्या विचारीत कीं, ह्या मुलाला आई नाहीं का? एवढा लहान मुलगा आईशिवाय एकटा कोणीकडे जातो? जेव्हां त्यांना खरी हकीकत कळे तेव्हां ते सर्व लोक त्याचे मोठे कौतुक करीत व म्हणत एकटा लहान मुलगा आईशिवाय कसा राहिला? इतका त्याला माझा त्यावेळीं लळा होता. पुढें आम्ही लागलीच परत आलों नंतर हा मुलगा फार दिवस जगला नाहीं. परत आल्यावर दोन तीन महिन्यातच त्याचा अंत झाला. त्या मुलाचे दुःख आम्हां उभयतांना फार जाणवलें. इतका त्याचा लळा विचित्र लागला होता. विशेष सांगण्याची गोष्ट कीं, त्याचे निधनवृत्त ऐकून कित्येक मोठमोठे लोक सुद्धां खबर घेऊन गेले इतका तो अशा लहान वयांत लोकांना ही प्रिय होता. म्हणून वांचला नाहीं.

## संस्थेचा बोलबाला

जबलपुरांत ज्या कांहीं नावाजलेल्या म्हणून शाळा होत्या त्यांत आमच्या शाळेची आतां गणना होऊं लागली, व जिकडे तिकडे मराठी शाळेचें नांव निघूं लागलें आमच्या शाळेंतून जे विद्यार्थी पास होत ते सर्व हितकारिणी हायस्कूल मध्येंच जात कारण आमची संस्था आतां त्यांच्याच अधिकाराखालीं असल्यामुळें आम्हांला सर्व मुलांना तिकडे पाठवावेंच लागे. परंतु इतर हायस्कूलचेही मास्तर आमचीं कांहीं मुलें आपल्या शाळेंत यावीं म्हणून प्रयत्न करीत. कारण महाराष्ट्रीय विद्यार्थी अभ्यासांत तरतरीत असल्यामुळें त्यांच्या डोळ्यांत तीं तेव्हांच भरें म्हणून त्या दृष्टीनें ते प्रयत्न करीत. अशा वेळेस एखादा

विद्यार्थी तिकडे जाईही अशा मंधीस मेजर कपार्डी इन्स्पेक्टर ज्यांना मराठी अवगत होते असे १ विळीं जबलपूर सर्कलला लाभले नियमाप्रमाणे त्यांचा जबलपूर शहरांतीलही शाळा पाहण्याचा बेत ठरला. त्या बेताप्रमाणें शहरातील सर्व शाळा पाहतां पाहतां आमची मराठी शाळाही पाहण्याचें त्यांनीं ठरविलें त्यांना मराठी चांगलें समजे शार्प साहेबांच्या वेळेला आम्हांला युरोपियन लोकांचा कांहींच अनुभव नव्हता म्हणून कमेटीच्या माल्यांनं आम्हाला पूर्वी बरीच खबरदारी घ्यावी लागली परंतु आतां तशी व्यवस्था करण्याचीही कांही जरुरी भासली नाहीं ह्यांच्या परीक्षेच्या वेळेस कोणी मेंबरही हाजर नव्हते सर्व शाळा पाहतां पाहतां आमच्या शाळेंत ही स्वारी येऊन थडकली बरोबर फक्त डेप्युटी इन्स्पेक्टर हनुमान प्रसाद होते. परीक्षा मोठी उत्तम झाली सर्व प्रश्न त्यांनीं स्वतः मराठींतच केले, व मुलांनीं त्यांच्या मर्जीप्रमाणें योग्य उत्तरें दिलीं परंतु गणिताचे वेळीं चौथ्या वर्गातील दोन चार मुलें घसरली बाकी सर्व शाळा उत्तम निघाली. आतां खुश होऊन स्वारी टांग्यांत बसणार इतक्यात हितकारिणी संस्थेची हिंदी ब्रँच व आमची शाळा अशा दोन्हीं शाळांचे हेडमास्तर डे. इन्स्पेक्टर साहेबांना म्हणाले कीं, कसरत कवायत साहेब घेणार आहेत कीं, काय ? तेव्हां त्यांनीं आम्हाला नाकावर बोट ठेवून चूप केलें व टांग्यांत बसता बसतां म्हणाले क्या अब बनाहुवा मामला बिघडाना चाहते हो ? इतकी इन्स्पेक्टर लोकांचीही आम्हाला सहानुभूति मिळाली होती प्रसंगीं ते सुद्धां आमचे कांहीं उणे पडूं न देतां आम्हांला वेळेवर सांभाळून घेत चांगल्याचा कोणीहीं वाली असतो हेंच जर आमचें काम ठीक नसतें, तर त्यांची नाराजीच झाली असती हें सांगणें नकोच ह्या वेळीं हितकारिणी कमेटीनें दिक्षित गुल्यांत पूर्वी ज्या ठिकाणीं हायस्कूल लागत होते ती जागा सर्व पुन पाडून नवीन बांधली. त्या ठिकाणीं प्रायमरी शाळा लावण्याचें निश्चित केलें. आमच्या मराठी करितांही एक भाग राखून ठेवण्यात आला त्याप्रमाणें एक हिंदी ब्रँच व आमची मराठी ब्रँच १९०८ पासून त्या नवीन इमारतींत लागूं लागलो. ती पुढें १९१६ पर्यंत मराठी शाळेचें म्युनिसिपालटीला दत्तविधान होईपर्यंत त्याच इमारतींत शाळा लागत होती

## राज्यारोहण समारंभ

१९१० सालीं आम्हांला राहतें घर बदलावें लागलें आतां आम्हीं ज्या घरांत राहत होता, तेथील बायकां मडळींत काहीं कुरबुर झाल्यामुळें माधवराव पराजपे ह्यांचे घरांत आम्हीं बिऱ्हाड बदललें होतें शाळाही जवळच होती १९०४ पासून आम्हांला ११ रुपये मिळूं लागले होते. पुढें करवाडी साहेबांचे वेळीं १२ झाले व १९१२ पासून १५ रुपये पगार मिळू लागला. ह्या प्रमाणें शनै: शनै: आमच्या पगारातही वाढ होऊं लागली दुसरे अ मास्तर गणपतराव करमरकर ह्यांचे ५ चे ७ व ७ चे ८ ह्या प्रमाणें वाढ झाली आणखी एक तिसरा मास्तर असे त्याला ५, ६ रुपये मिळत आतां जागा स्वत शाळेचीच होती भाडें द्यावें लागत नसें आमच्या शाळेंतील मुलाचें नुकसान होऊ नये म्हणून राजासाहेबांनीं जागा दिली त्या वेळी आमच्या येथून हायस्कूलमध्यें गेलेल्या मुलांना इंग्रजी शिकवण्याकरितां हायस्कूलमध्येंही शिक्षक ठेवून मराठींतून विषय शिकविण्याची तजवीज करून घेतली होतीच ह्या सर्व सोई झाल्यामुळें आमच्या कार्याला बळकटी येऊन त्याचें पाऊल पुढें पुढेंच पडत चाललें. असें होतां होता १९१०-११ साल उजाडलें. १९११ सालीं प्लेगची आवई पुन. ऐकू येऊं लागली भराभर लोक गाव सोडून जाऊं लागले. पुन. आमचे येथें बाळंतपणाचे दिवस डोकावू लागले तरी ह्यावेळेस राजासाहेबानी पूर्वीपासून जागा देण्याचें कबूल केल्यावरून प्लेगच्या वेळीं भटोलीसच जाऊन राहिलों होतों आता सर्व शाळा बंद होऊं लागल्या होत्या परंतु डिसेंबरचे ११ वे तारखेस जॉर्ज बादशाहा गादीवर बसणार असल्यामुळे त्या निमित्तें शहरांत मोठा जलसा होऊन मुलांना मिठाई वाटावयाची होती. म्हणून कित्येक लोक अद्याप बाहेर गेले नव्हते मिठाई निमित्त गोल बाजारांत शामियाने उभे करून मोठी जागा तयार करण्यांत आली होतां तेथें मुलांचे खेळ वगैरे होणार होते, व मिठाईही तेथेंच वाटायची होती. सुमारें ४–५ हजार मुलांना पुरेल इतकी मिठाई तेथें पटांगणात आणून तयार ठेविली होती. सर्व खेळ वगैरे झाल्यावर मिठाई वाटण्याचें काम सुरू झालें. सुमारें अर्धा शेर तीन पाव अशी मिठाई प्रत्येक मुलास मिळाली प्लेगमुळें पुष्कळशीं मुलें बाहेर गेलीं होतीं तरी बरींच मुलें वेळेवर जलशांत हाजर होऊन मिठाई घेऊन

गेलीं. व्यवस्था चोख होती. सर्कल इन्स्पेक्टर साहेब स्वतः जातीनें सर्व व्यवस्था पाहत होते. अशा रीतीनें हा राज्यारोहणाचा जलसा त्यावेळीं मोठ्या आनदानें पार पडला आम्हींही भटोलीहून ६ मैलांवरून मुद्दाम जलशाकरितां म्हणून गोलबाजारांत शाळेचीं बरींच मुलें घेऊन हजर होतो. होतां होतां प्लेग संपत अला तशी आमची गांवात येण्याची धडपड सुरू झाली.

## चि. गोविंदाचा जन्म

आमच्या कुटुंबाचे दिवस अगदीं भरले होते. तशात आम्हीं ज्या घरात सध्या राहात होतों त्या घराचे मालक बदली झाल्यामुळें आपले घरीं राहावयास आले होते. त्यांनीं आम्हांला आयत्यावेळीं सांगितलें कीं, आतां तुम्हीं दुसरे घर पाहा. ऐन बाळंतपणाची संधी अशा वेळेवर आम्हांला घर कोठें मिळणार ? आम्हीं त्यांना म्हटलें एवढें बाळनपण पार पडूं द्या मग आम्हीं तोंवर दुसरी जागा पाहून तेथें जातों. पण हें त्यांनीं मुळींच कबूल केलें नाहीं. आता आम्हांला धास्ती पडली कीं, जागा कशी मिळणार व आमचें होणार कसें ? शोध करतां करतां आमच्या शाळेजवळच एक सोनाराची जागा तात्पुरती भाड्यानें मिळाली मग आम्हीं कांहीही विचार न करितां लागलेच भटोलीहून बिऱ्हाड उचलून त्या सोनाराचें घरात येऊन राहिलों. पुढें ८ च दिवसानीं कुटुंब प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें आणखी जर थोडा उशीर होता तर भटोलीहून आमचें निघणें मुष्कील झालें असतें. आम्हीं इकडे येतों तों तिकडे राजासाहेबांचे कुटुंब प्लेगनें वारलें. त्यांना काहीं दिवसही गेले होते मेल्यानंतर ऑपरेशन करून गर्भाला अलग करून त्यांना अग्नी द्यावा लागला. मग आम्हांला वाटलें कीं, आपल्यावर ही एक ईश्वराची कृपाच झाली कीं, लवकरच जागा मिळून बाळंतपण सुरक्षितपणें पार पडलें. ह्या आमच्या येथील बाळंतपणाच्या संधीस सासूबाईही आपल्या वडील दीराकडे येऊन राहिल्या होत्या. त्यांचा त्या बाळंतपण प्रसगीं आम्हांस फार उपयोग झाला कारण घरचेंच मनुष्य असल्यामुळें मला कांहीं काळजी उरली नाहीं. योगा योग असा कीं, प्रयाग येथील बेबुताई चितळे ह्या त्यावेळीं शंकरभट परांजपे यांजकडे कांहीं दिवस राहण्याकरिता म्हणून आल्या होत्या. त्यांनीं श्रीधर परांजपे यांचे आईचे मागण्यावरून आम्हांला त्या अडचणीच्या प्रसंगीं बरीच साथ दिली

पुढें कांहीं दिवस शंकरराव टोळे आमचे एक विद्यार्थी ह्यांच्या मातोश्रींनीं स्वयंपाक पाणी करून आमचें काम तडीस नेलें ह्यावेळीं षष्ठीपूजन वगैरे मोठ्या प्रमाणात करावें लागलें, व पेढेही वांटावे लागले. अशा रीतीनें संकटाचे वेळीं कोणत्या ना कोणत्या रूपानें हजर राहून ईश्वरानें आम्हांला साह्य करून आमचें संकटांतून रक्षण केलें व संस्था वाढीस लाविली मुलाचें नाव गोविंद असें ठेविलें. गोविंदाचा जन्म १५ मार्च १९१२ रोजीं झाला ही गोविंदाच्या जन्माची जागा आम्हाला त्रास होऊं लागल्यामुळें पुढें लवकरच बदलली व आबाजी चिटणीस यांचें घरांत जाऊन आम्हीं राहिलों. ह्याच घरांतून पुढें मे महिन्यांत शाळेला सुट्टी असल्यामुळें मुलांना घेऊन तासगांवाचा प्रवास केला. बरोबर कृष्णालाही नेलें होतें त्याचा पुढें लवकरच ह्याच भाड्याचें घरांत अंत झाला हें मागें एक प्रसंगीं कळविलेंच आहे कृष्णा मेल्यानंतर आम्हांला ह्या घरात करमेना तरी आम्हीं दुसरी जागा मिळेपर्यंत ५, ६ महिने त्या घरांत होतोंच १५-२० दिवसांतच आम्हीं तासगावाहून परत आलों.

### कठीण प्रसंग शाळेच्या इमारतीला आग लागते

आम्हांला येऊन १५--२० दिवस होतात न होतात तोंच आम्हावर म्हणजे आमच्या शाळेवर एक अति कठीण प्रसंग ओढवला. त्या प्रसगानें आमचें फार मोठें नुकसान झालें कोणी दुष्टानें आमचे चांगलें चाललेलें काम सहन न होऊन ज्या भागांत आमची शाळा लागत होती व शाळेस सुट्टी असल्यामुळें ज्या खोलीत सर्व सामान भरून ठेविले होतें त्या खोलीला आग लावून दिली. आम्हीं त्यावेळीं बाजारांत बरेंच दूर गेलों होतों. कोणाला कांहीं समजलें नाहीं. आग हळू हळू पेटत पेटत कौलारातून धूराचे लोटच्या लोट निघूं लागले, तेव्हां आसपासच्या मंडळींनीं गिल्ला केला. हां हां म्हणतां शेकडों लोक जमले. आम्हांलाही वर्दी पोहोचली. आम्हीं तावडतोब त्या ठिकाणीं हजर झालों. आम्हीं येण्यापूर्वीच बंब येऊन पोहोंचला होता. पाण्याचा मारा सुरू होतांच तास दीड तासांत आग आटोक्यांत आली. तरी बाक, खुर्च्या, टेबलें, जुनें रेकार्ड, पुस्तकें, फळे वगैरे १०००--१२०० रुपयांचें सामान अग्निमुखीं पडलें इमारतीला धक्का पोहोंचला तो वेगळाच. [illegible] दारें, छप्पर वगैरे सर्व जळून खाक झालें. पोलीसांतही रिपोर्ट केला

सरकारी अधिकारी, शाळेची कमेटी, प्रेसिडेंट, कोतवाल, साहेब, डेप्युटी कमिश्नर, वगैरे जमा होऊन मोक्याची पाहणी झाली, व पुन जळलेली इमारत दुरुस्त करण्याचें ठरुन कमेटी बरखास्त झाला. कारण हेडमास्तर ह्या नात्यानें आमच्यावर सर्व जबाबदारी होती परंतु कोणत्या गोष्टाची तोहमत न येतां त्यातूनही पार पडलों पण इतके दिवसांचे जमविलेलें मोठ्या महत्वाचें कागदपत्र सर्व जळाले १८९३ पासून १९११ अखेर पर्यंतचे शेरेबूक, कमेटीचें प्रोसिडिंग्ज, लायब्ररीचीं चांगलीं चागलीं पुस्तकें, अशी सर्व मेहनत फुकट गेली स्वतंत्र कमेटीची शाळा असती तर कदाचित् सर्व शाळेलाच खो बसावयाचा परंतु ह्यावेळीं आमची शाळा एका मोठ्या संस्थेच्या कृपा छत्राखालीं वावरत असल्यामुळें त्या संस्थेने ही झालेली हानी सहन केली लागलीच हायस्कूल कमेटीनें आम्हांला पुनः दुसरें सामान पुरवून इमारत तयार करुन काम सुरळीत रीतीनें पुन चालूं केलें नाहींतर गंडांतर हें ठेविलेलेंच होते तें अशी सोय झाल्यामुळें टळलें

## डे. इ साहेब नवीन येतात व शाळेचे बक्षिस समारंभ शाळेच्या प्रगतीस कसे कारण होतात याची त्रोटक हकीकत

१९१२ एप्रिल मध्यें प्लेग नंतर पुन शाळा सुरू झाली. आमची शाळा सुरू झाल्याबरोबर लागलीच डे० इन्स्पेक्टर साहेब हनुमान प्रसाद यांची पाहणी झाली ही त्यांची डे० इन्स्पेक्टर म्हणून शेवटचीच पाहणी होती त्यानंतर त्यांची बढती होऊन अ सर्कल इन्स्पेक्टर हा त्यांना हुद्दा मिळाला. व ह्याच सर्कल मध्यें ते काम करुं लागले त्यांचे जागेवर एक डे० इन्स्पेक्टर आले. त्यांनी आमची वार्षिक परिक्षा घेतली ह्या वेळचा रिझल्ट साधारणच निघाला कारण प्लेगमुळें शाळा तीन महिने बंद होत्या मुलांचा अभ्यास यथा तथाच झाला होता क्लास प्रमोशन झालें व उन्हाळ्याच्या सुट्या सुरू झाल्या सुट्या नंतर आगीचे प्रकरण झालें. कसेबस त्या संकटातूनही पार पडलों पुनः पूर्ववत् शाळा सुरू झाल्या तात्पुरतें सर्व सामान हितकारिणी कमेटीनें पुरविलें इतक्यांत तात्पुरते आलेले हे डे० इन्स्पेक्टरही बदलून दुसरीकडे गेले, व त्यांचे जागीं केशवराव पुरोहित हे महाराष्ट्रीय डे इन्स्पेक्टर आले. हे महाराष्ट्रीय असल्यामुळें त्यांना आमची भाषा अवगतच होती त्यामुळें

आमच्या शाळेकडे त्यांना ओढाही फार असे. त्यांनीं जुलै महिन्यांत चार्ज घेतला. व लागलीच आमची शाळा पाहण्यास आले. त्या वेळेला मागील आमचें सर्व रेकार्ड जळल्यामुळें मागील कोणतीच गोष्ट आम्हांला त्यांना दाखविता आली नाहीं. परीक्षा घेतली सर्व क्लास चागले निघाले नवीन शेरे बूक त्याचें पुढें ठेविलें. पहिल्या प्रथम शाळेला लागलेल्या आगीचा उल्लेख करून ताबडतोब शाळेला सामान पुरविल्याबद्दल हितकारिणी कमेटीचे त्यांनीं आभार मानून शाळेच्या स्थितीचें वर्णन केलें एकंदर संतोषदायक असे शाळेसंबधीं मत प्रदर्शित करून शेरा संपविला पूर्वीचे इन्स्पेक्टर हिंदी असल्यामुळें त्यांनीं हिंदी सांगावे, आम्हीं त्याचें मराठी करून मुलाना सांगावें असा द्राविडी प्राणायाम होत असल्यामुळें केव्हां केव्हा मुलाचें व आमचेंही नुकसान होण्याचा संभव होता तो आतां मराठी भाषेचेच साहिब आल्यामुळें नुकसानीचा त्रास टळला आतां आमच्यावर जबाबदारी जास्त पडली कारण भाषा जाणणारे इन्स्पेक्टर असल्यामुळें टगळ मगळ करून चालण्याजोगें नव्हतें सर्व विषय काळजीपूर्वक शिकवावे लागत. मग परीक्षाही चागल्या होत हिंदी शाळेशीं कोणत्या बाबतींत आम्हीं मागें राहिलों नाहीं. आतां आमची स्कूल कमेटीही कसोशीनें काम करूं लागली त्यातल्या त्यांत क्षीरसागर, राजासाहिब, हर्षे वकील, मुकुदराव लोकरस, कानेटकर वगैरे मडळींचे आम्हांला फार साह्य झालें काणे हेही वेळोवेळीं जें लागेल तें अभ्यासासंबधीं सहाय्य करूं लागले असें सर्वांचें साह्य होत गेल्यामुळें आमचें पाऊल पुढेंच पडत गेलें.

एकंदर आमच्या शाळेंतील शिक्षणाचें रूप जनतेच्या प्रत्यक्ष निदर्शनाला यावें ह्मणून १८९८ पासून होणाऱ्या सार्वजनिक उत्सवांत कांहींना कांहीं तरी भाग घेऊन बौद्धिक शिक्षणासंबंधीं काहीं गोष्टी करून जनतेला दाखवाव्या असा परीपाठ ठेविला होता. तेव्हां दर वर्षी एखादा कार्यक्रम मुकर करून जनतेला दाखवावा लागे. त्यांत त्या कार्यक्रमापासून मुलांनाही लाभ होऊन त्याच्या अंगीं धीटपणा येई व चार चौघांत उभे राहून बोलण्यास, अगर गाणीं म्हणण्यास मुलें कचरतनाशीं झालीं. दर वर्षी निरनिराळ्या मुलांची निवड करावी, तऱ्हेतऱ्हेचीं भाषणें हुडकून काढावींत. गाणाऱ्या मुलांकडे गणपतरावांनीं पहावें, व भाषणा संबंधी काळजी मीं घ्यावी आमची तयारी

झाली म्हणजे तींच भाषणें व गाणीं कमेटी पुढें ठेवावीं त्यानीं त्यांतून करावीशी वाटल्यास दुरुस्ती करावी प्रत्यक्ष मदत लागल्यास शाळेंत येऊन मुलांची तालीम घ्यावी अशा तऱ्हेनें मुलाना नियमबद्ध शिक्षण मिळाल्यामुळें तीं कामेंही उत्तम करीत व चार चौघात त्यांची वाहवा होई. पुढें बक्षीस समारंभाकरितांही आम्हास एखादा उत्तम प्रोग्राम बसवावा लागे त्याचीही वरील प्रमाणेंच व्यवस्था लागून त्याच्याही तालमी होत आमचा पगार जरी आता दुसरी कडून मिळूं लागला होता तरी हितकारिणीला कांहीं रकम कमेटींत द्यावी लागे व बक्षीस समारंभ वगैरे कार्याकरितांही कांहीं रकम लागे म्हणून पूर्वीप्रमाणे वर्गणी वसूल करण्याचें काम चालूच होतें. वर्ष दोन वर्षांनीं एखादा बक्षीस समारंभ होई, व त्या करितां सढळ हाताने बक्षिसें वाटलीं जात प्रत्येक मुलाला कांहींना कांहींतरी बक्षीस मिळेच. त्यामुळें सर्व मुलें खुश असत त्या बरोबरच मिठाई वांटली जाई. कारण बालगोपाल हे मिठाईप्रिय असतातच. त्यामुळें आमच्या शाळेंत उमेदवाराचा भरणाही बराच असे वार्षिक परीक्षेनंतर आम्हांला मुलांच्या शोधाकरितां कधीं भटकावे लागले नाहीं आमचीं मुलें तयारच असत फक्त त्यांचीं नांवें दर्ज केलीं म्हणजे झालें. बक्षीस समारंभाप्रीत्यर्थ १००–१२५ रुपये खर्च होत. आम्हां शिक्षक वर्गावर कमेटीचा विश्वास असल्यामुळें सर्व खर्च आमचेच हातून होई, व बक्षीसास देण्यासारख्या वस्तूंची निवड करण्यापासून तीं नांव निशीवार यादीवर ती वस्तु प्रत्येक मुलापुढें लिहून ती अध्यक्षाचे हातून देण्यापर्यंत सर्व कामें आमच्याकडूनच करविलीं जात. देखरेख मात्र कमेटीची असे. इतक्या वर्षांत कोणा मुलाला बक्षीस मिळालें नाहीं किंवा रकमेंत अफरा तफर होऊन रकम ठीक वाटली गेली नाहीं अशी एकही तक्रार आढळण्यांत आली नाहीं. असे हे समारंभ १९३३ पर्यंत माझ्या हयातींत झाले व पुढेंही हाच क्रम चालू राहावा अशी व्यवस्था केली आहे असे समारंभ प्रत्येक वर्षी एकापेक्षां एक सरस होत. पुढें एक दोन महिने तोच विषय लोकांच्या तोंडी असे. ते एक छोटेसें नाटकच म्हणण्यास हरकत नाहीं. अशी त्यांत विविधता असे त्या मुलांना शिकविण्याची बाळकृष्णपंत क्षीरसागर उर्फ ड्राईंगमास्तर ह्याना फार आवड असे. आम्हां शिक्षक वर्गाना प्रोत्साहन देऊन हौसेनें त्यांनीं आमच्या-

कडून कामें करवून घ्यावीं व निरनिराळ्या प्रकारचे लोक आणून आमचीं कामें त्यांना दाखवावीं,व दुरुस्त करून घ्यावीं. अशा तऱ्हेनें त्यानीं आम्हांला त्या कामांत तरबेज केलें. पुढें पुढें आम्हांला कोणाचेंच सहाय्य घ्यावें न लागता आमचीं आम्हीं कामें निवडून बसवूं लागलों व लोकानाही तीं आवडूं लागलीं एखादे वेळीं समारंभ झाला नाहीं अगर गणपती उत्सवांत भाग घेतला नाहीं तर लोकांकडून कागाळ्या येत कीं, यंदा शाळेचा कार्यक्रम का ठेविण्यांत आला नाहीं अशा एका १९१४, १९१५ सालीं घडलेल्या समारंभाचे थोडें जास्त वर्णन करणें येथें भाग आहे तो समारंभ आमची मराठी शाळा व त्या बरोबरच इतर चालणाऱ्या खाजगी संस्था, म्युनिसीपालिटीनें आपल्या ताब्यांत घेऊन कां चालवूं नयेत ? ह्याला कारणीभूत झाल्या ??? असा एक समारंभ नेहमीं प्रमाणें करण्याचें ठरलें दोन माहिने आधींपासूनच तयारी सुरू झाली पुष्कळ प्रकारचीं तऱ्हेतऱ्हेचीं भाषणें, गाणीं निवडण्यांत आलीं त्यात कोणत्या मुलाला कोणते म्हणता येईल ह्याची चाचणी करण्यात येऊन आमच्या शिक्षकांच्या मतें टीक असा प्रोग्राम ठरवून तो योग्य प्रसगीं कमेटी पुढें माडण्यांत आला. तो आमचा प्रोग्राम व आम्हीं एकविचारें केलेली निवड पाहून कमेटी मोठी खुश झाली व त्यानीं आम्हीं केलेलीच निवड मान्य केली. कमेटींत त्यावेळीं गुणग्राहक मंडळींच जास्त होती त्यामुळें आम्हांला धाकधुक वाटत होती कीं, आम्हीं केलेली निवड पाहून कमेटीला पसंत पडते कीं, नाही ? का पुनः दुसरी निवड, करण्यास सांगतात. परंतु कमेटीचा निकाल ऐकल्यावर आमची हळू हळू तयारी सुरू झाली. गर्दी काहींच नव्हती काम चागलें वठलें पाहिजे हा मुख्य हेतु त्यामुळें कोणाचीच घाई नव्हती ज्या मुलाकडे जे काम दिलें तें त्यानें उत्तम रीतीनें वठवून त्यावर श्रम करून तें पक्कें केलें मुलांची भाषणें व गाण्याची निवडही फार उत्तम झाली होती. त्यांत एक माझ्या काठी हें हावभावयुक्त गाणें ज्या मुलाकडे होतें, त्या मुलाने तर फार बहार केली पुढें त्या गाण्याचे जलसे मोठमोठ्या समारंभांत झाले त्याच वेळीं हिंदी साहित्य संमेलनाची बैठक जबलपुरांत झाली. त्या समयीं आमच्या त्या मुलाला त्या गाण्याकरिता मुद्दाम बोलावण्यांत येऊन त्यानें हजारों प्रेक्षकापुढें तें गाणें म्हणून मोठी बहार उडवून दिली ! त्यामुळें सर्वांचे तोंडीं मराठी

शाळेची प्रशंसा होऊं लागली त्यामुळें त्या गाण्याचें हिंदींत रूपांतर होऊन हिंदी शाळेंतील क्रमिक पुस्तकांत त्या गाण्याला अग्रस्थान मिळालें इतकें तें गाणें लोकप्रिय झालें तयारी होतां होता बक्षीस समारंभाचा दिवस ठरविण्यात आला बक्षीस समारंभ कोणाचे हातून करावा ह्याची कमेटींत भवती न भवती होऊन सर्वानुमतें असें ठरलें कीं, यंदा श्रीमान कमिश्नर साहेब यांचे हस्तें बक्षीसे वाटावीं असा कमेटींत ठराव होताच आता त्यांना बोलावणें कोणी करावयाचें? हा प्रश्न पडला त्या वेळचे कमिश्नर क्राडाक साहेब व राजासाहेब यांचा परिचय चांगलाच होता. व राजासाहेबांना कमिश्नर साहेब मोठा मान देत व त्यांच्याशीं प्रेमानें वागत. तेव्हा राजासाहेबांनींच जाऊन त्यांना निमंत्रण करावें व बरोबर कोणीतरी मेंबरांनीं जावें असें ठरून त्या वेळेचे सेक्रेटरी मनोहरपंत गोळवलकर, राजासाहेब व ड्राईंग मास्तर असे तिघे जाऊन, त्यांना निमंत्रण पत्रिका देऊन आग्रहाचें बोलावणें करून आले. राजासाहेबांच्या विनंतीला मान देऊन त्यांनींही वेळेवर येण्याचें कबूल केलें झालें! मग काय सर्व लोक कामास लागले शामीयाना उभारणें, वेलकम लावणें, कुंड्या वगैरे जागजागीं ठेवून मंडपाला शोभा आणणें, खुर्च्या, बाकें, चौक्या वगैरे सामान जमविणें. व त्याची योग्य अशी मांडणी करणें वगैरे कामें प्रत्येकांनीं वाटून घेतलीं त्या ५-६ दिवसांत आम्हीं शिक्षकांनीं शाळेंतच मुक्काम ठोकला कारण सर्व सामान सांभाळण्याची जबाबदारी आमच्याकडेच होती. अशी राजासाहेबांपासून तों शिपायापर्यंत सर्व मनुष्यें एक जुटीनें कामास लागल्यामुळें हां हां म्हणतां मंडप उभारून खुर्च्या, टेबलें, चौक्या, बाकें, वगैरेंची योग्य ती मांडणी होऊन, कुंड्या, फुलझाडें, वगैरे स्थानीं स्थानीं ठेवून, जिकडे तिकडे पाणी शिंपडून, तोरणें पताका, वगैरे लावून, जय्यत तयारी झाली. इकडे ज्यांचेकडे प्रोग्रामचें काम सोंपविलें होतें, त्यांनीं त्याची पुनः एकदा पाहणी करून आपली खात्री करून घेतली सर्व विद्यार्थी उत्तम तऱ्हेचा पोशाक करून योग्य वेळीं शाळेंत हजर झाले. बक्षीसांची मुलांच्या नांवाच्या चिठ्या लावून यादीवर हुकूम योग्य मांडणी करून ठेविली, व साहेबांची वाट पाहात, मंडळी गप्पा गोष्टी करीत, मंडपांत बसली परंतु आयत्या वेळीं साहेब बहादुराकडून निरोप आला कीं, कांहीं जरूरीच्या सरकारी कामामुळें तुमच्या समारंभास मी हजर राहूं

शकत नाहीं, त्याबद्दल मी दिलगीर आहे मंडळीचा फार विरस झाला. ह्या वेळेला मंडळींनीं एक जुटीनें जीवापाड श्रम केले होते तेव्हा त्याचा विरस होणें हें सहाजिकच होतें आमच्या लोकांच्या मनाला सुद्धा फार वाईट वाटलें इतका उत्तम प्रोग्राम जमलेला व पाहावयास साहेब येत नाहींत ! सर्वांचीं मनें विरस झालीं. मग सर्वानुमतें राजासाहेबांनाच अध्यक्ष नेमून त्यांचे हातूनच बक्षीसें वाटावीं असें ठरून लागलेच कार्यास सुरुवात झाली. ईशस्तवन वगैरे होऊन मुलांनींही आपापलीं कामें उत्तम रीतीनें न घाबरतां पार पाडलीं कित्येक मुलांना तर टाळ्यावर टाळ्या पडून खाजगी स्वतंत्र बक्षीसें, पदकें, मिळालीं व शाळेतर्फेचींही बक्षीसें राजासाहेबाचे हातून वाटण्यांत आलीं एका गृहस्थानें तर असे उद्गार काढले कीं, मास्तर तुमचे आभार काय मानावयाचे ? हा सर्व समारंभ हींच तुमची कीर्ति, हाच तुमचा मान, तुमच्याच योगानें हें सर्व पार पडले तुम्हींच सर्व शिक्षक ह्या समारंभाचे जनक आहांत ह्यापेक्षा जास्ती मानाची अपेक्षा तरी आम्हीं काय करावयाची ? आमच्या श्रमाचें योग्य चीज झालें हें पाहून आम्हां सर्व शिक्षकाना धन्य वाटलें आमच्या जवळ विद्या नाहीं ? पैसा नाहीं ! ! साधारण प्रायमरी शाळाचे आम्हीं शिक्षक अशानीं ह्यापेक्षां जास्त मानाची हाव आणखी ती काय धरावी ! ! समारंभ आटोपला आतां जिकडचें सामान तिकडे पोहोंचविणें ही मुख्य कामगिरी आम्हाकडे राहिली ती आम्हीं रात्रीचा दिवस करून सर्वांनीं पार पाडली सर्व सामान जिकडचें तिकडे पोहोंचतें केले आणि पूर्वीप्रमाणे क्लासांची मांडणी करून आपल्या कामाला लागलों

## कमिश्नर शाळा पाहण्यास येतात

इतक्यांत अचानक एके दिवशी कमिश्नर साहेबाचा मनुष्य शाळेत येऊन उभा राहिला व त्याने निरोप आणला कीं, ह्या सोमवारीं कमिश्नर साहेब मराठी शाळा पाहण्यास येणार ! म्हणून राजासाहेबांना सांगा असें आम्हांला कळतांच लागलीच मी त्या शिपायाला घेऊन राजासाहेबाकडे गेलों, व त्यानें सांगितलेला निरोप राजासाहेबाना कळविला. मग काय ? पुन्हा दुसरें दिवशीं पूर्वीचीच मंडळीं साहेबांकडे जाऊन रीतसर आमंत्रण करून, दिवस वेळ पक्की करून घरीं आले आतां विशेष कांहीं न करितां, साहेबांपुरतीच सर्व व्यवस्था

करून जागेची सफाई तोरणें वगैरे लावून सर्व ठिकाणीं पाणी वगैरे शिंपडून, वेलकम लावून पूर्वीप्रमाणें साहेबांची वाट पाहात, सर्व कमेटीचे मेंबर, हायस्कूल कमेटीचे मेंबर, डे. इन्स्पेक्टर साहेब वगैरे शाळा खात्याचे सर्व अधिकारी असे मिळून वाट पाहात बसलों. मुलेंही सर्व तयार ठेविलीं होतीं आम्हींही पोषाख करून जागजागीं उभे होतों. योग्य वेळीं साहेब येतात अशी वर्दी आली. लागलीच राजासाहेब व हायस्कूल कमेटीचे प्रेसिडेंट, खजांजीसाहेब, स्वागताकरितां फाटकांत जाऊन पोहोंचले. साहेब मोटारींतून उतरताच हस्तांदोलन झाल्यावर सर्व मंडळी स्थानापन्न झाली. हुकूम होतांच कार्यक्रमाला सुरवात झाली. पूर्वीप्रमाणें कार्यक्रमाची योग्य अशी मांडणी केली होती. एका मागून एक असा आमचा सर्व प्रोग्रॅम पार पडल्यावर साहेबांचे हस्तें मुलांना पुनः बक्षीसें व मिठाईही वाटली. सर्व व्यवस्था उत्तम वठलेली पाहून साहेबांना मोठें समाधान झालेलें दिसलें व जातांना ते राजासाहेबांना मोठ्या खुशीनें म्हणाले कीं, इतना अच्छा तुम्हारा मराठी स्कूल है. मुझे कल्पना नहीं थीं कीं ऐसा उमदा कार्यक्रम मेरे देखनें में आवेगा '!! अच्छा अब मैं बिदा मागताहूं. एक दो रोजमे आप मुझे फिरसे जरूर मिलना. असे सांगून साहेब निघून गेले.

## शाळेचें पुनः दत्तविधान

जिकडे तिकडे पुनः आनंदी आनंद झाला. सर्वांना वाटलें कीं, आम्हीं केलेल्या श्रमाचें चीज होऊन सार्थक झालें. अशा ह्या आनंदाच्या प्रसंगीं स्वतः राजासाहेबानीं कमेटीच्या सभासदांना श्रमपरिहारार्थ खाजगी रीतीनें आपल्या बगीच्यांत गार्डन पार्टी दिली. आम्हांलाही त्यांत आमंत्रण होतें. हें निराळें सांगावयास नकोच. हा समारंभ झाल्याचे योगानें आम्हाला असें वाटूं लागलें कीं, आतां आमच्या ह्या चिमुकल्या संस्थेला कांहीं कायमचें रूप येणार! व आम्हीं इतके दिवस केलेल्या तपाचें सार्थक होणार!! म्हणजे ही संस्था जवळ जवळ सरकार आपल्या हातात घेऊन चालविणार. असे आमचे विचार चाललेच आहेत. तों आमचे ऐकण्यांत असें आले कीं, आमच्या ह्या सर्व खाजगी प्रायमरी शाळा, अंजुमनच्या तीन शाखा, मिशन हायस्कूलच्या तीन शाखा व हितकारिणीच्या तीन शाखा अशा नऊ शाळा सरकार आपल्या

ताब्यात घेऊन म्युनिसिपालिटीचे स्वाधीन करणार ! मागें जुना एक कायदा असा झाला होता कीं, सर्व प्रायमरी शिक्षण म्युनिसिपालिटीनें सांभाळावें त्या कायद्याला अनुसरून कमिशनर साहेबांनीं हा प्रश्न उपस्थित करून म्युनि-सिपालिटीच्या म्यानेजिंग कमेटीपुढें विचाराकरितां ठेविला व स्वत ते त्या वेळीं त्या कमेटींत हजर राहिले व कमेटीकडून सर्व शाळा कायद्या-प्रमाणें म्युनिसिपालिटीनें ताब्यांत घेऊन चालवाव्या हा ठराव सर्वानुमतें पास करून घेतला कमिश्नर साहेब त्या गोष्टीच्या मागें लागल्यामुळें हें काम तडकाफडकीं झालें नाहींतर वर्षोगणती ह्या कामाकडे कोणी पाहिलें सुद्धां नसते काहीं का असेना आमच्या शाळेचे नशीब फळफळलें हें खरें. सर्व शाळांच्या कमेट्यांना सर्कल इन्स्पेक्टर साहेबांचे द्वारा विचारणा झाली कीं, सरकारचा असा विचार आहे तर तुम्हीं ह्या गोष्टीस तयार आहां किंवा नाहीं ? हें तावडतोब कळवा , सर्वांकडून होकारात्मक उत्तरें गेलीं आमच्या कमेटीला थोडासा गर्व झाला कीं, आपली संस्था आपण इतकें दिवस कष्ट करून चालविली, द्रव्य खर्च केलें आतां थोड्याशा फायद्याकडे पाहून ती दुसऱ्यांस का द्यावी ? व त्याप्रमाणें सर्कल इन्स्पेक्टरला पत्रद्वारें कळविलें कीं, आम्हीं आपली संस्था सरकारच्या ताब्यांत देण्यास तयार नाहीं त्यानंतर इन्स्पेक्टर साहेबाकडून उत्तर आलें कीं, तुम्हीं फार घोक्यांत पडून तुम्हाला फार नुकसान सोसावें लागेल. तेव्हा तुम्हीं केलेला विचार सोडून द्या सरकार आपल्या निश्चयाप्रमाणें ही संस्था आपल्या ताब्यांत घेणारच तर तुम्हीं त्यात आडकाठी आणून वाईटपणा आपल्याकडे का घेतां ? असें त्यांचेकडून उत्तर आल्यामुळें कमेटीनें आपला केलेला बेत सोडून दिला व आम्हीं शाळा तुमच्या ताब्यांत देण्यास तयार आहोंत असें इन्स्पेक्टर साहेबांस कळविलें झालें ? अशीं सर्वांचीं उत्तरें हातीं आल्यावर ती म्युनिसिपालटींत ठेविलीं, व तिला मंजुरी मिळाल्यावर एप्रिल १९१६ पासून आमच्या शाळेचें त्याबरोबरच आणखी आठ संस्थांचें दत्तविधान यथाविधी म्युनिसिपालिटीचे मांडीवर झालें

## नवीन कारभार सुरू झाला

त्या तारखेपासून आमची पेशनेबल सर्विस सुरू झाली. आतां आमच्या

नावें कान्ट्रीब्यूशन जमा होऊं लागलें हितकारिणीनें व आमच्या कमेटीनें आम्हां सर्व शिक्षकाना मागील सर्व नोकरीबद्दल कांहींच दिलें नाही. नुसती होयबा करून आमच्या तोंडाला पानें पुसलीं आम्ही तुमची योग्य ती व्यवस्था करू असें नुसतें तोंडी आश्वासन फक्त दिलें केलें सवरलें कांहीं नाहीं आमच्या ताब्यांत असलेलें जुनें सर्व सामान आम्हीं हितकारिणी कमेटीच्या स्वाधीन केलें, व पावत्याची रसीद घेतली आतां वरील तारखेपासून आम्हां सर्व शाळाना म्युनिसिपालिटीकडून शाळेला लागणारें सर्व सामान नवीन मिळालें, व शाळेकरितां सोइस्कर अशी एक जागा इन्स्पेक्टर साहेबांनीं स्वत. पाहून पसत करून ठरविली. आतां त्या नवीन जागेंत शाळा लागूं लागली व पगार-ही म्युनिसिपालिटीकडूनच मिळूं लागला. आता मला २० रुपये पगार झाला होता. तसेंच गणपतरावांचेही १२ रुपये झाले होते. आतां आणखी दोन मास्तर नवीन ठेविलें होते त्यांनाही आठ आठ रुपये मिळत. आतां आमची म्युनिसिपल सर्व्हीस झाल्यामुळें आमच्या नोकरीला थोडी शाश्वती आली प्रायव्हेट संस्थेंत केव्हां काढतील, केव्हां कसा हुकूम होईल, म्हातारपणची कांहीं सोय नाहींच त्या दृष्टीनें आमची शाळा म्युनिसिपालिटीनें घेतली हें आम्हांला बरेंच वाटलें. कदाचित आमची पुरी नोकरी झाली तर म्हातारपणची सोय होईल. कांहीं तरी पदरांत पडेल. नाहींतर असहाय स्थितींत कोणाकडे पाहणार? नसती म्युनिसिपालिटीनें घेतली संस्था आपल्या ताब्यांत, तर तेथेंही दिवस काढलेच असते. आजपर्यंतच्या शिक्षकाचा जसा निर्वाह झाला तसाच आमचाही झाला असता जास्त सुखाची इच्छा कोण करीत नाहीं. बहुतेक सर्व प्राणी सुखाकरितां हापापलेच असतात. मग आमच्या सारख्या संकाश्रित मागसाची कथा ती काय? हा आम्हां शिक्षक लोकांना फार मोठा फायदा झाला. कारण त्या योगें आमची म्हातारपणाची पोटाची थोडी सोय झाली. हितकारिणींत प्रॉव्हिडंट फंडाची वगैरे कांहींच सोय नव्हती. शाळा दुसऱ्याच्या स्वाधीन करून त्यावेळीं नुसतें गोड बोलून आमच्या तोंडाला पानें पुसण्यांत आलीं आम्हीं तुमच्या करिता सर्व व्यवस्था करूं असें म्हटलें पण केलें कांहीं नाहीं, व आम्हीं हात चोळतच स्वस्थ बसलों

## स्कालरशिप परीक्षा सुरू होते व मुलींकरितां म्हणून शिक्षकांना कांहीं रकम स्वतंत्र रीतीनें मिळूं लागली

१९१३ पासून सर्व प्रायमरी चवथ्या वर्गाची स्कॉलरशिपकरितां ह्मणून एक निराळी परिक्षा होऊं लागली, व त्यांत पास होऊन वर नबर येणाऱ्या कांहीं मुलाना दरमहा ४ रु प्रमाणें पुढील शिक्षणाकरितां ह्मणून चार वर्षे स्कॉलरशिपच्या रूपानें मदत मिळू लागली ह्या गोष्टींत आमची शाळा कोणत्या शाळेच्या पाठीमागें न राहता २, ३, ४, अशा स्कॉलरशिपा आमच्या वाट्यास येऊं लागल्या, व त्या दृष्टीनेंही आमच्या शाळेचें सरकार दरबारीं नांव गाजू लागलें. अशा ह्याच वेळीं आणखी एक फायदा आमच्या शाळेला झाला तो हा कीं, आमच्या शाळेंत मुली घेण्याची व्यवस्था मी मागेंच करून घेतली होती त्याप्रमाणें शाळेंत मुली येऊ लागून ह्या सुमारास शाळेंत मुलींची संख्याही बरीच वाढली होती त्यावेळीं असा एक फायदा होता कीं, ज्या ठिकाणीं मुलींची शिक्षणाची सोय नसेल व त्या मुली मुलांबरोबर शिकत असतील तर त्या शाळेंतील मास्तरांना बक्षीस ह्मणून कांहीं रकम सरकार ठरवील ती हेडमास्तरचें द्वारा सर्व शिक्षकाना पोहोंचती करावी. येथेंही मराठी शिक्षणाची स्वतंत्र शाळा नव्हतीच, व मुली आमचे शाळेंतच भरती होत असे आज १०० वर्षें सतत चाललें होतें अशी ही गोष्ट सरकारच्या नजरेस आल्यामुळें सरकार-नेंही ही बाब लक्षांत घेऊन त्या नियमाप्रमाणें आमच्या शाळेलाही मुलींची ग्रँट सुरु केली, व ती शिक्षकांनांच स्वतंत्र रुपानें मिळावी असे कळविलें त्यांत कमेटीचा कांहीं संबंध नाहीं. त्याप्रमाणें आमचेकडून रिपोर्टही मागविला व तो मंजूर होऊन पहिले वर्षी आम्हाला सोळा रुपये बक्षिस मिळालें अशी ही रकम वाढत वाढत १००, १२५ रुपयापर्यंत गेली होती परंतु शिक्षक लोक आप-सात भांडल्यामुळें व आणखी काही सरकारी कारणामुळें १९३० नंतर ही ग्रँट बंद झाली. तोंपर्यंत ही व्यवस्था सारखी चालून शिक्षकांना कांहीं फायदाच होत होता. परंतु आशा ही फार कठीण आहे ? प्रत्येक मनुष्यास असें वाटतें कीं, आम्हांलाच सर्वांत जास्त मिळावें. अशी दुही उत्पन्न होऊन मिळणाऱ्या सर्वच रकमेला आम्हांला मुकावे लागलें आम्ही भांडतों म्हणजे जगांत गव-गवा मात्र झाला तो निराळाच अस्तु ! जगात असेच चालावयाचें त्याला कांहीं

इलाज नाहीं म्हणून स्वस्थ बसलें पाहिजे माझ्याकडून होईल तितकी मी निस्पृहपणानें वाटणी करीतच होतों परंतु हें खरें कसें कोणाला वाटणार? त्यावरही काहूर करावयाचें ते कित्येकांनीं केलेंच. पण परमेश्वराची कृपाच म्हणून त्यातूनही आम्हीं कांहीं डाग न लागता पार पडलों ही ईश्वराची कृपाच दुसरें काय? असे टक्के टोणपे खात खात १९१६ साल तर गाठलें व आमचे म्युनिसिपालिटीकडे दर विधानही झालें आता आम्हीं म्युनिसिपल नोकर म्हणवूं लागलों १९११ पासून १९१६ पर्यंत प्लेग महाराजांनीं जबलपुरावर कृपाच केली होती. त्यानीं ह्या पांच वर्षांत इकडे बिलकूल मोर्चा वळविला नाही। ही त्याची मेहरबानीच समजली पाहिजे

## कौटुंबिक हकीकत

जाता जातां थोडी कौटुंबिक हकीकतही सांगावी लागेल. १९१२ पासून १९१६ च्या दरम्यान आमच्या ससारांत आणखी दोन मुलींची भर पडली त्यांची नावें कुशी व मनी ह्या दोन्ही मुलींच्या वेळचीं बाळतपणें माहेरींच झालीं ह्यावेळीं आमचे श्वसूर त्याचा पाय अधू झाल्यामुळें, पेनशन घेऊन जबलपूर येथें कायम बिऱ्हाड करून राहिले होते त्यामुळें मग आम्हांला आणखी कोणाकडे पहावें लागलें नाहीं वेळप्रसंगीं सासुबाई येऊन आमचा परामर्श घेऊन जात १९१५ सालीं माझ्या शालकाचें लग्न झाल्या कारणानें त्या लग्नाकरितां म्हणून आम्ही नागपुरास गेलों होतों यतां येतां रामटेक पाहून दर्शनही घेऊन आलों ह्याच सधीस आमच्या तासगावच्या एक दोन सर्कशी येथें येऊन गेल्या त्यांना जाऊन भेटलो त्यांनीं मला ओळखलें. त्यात एक दोन माझे बाल मित्रही निघाले. रोज सर्कस पाहण्यास मिळू लागली. असे दिवस जातां जातां आम्हीं आर्य बाल सभेतर्फे गणपतीचा उत्सव करीत असता काशिनाथपंत छत्रे यांची सर्कस येथें येऊन पोहोंचली मी त्यावेळीं गणेशोत्सवाच्या गडबडींत होतों माझ्याकडे वर्गणी वसूल करण्याचें काम होतें तें काम मी व मारुतीराव सोनक असे दोघे मिळून करीत होतों बरीच वर्गणी जमा केली नतर आम्हांला असें वाटलें कीं, काशिनाथपंत छत्र्याच्याकडे जाऊन उत्सवात कांहीं मदत मिळाल्यास मागावी. परंतु ह्यावेळीं त्यांना येथें येऊन १५ दिवस होऊन गेले होते आतां ते शेवटचा

खेळ करून जाण्याचे तयारींतच होते इतक्यांत आम्हीं दोघे जाऊन त्यांच्याकडे पोहोंचलों औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर मी त्यांना ह्मणालों मीं जमखंडीचा महादेव आप्पा जोशी ह्यांच्या मुलीचा मुलगा तेव्हां लागलीच त्यांनीं विचारलें कीं, वेणुताईचा कां मुलगा तूं? मग इतकें लांबलचक नांव सांगण्याची कांहीं जरूरी नव्हती तुमचे आप्पा ह्मटलें असतेस तरी मला समजलें असते अरे मला येथे येऊन आज १५–२० दिवस झाले! आज तू मला येऊन भेटतोस? जा आतां आमचेकडून उत्सवास कांहीं मदत मिळूं शकत नाहीं मग आम्हींही कांहीं भाषण न करितां तसेंच उठून परत आलों. त्याचें व माझें कांहीं नातें आहे हें मला ठाऊक होतें मला ह्यापूर्वीच जाऊन त्यांना भेटावयास पाहिजे होतें. माझ्याकडून थोडी हयगय झाली. त्याला इलाजच नव्हता. कित्येक वर्षांत त्याची आमची भेट नव्हती. परंतु त्याची आठवण जबर त्यावेळीं असा रिवाज होता मनुष्य कितीही मोठा झाला तरी तो आपल्या मंडळीस विसरत नसे आतां पहावें तों काय? बापाची मुलाची व मुलाला बापाची ओळख राहणें कठीण पडूं लागलें आहे ५०–६० वर्षांत इतका फरक

## कु. यमूचें लग्न व तिचे संबंधीं थोडा वृत्तांत

आतां आमच्या यमूलाही १० वर्षें पूर्ण झालीं. हिच्या लग्नासंबंधीं वरांतल्या घरांत गोष्टी होऊं लागल्या अशा गोष्टी करतां करतां तिचें १२ वें वर्ष संपलें. तेरावेंही संपलें. मग अंमळ काळजी वाटू लागली. तिला मंगळ असल्यामुळें कांहीं कोठेंच जम बसेना. पाहतां पाहतां बनारस मुक्कामीं सरबागे आडनांवाचा एक मुलगा आढळला त्याचें शिक्षण मॅट्रीक पर्यंत झालें असून बिजवर होता तरी वय फार नव्हतें. २५–२६ वर्षांचें वय असल्यामुळें तो कांहीं मोठा वाटत नव्हता मेकॅनीक कामाकडे त्याचें फार लक्ष होतें. मागावर एकदम ७–८ चाल्या चालवून दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न सुरू केला होता. त्या त्यांच्या प्रयत्नांत यशही येऊं लागलें होतें म्हणून आम्हीं आमचे एक मित्र दाते यांचे सल्याप्रमाणें तोच मुलगा पसंत करून जातां येतांचें भाडें ८ जणांचें व किरकोळ मान पान वगैरे बाबी ठरवून मुहूर्त पक्का केला. जबलपुरासच कार्य होण्याचें ठरलें ता १७ मार्च १९१६ हा दिवस कार्याकरितां योजिला. आतां कार्य करण्याचें निश्चित झाल्यामुळें सुट्टी करितां अर्ज केला व स्वत: तो

अर्ज घेऊन मी प्रेसिडेंट साहेबांकडे गेलों प्रेसिडेंट म्हणाले, तुम्हांला रजा घेण्याचीच काय आवश्यकता? आपल्या कोणाही असिस्टंटला सांगा व कामास लागा ते पाहून घेतील. ह्या कामांत तुम्हांला कोणीही, तुम्हीं कोठें गेलां म्हणून जाब विचारणार नाहींत. आम्हांला ठाऊक आहे कीं, तुम्हांला आपल्या कामाची जाणीव आहे इतका सर्वांचा आमच्यावर विश्वास होता त्यांना ठाऊक होतें कीं, आता जरी हे सुट्टीवर गेले तरी पुढें ही कसर ते भरून काढल्याशिवाय राहणार नाहींत। झालें करारप्रमाणें देण घेण होऊन निर्विघ्नपणें कार्य पार पडलें ह्या कार्यांत ४५०—५०० रुपये खर्च आला प्रत्यक्ष हुंडा वगैरे कांहीं द्यावा लागला नाहीं दादा व सौ वहिनी यांचीं मुलें लग्नाकरितां मनमाडाहून येथें आलीं होतीं. परंतु दिनकर भटजी व आई यांना कांहीं येतां आलें नाहीं. त्यामुळें थोडा विरस झाला व आई न आल्यामुळें वेळेवर तिची आठवण होऊन डोळ्यांतून पाणी आलें. लग्नानंतर जामातांच्या उद्योगाला यश येऊन सरकारी इंडस्ट्रीयल खात्याकडून त्यांना १००० रुपये बक्षिस मिळाले, व अलीगडला वीव्हींग स्कूलमध्यें ३० रुपयांची नोकरीही मिळाली असे तें कुटुंब पुढें ८–१० वर्षें नांदत होतें. हळू हळू त्यांची प्रगती होत होती. परंतु दैवयोग असा कीं, त्यांना नवज्वर होऊन त्यांत त्यांचा अंत झाला, व मुलगी सर्वस्वी उघडी पडली मी जाऊन तिला घरीं घेऊन आलों मरते वेळीं १०० रुपयांशिवाय त्यांचे जवळ कांहीं शिल्लक नव्हतें. यमूच्या लग्नाचा विमा गुजराणवाला ह्या कंपनींत उतरला होता त्या पासूनही तिच्या लग्नाला मदत म्हणून १०० रुपये मिळाले. त्यांच्या घरचीं गरीबीच होती सध्या त्यांचे एक भाऊ आहेत ते काशीसच असतात. शाळा खात्यांत नोकर असून बी. ए आहेत ते आतां कधीं कधीं आपल्या भावजयीचा परामर्श घेतात तिचें नामलें त्या वेळेस मुलगी गरोदर होती ती योग्य वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगीच झाली. मुलगा होता तर वंशाला आधार होतो परंतु होतो कसा? त्या प्रमाणें तिला आमच्या घरीं येऊन वर्ष दोन वर्षें होत आलीं त्या नंतर तिच्या मामांनी आग्रह केला कीं, यमूला तुम्हीं आमच्याकडे पाठवा आम्हीं तिचें मुलीप्रमाणें संगोपन करून तिच्या कांहीं शिक्षणाचीही सोय करूं त्या वेळीं तिचे मामा नुकतेच नोकरीस लागले होते आता ते वाढत वाढत फर्स्ट क्लास सबजज्ज

ह्या हुद्यावर आहेत असे त्यांचें आश्वासन मिळाल्यामुळें यमूला आम्हीं त्यांच्या-कडे पाठविली व त्यांनींही आपल्या म्हणण्याप्रमाणें तिचें ७–८ वर्षे पालन पोषण करून आपल्या मुलीप्रमाणें वागविली. त्यांनीं तिच्या शिक्षणाची कांहीं थोडी फार सोय केली होती पण तिचा तिला फायदा घेतां आला नाहीं. नंतर आम्हीं तिला जबलपुरास बोलावून एका स्नेह्यांच्या साह्यानें फिमेल नॉर्मल मध्यें तिला भरती करविलें. त्या शाळेंत तिला स्कॉलरशिपही मिळूं लागून ४–५ वर्षे उत्तम तऱ्हेनें शिक्षण होऊन ती त्यात पास झाली, व लागलीच तिला सरकारी शाळा खात्यात शिक्षकिणीचीच जागा मिळून आज ती बालाघाटला आपल्या मुलींसह सुखानें कालक्रमणा करीत आहे. नुकतीच ती १५ दिवसांपूर्वी येथें येऊन भेटून गेली.

## कांहीं सहाय्यक धंदे बंद केले

कृष्णा गेल्यानंतर चिटणीसाचें घर सोडून आम्हीं भैय्यासाहेब परांजपे यांचे त्यांच्या वाड्यालगतच असलेल्या दुसऱ्या एका घरांत भाड्यानें राहूं लागलों तेथें आतां सोडा वॉटर लेमन वगैरेचा एक कारखाना भाऊ परांजपे ह्यानीं सुरू केला त्यांतील सामानाच्या विक्रीचेंही काम आम्हीं कांहीं दिवस केलें. ह्याच वेळेस हिंदी एजंसी, कुटुंब शिक्षणमाला, एक आणा माला, एक पैसा माला वगैरेच्या एजंशा घेऊन त्याही चालवून दाखविल्या पुढें कामाची व्याप्ति जास्त वाढल्यामुळें ह्या विक्रीच्या कामांत वेळ मिळेना म्हणून हळूं हळूं व्यापार गुंडाळण्यास आरंभ करून १९१६ पर्यंत बहुतेक व्यापाराचें काम बंद केलें होतें आता फक्त शिकवण्या व शाळा ह्याच कामाकडे लक्ष द्यावें व त्यांतच चार पैसे मिळून काम यशस्वी करून दाखवावें, असें ठरवून, त्याप्रमाणें उद्योग सुरू करून, कोकांकडून बरें म्हणून घेतलें. हजार धंदे करण्यापेक्षा एकच धंदा केलेला बरा! परंतु लोकाग्रहास्तव जोडीला भिक्षुकी ठेवावी लागली, व ती आजही मला उपयोगी पडत आहे. भिक्षुकी संबधीं कोणतें काम अशुद्ध करीत नाहीं. मी हद्द शुद्ध व ठीक म्हणतों. पण पोथीवरून म्हणतों. मी येतें तें त्यांना सांगतों. ते यजमानास पसंत असतें. मला येत जात विशेष नाहीं. पण लोक बोलावतात त्याला माझ्याकडून

९५००२ २७।१०।६३

नकारात्मक उत्तर देववत नाहीं त्याला मी काय करूं ? असें हें माझें काम शेवटपर्यंत चालणारच

## मागें बंद पडलेलें चिटणीस पुराण पुढें चालू

१९०४ सालापासून आमचा ज्यांच्याशीं मुख्य संबंध, असे शाळेचे चिटणीस, त्या विषयीं येथें थोडा उहापोह केला पाहिजे. कारण मला वाईट जो कांहीं प्रसंग येणार तो पहिल्या प्रथम चिटणीसांशीच रंगोपंतांच्या समोरच शाळेचें चिटणीसाचें काम मुकुंदराव लोकरसच पाहूं लागले होते नंतर रंगोपंत प्लेगमध्यें वारले व सगळेंच काम लोकरस साहेबांकडे आलें. हे गृहस्थ सर्व प्रकारें हिशेबी असल्यामुळें त्यांना व्यवहारांत चोखपणा पाहिजे होता. काम चोख दाम रोख ह्या म्हणीप्रमाणें ते आमच्याशीं अत्यंत सलोखीनें वागल्यामुळें तो काळही त्या दृष्टीनें मोठा सुखांत गेला. नंतर त्यांची कांहीं दिवसांसाठीं परगांवीं बदली झाली. मग चिटणीसाची माला जयरामपंत हर्षे वकील ह्यांच्या गळ्यांत पडली त्यांनीं स्वत मास्तरी केली असल्यामुळें ते शिक्षकाच्या धंद्यात काय अडचणी असतात, त्यांच्याशी कसें वागावें, कोणा-कोणांचीं मनें प्रसन्न ठेवावीं, वगैरे त्यांना माहीत असल्यामुळें आम्हाला त्यांचे-कडूनही बरीच मदत मिळूं लागली, व त्यांनीं सर्व जबाबदारी आमच्यावर सोंपविली, व जेथें अडेल तेथें मदत करूं लागले आता सेक्रेटरींना फार काम नव्हतेंच कारण पैशाअडक्या संबंधानें हितकारिणी मुख्य कमेटीकडे गेल्यामुळे ह्या शाळेकरितां पूर्वी जी वर्गणी गोळा होई तीच सध्यां चालू होती. त्यातून मास्तर लोकाना कांहीं मदत देणें, बक्षीस समारंभ करणें, कांहीं गरजा भागविणें, हीं कामें सेक्रेटरीला करावीं लागत, व त्यासंबंधीं हिशेब ठेऊन तो कमेटीला दाखवावा लागून मंजुरी मिळवावी लागे. हें काम त्यांनी केलें कीं, त्यांची जबाबदारी संपली.

अशी हर्षे वकील यांची चिटणीशी सुरू असतां त्यांच्या मनांत आलें कीं, जबलपुरांत आपली वकीली कांहीं चालत नाहीं. तेव्हां गाडरवाडा येथें जाऊन वकीली करावी त्या प्रमाणें त्यांचे ठरून १९११-१२ चे सुमारास ते गाडरवाड्यास कायमचेच रहावयास गेले आतां सेक्रेटरीशिप कोणाला द्यावी हा प्रश्न पडला. मनोहरपंत व आणखी दोन चार गृहस्थांस विचारलें,

परंतु कोणीही होय म्हणेना ! कारण त्यांच्या पाठीमागे कामाचा व्याप बराच असे. आतां शाळेचें स्वरूप पालटल्यामुळें कामाची जबाबदारीही फार मोठी होती. कामांत कांहीं चूक झाली तर बदनामी होण्याचा प्रसंग. तेव्हां असलें जोखमीचें काम कोण मुद्दाम पत्करतो !

## मनोहरपंत सेक्रेटरी होतात

होतां करतां श्री. मनोहरपंत गोळवलकरांनीं काम करण्याचें कबूल केलें. त्यांना बिलकूलच वेळ नसल्यामुळें आम्हांला सर्व कामें त्यांची वेळ सांभाळून त्यांच्या घरीं नेऊन दाखवावीं लागत. त्यामुळें आमचा बराच वेळ मोडूं लागला. पूर्वीचे सेक्रेटरी जवळच राहात असल्यामुळें केव्हांच कामें उरकून जात. आतां दोन दोनदां जावें तरी सेक्रेटरी साहेबांची गाठ न पडल्यामुळें कामांत व्यत्यय येऊं लागला. ते मोठे गृहस्थ असल्यामुळें त्यांच्या मर्जीप्रमाणें आम्हांला घ्यावें लागे. कारण त्यांची मर्जी अप्रसन्न झाल्यास सगळेंच ओम फस ! मग आमचें काम कितीही चांगलें असलें तरी त्यांच्या मोठेपणामुळें आम्हांला विचारतो कोण ? व आमची कींव येते कोणाला ? हा सर्व असा जगाचाच न्याय आहे. लहानाला मोठ्याच्या तंत्रानेंच चाललें पाहिजे. त्या शिवाय गत्यंतर नाहीं. विरुद्ध वागल्यास त्याच्या फजीतीला पारावारच नाहीं. तरी गोळवलकर साहेबांचा स्वभाव उमदा असल्यामुळें त्यांतल्या त्यांत आम्हांला कांहीं त्रास झाला नाहीं. ते जरी मोठे होते तरी आम्हां शिक्षकांचा ते मान ठेवीत, व आमच्याशीं मोठ्या दिलदारपणानें वागत. असे मोठे गृहस्थ सेक्रेटरी लाभल्यामुळें शाळेचाही मान वाढला. सरकार दरबारचीं कामें लवकर होऊं लागलीं. कारण सरकारी अधिकारीही त्यांना मान देत व त्यांनीं कोणतीही गोष्ट म्हटली कीं, तावडतोब त्या गोष्टीकडे अधिकाऱ्यांना लक्ष द्यावें लागे.

## एक विलक्षण योगायोग

अशाच संधीस रा. रा. तिळकटराव लेले म्हणून एक पुण्याकडील गृहस्थ येथें हितकारिणी हायस्कूलमध्यें मास्तर म्हणून आले. ते मोठे धोरणी, मुत्सद्दी, व आपल्या कामांत दक्ष, कमी बोलणारे असे असल्यामुळें विद्यार्थी, शिक्षक,

कमेटी वगैरे सर्वांवर लवकरच त्यांची छाप बसून ते सर्वांना प्रिय असे वाटूं लागले. ते मनोहरपंताच्या वाड्यांत राहात असल्यामुळें मनोहरपंतांना वाटलें कीं, ह्यांना जर मराठी कमेटीच्या शाळेंत घेतलें तर आपल्याला मदत करण्याचें कामास ह्यांचा आपल्याला बराच उपयोग होईल. असें त्यांचे मनांत येतांच त्यांनीं लागलीच लेल्यांच्याजवळ गोष्ट काढली. त्यांची मान्यता मिळतांच कमेटीकडून मंजुरी घेऊन अ. सेक्रेटरी म्हणून लागलीच त्यांची नेमणूक झाली. आतां शाळेचे कामात लेले साहेबांची मदत मिळूं लागल्यामुळें मनोहरपंतांना जरा हलकें झाल्यासारखें वाटलें, व त्यांच्या मागची काळजी दूर झाली. आता आमचा लेले साहेबांशीं बराच संबंध येऊं लागला. पूर्वी ते एक शिक्षक म्हणून आम्हीं त्यांना ओळखीत होतों. परंतु आता अधिकारी या नात्यानें ओळखूं लागलों. शाळेचें इतर कामांत तर त्यांची आम्हाला मदत मिळेच पण आतां शिक्षणाचें कामातही आम्हांला त्यांची फार मदत होऊं लागली. तसे त्यांचे सर्वच विषय चांगले होते. परंतु त्यांतल्या त्यांत गणित हा विषय फारच उत्तम असल्यामुळें पुष्कळशा गोष्टी आम्हीं त्यांचेकडून समजावून घेतल्या. गणिता संबधीं त्यांना प्रायमरी शिकतांना काय अडचणी गणितांत येतात हें त्यांच्याकडून आम्हीं समजावून घेतलें. पूर्वी शाळेंत जरी आम्हीं शिकून भराभर परीक्षा दिल्या नाहींत तरी ती उणीव आम्हाला आमच्या नोकरीच्या वहिवाटींत मॉडेल हायस्कूलचे शिक्षकांकडून रा. काळे, श्रीमान् लेले, श्रीयुत राजवाडे, प्रो. कानेटकर, प्रो. वैद्य, रा. कासखेडीकर, रा. सदाफळे, रा. जोशी मास्तर, मि. क्षीरसागर अशा माननीय शिक्षक वर्गाकडून सर्व विषयांत आम्हांला शिक्षणाचे धडे मिळून जवळ जवळ आम्हीं त्यात तरबेज झालों. व प्रायमरी शिक्षण म्हणजे आमच्या तळ हाताचा मळ असें आम्हीं आपल्या मनांत म्हणू लागलो. त्यातल्या त्यांत हडाकर वकील साहेब यांचेकडून मुलाच्या बक्षीस समारंभाचे तयारीस लागणाऱ्या गाण्यासंबंधी फार मोठें सहाय्य झालें. त्यानीं मोठ्या आनंदानें अशा गाण्याचे वेळीं स्वत: शाळेंत येऊन अगर मुलांना आपलें घरीं बोलावून तो विषय त्यांनीं पक्का करून घ्यावा. आम्हांला त्यांत पहावे लागत नसे. ह्या सर्वांच्या उपकाराबद्दल मी स्वत: त्यांचा अत्यंत ऋणी आहे, व माझे

सहाय्यक शिक्षकही त्यांना तसेच पूज्य मानतील असें मी समजलों तर त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं इतके लेले साहेबाचे आमच्यावर उपकार झाले आहेत. आम्हीं कोठें कोठें चुकतों हें त्यांना ठाऊक होतें. आमचीं आपसांतील भाडणें त्यांना अवगत होतीं कोठें कसें वागावें, कशा चुका दुरुस्त कराव्या, ह्या विषयीं सुद्धा ते आह्मांला वेळोवेळीं पाठ देत. मी स्वतः तर इतकेंच ठरविलें होतें का, जी कांहीं आपली अडचण असे ती त्याचे चरणीं पहिल्या प्रथम निवेदन करावी जसें काहीं घडलें असेल तसें जाऊन त्यांना सांगावें मग ते त्यातून मारोत किंवा तारोत ह्यातून अशा चुका नेहमीं घडत व त्यांतून त्यांनी आपल्या चातुर्यानें योग्य सलाह देऊन आह्मांला वाचविलेंही आहे. आमच्या कारकीर्दीच्या शेवटपर्यंत तेच आह्मांला फार उपयोगी पडले आहेत. आमच्यामागें अद्यापही तशींच सलाह ते हल्लींच्या शिक्षकांनाही देतात, असें मी परवा नुकतेच प्रत्यक्ष पाहून आलों. लेले साहेबाचे वडील हे माझे आद्य गुरू लेले ह्यांचे वडीलांनीं माझी पहिल्या वर्गाची परीक्षा घेऊन त्यांत त्यांनीं मला पास केलें हें मागें एका प्रसंगीं सांगितलेंच आहे. आता प्रत्यक्ष त्याच्या चिरंजीवाच्या हाताखालीं काम करून आज जवळ जवळ ३० वर्षे शिक्षण संपादन केलें व ज्या गोष्टी मला अवगत नव्हत्या त्या शिकून त्यांत तरबेज झालों हा योगायोगच म्हणावयाचा तर काय? असे जन्म जन्मांतरीचे ऋणानुबंध असतात. ते अशा तऱ्हेनें योग पडून पुन पुन जुळून येतात पुढें पुढें मनोहरपंताच्या कामाच्या अति व्याप्तिमुळें सेक्रेटरीचें काम त्यांना सोडावें लागलें

## लेले सेक्रेटरी होतात

श्री. लेले हेच सेक्रेटरीचें काम पाहूं लागले. अ सेक्रेटरी खंडकर मास्तर हे कित्येक दिवस होते. सन १९२९-३० चे सुमारास लेले साहेबांनींही सेक्रेटरीचें काम सोडलें, व त्यांच्या जागीं बॅ. शेवडे हे काम पाहूं लागले. ह्या सेक्रेटरींनीं आपल्या कारकीर्दीत बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. अखेरीस म्युनिसिपल कमेटीच्या नियमाप्रमाणें ही सेक्रेटरीची जागाच बंद करण्यांत येऊन हेडमास्तरनेंच स्कूल कमेटीच्या सेक्रेटरीचें काम पाहावें असें ठरलें त्या प्रमाणें मी स्वतः एक वर्ष सेक्रेटरीचें काम केलें. आतां हेडमास्तर हायस्कूल कमेटीचा सेक्रेटरी कायम असल्यामुळें तसा अधिकार दुसऱ्या

कोणाकडे राहिला नाहीं स्कूल कमेटी मात्र पूर्वी प्रमाणेंच कायम आहे प्रत्येक तीन वर्षांनीं कमेटीची नवीन निवडणूक होऊन त्याप्रमाणें म्युनिसिपालिटीकडे कळवावें लागतें.

## स्कॉलरशिप प्रकरण पुढे चालू

मुलामुलींची शिक्षण विषयांत प्रगती व्हावी व त्यांना उत्तेजन मिळावें म्हणून सरकारनें प्रायमरी शाळेंतील मुलांची गणित, भाषा आणि भूगोल ह्या विषयात स्कॉलरशिप परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या अशा विद्यार्थ्यांना प्रत्येक जिल्ह्यातून एक रुपयापासून ४ रुपये किंमतीच्या अशा सुमारें ४०–५० स्कॉल-शिप्स ठेवलेल्या असत याबद्दल मागें थोडा उहापोह केलाच आहे आतां थोडें जास्त वर्णन करून त्याची माहिती देत आहे ती परीक्षा वार्षिक परी-क्षेच्या पूर्वी दोन महिने म्हणजे फेब्रुवारीस होई ही स्कॉलरशिप सिस्टिम १९१३ पासून सुरू झाली पहिले वर्षी परीक्षा न घेतांच गेल्या वर्षाच्या परीक्षेच्या अनुभवानुसार कांहीं मुलें निवडून काढून त्यांना स्कालरशीप देण्यात आली पहिल्या वर्षी आमच्या शाळेंतील मुलाला ४ रु प्रमाणें चार वर्षे स्कॉलरशिप मिळत राहिली. १९१४ पासून नियमित परीक्षाच सुरु झाली. पहिल्या प्रथम हेडमास्तरानेंच आपल्या रोजच्या अनुभवावरून मुलें निवडून पाठवावीं असा परिपाठ होता त्या प्रमाणें आम्हांस हुकूम झाला कीं, मुलांची एक यादी आम्हीं लिहिलेले खाने पुरे करून पाठवा. त्याप्रमाणें आम्हीं त्या वर्षी ३ मुलांची निवड करून तीं मुलें परीक्षेस बसविलीं दैव योगानें तिन्हीं मुलांचा नंबर वर येऊन प्रत्येकास चार चार रुपये स्कॉलरशिप मिळूं लागली. पहिले वर्षीच ह्याप्रमाणें कल्पनातीत यश आल्यामुळें सर्व जिल्ह्यांत आमच्या शाळेचा बोलबाला झाला "मराठी स्कूलने तो डंका बजाया" असें हिंदी मास्तर सुद्धां बोलूं लागले अशी घडी पहिल्या वर्षीच बसल्यामुळें पुढेंहि १० वर्षेपर्यंत असेंच यश येत गेलें. कधींही अपयश पदरी घतलें नाहीं दिवसें दिवस अशी कीर्ति पसरत गेल्यामुळें प्रत्येक मुलालाच वाटूं लागलें कीं, आपणही परीक्षेस बसावें. स्कॉलरशिप मिळवावी हेतु स्तुत्य होता. परंतु ही गोष्ट सर्वांनाच कशी साध्य होणार ? मास्तर मेहनत सर्वांवरच करतात परंतु त्यांतल्या त्यात डावा उजवा हात आहेच कीं सर्वच मुलें परीक्षेला बसवा, सर्वच पास करवा, सर्वांनाच

स्कॉलरशिप मिळूं या अशा अशक्य कोटींतील गोष्टी लोक बोलूं लागले. ज्या मुलाला परीक्षेला न बसविलें त्याचे आईबाप नाराज होत. ते हा विचार करी-नात कीं, बाबानो आमचें व मुलांचें वैर कां आहे? आम्हांला तर जितकीं मुलें परीक्षेला बसतील, पास होतील तितकीं हवींच होतीं. त्यात आमचेंच नांव होणार होतें. मग आम्हीं खटपट कां करणार नाहीं? पण थोडी सबूर करून सारासार विचारही पाहिला पाहिजे. कोणी हा विचार करीना कीं, स्कॉलरशिप मिळविणें ही काय परसांतील भाजी आहे? गेले आणली उपटून! कीं टाकली फोडणीला!! असें असतें तर मग परीक्षेची तरी काय जरूर होती? सर्वांनांच स्कॉलरशिप देतां आली असती पण तसें होत नाहीं. त्याला थोडी बुद्धि लागते तारतम्य ज्ञान पाहिजे मास्तरांनीं व मुलांनीं कसून मेहनत केली पाहिजे. ही चढाओढ आहे. विशेष बुद्धिवान मुलें असतात, तींच हात मारून जातात बाकीच्यांना स्वस्थ बसावें लागतें. म्हणून शाळेचें नाव राहतें. ह्या करिता शिक्षकांकडूनच निवड होऊन मुलें परीक्षेला बसविलीं जात. तीच रीत बरी होती. पुढें सवधान बारा पसेरी झाल्यानें परीक्षेचा रंगही पालटला, व अपयश पदरात घेऊन हात चोळीत स्वस्थ बसावें लागलें. अशी चुरस उत्पन्न झाल्यामुळें शाळेचें नुकसान होऊं लागलें.

## शिकवण्यावर एका गृहस्थाचा कटाक्ष व माझें त्याला उत्तर

माझ्या आयुष्यांत माझी शाळा जितकी हितकारक व कीर्ति वाढविणारी झाली, त्याच्या खालोखाल मला माझ्या शिकवण्यानाही महत्व देणें भाग आहे कित्येक लोक व अधिकारी माझ्या असे पाहण्यांत आले कीं, शिकवण्याचा आणि त्याचा उभा दावा. मी एके प्रसंगीं तासगांवास गेलों असतांना एका मोठ्या अधिकाऱ्यांजवळ, ज्याचा शाळांशीं निकट संबंध होता, त्याच्याजवळ बसलों असतांना असा एक शिकवण्या करणाऱ्या मास्तरांबद्दल अत्यंत वाईट शब्द ते बोलून गेले मग त्याचे त्यानांच काय वाटलें कोणास ठाऊक? ते मला म्हणाले, निळोबा, मी तुला खरें सांगतों, हे मास्तर लोक फार वाईट आहेत. आपला वेळ सर्व शिकवण्यांत दवडून शाळेच्या कामांकडे दुर्लक्ष करितात, व भराभर शिकवण्या करीत फिरतात. मी म्हणालों, साहेब आपलें म्हणणें ठीक आहे परंतु त्या शिक्षकाला आपण पगार असा किती देतां? त्यांत त्यानें

आपल्या बायकोचें, मुलाचें, आईबापांचें पोट कसें भरावें ? आपलें म्हणणें असें आहे काय, कीं पोटांत काटे भरून फटींगासारखे राहून आपली नोकरी त्यानें बजावावी ? तुम्हांला मात्र मोठमोठे पगार पाहिजेत तुम्हीं म्हणाल कीं, आम्हीं इतकें शिकलों, हाडाचीं काडें करितों, तें काय उगीच ? केवळ परोपकार ह्मणून मी म्हटलें कीं, प्रायमरी शिक्षक म्हणजे कांहीं तुमचा गुलाम नव्हे त्याच्या ऐपती-प्रमाणें व बुद्धीप्रमाणें त्याला चार अक्षरें शिकावींच लागलीं त्याच्याही परीक्षा झाल्या, तर त्याच्या मगदुराप्रमाणें त्याच्या पोटाची तुम्हांला सोय केली पाहिजे मी पुष्कळ ठिकाणीं पाहतो कीं, प्रायमरी शिक्षक म्हणजे अगदीं हलका दर्जा अरे पण असें का ? मी म्हणतों त्याची योग्यता फार मोठी आहे फार झालें तर कारागिराचा पगार त्याला नका देऊं. पण मजुरी तर त्याला पोट भरण्यापुरती द्याल किंवा नाहीं ? योग्यता मोटी म्हणजे कशी याचें मी एक उदाहरण देऊन तुम्हांला ती गोष्ट सांगतो कुंभाराजवळ एक चिखलाचा गोळा टेविला आहे तो त्यांतील थोडा थोडा चिखल घेऊन चाका-वर चढवून आपल्या मनाप्रमाणें त्या चिखलाला आकार देऊन एक उत्कृष्ट भांडें तयार करितो तीच गत ह्या प्रायमरीच्या शिक्षकाची आहे आपण अप्रबुद्ध असें एक कोवळें बालक त्या मास्तररूपी कुंभाराजवळ चिखला-प्रमाणें नेऊन दवडितो त्या देठेला त्या मुलाला काय समजत असतें ? शिक्षकाला पाहिल्या बरोबर त्याला आधीं रडू येते येथून सुरुवात अशा त्या मुलाला प्राथमिक शिक्षणाकरिता तयार करावें लागते त्यात का त्यानें थोडी कसर केली कीं त्या मुलाची स्थिती काय होणार ? बुद्धि असली तरी त्याला चांगला वाईट बनविणें सर्वस्वी त्या मास्तररूपी कुंभाराकडेच असतें. तेव्हां महाराज तुम्हीं अशा व्यक्तींची अवहेलना करू नका. योग्य तें त्याच्या पोटाला द्या मग चापून त्याच्याकडून काम घ्या त्या नंतर मी जबलपुरास आलों व निश्चयच केला कीं, शाळा व शिकवण्या दोन्हीही करावयाच्या व दोन्हीं बाबतींत यश मिळवून हा धंदा जो अगदीं हलका समजतात त्याला थोडी उर्जितावस्था आणावयाची

## माझें शिकवणी पुराण

ह्या अशा शिकविण्या मिळविण्याकरितां मला कधीं खटपट करावी लागली नाहीं आपोआप चालून त्या घरीं येत माझें काम भागून त्या पैकी काही मीं

आपल्या सहाय्यक शिक्षकानाही राखून ठेवी मी नियमच ठेविला होता कीं, चार शिकवण्या करावयाच्या. एखादे प्रसंगीं ५ वीही करावी लागे पण विशेष असा मी तिच्या मार्गे लागलों नाहीं अशी माझी अगदीं पहिली शिकवणी रा केशवराव परांजपे यानीं आणिली रा नारायणराव पुरोहित म्हणून लोकल ऑडिटर जबलपुरकडे सरकारी ऑफिसांत पाहणी करण्याकरितां आले होते. त्याच्या मुलाला मराठी शिकविण्याकरिता म्हणून त्यांनीं मला ठेविलें तो मुलगा इंग्रजी दुसरींत शिकत होता त्याला हिंदी इंग्रजी विषय शिकविण्याकरितांही एक मास्तर आणखी येत असत. मी लवकरच त्यांची मर्जी सुप्रसन्न करून घेतली व ते मला आपल्या घरच्या सारखाच एक मनुष्य असें समजून माझ्याशी त्यांनी वर्तन ठेविलें तसेंच त्याना नेहमीं दौऱ्यावर जावें लागे तेव्हा बाजार हाट वगैरे किरकोळ कामेंही त्याचीं मलाच करावी लागत. नित्य नैमित्तिक पूजा अर्चा वगैरेही मला सांगणें भाग पडे अशा रीतीनें ती पहिला शिकवणी यशस्वी होत गेल्यामुळें माझा जम बसत चालला त्याच्या मंडळीच्या मार्फत माझी एक प्रकारची जाहिरातच होऊ लागली त्या बाई मोठमोठ्याच्या घरीं बसावयास जात तेथें सहाजिकच गोष्टी निघत काहो तुमच्या मुलाला कोण शिकवितो ? पहा बाई आमचा बाळया आम्हीं येथे आल्यापासून अगदीं ढोण्या होत चालला आहे मराठी शिकविणारा कोणी मिळत नाही काय करावें ? येथून बदली करून घ्यावी नाहींतर मुलाचें नुकसान होणार मग ह्या बाई त्यांना म्हणत. अशी काळजी कां करिता ? आमच्याकडे एक मास्तर येतात त्यांना उद्या तुमच्याकडे पाठवून देतें. त्याची शिकवणी तुम्हीं एकदा सुरू केली तर येथून बदली करून घेऊन दुसरीकडे जावें असे तुमच्या मनांत सुद्धा येणार नाहीं मी उगीच तारीफ कशाला करू ' तुम्हाला अनुभवावरून कळेलच मग तुम्हींच त्यांची दुसरीकडे वर्णी लावाल ! झालें ' लागलीच साठे म्हणून एक मोठे जंगल खात्याचे ऑफिसर असत त्याच्या मुलाला शिकवण्यास जाऊं लागलों मग भिडे, मोडक, देवधर, वरवंडकर अशा १८९४ ते १८९९ पर्यंत ४–५ शिकवण्या चालल्या. १९०० सालीं राजासाहेबाच्याकडची शिकवणी लागली ही शिकवणी माझी एका मागून एक विद्यार्थी त्यांच्या घरींच

मिळत गेल्यामुळें पुढें २६-२७ वर्षे चालली इतक्या दीर्घकाळ शिकवणी केल्याचें हें एकच उदाहरण माझे पाहण्यांत आहे. कारण त्याचा मी प्रत्यक्षच अनुभव घेतला आहे. मी तांसगांवास ४ थ्या वर्गांत शिकत होतों त्या वेळीं आमचे त्या वर्गाचे मास्तर दिवेकर हे बापुसाहेब तासगांवकराचे चिरंजीव भाऊसाहेब ह्यास शिकविण्यास जात त्या वेळेस आह्मास पोर बुद्धीनें वाटे कीं, आपल्यालाही अशा राजेलोकांच्या मुलाची शिकवणी शिकविण्यास मिळेल कां ? आपल्याला कांहींच येत नाहीं तेव्हां मास्तरकी तरी कोण देणार ? व अशा मोठ्या घरीं आपला शिरकाव तरी कसा होणार ? असे कांहीं तरी मनांत विचार येत व आपले आपल्यालाच त्याचें हसूं येऊन शेख महंमदाप्रमाणें सर्व विचार लागलीच विलयाला जात अशा त्यावेळी मनांत घोळत असलेली गोष्ट मूर्त रूपानें आज आपल्या पुढें उभी राहिलेली पाहून त्या योगायोगाचें मोठें कौतुक वाटतें त्या पेशव्यांच्या सरदारीच्या मुलांना नाहीं तर नाहीं पण त्याच पदवीचे गोविंद पंत बुंदेले ह्यांच्या वंशजांना खास शिकविण्याचा योग येऊन २६ वर्षे त्या वंशाची सेवा करण्याचें महत् भाग्य मला लाभून त्या वेळचे माझे हेतु आज सफल झाले ह्या बद्दल मी आपणाला मोठा धन्य मानतों अशाच एका कार्य प्रसंगीं मी त्या वेळचे राजासाहेबांचे दिवाणजीस विनंती केली कीं, अशा आनंदाच्या उत्सव प्रसंगीं आह्यांलाही कांहीं बक्षीस मिळावें तेव्हां ते उत्तर काय देतात ? तुमच्या सारख्या प्रायमरी शाळेच्या य:कश्चित् शिक्षकाला बक्षीस तें काय द्यावयाचें. तुम्हाला पगार मिळत नाहीं कां ? उद्यां रामा गाडीवान सुद्धां बक्षीस मागेल म्हणून त्यांना तें द्यावयाचें काय ? तसेंच तुम्ही ' ! '

हें त्यांचें उत्तर ऐकून आम्हीं चूप बसलो काय बोलणार ? ते पडले दिवाण श्रीमंतांचा त्यांना आश्रय ते म्हणतील तसे होणार खरेंच आम्हीं य:कश्चित् मास्तर बिदागी काय मागावयाची ? मी आपलें बोलणें मनातच ठेविलें व म्हटलें कीं, ह्याचें उत्तर बक्षीस घेऊनच दिलें जाईल. आज त्याची वाच्यता कशाला ? श्रीमंताचें घरचें कार्य आशा सगळ्यानांच असतें तशात तें मानानें मिळालेलें चांगलें योगायोग बक्षिस मिळण्याचा आला मानकरी लोकांच्या याद्या झाल्या त्यांत आमचा गुरुजी म्हणून बराच वर नंबर

लागून आम्हा दोघां मास्तरांना म्हणजे गणपतराव करमरकर व मी अशा दोघांनाही महावस्त्राची बिदागी सन्मानपूर्वक दिली गेली दिवाणजीला कांहीं मिळालें नाहीं ते हात चोळतच राहिले मी त्यांना त्या वेळेला उत्तर दिलें व म्हटलें हा रामा गाडीवान नाहीं हे गुरुजी आहेत ह्यांच्या पायां पडून ह्याना बिदागी द्यावी लागते हें ध्यानात ठेवा व पुढे असा कोणाचा अपमान करूं नका मोठे झालात तर आपल्या घरचे आम्हाला त्याचें काय ? त्या नंतर ह्याच २०-२५ वर्षांत रामराव दाते, तहसीलदार, शिरोळे, पराजपे सबजज्ज, डॉ काणे, पराडकर, पोहनकर, बेलापूरकर, जोशी, नावलेकर, नारायणराव जोशी, गोळवलकर, ताम्हनकर, मोने, परांडे, खांडेकर, डॉ. हर्षे कोयल, फडके, शामराव शिंदे, साने कट्राक्टर, कर्णिक वगैरे मोठ मोठ्यांच्या घरीं शिकवण्या करण्याचा प्रसंग आला पण माझ्या कामावर सर्व खुष राहून कोणीही अव्हेर केला नाहीं व सर्व तऱ्हेनें माझ्या संसारांत मदत करून मला उतराई करून ठेविले ह्या पालकाना मी म्हणे मला एखादें लेखी सर्टिफिकेट द्या तर ते म्हणत तुम्हांला सर्टिफिकेट तें काय द्यावयाचें ? मुलगा शिकला, पास झाला म्हणजे तुमची आपोआपच शिफारस होते ती त्यांत आमच्या दोन ओळींनी काय भर पडणार आहे ? सर्टिफिकट कोणाला तर एखाद्या आळशी कामचुकार मनुष्यानें त्याची इच्छा करावी कारण त्या सर्टिफिकेटावरच त्याचें जीवित अवलंबून असून निदान दोन चार महिने अशा वशिल्यानें उदरनिर्वाह चालावयास हरकत नाहीं. तुम्हीं झाले, गणपतराव झाले ह्यांना दाखल्याची कांहीं जरूरी नाहीं व अशांनीं ते मागूंही नाहीं मी अशी सर्टिफिकेटें कधींच गोळा केलीं नाहींत आपोआपच माझी शिफारस होई व वरच्या प्रमाणे माझी वर्णी लागे एक दोन गृहस्थाचा तर इतका माझ्यावर विश्वास कीं, कसेही करा पण आमच्या मुलाना पास करून द्या आम्ही तुमची शिकवण्या शिवाय निराळ्या तऱ्हेनें संभावना करूं, व मुलाला बरोबर देऊन प्रवासास पाठवूं. पण मुलगा पास होतो कसा ? हीं दोन्हीं मुले गणितात कच्चीं वर्गांतील सर्व मुल पास झालीं परंतु हे राजेश्री गणितात नापास व्हायचे ते झालेच कितीही उत्तम शिक्षक असला तरी अशा प्रकारचे विद्यार्थी मिळाल्यावर त्यांना खालीं पाहण्याचा प्रसंग येणार मुलगा जरी नापास झाला तरी त्याच्या

पालकांना मास्तरांनीं श्रम केले आहेत ह्याची जाणीव होती त्यानीं मास्तराना दोष न देतां पूर्वीप्रमाणे प्रेम कायम ठेवून पुढील मुलाच्या शिकविण्या कायम ठेविल्या, व त्यांत तीं मुलें उत्तीर्ण झालीं पण असे प्रसंग शिक्षकावर नेहमी येतात म्हणून त्याची योग्यता कमी होत नाहीं सर्वच वेळा सारख्या नसतात कधीं चढ, कधीं उतार हा व्हावयाचाच कार्य करीत असावें ह्या प्रमाणें ठरविलेल्या उद्देशाप्रमाणे, कार्य करून, दोन्हीं योग्य रीतीनें चालवून त्यात ईश्वर कृपेनें यश संपादून लोकात बरें म्हणवून घेतलें

## मध्येंच ओढवलेला एक दुःखकारक प्रसंग

म्युनिसिपलिटीला सर्व शाळा दिल्या गेल्या त्याबरोबर आमचीही शाळा दिली गेली नवें राज्य नवी विटी सुरु झालें सर्व्हीस बुकें भरलीं ऑडिट होऊं लागलें आतां बढती ओहोटा सर्व अधिकार डे इन्स्पेक्टरकडे आले ग्रेडलिस्ट प्रमाणें पगाराची बढती होऊ लागली. ह्याच वर्षी एका एकीं एक दुःखाचा प्रसंग ओढवला तो हा कीं, दिनकर भटजी हे कैलासवासी झाल्याचें वृत्त एका एकीं येऊन थडकलें आतां आईचा आधार नाहींसा झाला ते होते तोपर्यंत आह्मांला काहींच तिकडची काळजी नव्हती त्यांचीही बायका मुलें उघडीं पडलीं दिनकर भटजीचें मरणाचे वृत्त ऐकून तासगांवी जावें, आपल्याकडून कांहीं जमल्यास त्यांना मदत करावी मुलें बाळें इकडे येत असल्यास त्याना व आईलाही इकडे घेऊन यावें इतक्या गोष्टी करण्यांस २००–३०० रुपयाची तरी त्यावेळीं आवश्यकता वाटली. तरी धाडस करून मनमानडला मी दादांच्याकडे गलों त्यांचा विचार घेऊन पुढें काय करावयाचें तें ठरवावें असा विचार होता त्याप्रमाणें दिनकर भटजीच्या सासऱ्यालाही कळविलें होतें मी तिकडे येतों आपण तांसगांवीं हाजर असावें परंतु दादाचा सल्लाह घेतां त्याचा विचार असा दिसला कीं, मी तिकडे न गेलेला बरा कारण ही मोठी आणीबाणीची वेळ आहे कोणी आतां पाहण्यास जबाबदार नाहीं तूं गेलास तर तुझ्यावरच कांहीं संकट यावयाचें दुसरें तिकडून कोणी येणार नाहीं. ती बाई आपलें माहेर सोडून इतक्या लांब कशाला येईल? तर मला वाटतें कीं, तू तिकडे जाऊं नयेस असा त्यांचा विचार पडल्यावर मग मी आपलें तिकडचें जाणे रहित केलें. गेलों तसा परत आलों. हें त्यांचें

म्हणणें खरें यमूच्या लग्नात इनकें अगत्यानें बोलविलें असता तिकडून कोणी आलें नाहीं मी १९११ सालीं तामगावीं गेलों असतां मी येणार हें ठाऊक असून दिनकर भटजी बाहेरगांवीं निघून गेले. पुढें माझ्याशीं पत्र व्यवहार मुद्धां बंद केला सागण्याचा मतलब इतकाच कीं, त्यांचा मुलगा विनायक हा शिकण्याकरितां दत्तूकडे राहिला असतांना मी जबलपुरात त्याला, मला भेटण्या करिता बोलाविलें होतें परंतु तो येऊन भेटून सुद्धां गेला नाहीं परंतु पुढें आजपर्यंत त्याचें आमचें दर्शन मुद्धा नाहीं. हा योगायोग आह्मां दोघा भावामध्यें लहानपणापासूनच अशा तऱ्हेचा भाव उत्पन्न झालेला कीं, दूर दूर राहिलेलेंच बरें ! कोणाचा कोणाला संपर्क नको दादा हे अनायासें दूर होतेच तेव्हाच मी मनात समजलो कीं, आपण एकटें जन्मलों असे एकटेच जाणार

## १९१६ सालांतील प्लेगचें वर्णन

इकडे यमूचें लग्न झालें ती आपल्या सासरी गेली. १९१६ चा डिसेंबर उजाडला गांवांत प्लेगची आवाई ऐकूं येऊ लागली आता ५ वर्षानंतर ही स्वारी होती उदीर पडूं लागले. आमचे स्नेही ह्याचे घरा जवळपासच उंदीर पडू लागल्यामुळें ते रानांत राहावयास निघून गेले यंदा प्लेग कँप मदन महाल स्टेशनच्या समोर ओमतीच्या काठीं होता. त्या ठिकाणींच म्युनिसिपल कमेटीनें पत्र्याच्या पुष्कळशा झोंपड्या आणून टाकल्या होत्या ज्याला लागेल त्यानें त्याचा उपयोग वेळेवर करावा व त्याचें भाडें ४ महिन्याचें म्हणून ४॥ रुपये म्युनिसीपालटी ऑफिसमध्यें भरून पावती घ्यावी. असा नियम होता अजून जागा साफ झालेली नव्हती नुसत्या झोंपड्याच ठेविलेल्या होत्या तशातच ते स्नेही तेथें जाऊन राहिले आसपास सोबत कोणी नाहीं जिकडे तिकडे गवत उगवलेलें पण करतात काय ? गावातील भीतीपेक्षां हे कष्ट बरें असे समजून ती रात्र तर त्यांनीं एकट्यांनीच तेथें काढली , दुसरे दिवशीं आम्हीं सर्व मंडळी, गणपतराव करमरकर, दुसरे मास्तर वगैरे आम्हीं सर्वांनीं मिळून त्यांना सोबत म्हणून त्याचे जवळच झोंपड्या उभारल्या व त्यात जाऊन राहिलो

आम्हीं जसे येऊन राहिलों तसे आमचे पाठी मागून भराभर आणखीही मडळी येऊं लागली, व सर्व कँप ८-१० दिवसात भरून गेला शाळाही बंद झाल्याच होत्या. परंतु त्या वर्षी सर्कल इन्स्पेक्टर साहेबांनीं हुकूम काढला कीं,

म्युनिसिपालिटीनें शाळेकरितां गवताच्या झोंपड्या बांधून द्याव्या व सर्व म्युनिसिपल शाळा त्यांत भराव्या शिक्षक लोकांनीं सुट्टीशिवाय बाहेर कोठें जाऊं नये तीन तास शाळा भराव्या असा हुकूम होतांच भराभर झोंपड्या तयार होऊं लागल्या आमची सर्व महाराष्ट्र मंडळी आमच्या झोंपडीच्या आसपासच वसली होती म्हणून म्युनिसिपालिटीकडून आम्हीं शाळेकरितांही झोंपडी आमच्या राहण्याच्या झोंपडी जवळच उभी करविली त्यात शाळा भरूं लागली शाळेची अशी सोय झाल्यानें आता मुलाचें शिकण्याचें नुकसान न होतां अभ्यास होऊं लागला नाहींतर चार महिने शाळा बंद झाल्याचें योगानें सर्व विद्यार्थी जवळ जवळ कोरे होऊन येत. पुन: सर्व विषय करून घ्यावे लागत त्याचा परिणाम परीक्षेवर कांहीं तरी पडेच आता तसें न होतां थोडी तरी उणीव भरून निघेल असा भरंवसा उत्पन्न झाला अशाच प्रसंगीं दत्तोपंत मटंगे त्यावेळीं रॉबर्टसन कॉलेज मध्यें प्रोफेसर होते तेथें त्याच्या बंगल्याच्या आसपास प्लेग सुरू झाल्यामुळें ते फिकरींत पडले कीं, आता मंडळींना कोठें पाठवावें ? कारण त्याच्या कुटुंबाला ९ महिने भरून बाळंतपणाची संधी अगदीं जवळ येऊन ठेपली होती अशा वेळीं कुटुंबाला कोठें पाठवावें ? ह्या फिकीरींत ते होते आमच्या कुटूंबाची ती बहीणच असल्यामुळें आम्हीं त्याना सांगितलें कीं, तुम्हीं कांहीं काळजी करू नका आम्ही आमच्या झोंपडींत त्यांच्या बाळंतपणाची सर्व सोय करूं त्याना इकडे पाठवून द्या. अशी त्याची सोय झाल्यामुळें त्या बाई मुलांना घेऊन आमच्या झोंपडींत राहावयास आल्या आमच्या सासुबाईही ह्यावेळीं येथेंच होत्या त्याही आम्हांला त्या बाळतपणाच्या वेळीं फार उपयोगी पडल्या. ह्या प्रमाणें सर्व गोष्टी जुळून जिकडे तिकडे थोडें स्थिरस्थावर होत आहे तों जानेवारी महिना अर्धा होऊन संक्रांत आली. त्या संक्रांतीच्या हळदी कुंकवाला म्हणून आमच्या कँपमधील पुष्कळशा बायका व आमच्या घरची मंडळी कँपपासून ३–४ मैलावर राजासाहेब सागरवाले यांचे कँपात हळदी कुंकवास म्हणून गेल्या होत्या घरीं एकट्या मटंगीणबाई होत्या आम्हीं पुरुष मंडळी सुट्टी असल्यामुळें घरींच होतों संध्याकाळची वेळ एका एकीं आकाशात ढग उत्पन्न झाले पावसाची भीति वाटूं लागली झोंपडीचें राहणं इतक्यांत वारा सुरू होऊन पावसाचे थेंब येऊं

लागले कांही वेळ गडगड होऊन विजा चमकूं लागल्या मग काय विचारतां? जिकडे तिकडे कँपमध्यें एक धांदल सुरू झाली इतक्यात सोसाट्याचा वारा सुरू होऊन टीनाच्या झोंपड्या उडूं लागल्या त्यावेळीं कांहीं अनुभव नसल्या-मुळें विशेष बंदोबस्तानें त्या कांहीं बांधलेल्या नव्हत्या बाई एकट्या घरीं, तशात दिवस भरलेले, झोंपडींत सर्व सामान चिरगुटें पांघरुणें ठेविलेलीं. आम्हीं दोघांनीं मिळून झोंपड्या धरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्या झोंपड्या का आमच्या बापाला ऐकनात केव्हांच त्यांनीं आपली जागा सोडून तीन झोंपड्या पैकीं दोन झोपड्या उडून जवळच वाहत असलेल्या ओमती नाल्यात जाऊन त्यांनीं स्नान करण्यास आरंभ केला पाऊस म्हणतो मीं सर्व पाणी आत आतच येऊं लागलें. झोंपडींतील सर्व सामान भिजून चिंब आमचेंही कपडे भिजले. एवढी खैर की, अशा प्रसंगीं कोणास इजा मात्र कांहीं झाली नाहीं कँपातील बायका माणूस सर्व मंडळी बाहेर गेलेली थोडे बहुत पुरुष होते पण ते सर्व आपल्या झोंपड्यांच्या उस्तवारींत गुंतलेले, व अशा प्रसंगीं आपली झोंपडी सोडून कोणी येणार तरी कसें? सर्वत्र गोंधळ ' इतक्यात धरलेली तिसरी झोंपडीही उडून गेली मग आम्हीं विचार केला आतां जें व्हायचें असेल तें होवो. स्वस्थ बसावें. मीं त्या बाईना म्हटलें आता तुम्हीं स्वस्थ बसा कारण तुमचे दिवस भरलेले फट म्हणता ब्रह्महत्या असे व्हावयाचें अशा फिकीरींत आम्हीं सर्व आहों तोंच देवानेंच पाठविल्याप्रमाणें आमचे सेक्रेटरी लेले साहेब व त्यांचे आणखी दोन मित्र फिरत फिरत अकस्मात तेथें येऊन पोहोंचले, व त्यांच्या लक्षात तो सर्व प्रसंग आला लागलीच त्यानीं कपडे वगैरे भराभर फेकून आधीं त्या नाल्यांत पडलेल्या झोंपड्या चार पांच जणांनीं मिळून उचलून आणून पुन पूर्वीप्रमाणें झोंपडीवर बसविल्या. आतां पाऊसही थांबून वारा बंद झाला होता' अशा त्या त्रिमूर्तीनीं कृपा केल्यामुळें आह्मांला असें वाटलें कीं, आज दत्तात्रयच आमच्यावर प्रसन्न होऊन त्यानें आमची संकटातून मुक्तता केली म्हणून त्या त्रिवर्गाला मनांत अनंत धन्यवाद दिले ते निघून गेले. मग मी त्या तिन्हीं झोंपड्यावर मोठे वास बांधून त्या चारही बाजूस चांगल्या बळकट बांधून टाकल्या त्या योगानें आतां त्या उडण्याची भीति पुष्कळ अंशानी कमी झाली.इतक्या वेळ आह्मांला आमच्या मनींची आठवणच

नव्हती ती हळदीकुंकवाला जातांना तिला पाळण्यांत निजवून गेली होती व पाळणा जमिनीवरच होता आम्ही त्या गडबडींत भराभर चिरगुटें पाळण्याच्या आसपास टाकलीं त्या योगानें पाळणा आसपास पडलेल्या चिरगुटांनीं झाकला गेला, व मुलीला कांहीं त्रास न होतां उलटी ऊब येऊन ती पाळण्यांत स्वस्थ पडली होती व खेळत होती. इतक्यांत तिनेंही झालेला प्रकार पाहिला, व मग तिला मनीची आठवण होऊन मनी कोठें आहे ? म्हणून तिनें विचारलें. मग आमचे डोळे उघडले तोंपर्यंत आम्हाला कांहीं तिची आठवणच नव्हती कारण आम्हीं एकसारखे कामात असल्यामुळें विचार सुचण्याला चित्त स्थिर होतें कोठें ? अशा रीतीनें आठवण होतांच पाळण्या जवळची चिरगुटें बाजूला सारलीं. तो ती हसत पडलली झालें मग अशा त्या संकटांत सुद्धा जो हशा पिकला तो न भूतो न भविष्यति तीहि मडळी सर्व भिजूनच आली होती. जे कांही थोडे बहूत कपडे कोरडे राहिले होते ते सर्वांनीं नेसून व त्या-प्रमाणें आंथरण्या पांघरण्याची व्यवस्था करून ती रात्र कशीबशी काढली. उजाड-ल्यावर मुख्य काम हें केलें कीं, सर्व भिजलेले कपडे वाळत टाकले, व पुन. जागा वगैरे साफ करून आपल्या नित्य उद्योगाला लागलों पुढें त्या बाई योग्य वेळीं प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झालें. त्याचं नांव त्यांनीं नरसिंह असें ठेविलें आम्हा लोकांना पेढे खावयास मिळाले. तेच आमचे नानासाहेब बी एस सी इंजीनियरींग पास होऊन दिल्लीस मोठ्या पगारावर काम करीत आहेत अशा ह्या ऋणानुबंधाच्याही कांही गोष्टी केव्हां केव्हां घडून येतात

१९१६ पासून प्लेगचा जोर पुन दिसूं लागला. अशी भीति वाटू लागली की, आता प्रत्येक वर्षीं प्लेग येतो की काय ? असें वाटूं लागल्यामुळें झोंपडीचें सामान ह्या वर्षापासून आम्हीं राखून ठेवू लागलो त्यांतील कांहीं सामान दुसऱ्या वर्षाच्या प्लेगच्या वेळीं उपयोगी पडे १९१७ साली पुन प्लेग आला पूर्वी प्रमाणेच झोपड्या झाल्या लोक गांवाबाहेर पडले त्यांत पुष्कळांनीं इनॉक्युलेशन केले होते तरी सुरक्षिततेकरितां बाहेर पडणें आवश्यक म्हणून ज्याला शक्य तो रानात राहावयास जाई त्यामुळें प्लेगचा जोर कमी होऊं लागला शाळेच्याही झोंपड्या झाल्या. कॅंपमध्येच शाळा भरू लागला तोही एक काळ मजेचा गेला थंडी, वारा, पाऊस ह्या जरी आपत्ती क्षणोक्षणीं भेडसावित

होत्या तरी जीवन एक प्रकारानें सुखदायक जात होतें त्यावेळीं मोकळ्या हवेमुळें पचनशक्ति वाढून भूकही चांगली लागे व मनाला एक प्रकारचा आनंद वाटे. आमची गंगु १०–१२ वर्षांची होती ती चौथ्या वर्गांत शिकत असे मी मुलांना अभ्यास करून आणला नाहीं म्हणून त्या दिवशीं त्यांचेवर बराच रागावलों होतों तुम्हीं अभ्यास करीत नाहीं, आता लवकरच परीक्षा होणार ! तुम्हाला पास झालेंच पाहिजे कशी परीक्षा होणार ? कोण जाणे ? मी चिंतेत होतों अशा स्थितींत मी असतांना गंगू मला म्हणते काय ? बाबा ? तुम्हीं आम्हांला पुस्तकें घेऊन तर देतच नाहीं मग आम्हीं पाठ तरी कसे करावें ? तिचें म्हणणें खरें होतें. तिला मी अद्याप पुस्तकें घेतलींच नव्हतीं. कसे तरी दुसऱ्या मुलांच्या पुस्तकावर ती काम काढीत होती परंतु तिचें बोलणें मला त्या वेळीं फार लागले त्यावरून मी तिला रागें भरलो, व मारही दिला गरीबी मोठी वाईट असते त्यावेळीं आमचा पगार तो काय ? जेमतेम संसार चाले ' अशात प्लेग वगैरेंच्या अगातुक कारणामुळें मनुष्य भांबावून जाई ह्या महिन्याची त्या महिन्याला गांठ पडणें मुष्कील. तर पुस्तकां करितां पैसे कोठून खर्च करणार ? मग लागलीच संध्याकाळीं बाजारात जाऊन आधीं तिला पुस्तकें आणून दिलीं नंतर दुसरा उद्योग अशीच पुष्कळांच्या घरची स्थिती त्यांना वेळेवर पुस्तकें न मिळाल्यामुळे त्याचा अभ्यास तरी कसा होणार ? त्यांना आम्हीं बोलून काय उपयोग ? अशा तऱ्हेनें दिवस जात जात १९१७ चा हा प्लेग संपला. पुन. लोक गांवांत गेले पूर्ववत् व्यवहार सुरु झाले १९१८ साल उजाडलें.

## थोडी सांसारिक हकीकत व गंगूचें लग्न

गंगूच्या लग्नाची फिकीर सुरू झाली म्हणून स्थळ पाहण्यास सुरुवात केली मध्यंतरी कुशीच्या जन्मानंतर आतां आणखी एक बाळंतपण पार पडलें हा मुलगा झाला पण तो फार दिवस जगला नाहीं. वर्ष दीड वर्षांचा होऊन लागलाच गेला. असें आम्हांस ह्या वेळेपर्यंत पांच मुली व तीन मुलगे ह्या प्रमाणे ८ अपत्यें झालीं. पण त्यांतून एक मुलगी व दोन मुलगे लहानपणींच मृत्यू मुखीं पडली. राहतां राहिल्या चार मुली व एक मुलगा त्यापैकीं एका मुलीचें लग्न १९१६ सालीं उरकलें होतें. आतां गंगूच्या लग्नाचा विचार सुरु

२८८

आला स्थळें पाहता पाहतां बनारसचे कृष्णराव पा गो व त्यांचे एक आते बधू मुलास पाहण्यास आले परंतु त्या पूर्वीच एक नमूद करण्यासारखी गोष्ट घडली ती ही कीं, मुबई रेल्वेतील पेठे आडनांवाच एक गृहस्थ आमच्या एका लुच्चा मित्राच्या सांगण्यावरुन मुलीला पाहण्यास आले होते मी त्यांना स्टेशनवरुन घेऊन आलो ते घरीं आले मुलीला पाहिली, साखरपुडा दिला व आम्हीं घरीं गेल्यावर कळवितों असें सांगून मोठ्या सभ्यपणानें आले तसे ते निघून गेले आम्ही पत्राची वाट पाहत राहिलो महिन्या दिडमहिन्यानंतर एक निनावी पत्र माझ्या हातांत येऊन पडलें तें पत्र बहुतेक तो आमचा एक लुच्चा मित्र व ते पेठे गृहस्थ ह्या दोघांनीं मिळूनच लिहिलें असावें असा माझा आपला तर्क आहे ' तर्कच तो खरें खोटें ईश्वर जाणे त्यांनीं पत्र लिहिलें होतें, अशा आमच्यासारख्या स्थळें पाहण्याचे भानगडींत पडण्यापूर्वी नागपूरकडील कोणी आचारी पाणक्या पाहिला असता तर बरें झालें असते पुढें आम्हास कळले कीं, त्याना नवीन चालीची, वांकड्या भांगाची, तोंडाला पावडर लावणारी, पदर खालीं वर करणारी, इंद्रभुवनांतील एक अप्सरा पाहिजे होती. मग त्यानीं तरी आमच्या सारख्या घरंदाजाची मुलगी पाहण्याचे श्रम कशाला घ्यावे ? आम्हांलाही कोणी तिला पत्करणारा मिळेलच अशीं पुष्कळ स्थळें होता होतां वरील पावणी आले. त्यांनी मुलगी पाहिली त्या दोघांना मुलगी पसंत पडली लागलीच त्यांनीं साखरपुडा वगैरे दिला व वडीलांना विचारुन लवकरच कळवितों असे सांगून गेले लागलीच त्यांनीं वडीलाची सलाह घेतली ज्योतिषी बरोबर होतेच त्यानीं पत्रिका पाहिलीच होती ती उत्तम होती. गोत्राशींही पटत होतें आतां राहता राहिलें देणे घेणें आम्हीं त्यांना सांगितलें आम्हीं गरीब, आमच्या जवळ देण्या घेण्यास काही नाहीं, आम्हीं मुलगी पिवळी करुन देणार तेही हुंडा घेणाऱ्या पैकीं नव्हतेच तुम्हाला शक्य असेल तेवढ्याच बाबी तुम्हीं करा असे ते म्हणाले आमचें कांहीच म्हणणे नाहीं त्यांच्या घरीही त्यावेळी अडून बसणारे बायको माणूस कोणीच नव्हते झालें ! लागलीच ठरलें ' आम्हीच बनारसला गेलो आणि कार्य उरकून परत आलो. आमचे व्याही मोठे वाणीदार ' स्वत आपल्या हिमतीवर आज मोठा

वाडा बांधून पदरीं ५०|६० मनुष्यें नोकरीला ठेवून हितचिंतक नांवाचा छापखाना आज ४७ वर्षे चालवून प्रसिद्धीस आणला. आज तो छापखाना चांगल्या स्थितींत चालत असून बनारस शहरांत त्याचें नांव लौकिक बाण्याचें आहे. आमचे व्याही नुकतेच कालवश झाले तरी आमचे जावई त्याचें कार्य पुढें चालवून त्यांनीही आपल्या कामांत लौकिक संपादन केला आहे, व ते "गृहस्थ" नांवाचें एक हिंदी मासिक चालवीत तसेंच पात्रमो नांवाची एक रोजनिशी आज ८७ वर्षे नियमानें काढतात. ती ह्या प्रांतांत प्रसिद्ध आहे. आतां त्यांनी फाऊंड्री काढली आहे. अशा रीतीनें आचारी पाणक्या शोधीत असणारी ती मुलगी मोठी भाग्यशाली निघून संतती व संपत्ती यांनीं युक्त असा समाराचा लौकिक वाढवून आपल्या दोन्ही कुलांस भूषणभूत अशी झाली आहे. सांगण्याचा हेतु हा कीं, कोणाचें कोणी भाग्य मागून येत नाहीं म्हणून विशेष श्रीमतीचा कोणी गर्व वाहून दुसऱ्याला हीन समजूं नये. ह्या कार्यांत आम्हालाही ४००—५०० रुपये खर्च आला.

## गोविंदाची मौंज

आतां आमचा मुलगा गोविंदा हा मुंजीचा झाला होता, व ह्यावर्षी त्याला मुंजही लाभत होती. म्हणून गोपाळभट बेलापूरकर एक जबलपुरांतील नामांकित ज्योतिषी होते त्यांना नेऊन पत्रिका दाखविली. त्यांनी लागलीच सांगितलें कीं, ह्याच वर्षी कार्य उरकून घ्या. चांगली लाभते आहे. त्यांच्या आज्ञेप्रमाणें लागलेंच कार्य करण्याचें ठरवून दादांना वगैरे पत्रें लिहिलीं. त्यांचीही संमति घेतली, व एका चांगल्या शुभ मुहूर्तावर कार्य उरकलें. हीं दोन्ही कार्यें लागोपाठ झाल्यामुळें बराच खर्च होऊन दोन वर्षें जरा हलाखींतच गेलीं. पण कोणाचें कर्ज वगैरे न होतां लवकरच त्यांतूनही पार पडलों.

## चि. काशिनाथाचा जन्म व त्याचा पुनर्जन्म आणि काकांची आम्हांला अपूर्व देणगी

पुढें म्हणजे १९२० आक्टोबरच्या १० तारखेस कुटुंब प्रसूत होऊन मुलगा झाला व त्याचें नांव काशिनाथ असें ठेविलें. आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, या मुलाचे कान जन्मतःच टोंचलेले होते. ईश्वरी लीला ही सर्व बाळपणपणी गांसुरवाडींतच झाली. काशीनाथाचे वेळीं सर्वांनीं पेढे घेण्यास

मोडलें नाहीं ह्या वेळींही १५–२० रुपयांचे पेढे वाटले. ह्याच वेळेस आमच्या श्वसुरांचें पायाचे ऑपरेशन होऊन पाऊल कापून काढण्यात आलें. थोडे दिवसानीं त्याचा पाय बरा होऊन ते घरातल्या घरात थोडें बहूत काठीच्या साह्यानें फिरू लागले. अशा ह्या वेळीं आमच्या काशीनाथाचें वय ८–१० महिन्यांचे असेल सौ. त्याला घेऊन जेवणाकरितां म्हणून माहेरीं गेली होती मीही त्यावेळीं तेथेंच होतो. आम्हीं जेऊन खाऊन स्वस्थ होतों तों एका एकीं काशीनाथानें डोळे पांढरे करून हात पाय ताणले आम्हीं सर्व घाबरलों. आता काय होतें कोणास ठाउक मुलगा हातचा जातो कीं, काय? अशी भीति वाटूं लागली कारण त्यावेळची त्याची स्थितीच तशी होती एका एकीं हें काय झालें आम्हीं सर्व काळजींत पडलों आता दाखवावें तरी कोणाला? ह्याचा प्रश्न पडला वय लहान तशात आजारी अशा वेळीं त्याला न्यावयाचें तरी कोठें? फट म्हणतां हत्या व्हावयाचीच लागलीच सौ. च्या मनांत काय आलें कोणास ठाऊक ती एकदम मुलाला घेऊन जी निघाली ती आपल्या काकांच्या घरीं जाऊन उभी राहिली. त्यांचें घर तेथून जवळच होतें. ते वैद्यकीही उत्तम जाणत पण त्यानीं तो धंदा असा सुरू केला नव्हता तरी पुष्कळ परिचयाचे लोक त्याचे पासून औषध घेऊन रोगमुक्त होत त्यांचें कापडाचें मोठें दुकान होतें. त्यावर त्या कुटुंबाचा उदर निर्वाह चाले. वैद्यकी बद्दल ते कोणाकडून कांहीं घेत नसत मुलाला घेऊन सौ त्यांचे घरीं जाऊन पोहोंचतांच समोरच ते उभे होते तिला पाहतांच ते 'अशा उन्हाच्या वेळीं इकडे कोणीकडे' हा प्रश्न विचारीत होते इतक्यांत त्यांची दृष्टि मुलाकडे गेली व एकदर प्रकार त्याच्या लक्षांत आला त्यांना परीक्षा फार चांगली त्यानीं लागलीच आपल्या कुटुंबाला सांगितलें ह्याला आंत नेऊन निजवा व मला सांगितलें एक डाळींब व गेराच्या नांग्या कोठें मिळाल्यास लवकर घेऊन या तोवर मी उपचार करतो एवढासा लहान मुलगा, अद्याप त्याला अन्नाचा स्पर्श सुद्धां झालेला नाहीं तरी त्यांनीं भात मागविला, व त्यांत कांहीं औषध मिळवून त्याचें चाटण त्याला दिलें डाळींबाचा रस थोडा थोडा पोटांत गेला अशा त्यांच्या योजनेप्रमाणें पटापट दोन चार औषधें त्याला मिळतांच रात्रीं आठाचे सुमारास त्यानें थोडी हालचाल केली औषधें सुरूच होतीं ते दिवशीं

तीं नवराबायकों रात्रभर त्या मुलाचे शुश्रूषेत होतीं. सकाळीं मुलगा रोजच्या प्रमाणें बरा होऊन आनदानें हात पाय नाचवून खेळू लागला असा हा जीव एखाद्या श्रीमताच्या घरीं १००, ५०० रुपये खर्च करून सुद्धा यश पदरीं न पडणार ! दोन चार पैशांच्या उपचारांत त्यानीं आमचें पदरीं टाकला त्याला हे त्यांचे आमच्यावर केवढे उपकार झाले, ते शब्दानें सांगणें कठीण असा प्रसग ज्यांचेवर येतो त्यालाच त्याची किंमत कळते असा हा अमूल्य जीव त्यांच्या प्रयत्नास यश येऊन त्यांनीं त्याला आमच्या पदरांत टाकला हे त्याचे आमच्यावर अनंत उपकार आहेत

## पगारांत एकदम वाढ व श्री. फत्तेचंद डे. इन्स्पेक्टर येतात आणि पगारांत पुन्हां वाढ करितात.

म्युनिसिपल कमेटीकडे शाळा गेल्यापासून १९२०–२१ पर्यंत पगार २० सच रुपये मिळत होता ह्या नंतर शिक्षक मंडळींचें कांहीं भाग्य उदयास आल्यामुळें प्रांतांतील सर्व प्रायमरी शाळांतील शिक्षकांच्या पगारांत वाढ झाली व सरकारांतून त्या बद्दल जादा ग्रँट म्युनिसिपल कमेट्यांना देण्यांत आली. त्या प्रमाणें जबलपूर म्युनिसिपालटीचाही नंबर लागून तिला ज्यादा ग्रँट मिळाली सर्व शिक्षकाचे पगार वाढविण्यात आले प्रत्येक हेडमास्तरास ६॥ रु असे पगार वाढले. १० चे ऐवजी १८॥ रुपये अ मास्तराना मिळूं लागले गणपतरावानाहा १५+६॥ असे २१॥ रुपये मिळूं लागले. व मला २०+१३ असे ३३ रुपये पगार मिळूं लागला. अशा पगारांत वाढ झाल्यामुळें शिक्षक लोकांच्या पोटांत थोडी बहुत तरी डाळ रोटी सुखाने पडूं लागली. आतां आमची शाळा १९१७ पासून अलफखाच्या तलैय्यांत बेलापूरकराच्या घरासमोर लागू लागली ती तेथें सुमार १९२५ पर्यंत होती नंतर ती जागा अपुरी पडूं लागल्यामुळे पुन पूर्वीच्या हितकारिणीच्या जुन्या इमारतीत स्वतंत्र रातीत लागूं लागली. ह्या अवधींत जोश व केळकर असा दोन अ सर्कल इन्स्पेक्टर साहेबांच्या पाहण्या झाल्या. ते मराठी भाषेंत तज्ञ असल्यामुळें त्यांनीं परीक्षाही करून घेतल्या त्यांच्या परीक्षेत ही शाळा यशस्वी रीतीनें पार पडली आता आमचे डे इन्स्पेक्टर साहेब केशवराव पुरोहित ह्यांची बदली सागरास आल्यामुळे त्याच्या जागीं फत्तेचद हे डे इन्स्पेक्टर होऊन काम पाहूं लागले

मध्यंतरी कांहीं दिवसांकरितां भास्करराव परांजपे यांचीही डे. इन्स्पेक्टरचे जागीं नेमणूक झाली होती नंतर ते दिंडोरी पाटण वगैरे ठिकाणीं काम करू लागले त्यांचे हातून काम ठीक न वठल्यामुळें त्यांना कामावरून काढलें. एकदम त्यांना 'ग'ची बाधा झाल्यामुळें ते शिक्षकांना तुच्छ समजूं लागले व ह्या अहमन्यतेमुळें सर्व ठिकाणाहून त्याचबद्दल कागाळ्या झाल्यामुळें सरकारला ही गोष्ट मुद्दाम विचारांत घ्यावी लागली असावी ते कांहींही असो ते कमी झाले खरे! पुरोहित साहेबाचीही कारकीर्द यशस्वी रीतीनें पार पडली त्याच्या कारकीर्दीत कांहीं कमी जास्त न होतां स्कॉलर-शीपचेहा रिझल्ट उत्तम रीतीचे निघाले वार्षिक परीक्षेंतही कांहीं गडबड झाली नाहीं मध्यें मुद्दाम घडूनच आणल्यामुळें आमचें प्रमोशन दुसऱ्यास दिलें गेलें असाच एक घाट ३३ चे ३५ होण्याचे वेळीं कांहीं हिंदी प्रतिस्पर्ध्यांनीं घातला होता, व तें प्रकरण सुमारें ३ वर्षें भिजत पडलें होतें. पुढें तें एक सिलेक्ट कमेटी नेमून तिच्या पुढें मांडलें त्या कमेटीचे अध्यक्ष गोळवलकर साहेब होते त्यावेळीं माझे सर्व रिझल्ट उत्तम होते. सर्व इन्स्पेक्टर मला अनुकूल असे होते हे इन्स्पेक्टर फतेचंद श्रीवास्तव ह्यांनी माझी बाजू कमेटीपुढें मोठ्या हिंमतीनें कसून मांडली, व मला आश्वासन दिलें कीं, आपका प्रमोशन दुसरा कोई ले सकता नहीं! वह आपही को मिलेगा! त्याप्रमाणें केस सुरू झाल्यापासून पुढें वीस महिन्यांनीं प्रत्येक महिन्यास ५ रु प्रमाणें एकंदर वीस महिन्याचे १०० रुपये मला मिळाले ह्याप्रमाणें आता मला ३८ रुपये पगार मिळूं लागला ह्याप्रमाणें बाकीच्या शिक्षकांचेही पगारात ग्रेडेड लीस्टप्रमाणें वाढ होत गेली हें निराळें सांगावयास नकोच. आता आमच्या शाळेंत मी स्वत, गणपतराव करमरकर, मुसळे, घाटे, बर्वे असे पांच शिक्षक झाले त्यांत आम्हीं तीन कायमचे असून बाकीच्या शिक्षकांत नेहमीं बदल होत गेला कधीं कोणी, कधीं कोणी! १९१६ सालीं सदाशिवरावांनींही कांहीं दिवस आमचें काम केलें होतें. नंतर ते इंग्रजी शिक्षणाकरितां मॉडेल हायस्कूलमध्यें भरती झाले. तेथें ते ६ इयत्तेपर्यंत शिकले

## एक नवीन शिक्षक शाळेस येऊन मिळतात

सन १९१३ चे सुमारास लक्ष्मणराव मुसळे हे एक होतकरू व तरुण

शिक्षक आमच्या शाळेस येऊन मिळाले असे आता तिघे आम्हीं कायमचे शिक्षक झालों हे शिक्षक स्वभावानें गरीब असून आपले शिकविण्याच्या कामांत त्यांचा हातखंडा असे कोणतेही दिलेलें काम हुशारीनें व सावधगिरीनें करीत. त्यांचें अक्षरही फार सुंदर असल्यामुळें रजिष्टरें वगैरे लिहीण्यास त्यांचा मला फार उपयोग होऊं लागला. मनुष्य एकदा आपला म्हटला म्हणजे त्या करितां रात्रंदिवस झटून त्याच्या उपयोगी पडणारे आहेत त्याची व गणपतरावांची बरीच गट्टी असे पुढें पुढें शाळेंत आणखी शिक्षक वाढल्यामुळें त्या लोकाशीं ते फटकूनच असत आमच्या ह्या मराठी शाळेच्या दोन शाळा झाल्यावर गणपतरावांनीं त्यांना आपल्याकरितां म्हणून मुद्दाम मागून घेतलें एकदा काम करण्याचें त्यानीं कबूल केलें म्हणजे आपलें काम पक्कें झालें असें समजावे अशा तऱ्हेचा त्याचा स्वभाव आहे असे ते पाच रुपयांपासून वाढत वाढत आज गणपतरावांच्या मागून हेडमास्तरच्या हुद्यावर काम करीत आहेत व पगारही २५ रु. पर्यंत वाढला आहे आतां लवकरच ते रिटायर होण्याच्या तयारींत आहेत.

## आमच्या शाळेचे एक विद्यार्थी सदाशिवराव परांजपे हे आमचे शाळेस येऊन मिळतात व त्यांचा लौकिक

मि सदाशिवराव पुन आमचे शाळेस येऊन मिळाले मग कांहीं दिवस शाळेंत काम केल्यावर त्यांना म्यु. कमेटीनें ट्रेनिंग करितां उमरावतीस पाठविलें. तेथें ते दोनतीन वर्षें ट्रेनिंगचा अभ्यास करुन चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले व त्यांना चौथ्या वर्गाचा स्पेशल कोर्स शिकण्याचीही परवानगी मिळून त्यांतही ते उत्तीर्ण झाले. हे शिक्षक तरुण असून होतकरु आहेत ट्रेनिंग पास होऊन आल्या बरोबर त्यांना शिकविण्या करितां म्हणून चौथा वर्ग देण्यात आला. पण त्यांत त्यांनीं कल्पनातीत यश मिळविल्यामुळें त्यांची सर्व ठिकाणीं उत्तम शिक्षक म्हणून वाहवा होऊं लागली हे पहिल्या वर्गापासून आमच्याच शाळेंत चौथ्या वर्गापर्यंत शिकून प्रायमरी पास होऊन इंग्रजींत गेले होते त्यामुळें आमच्याच शाळेंत शिकलेला विद्यार्थी ट्रेन्ड होऊन पुन. आम्हांला कामाला मिळून त्याने पहिल्याच वर्षी उत्तम यश संपादन केलें. हे त्यांस फार भूषणावह होऊन त्यांच्या उत्कर्षास कारणीभूत झाले हेच शिक्षक आज

आमच्या मागून ह्या गोलबाजार मराठी शाळेचे मुख्य अध्यापक आहेत व आपलें काम यशस्वी रीतीनें पार पाडात आहेत हे तारीख १०-११-१९४० रोजीं जबलपुरास झालेल्या मराठी प्रायमरी शाळेच्या स्नेह संम्मेलनाचे वेळीं मुलांनीं व मुलींनीं केलेल्या कामावरून जनतेची खात्री झाली असेच ते आपल्या कामात यश मिळवुन त्यांची उत्तरोत्तर कीर्ति पसरो असा मी त्यांना आशीर्वाद देतों.

## आणखी एक शिक्षक शाळेचे विद्यार्थी असून आज शिक्षक म्हणून आमच्या शाळेला लाभले

ह्या प्रमाणें १९१६ सालीं वरील शिक्षकाप्रमाणेंच मराठी मुळाक्षरापासून आमचे शाळेंत शिक्षण संपादन करून प्रायमरी पास झालेले तरुण शिक्षक लक्ष्मणराव नाफडे हे होत. हे विद्यार्थी दशेंत असतांनाच त्यांची तीव्र बुद्धि दिसून येत होती, व हे वर्गात हुशार म्हणून गणले जात त्यांच्या मन-मिळावू स्वभावामुळें सर्व शिक्षक वर्गास ते विद्यार्थी असतांनाच प्रिय होऊन बसले होते त्यांचा तो हंसत मुख चेहरा पाहूनच लोकांचे मनावर एक विलक्षण परिणाम होई. ते म्हणत हा मुलगा पुढें होतकरू झाल्याशिवाय राहणार नाहीं. असे हे आमच्या येथून चौथी पास झाल्यावर इंग्रजीही ५-६ पुस्तकें शिकले व ड्राईंगची परीक्षा देऊन त्यांतही त्यांनीं उत्तम प्रकारें यश संपादन केलें त्याच प्रमाणें त्यांनीं उमरावतीस जाऊन व्यायामाचें शिक्षण संपादन केलें, व त्यातही पास होऊन, व्यायाम-विशारद ही पदवी संपादन करून जबलपूर येथील व्यायाम शाळेंत प्रामुख्यानें अधिकारी वर्गात ते आतां मोडत आहेत. व ते व्यायाम शाळेंत प्रामुख्यानें भाग घेऊन काम करीत असलेले आढळून येतात तसेच त्यांनीं वर्धेचें ट्रेनिंगही पास केलें आहे व गायन विषयांत प्रगती केली आहे. येथील दत्तभजन मंडळांतही ते प्रामुख्यानें गातांत असल्याचें आढळून येतें अशा प्रकारचे हे सर्व गुणांनीं संपन्न असे शिक्षक मराठी शाळेच्या भाग्यामुळें तिला प्राप्त झाल्यामुळें शाळेच्या कीर्तीत पुन भरच पडत गेली आज ते सदाशिवरावांचा उजवा हात म्हणून त्या सर्वांत काम करीत आहेत व परवांचें स्नेहसंमेलन यशस्वी होण्यास ह्यांचेही श्रम विशेष कारणीभूत झालेले दिसून आले ह्या शिक्षकांना विद्यार्थ्यांनिर्यी फार

प्रेम वाटत असल्यामुळें सर्व विद्यार्थी त्यांच्याशीं सलगीनें वागत असलेले आढळून येतात इतके जरी ते होतकरू व गुणी आहेत तरी आम्हां जुन्या शिक्षकांची ते आठवण विसरले नाहींत आमच्यावरही त्यांची पूर्ण भक्ति असून वेळोवेळीं कांहीं नवीन टूम काढून आम्हांला ते जगापुढें आणून आमच्या कीर्तीत भर घालतात. ह्या त्यांच्या प्रेमाबद्दल आम्हीं त्यांना अनेक आशीर्वाद देऊन आपल्यास धन्य मानून घेतों.

## शाळेचें स्थिरत्व व त्याकरितां मी केलेले प्रयत्न

आता आमची शाळा चांगली चालू झाली बंद पडण्याची कांहीं भीति राहिली नाहीं. लोकांत अभिरुचि उत्पन्न झाल्यामुळें सर्व बाजूनी उत्तम जम बसत चालला. मास्तरांच्या पगाराचीही पूर्वीची दशा राहिली नाहीं असें सुरळीत काम चालू होऊन आता पुढें पाऊल टाकण्याची वेळ आली शाळेच्या स्थिरत्वाला आणखी एक गोष्ट कमी होती ती म्हणजे प्रायमरी परीक्षा पास झाल्या नंतरची हा प्रश्न माझ्या मनांत सारखा घोळत होता. मधून मधून मी त्याला चालना देण्याचाही प्रयत्न करीं परंतु यात्रें तसें अद्याप त्यास यश येण्याचें चिन्ह दिसेना. रावबहादूर केळकर साहेब येथें असतां मी त्यांच्या जवळ गोष्ट काढून थोडा प्रयत्न करून पाहिला तुर्तास मुलींच्या शिक्षणाची थोडी सोय झाली काहा ट्रेनिंगचे मास्तर प्रो कानेटकर वगैरे लोकांनीं एक एक तास ऑनररी शिकविण्याचे कबूल करून एक पगारी शिक्षक ठेवावयाचें ठरलें त्या प्रमाणें आमच्या मराठी शाळेंत म्हणजे भालदार पुऱ्यांत शाळा लागून ७ रुपये पगारावर माझीच त्या जागीं नेमणूक झाली. पुढें प्लेग आल्यामुळें रावबहादुरांचे बंगल्यावरही दोन चार महिने क्लास लागला. जेम तेम ही व्यवस्था वर्ष सहा महिने चालली मुलींची कांहीं सोय होईना व बरोबर कांहीं शाळा चालेना. मग ती बंद करण्यांत आली हा प्रश्न तसाच माझ्या मनांत घोळतच राहिला आमच्या शाळेंतून मुलें पास होऊन जात पुढें ती हिंदींत आपलें काम चांगलें करून कीर्तिही मिळवीत सर्व कांहीं होई परंतु असें करण्यात मुलाना थोडे श्रम जास्त करावे लागत. व आम्हांला थोडें थोडें हिंदी विशेषत मलाच त्यांचे शाळेंत न अडण्यापुरतें, येथें मराठी शाळेंत करून घ्यावें लागे त्यामुळें असें होई कीं, आमच्या शाळेतून गेलेला एकही

विद्यार्थी नापास होऊन त्याच वर्गात खितपत पडला आहे असें कधींही ऐकण्यांत आलें नाहीं व गवगवाही पण कधीं झाला नाहीं केव्हा केव्हां असा प्रसंग येई कीं, परीक्षेच्या आधीं दोन तीन महिन्यापासूनच आमच्या शाळेतील मुलें हिंदी हायस्कूल मध्यें पाठविण्याबद्दल तगादे सुरू होत. मग आम्हांला सर्वांचीं मनें ठेविण्याकरितां सर्व ठिकाणीं विद्यार्थी पाठविण्याची तयारी ठेवावी लागे असें जरी होतें तरी माझ्या मनांतून तो प्रश्न जाता जाईना. माझी महत्वाकांक्षा मोठी! एकदां कोणतीही गोष्ट करावयाचें मनांत आलें की, मग ती झाल्याशिवाय मला चैन पडत नसे. असें माझे मनांत ही गोष्ट घोळत असल्यामुळें मधून मधून सर्व तऱ्हेच्या लोकाजवळ मी गोष्टी कराव्यात. अशाच गोष्टी करतां करतां प्रो बेहेरे यांच्या जवळ सहज गेला असता मनांत आलें कीं, ह्या ठिकाणीं थोडा ऊहापोह करून पहावा. काहीं जमले तर जमलें नाहीतर हे आहेच म्हणून त्याचे जवळ सुमारें तासभर ह्या गोष्टीचा ऊहापोह केला त्या वेळीं कोठून स्फूर्ति आली कोण जाणे? माझें भाषण मोठें कळकळीचें झालें ते नुसते ऐकत होते व मधून मधून हंसत होते. त्यांनी माझें भाषण शांतपणें ऐकून घेतलें. मग मी उठून माझी शाळेची वेळ झाल्यामुळे घरीं गेलो व जेवण करून शाळेंत आलों मी मनांत असेंच समजत होतो कीं, हें माझें बोलणें आज पर्यंतच्या प्रयत्नाप्रमाणें निष्फळच होणार परंतु तसें कांहीं झालें नाहीं. ह्या माझ्या विचाराचा त्यांच्या मनावर जोरानें परिणाम होऊन त्यांनीं आपल्या मित्र मंडळींत ह्याची चर्चा केली असावी हें मला दुसरें दिवशीं कमेटीचें बोलावणें आल्यावरून मीं निश्चित समजलों ह्याच विषयाची चर्चा करण्याकरिता दुसरें दिवशीं राजवाडे यांचे घरीं खाजगी सभा बोलावली त्यांत मलाही पण बोलविलें होतें व त्याशिवाय राजवाडे, ओक, जोशी, लेले, पराजपे, आणखी एक दोघे गृहस्थ होते एकंदर तेथें झालेल्या प्रकारावरून मी ताडलें कीं, हा माझ्या कालच्या भाषणाचाच परिणाम आलें! लागलीच शाळा उघडण्याचे ठरून मुलें जमविण्याचें काम सुरू करण्याकरितां आधीं प्रत्येकाचें घरीं जाऊन पालकांचीं मनें वळवणें प्राप्त असल्यामुळें तसें आधीं करण्याचें ठरून एक एक मोहल्ला सर्वांनीं वाटून घेतला व आणि जोगा मास्तर ह्यांनीं दक्षिणपुऱ्याचें काम पत्करलें अशी

महिना दोन महिने खटपट होऊन वर्गणीचे आंकडे पडत चालले व एके दिवशी चांगला दिवस पाहून टिळक मंदिरांत शाळा उघडण्याचें जाहीर केलें. पहिले मास्तर हुद्दार व पोहनकर, नाखरे असे एकामागून एक झाले. शाळा पक्की झाली. आतां माझें काम झालें असे पाहून मी कांहीं तींत पडलों नाहीं, व पुढें मला कोणी आग्रहही पण केला नाहीं. मग त्याचें कारण काय असेल तें असो. तें मला कांहीं समजलें नाहीं, व पुढें कधीं कमेटीचें बोलाविणेंही पण मला आलें नाहीं. मी समजलों, नाहीं आलें बोलावणें तर नाहीं. आपलें मुख्य काम तर झालें. मग मला वाटलें आतां कांहीं आपली शाळा बुडत नाहीं. तिला कायमचें स्वरूप प्राप्त झालें. तें हें महाराष्ट्र स्कूल वाढतां वाढतां मिडल स्कूल झालें. मुलें येऊं लागलीं व मुलीही पण भरती होऊं लागून आतां वाढत वाढत त्याचें हायस्कूलांत रूपांतर होऊन गोल बाजारांत त्याची एक मोठी भव्य इमारत आज सर्वांच्या दृष्टीसमोर उभी आहे. ह्या बद्दल ओक व लेले हे दोघे गृहस्थ धन्यवादास अत्यंत पात्र आहेत यांत शंका नाहीं.

## चि. गोविंदाचें शिक्षण

आतां थोडें घरगुती हकीकतीकडे वळूं. मगूचें लग्न आणि गोविंदाची मुंज यातून पार तर पडलों. आतां ह्या पुढील वृत्तांत असा कीं, गोविंदाचें सर्व प्राथमिक शिक्षण तिसऱ्या वर्गापर्यंत मीं घरींच करून घेतलें. बुद्धि प्रखर असल्यामुळें दीड दोन वर्षांत तिन्ही इयत्ता पार पडल्या. मग चौथ्या वर्गांत नांव दाखल केलें. चौथ्या वर्गाचाही शिक्षक मीच होतों. गोविंदाची चौथ्या वर्गाची परीक्षा १९२१ सालीं झाली. त्यांत तो उत्तम प्रकारें उत्तीर्ण होऊन स्कॉलरशिप परीक्षेत जनरल कॉंपीटीशन मध्यें ३ रा नंबर आल्यामुळें त्याला ४ रु. स्कॉलरशिप मिळाली. ती स्कॉलरशिप पुढें चार वर्षे चालली. ह्याला मीं थोडें हिंदीही घरीं शिकविलें होतें. त्यामुळें शाळेंत त्याचें रेग्युलर विद्यार्थी म्हणून नांव प्रसिद्ध होतें. रोजचा त्याचा अभ्यास त्यानें नियमितपणें करून सर्व शिक्षकांची मर्जी सुप्रसन्न करून घेतली होती. सर्व शिक्षक त्याचेवर खुश असत. गोविंदाचे वेळेस हायस्कूल स्कॉलरशिप परीक्षा ३ ऱ्या वर्गातच घेण्याची कांहीं नवीन टूम निघाल्यामुळें तो ३ ऱ्या वर्गांत असतांना ती परीक्षा लागली. असें हे कांहीं ध्यानीं मनीं नसतां एकदम परिवर्तन झाल्यामुळें पुष्कळ

मुलांचें नुकसान झालें, व काहींचा थोडा फायदाही झाला जी नियमीतपणानें अभ्यास करणारी मुलें होती त्यांचा असा समज कीं, नियमाप्रमाणें पुढील वर्षी स्कॉलरशिप परीक्षा होणार तर ठरलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणें आपला अभ्यास झाला म्हणजे आपण स्कॉलरशिप परीक्षेंत अवश्य पास होऊं. अशी तीं मुलें खात्री बाळगणारी होतीं म्हणून अशा ह्या बदला बदलीमुळें त्याच्या खात्रींत व्यत्यय येऊन आयत्या वेळीं त्यांना तोंडघशी पडल्यासारखें झालें व इंग्रजीची तशी तयारी नसल्यामुळे त्याला इंग्रजींत कमी मार्क मिळून त्या विषयात नापास होण्याची पाळी त्याचेवर आली असा हा स्कॉलरशिप मिळू पाहाणारा मुलगा, ती तर त्याला मिळाली नाहींच पण नापास झाल्यामुळें वरच्या वर्गाचें प्रमोशनही बंद होऊन मिळत असलेली ४ रु. स्कॉलरशिप त्या परिस्थितीमुळें बंद होतें की काय? ही भिति उलट उत्पन्न झाली. तोही थोडा निराश झाल्यासारखा दिसूं लागून परीक्षेच्या निकालाचे दिवशीं नापास झाल्यामुळे उदास तोंड करून माझेकडे आला. तेव्हां मी मनाशीं विचार केला. कीं, ह्याला प्रमोशन मिळून ह्या वर्षी तो जर का खालच्या वर्गांत राहिला तर ह्या गोष्टीचा त्याच्या पुढील अभ्यासक्रमावर विशेष परिणाम होऊन त्याचें मन ढासळल्याशिवाय न राहतां त्याची मागासलेल्या विद्यार्थ्यांत गणना होऊं लागून पुढें त्याची एकंदर उन्नति थांबणार! तिच्यावर पाणी पडल्यासारखें होणार! म्हणून मी लागलाच त्याच्या शाळेंत जाऊन हेडमास्तरांची भेट घेतली व त्यांना सर्व प्रकरण समजावून सांगितलें. इतर हायस्कूलमध्यें हा मुलगा ह्या वेळीं असता तर सरकारी नियमा प्रमाणें त्याला प्रमोशनची सुद्धां आशा नव्हतीच परंतु मॉडेल हायस्कूलच्या हेडमास्तरांनीं शिफारस केली तर अशा नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा मागील अभ्यास पाहून प्रमोशन देण्याचा अधिकार होता. ही एक त्या शाळेंत मोठी सोय होती व त्या प्रमाणे मागें कित्येक मुलांना प्रमोशन मिळालेंही होतें ह्या आधारावर मीही खटपट सुरू केली होती ह्या प्रमाणें तेथील सर्व शिक्षकांची सल्ला घेऊन त्यानीं सांगितल्याप्रमाणें एक अर्ज तयार करून मीं तो हेडमास्तराकडे नेऊन दिला पुढें योग्य वेळीं त्या अर्जाचा निकाल लागून ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिंसीपाल साहेबांनीं त्याला अनुमोदन देऊन

गोविंदाला वरच्या वर्गात प्रमोशन दिलें, व त्याच्या ह्या खटपटीमुळे आणखीही तीन चार मुलांना असेंच प्रमोशन मिळालें. व त्याची कुद्ध पाहणारी स्कॉलरशिपही पुढें नियमाप्रमाणें एक वर्ष त्याला मिळाली अशी ही त्यावेळीं हायस्कूल स्कॉलरशिप परीक्षेत गडबड होऊन अधिकारी वर्गाला विरुद्ध अनुभव आल्यामुळें ही पद्धत बंद करावी लागली परंतु ह्या एक वर्षाच्याच उलाढालीमुळें कित्येक मुलांना विनाकारण नुकसान सोसावें लागलें पुढें योग्यवेळीं हा विद्यार्थी मॅट्रिकचे परीक्षेस बसून पहिल्या वर्गात पास झाला, व त्याला भूगोल विषयांत कोणाला कधीं न मिळणारें प्राविण्य मिळालें, व अभ्यासाचीं पुस्तकें विकत घेण्याकरितां ह्मणून ३५ रुपयाचें शिरोळे बक्षीस मिळालें आतां तो पास झाल्याचें ऐकून मॉडेल हायस्कूलचे त्यावेळचे हेडमास्तर साहेब यांनीं मला मुद्दाम बोलावून सांगितलें कीं, देखो ' हमने प्रमोशन दिया उसका इस लडकेने बडा सार्थक किया. वह हमारे स्कूलमें पहिले दर्जे मे पास होकर उसको स्कॉलरशिपही मिला. इतका त्यांना त्यांनीं प्रमोशन देऊन त्याचें सार्थक झाल्यामुळे आनंद झाला, व सर्वांजवळ ते ह्या मुलाबद्दल तारीफ करीत होते आता त्याला स्कॉलरशिप मिळूं लागून कॉलेजच्या शिक्षणाचीही सोय झाली त्याच्या मामांनेही ह्या आनंदाप्रीत्यर्थ त्याला १२५ रुपयांची सायकल व दहा रुपये मासिक मदत देण्याचें आश्वासन देऊन त्याचा गौरव केला. ही मदत त्यांनी वेळेवर देऊन पुढील अभ्यास करण्यास त्याला उत्तेजित केलें. अशी सर्व प्रकारानों मदत झाली नसती तर आमच्या सारख्या गरीब स्थितींतील वर्गाच्या मनुष्याच्या मुलांचें शिक्षण कसें होतें ? अशा ह्या सर्व गोष्टी जुळून याव्या लागतात. गोविंदाच्या नियमित अभ्यास क्रमामुळें त्याचेवर त्याचे कॉलेजांतील प्रोफेसर मंडळीही खुष असत सर्व बाबतींत त्याला संभाळून घेत व उत्तेजन देत पुढें २ वर्षांनीं इंटरची परीक्षाही पास होऊन त्यानें कॉलेजच्या तिसऱ्या वर्षांत पदार्पण केले. ह्या दोन वर्षांकरितां जरी त्याला स्कॉलरशिप मिळाली नाही तरी त्याच्या प्रिंसिपाल साहेबा (रोलँड)नीं त्याच्या हुशारीवर प्रसन्न होऊन त्याची दोन वर्षांची कॉलेजची फी स्वतः भरून त्याच्या अभ्यासाला मदत केली. युरोपियन लोक सुद्धां मोठे गुणग्राहक असतात नाहींतर त्याना काय जरूर ! कोण मुलगा आणि कोठलें काय ? असे कित्येक

त्याच्या कॉलेजांत येतात आणि जातात आपल्या स्वत च्या खिशाला कोण फुकट खार लावून घेणार ? परतु वरच्यासारखीं हीं उदाहरणें केव्हा केव्हा पाहण्यात येतात ह्या कॉलेजच्या शिक्षणांतही प्रिन्सिपाल पासून प्रोफेसरापर्यंत पर्वानीं सहानुभूति दाखविल्यामुळें बी एस् सी मध्येंही तो फर्स्ट क्लासमध्यें पास होऊन सर्व मध्यप्रातांत गणित ह्या विषयात पहिला आल्यामुळें त्याला रामानुजम नांवाचें सोन्याचें पदक बक्षीस मिळालें, व स्पेशल पत्र पाठवून रोलँड साहेबानी त्याचें मनः पूर्वक अभिनंदन केलें अशी आमच्या ह्या मराठी शाळेंतून निघालेल्या शिष्यवर्गाची परंपरा चालू असल्यामुळें त्यांचे आम्हां मास्तरानाही मोठें कौतुक वाटून आम्हीही आपल्यास धन्य मानून घेतों, व पत्करलेलें काम असें यशस्वी होत गेलेले पाहून समाधान मानून घेतों

विद्यार्थ्यांच्या अशा ह्या यशामुळें किंग एडवर्ड मेमोरियल फंडाची २५ रुपये प्रमाणें २ वर्षें स्कॉलरशिप गोविंदाला मिळून गोविंदाच्या एम्. एस् सी च्या अभ्यासाची सोय झाली ह्या पुढील शिक्षणाची रॉबर्टसन कॉलेज मध्यें सोय नसल्यामुळें नागपूरच्या सॉयन्स कॉलेजांत त्याला भरती व्हावें लागलें, त्याला नागपुरास राहावें लागलें. कांहीं पुस्तकांच्या गैर सोईमुळें फर्स्ट क्लासांत येण्याकरितां लागणाऱ्या अर्ध्या मार्कानें अयशस्वी होऊन तो सेकंड डिव्हीजन मध्यें पास झाला. त्या अर्ध्या मार्काचा सुद्धां त्याच्यावर परिणाम होऊन ते त्याच्या मनाला खाऊं लागलें मी त्याला म्हणालों, अरे चाललेंच आहे कधीं कमी कधीं जास्ती. सर्वच वेळा सारख्या थोडें असतात ? ईश्वर जसें ज्यावेळीं जमवून आणील त्यातच मनुष्यानें संतोष मानून समाधान वृत्तीनें राहिलें पाहिजे पण जीं कर्तृत्ववान मनुष्यें असतात, त्याना हें म्हणणें खरें वाटत नाहीं इतका त्यांना आपल्या बुद्धीचा आत्मविश्वास असतो म्हणून त्याना थोडें वाईट वाटतें इतकेंच पण एवढ्या ह्या अर्ध्या मार्कानें नुकसान किती झालें ? फर्स्ट क्लासांत येऊन पुढें एखादी प्रोफेसरीची जागा मिळण्या बाबत केलेलें मनोराज्य मनांतच राहून पुढील भविष्याला त्याला मुकावें लागलें तरी प्राध्यापक म्हणून एक वर्ष सिटी कॉलेज मध्यें शिकविण्याचा मान त्यानें अनुभवलाच पण पुढें त्याच्या इथें जागाच रिकामी नसल्यामुळें व ज्या जागेवर हें काम तो करीत होता तो इसम परत आल्यामुळें त्याला घरीं बसावें लागलें.

दिवसें दिवस पुष्कळ शिकून सुद्धां हें शिक्षण घेतले नसते तर बरे असें आतां प्रत्येक विद्यार्थ्यास वाटू लागलें आहे

## चि. गोविंदाचें लग्न

ह्याच संधीस गोविंदाच्या विवाहाचाही योग आला पुष्कळ मुली सांगून आल्या. कित्येकांनीं आपले मुलींचे फोटोही पाठविले त्या पैकींच आम्हीं एक मुलगी पसंत करून त्याला सांगितलें कीं, तूं स्वत जाऊन मुलगी पाहून ये कारण आतां तुम्हीं जाणते असून पुढें तुमचे बरें वाईट तुम्हांला कळू लागले आहे. पूर्वीचा काळ आतां राहिला नाहीं कीं, आई बापांनीं जावें, मुलगी पसंत करावी, मुलाचें लग्न उरकावें. कारण ह्या जन्माच्या गांठी असतात नवीन पडत चाललेल्या हद्दीस मान हा दिलाच पाहिजे. असे आमचे ठरून त्याला आणि त्याची मोठी बहीण यमू हिला मुलगी पाहण्यास खामगावास पाठविलें दोघांनींही मुलगी पाहून पसंत केली. मग मीं आठवले साहेबाना लिहिलें की, आपणही जबलपुरास येऊन मुलगा पाहून जावा व त्या बरोबर आमची सर्व माहिती देऊन आम्हीं गरीब असल्याचें ही कळविलें, व मुलाच्या शिक्षणा-कडेच पाहून मुलगी देत असल्यास द्या असे आमचे विचार त्यांस पसंत पडून ते ओझरकर नांवाच्या वकील साहेबास बरोबर घेऊन पुढील गोष्टी करण्यास जबलपुरीं आले त्या वेळेला सुट्टी असल्यामुळें मीही जबलपुरींच होतों. तेथें आमची सर्वांची भेट होऊन चार दोन मित्र मंडळींच्या समोर सर्व गोष्टी पक्क्या होऊन कार्य करण्याचें ठरलें. आमच्या सर्व मागण्याही त्यांनी कबूल केल्या व कार्य करण्यास आम्हीं तयार आहों, तुम्ही सर्व मंडळीसह येऊन मूहूर्त साधावा असें कळविलें. त्या प्रमाणें आम्हीं १५–२० मंडळी खामगांवास जाऊन निर्विघ्नपणें कार्य उरकून सुनेला घेऊन प्रयाग येथे आलों या प्रमाणें आमच्या संसारात एक नवीन मनुष्याची भर पडली आतां स्वस्थ बसून कसें चालणार म्हणून त्यानीं डेप्युटी अकाऊंटंट जनरल पोस्ट आणि टेलिग्राफ डिपार्टमेंट मध्यें खटपट करून जागा मिळविली व आतां त्याच कचेरींत ते पक्के होऊन तेथेंच काम करीत आहेत ह्यावेळीं त्या जोडप्याला तीन मुलें असून नागपुरात ते आपल्या श्वसुरांचें सान्निध्यांत-सुखानें कालक्रमणा करीत आहेत. आम्हींही सर्वांतून

एक दोनदां नागपुरास जाऊन त्यांना भेटून नातवांना पाहून येतों. व तीही मंडळी केव्हां केव्हां इकडे येऊन आम्हांस भेटून श्री गंगामाईचें स्नान करून जातात सध्यां मी आजारीपणामुळें दोन वर्षांपासून नागपुरासच आहे.

## चि. कुमारी कुशीचें लग्न

१९२५ चे सुमारास कुशीचेंही लग्नाचा योग जमून आला. आमचे व्याही काशीचे रा बळवंत रावजी पावगी साहेब यांचा एक भाचा लग्नाचा होता त्याचें नाव विश्वनाथ. हा मुलगा पूर्वी माझे जवळ २ री, ३ री मराठी पर्यंत जबलपुरात शिकला होता तो प्रभाकरपंत गोरे यांचे जवळ राहत असल्यामुळें ते गोरे साहेब हे मॉडेल हायस्कूलचे हेडमास्तर काहीं दिवस असल्या-कारणानें ह्या मुलाला नॉर्मल स्कूलमध्यें त्यानीं भरती केलें. तेथें तो ४ थी हिंदी पास होऊन ४ थी पासून मॉडेल हायस्कूलांत ४ थ्या इयत्तेपर्यंत इंग्रजी शिकला व त्या बरोबरच त्यानें ड्राईंगच्याही दोन्हीं परीक्षा दिल्या, व नंतर सर्वच मंडळी काशीस गेली हा मुलगा पुढें पावगी हितचिंतक प्रेस मध्येंही कांहीं दिवस काम करीत होता, व दुसरी चांगली नोकरी शोधतां शोधतां त्याला तेथील एका महाजनी मारवाडी हायस्कूलमध्यें ड्राईंग मास्तरची जागा मिळाली असा हा मुलगा बळवंतराव पावगींनी शिफारस केल्यामुळें आम्हीं पसंत केला. मुलगा होतकरू असून लहान व प्रथम वर होता देण्या घेण्या संबंधानें विशेष भानगड नाहीं, असें सर्व बाजूंनीं उत्तम स्थळ मिळाल्यामुळें आम्हीं लागलेंच होय म्हटलें व लागलीच मुहूर्त निश्चित होऊन मे महिन्याचे सुट्टीत आम्हीं कार्यास काशीस गेलों. बरोबर कुशीचे मामा व मामी वगैरे मंडळीही अगत्यपूर्वक आली होती. या स्थळाविषयीं संमती घेण्याकरितां मी स्वतः दादाकडे मनमाडास जाऊन आलों, व येतांना नाशकाहून लग्नाप्रित्यर्थ लागणारा कपडा घेऊन आलों, व कांहीं अडथळा न येतां कार्य उरकलें. ते कुशल व गुणी असल्यामुळें ती कला त्यांनीं चांगलीच अवगत केली आहे, व आज त्याच हायस्कूलमध्यें ते नावाजलेले शिक्षक म्हणजे ड्राईंग मास्तर ह्मणून प्रसिद्ध आहेत सध्यां त्यांनाही दोन मुली आहेत आमची कुशी अप्पर प्रायमरी पास आहे व ही मुलगी आपल्या सासू सासऱ्याचे हाताखालीं संसारा संबंधीं सर्व कामें शिकून लग्न तो आतां तरबेज झाली आहे हिच्याही

लग्नांत वडील दोन बहीणींप्रमाणेंच ४७५ रुपये पर्यंत खर्च आला. लग्ना-प्रीत्यर्थ डॉ. हर्षे वगैरे बऱ्याच मंडळींनीं चांगली मदत केली व ह्या कार्यांतूनही पार पडलों

## चि. काशिनाथाचें शिक्षण

येथें काशिनाथाचें जावळ काढण्याचाही समारंभ उरकून घेतला. आतां काशिनाथाचेंही वय ४, ५ वर्षांचें होतें एके वेळीं पुढें होणाऱ्या बक्षीस समारंभाची तालीम पाहण्याकरितां सर्व शाळांच्या हिंदी मास्तरांना आम्हीं मुद्दाम बोलाविलें होते सुमारें १००–१२५ शिक्षकांचा समुदाय जमला होता पुष्कळ मुला मुलींचीं भाषणें, गाणीं पार पडलीं. काशिनाथालाही एक भाषण शिकविलें होतें, व तें त्याचें चांगलें पाठही होतें पण ह्यावेळीं त्याला काय वाटलें कोणास ठाऊक ? तो कांहीं भाषण म्हणण्यास पुढें येईना पुष्कळ रागें भरून पाहिलें, थोडासा मारही मिळाला परंतु तो जो अडला तो अडला ते दिवशीं त्यानें कांहीं तें भाषण म्हटलें नाहीं असा हा मुलगा कधीं अडणार नव्हे. एखाद्या वेळेचा गुण असा हा ! दुसरें ह्याला काय नांव द्यावें. आता ह्याला ५ वें वर्ष लागल्यामुळें पाटीवर बसविण्याची वेळ आली म्हणून चांगला मुहूर्त पाहून शंकर भटजी पराजपे ह्याचे हातून त्याचें सरस्वती पूजन करविलें व काल्लूराम बाजपेई आमचे भावी सुपरवाईझर यांचेकडून अक्षरारंभ करविला, व त्याना चांगलें बक्षीसही काशिनाथाचेकडून देवविलें पाटीवर बसविल्यापासून ४ महिन्यांत त्याला अक्षर ओळख होऊन १०० अंक व १० पाढे उत्तम तऱ्हेनें पाठ झाले. ६ वे महिन्यांत त्याला वाटेल तें पुस्तक घडाघड वाचतां येऊं लागलें. वर्षाचे अखेरीस बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार होऊन तो स्वतःच पाटी घेऊन वार्षिक परीक्षेचे वेळीं २ ऱ्या वर्गाची माझी परीक्षा घ्या म्हणून फत्तेचंद साहेबाचे जवळ जाऊन हट्ट धरून बसला काशिनाथाचें नांव शाळेंत दाखल केलें नव्हतें पण इन्स्पेक्टर फत्तेचद यानीं त्याची तयारी पाहून १ ल्या वर्गाचे लिस्टमध्यें आपण होऊनच त्यांनीं नाव दाखल करून घेतलें त्याचीं सर्व उदाहरणें बरोबर आलीं. वाचण्यांत लिहिण्यांतही चांगला निघून तो उत्तम रीतीनें पास झाला. आतां त्याचें नाव ३ ऱ्या वर्गांत दाखल करावें लागलें. ३ ऱ्या वर्गांत एक वर्ष शिकून १९२९ साली तो अप्पर प्रायमरी परीक्षाही पास

झाला पुढें आता तेथें मराठी शिकण्याची सोय झाल्यामुळें त्याला मराठी मिडल-स्कूलमध्यें घातलें तेथेंही तो कोणत्याही वर्गांत नापास न होतां ४ थ्या वर्गाची परीक्षा फर्स्ट डिव्हीजनमध्यें पास होऊन वर नंबर आला ह्यावेळीं त्याला स्कालर-शिप ही मिळाली असती. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, तो हंसतमुखी असल्यामुळें त्याचा चेहरा कधींही दुर्मुखलेला नसे हे सर्व मास्तरांना ४ वर्षांचे अनुभवा वरून ठाऊक होतें परंतु काय झालें कोणास ठाऊक! एके प्रसंगीं हेड मास्तरांचा वर्ग चालू असता तो हसला मास्तरांना वाटलें कीं, हा माझ्याच-कडे पाहून हसला मग त्यांनीं कोणताही विचार न करतां टेबलवरच रूळ ठेविला होता तो घेऊन त्याच्या मनगटावर जो मारला, त्या योगानें त्याचे हाडावर परीणाम होऊन पुढें तें दुखणें त्याला ४,५ महिने भोगावें लागलें. तो उजवाच हात होय त्याला लिहितांही येईना. आम्हांला काळजी पडली कीं, आतां ह्याचा हात नेहमींच अधू होतो कीं, काय? पण डॉ हर्षे साहेब याच्या प्रेमळ उपचारानें त्या दुखण्यातूनही तो बरा झाला पण त्याच्या विषयीं तेथील शिक्षकांनीं जी अढी धरली ती धरलीच. एखादा साधारण पास झालेल्या मुलाचें नांव सुद्धां त्यांच्या वार्षिक अहवालांत येऊन गेलें पण हा त्यांच्याच शाळेंतून उत्तम प्रकारें पास होऊन पुढें बी कॉम. झाला तरी ह्या मुलाची त्यांना आठवण सुद्धां न होतां तेथील हेडमास्तर मला एके वेळीं म्हणतात कीं, हाच कां तो व्हॅगॅबाँड मुलगा. ह्याला तुम्हीं अनाथ बालका-श्रम पुणे येथें शिकण्याकरिता पाठविणार होतां मग मी त्यांना म्हटलें, अहो तो व्हॅगेबाँड होता म्हणून मी त्याला तिकडे शिक्षणाकरितां पाठवणार होतों असें नव्हे तर त्याची बुद्धीच लहानपणापासून तेज असल्यामुळें आपल्या सार-ख्याच्या शाळेंत त्याच्या बुद्धीचा काय विकास होणार? ह्या धास्तीमुळें मी तसा विचार केला होता कीं, तिकडील शिक्षणाचा त्याच्या बुद्धीवर कांहीं परिणाम होऊन कांहीं ऊर्जितावस्था आली तर आली! पण त्याला उच्च कुळांतील हा मुलगा म्हणून प्रवेश न मिळाल्यामुळें आम्हांला तो बेत रहित करावा लागला त्याच्या परीक्षे नंतर मी रिटायर झाल्यामुळें सर्व मुलांना घेऊन अलाहाबादला आलों. येथें दारागंज हायस्कूलमध्यें नवव्या वर्गांत त्याला भरती मिळून वार्षिक परिक्षेंत तो नापास झाला ह्या वेळेला त्याला हिंदी बिलकूल येत नव्हतें. म्हणून

त्यानें हिंदी इंडियन हिस्ट्री एका मास्तरांकडून मागून आणून स्वतः हातानें हिस्ट्री लिहून काढली. आणि त्या योगानें त्याला हिंदी लिहिण्याचा बराच सराव झाला. लागलीच तो पुढील वर्षी मॅट्रीकचे परिक्षेस बसून सेकंड डिव्हीजनमध्यें पास झाला. लागलीच त्याला कायस्थ पाठशाळेंत प्रवेश मिळून त्याची ७॥ रुपये महिना लागणारी फी माफ करण्यांत आली. सर्व शिक्षकांची ही त्याच्यावर कृपा होती. त्यामुळें येथूनही तो उत्तम रीतीनें पास होऊन बी. कॉम. करितां त्यानें युनिव्हरसिटी कॉलेज जॉईन केलें. पहिले वर्षी त्याला ६० रुपये अमरनाथ स्कालरशीप मिळाली. ह्याच वेळीं तेथील युनिव्हर-सिटीच्या साहित्य समेलनाकडून होणाऱ्या प्रथमा, मध्यमा, उत्तमा अशा एका मागून एक हिंदींतील इंटर, बा. ए., एम्. ए. पर्यंत दर्जाच्या शिक्षण मिळविणाऱ्या परीक्षा पास होऊन त्याला विशारद, साहित्यरत्न, अशा पदव्या त्या संम्मेलनाकडून मिळाल्या, व नंतर बी. कॉम. मध्येंही पास होऊन तो सेकंड डिव्हीजन मध्यें आला. याही परिक्षेच्या वेळीं येथील पुष्कळ मोठ मोठ्या लोकांनीं त्याला परीक्षेस बसण्याकरितां लागणाऱ्या फीची मदत करून साहाय्य केलें. त्यापैकीं, नाव घेण्यासारखें साहाय्य अपे श्रीमान भडकमकर साहेब आय. सी. एस्. याचेकडून झालें, व त्यांनी आपल्या ऑफिसमध्यें त्याला नोकरीवर लावून घेतलें. आतां त्यांच्याच संमतीनें तो अर्सेनल मध्यें स्टोअरकीपरचें काम करीत आहे. आणि वय काय तर म्हणे एकोणीसावे! सध्या तो लढाई खात्यांत काम करीत असून तो फील्डवर गेला आहे व त्याला व्हाइसराय कमिशन मिळून तो आनंदांत आहे.

## चि. रामकृष्णाचा जन्म, काशिनाथाच्या मुंजीची हकीकत आणि चि. कुमारी मनीचें लग्न

कुशीच्या लग्नानंतर मध्यें १९२५ च्या डिसेंबरचे ६ तारखेस चि. रामकृष्णाचा जन्म झाला. काशिनाथाच्या नंतर ५–६ वर्षांनीं हा झाला. हेंच आमचें शेवटचें अपत्य. आम्हीं ओरीएंटल कंपनींत १० वर्षांचे अवधीचा ५०० रुपयांचा एक विमा उतरला होता. त्याची मुदत १९३० सालीं संपत आली होती. आतां त्यांत मिळणाऱ्या रुपयांत एखादें कार्य उरकवून घ्यावें असा विचार करून काशिनाथाची मुंज करावी, असा विचार ठरविला. लागलीच

त्या उद्योगास लागलों मुहूर्त वगैरे पाहून सर्वांना कार्यास येण्याकरितां आमंत्रणें पाठविलीं त्याप्रमाणें मनोहरपंत परांजपे आपल्या कुटुंबासह वर्तमान कार्यास आले त्यामुळें कार्यास शोभा आली ह्याप्रसंगीं राजासाहेबांकडील सर्व मंडळीस मेजवानी केली सर्व मंडळी मेजवानीस आली होती. १५००-१६०० रुपयाची चांदीचीं भांडीं बिना यादी शिवाय त्यांनीं आमच्या स्वाधीन करून कार्यास शोभा आणिली. सर्व खाशा पंक्तीला चांदीच्या ताट वाट्या ठेविल्या होत्या. गावांतीलही ४ मोठीं अधिकारी मंडळी पंक्तीस येऊन त्यांनीं मंडप शोभिवंत केला होता अशा प्रकारें वहिनीसाहेब व दादासाहेब यांनीं सेवकास इतकें मोठें सहाय्य करून आमची लाज राखिली, व कार्य यशस्वी करण्यास मदत केली. नाहींतर आमच्या सारख्या गरिबांकडे चांदीचीं भांडीं कोठलीं मिळणार व विश्वास तरी कोण ठेवणार? साधी ताट वाट्या मिळण्याची सुद्धां जेथें मारामार तेथें वरील सारखा संच कोठून प्राप्त होणार? पण श्रीमंतांच्या कृपेनें असेंही प्रसंग एखादे वेळीं घडून येतात. ह्या कार्यातून पार पडतों न पडतों तोंच मनीच्या लग्नाचाही योग जुळून आला परंतु हुंड्यामुळें हें स्थळ कसें पदरांत पडतें ही विवंचना मला डाचूं लागली. मग मी मनोहरपंत परांजपे व बळवंतराव पावगी ह्या दोघांस माझी काळजी विदीत केली. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, दोघांकडूनही कोणत्याहि तऱ्हेची अट न घालतां मी मागितलेल्या रकमेस मान्यता मिळून त्यांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें मदतीचें आश्वासन दिलें. व ते दोघे नुसते आश्वासन देऊनच राहिले नाहींत तर जेव्हां पाहिजे तेव्हां रक्कम तयार आहे असें अगत्यपूर्वक त्यांनीं लिहून कळविलें झालें! माझी एक मोठी काळजी दूर झाली. आम्हीं हुंडा देण्याचें कबूल केलें व हें स्थळ म्हणजे विष्णूपंत दामले यांचे कनिष्ठ बंधू विनायकराव दामले हे होत योग्य प्रसंगीं मुहूर्त वगैरे ठरवून निर्विघ्नपणें कार्य सिद्धीस गेलें. हे गृहस्थ जी. आय. पी. रेल्वेंत नोकर असून आज चांगल्या हुद्यावर आहेत सर्व अधिकारी लोकप्रिय असेंही असून ह्यांचेवर अधिकारी खुष आहेत सध्यां ते वाढत्या ग्रेडमध्यें आहेत. त्यांना एक मुलगी व एक मुलगा अशीं दोन अपत्यें आहेत, व ते सुखानें संसार करून कालक्रमणा करीत आहेत

## माझी पगारवाढ

आतां आमचाही पगार वाढतां वाढतां ३८ चे ४० झाले ४० चे ४४, ४४ चे ४५ व १९३० सालीं ४५ चे ५० झाले या प्रसंगी लेले व काणे साहेब या दोघांनीं मुद्दाम पत्र पाठवून माझें मनःपूर्वक अभिनंदन केलें. पुढे लागलेच एका वर्षानीं ५० चे ५२ झाले नंतर १९३३ सालीं मी रिटायर झालों.

## शाळेंतील देशी खेळांचे सामने

म्युनिसिपालिटीकडून १९२४ ते २५ पासून शाळांत देशी खेळांचे सामने सुरू करण्यांत आले. व त्या करितां २००।३०० रु. पर्यंत खर्च हा होऊं लागला असे हे सांघिक खेळ पुढें बरेच वर्षपर्यंत चालले होते एकदा असाच खो खो चा शाळेंत चढाओढीचा प्रसंग आला १०, ५ वर्षे बराच प्रसिद्ध होऊन गाजला होता अशा खेळांचे सामने अभ्यासाकडेहि दुर्लक्ष होऊन खेळ चालूं देण्यांत येत. असाच एक चढाओढीचा सामना होणार होता. एकंदर आमच्या प्रायमरी शाळा २४ होत्या त्यांच्या २।२ अशा जोड्या लागून चिठ्या टाकून जोडी ठरविण्यांत आली आमचे खेळास आदित-वारी बाजाराचें पटांगण ठरविण्यांत आलें. पहिले दिवशीं बाराही जोड्यांचे सामने होऊन १२ शाळा हरल्या, व १२ यशस्वी झाल्या आतां १२ शाळांच्या पुन. पूर्वी प्रमाणेंच जोड्या ठरविण्यांत आल्या ६ जोड्या लागल्या गेल्या त्यांतही ६ हरल्या, व ६ विजयी झाल्या मग राहिल्या ६. त्यांच्या ३ जोड्या ठरल्या व त्यांचेही सामने पूर्वी प्रमाणेंच झाले. त्या तिन्हींत आमचीही शाळा आली आतां तीन शाळात जोड्या लावावयाच्या कशा ? म्हणून एक शाळा जोडी लावण्याकरितां म्हणून पूर्वी हरलेल्या शाळातून निवडण्यांत आली. आता ४ शाळा झाल्या. त्यांच्या दोन जोड्या जमविण्यांत आल्या त्यांचेही सामने एका शनिवारीं झाले राहतां राहिल्या दोन शाळा एक मराठी व एक उर्दु. असा शेवटपर्यंत आमच्या महाराष्ट्रानें तग धरला आज महिनाभर खेळून खेळून आमची शाळा बरीच थकली होती तशांत वयानें ही सर्व मुलें उर्दूपेक्षां फार कमी बहुतेक काडी पहिलवानच होते आज महिनाभर हे कसे टिकले हेंच मोठें आश्चर्य ! आता हा शेवटचा

सामना बराच चुरशीचा होणार ! व तो पाहण्याकरितां मोठमोठे अधिकारी येणार ! ह्या विषयीं आम्हांला बरीच काळजी वाटूं लागली चालकांचीही विशेष सहानुभूति आमचेकडे नव्हतीच ! परंतु आमचीं मुलें हिंमतवान ! मुलांनींच मला धीर दिला व सांगितलें कीं, मास्तर साहेब तुम्ही घाबरू नका आम्हीं आजही चांगलें काम करून दाखवूं. ही मुलांची हिंमत पाहून मलाही आनंद झाला. खेळ सुरू झाला. सर्व पटांगण माणसांनीं फुलून निघालें होतें जिकडे तिकडे मनुष्येंच मनुष्यें दिसत होतीं खेळ ऐन रंगात आला दुसऱ्या बाजूचीं मुलें वयानें मोठी असल्यामुळें यशस्वी तेच होणार हें ठरलेलेंच होतें पण सामना फार पाहण्या सारखा झाला आमची शाळाही मोठ्या हिंमतीनें खेळली परंतु अखेरीस बरेच गडी बाद झाल्यामुळें सर्व खेळाचा भार एक दोघां मुलांवरच पडल्यामुळें तीं मुलें दमलीं शेवटीं उर्दु शाळा यशस्वी होऊन ढाल त्यांचेकडे गेली मुलांनाही थोडें वाईट वाटल्यासारखें दिसलें. मग मी त्यांची समजूत करून म्हटलें कीं, हारलात तर हरकत नाहीं ही झालेली निराशा आपण पुढें लवकरच भरून काढू. परंतु लिहिण्यास वाईट वाटतें कीं, अशा तऱ्हेचे खेळाचे सामने घडवून आणण्याचे प्रसंग आजपर्यंत झाले नाहींत

## आमचें शेवटचें अपत्य, चिरंजीव रामकृष्ण

सन १९२५ च्या डिसेंबर महिन्यांत पुनः बाळंतपणाचा योग चि काशिनाथानंतर बरेच दिवसांनीं आला या प्रसंगीही नेहमीं प्रमाणें सर्व मंडळी वेळेवर उपयोगी पडून बाळंतपण पार पडलें मुलाचें नांव रामकृष्ण असें ठेविलें ह्या प्रसंगीं आमचा शहरांत बोलबाला असल्यामुळें पुष्कळ लोकांकडून बाळंतविडे वगैरे रूपानें बरेंच सहाय्य व मदत झाली हा मुलगा पुढें वाढत वाढत त्याचे दोन इयत्तेपर्यंत प्रायमरी शिक्षण घरींच झालें त्याला सातवे आठवें वर्षी निमोनिया झाल्यामुळें हा जवळ जवळ चाळीस दिवस आंथरूणावर पडून होता. पुढे त्याचें अंगांत इतकी अशक्तता आली कीं, ती हा वेळ पावेतों भरून निघाली नाहीं आमचे घरगुती डॉक्टर श्री हर्षे हे आम्हांला नेहमी वेळोवेळीं उपयोगीं पडतच. परंतु ह्या प्रसंगीं दुखणें दीर्घ असल्यामुळें त्यांना फार मेहनत पडली कोणत्याही तऱ्हेचा आमच्याकडून मोबदला न घेता त्यांनीं प्रकृती सुधारेपर्यंत औषधोपचार केले त्यांचे

हाताला यश येऊन मुलगा खडखडीत बरा झाला. हे त्यांचे आमच्यावर अनंत उपकार आहेत. या प्रसंगीं मी रिटायर झाल्यामुळें आम्हीं सर्व प्रयागास गेलों. तेथेंही मींच मास्तर असल्यामुळें या मुलाचे दुसऱ्या वर्गानंतरचें शिक्षण प्रयाग येथें बालशाळेंत झालें. तेथें त्याला मी थोडें हिंदी शिकविलें. मग तो पुढें दारागंज हायस्कूल मध्यें भरती होऊन योग्य वेळीं मॅट्रीक झाला. सध्यां प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जरी शाळेंत जात नसला तरी आज तो घरींच अभ्यास करून इंटरच्या परीक्षेस बसण्यापर्यंत त्यानें अभ्यासांत मजल मारली आहे, व लवकरच त्याची परीक्षा होऊन त्या परीक्षेंत तो उत्तीर्ण होईल अशी आशा वाटत आहे.

## एका शाळेच्या दोन शाळा होतात

आतां आपण थोडें शाळेच्या इतिहासाकडे वळूं. १९१६ सालीं नगर-पालिकेनें आमची शाळा आपल्या ताब्यांत घेतल्यापासून तिला स्थिरत्व येत चाललें. या पूर्वी शिक्षकांना दोन दोन, तीन तीन वर्ग शिकवावे लागत असल्यामुळें त्यांना फार मेहनत करावी लागे. त्यामुळें त्याचा परिणाम वार्षिक परीक्षेवर होऊन शाळेचें कामांत थोडा कमीपणा वाटे. तो आतां प्रत्येक वर्गास स्वतंत्र शिक्षक मिळत गेल्यामुळें त्यांच्या वरील तितकें ओझें कमी होत गेलें. पूर्वीपेक्षां आतां पगारातही बरीच वाढ झाली. शिक्षणाच्या कामांत लागणारे सर्व प्रकारचें सामान आम्हांला वाटेल तितकं मिळूं लागलं. त्यामुळें आम्हीं कोणत्याही परीक्षेत विशेषेंकरून कोलरशिप वगैरे परीक्षांत जिल्हाभरांत कोणत्याही शाळेच्या मागें राहिलों नाहीं. अशा प्रमाणें आमची दिवसें दिवस वाढ होत गेल्यानें शाळेंत मुलांची आम्हांला कधींच वाण म्हणून पडली नाहीं. आतां खर्चाचा प्रश्न नसल्यामुळें ४० मुलांस एक शिक्षक या प्रमाणें आम्हांला शिक्षकांचा पुरवठा होऊं लागला. आतां प्रत्येक वर्गाचे दोन दोन अगर तीन तीन सेक्शन होण्याची पाळी आली. ह्या प्रसंगीं आम्हीं पांच शिक्षक होतोंच. आतां वर्ग वाढल्यामुळें वऱ्हाड व नागपूर प्रांतांतून ट्रेनिंग पास झालेले शिक्षक आम्हांला मिळूं लागले. या प्रमाणें नऊ शिक्षक होऊन मुलांची वाढ झाल्यामुळें पूर्वीची इमारत शाळेला अपुरी पडूं लागली. त्याचा नगर पालिकेनें विचार करून एका शाळेच्या दोन शाळा करण्याचें ठरविलें

आमचे जावई

श्री विनायक वामन

दामल, जबलपूर





दुसरें फूल !

चि. मुकुर

[ चि. गोविंदाचें पुत्ररत्न ]

कै. चि. शाम



चि. काशीनाथ याचा मुलगा. हा आपली गोड
आठवण मागे ठेवून सर्वांना सोडून गेला

भालदार पुरा वगैरे मोहोल्यांतील मुलांना संध्यांची जागा फार दूर पडत असल्यामुळें त्या मुलांचे पालकांनीं आमच्या मोहल्यांत एखादी शाळा असावी अशी मागणी नगर पालिकेकडे केली होती. तिला अनुसरून नगर पालिकेनें एक शाखा भालदार पुऱ्यांत उघडण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें जागा पाहून मुलांची योग्य तऱ्हेनें वाटणी करण्यास आम्हांला हुकूम दिला त्याप्रमाणें आम्हीं हुकूमाची अंमल बजावणी करून योग्य ती मुलांची वांटणी करून घेतली या दुसऱ्या शाळेचे हेडमास्तर गणपतराव करमरकर याना नेमण्यांत आलें व त्याना मदतनीस म्हणून पाटक, मुसळे, व देशपांडे देण्यांत आले. व गोल बाजारांतील शाळेंत मी स्वतः, सदाशिवराव परांजपे, नाफडे, भागवत, व देशपांडे असे पांच शिक्षक देण्यांत आले. शिक्षणोपयोगी सामानहीं दोन्हीं शाळांनीं सारखें सारखें वाटून घेतलें, व बाकी लागणाऱ्या सामानाचा योग्य तो पुरवठा नगर पालिकेनें केला. व प्रत्येक शाळेस निरनिराळा एक एक शिपाई मिळून शाळेचें काम सुरळीत रीतीनें चालूं झालें अशा तऱ्हेनें आता नगर पालिकेच्या मराठी दोन शाळा झाल्या.

## शाळेचे बक्षीस समारंभ

सन १९१६ सालचा बक्षीस समारंभ आमचे शाळेची उन्नती होण्याला बराच कारणीभूत झाला. अशाच रीतीचे बक्षीस समारंभ नेहमीं करण्यास पांपडावे म्हणून श्रीमंत राजासाहेब भागरवाले यांच्याकडे सुमारें १८०० रुपये आमचे शाळेच्या खाजगी फंडांतून व्याजीं लावून ठेविले होते त्याचें व्याज दरसाल दर सेंकडा ६ प्रमाणें सुमारें १०० रुपये येत असे. त्या योगानें प्रत्येक दोन वर्षांनंतर सन १९३३ पावेतों असे बरेच बक्षीस समारंभ झाले. त्यांत मुलांना बक्षीसें वाटण्यांत येऊन कांहीं रकम मास्तरांनाही चांगल्या कामाबद्दल बक्षीस रुपानें देण्यांत येई. अशा बक्षीस समारंभाला मोठमोठे अधिकारी अध्यक्ष निवडण्यांत येत. त्यांत मिनिस्टर, कमिश्नर सारखेही अधिकारी निवडण्याचा योग येऊन ह्या समारंभाचे वर्णन नेहमीं लोकांचे डोळ्यांसमोर राही. असे होतां होतां माझ्या कारकीर्दीत शेवटचा समारंभ १९३३ सालीं जानेवारी महिन्यांत झाला. त्या प्रसंगीं आम्हीं शाळेचा एक अहवाल सर्व माहितीनें पूर्ण भरलेला असा प्रसिद्ध केला होता तो पुष्कळांच्या

वाचण्यात असेलच व ह्या प्रसंगीं मुलां मुलींनी उत्तम प्रकारची कामें केल्यामुळें ह्याही समारंभाचें वगैरे सर्वतोपरी झालें. व आम्हीं या प्रसंगीं एक मोठें आदर्शनीय प्रदर्शन मुलांच्या हस्त कौशल्याचें भरविलें होतें. तें पाहून प्रेक्षकांना मोठा आनंद झाला. त्या नंतर असे बक्षीस समारंभ करण्याचा योग आला नाहीं. १९४० चे सुमारास एक स्नेहसंमेलन गोल बाजारच्या शाळेतील शिक्षकांनींही भरविलें होतें. तेंही चांगलें यशस्वी झालें

बक्षीस समारंभाचे वेळीं मुलांना भाषण, गाणीं वगैरे शिकवावीं लागत. आमच्या शिक्षक वर्गापैकीं कोणालाच गाण्याचें विशेष ज्ञान नसल्यामुळें अशा एखाद्या तज्ञ मनुष्याचा आह्मांला विनवणी करावी लागे. गणपतराव करमरकर हे थोडी वेळ मागून येत परंतु सर्वच प्रसंगीं त्यांना तें साधत नसे अशा कित्येक बक्षीस समारंभाचे प्रसंगी रा. रा. गोविंदरावजी हर्डीकर वकील यांनीं आमची बाजू सांभाळून आह्मांला मदत केली आहे. व आमचे उत्सव पार पाडले आहेत. यांना गाण्याचें विशेष अंग असल्यामुळें समयोचित अशीं पदें वगैरे तयार करून ते आमचे शाळेंतील मुलां मुलींना आपला स्वतःचा वेळ खर्च करून शाळेंत तालीम देण्यास येत. असे बरेच प्रसंग त्यांनीं पार पाडण्यास मदत केली आहे. ही उणीव आम्हांला नेहमींच भासे. एखादे वेळीं त्यांना वेळ न मिळाला तर काम अडून राही व दुसऱ्या एखाद्याची प्रार्थना करावी लागे. असे हे गृहस्थ वामनराव केळकर होत. हेही गायनाचे तज्ञ असून यांना गायनाच्या कांहीं शिकविण्याही असत. हे आम्हीं पाहून एखादा गायनाचा शिक्षक आपल्या शाळेस मिळाला तर पहावा, म्हणजे आपली ही भासणारी उणीव सहजा सहजीं भरून निघेल व कोणाकडे तोंड वेंगाडावें लागणार नाहीं. याला अनुसरून आम्हीं म्युनिसिपालिटीकडे अर्ज केला कीं, शाळेंतील मुला मुलींना गायन वादन शिकविण्यासाठीं एखादा शिक्षक मिळावा. त्या प्रमाणें नगर पालिकेकडून शिक्षक ठेविण्यास मंजुरी मिळाल्यावर कांहीं अटीवर वामनराव केळकर यांनाच गायन शिक्षक नेमिलें. हेच शिक्षक आज दहा बारा वर्षें गायन वादन कलेचें शिक्षण मुलांना देत आहेत. व एकंदर कार्यक्रम पार पाडण्यास मदत करीत आहेत. हे उत्साही असून मन मिळाऊ असल्यामुळें गाण्यासंबंधीं सर्व काम बिनबोभाट पार पाडतात. त्यांचें

उदाहरण म्हणजे यंदाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगीं त्यांनीं विद्यार्थ्यांकडून कामें कशी वठवून घेतलीं यावरून दिसून येईल.

## मी सेवानिवृत्त झालों

ह्याप्रमाणें कामें करता करतां माझा पेन्शनचा दिवस येऊन ठेपला वयाला पचावन वर्षें पूर्ण झालीं अंगिकारलेलें काम मोठ्या कष्टानें व हिंमतीनें पार पाडून यशस्वी करून दाखविलें, व मी १९३३ एप्रील महिन्याच्या २२ तारखेस श्रीयुत सदाशिवराव परांजपे यांच्या हातांत शाळेचीं अधिकार सूत्रें देऊन राम राम म्हणत घरीं बसलों. या नंतर एका एकीं प्रयाग येथून माझ्या एका मित्राचें पत्र आलें कीं, आता आपण राम राम म्हणत घरीं बसला आहांत तरी यापुढें आपली लोकसेवा करण्याची इच्छा आहे काय ? आमच्या येथें एक महाराष्ट्र बालशाळा नांवाची संस्था आहे तिचें चालकत्व आपण स्वीकारता काय अशा तऱ्हेचें पत्र येताच मी लगेंच हें पत्र माझ्या मित्र मंडळीला व हितचिंतक मंडळीला दाखविलें आतां मला करमणुकीला कांहींतरी साधन पाहिजेच होतें, म्हणून करमणुकची करमणूक होऊन पोटाला मिळतें तर आलेली संधी व्यर्थ कां दवडावी. अशी सुसंधी पुन येणार नाहीं म्हणून प्रयाग येथील चालकांचें पत्र आल्या बरोबर मी आपल्या इकडील सर्व मंडळीचा विचार घेऊन प्रत्यक्ष एकदां तेथें जाऊन येण्याचें ठरविलें व त्या प्रमाणें एका रविवारीं जाऊन प्रयागास पोहोंचलों. श्री गंगामातेचें स्नान वगैरे करून श्रीगंगामाई व श्री वेणी माधव यांचें दर्शन घेतलें, व तेथील बाल शाळेचे सेक्रेटरी श्रीमान बाबासाहेब गोरे यांना भेटलों त्यांनीं माझें योग्य प्रकारें स्वागत केलें, व संस्थेच्या सर्व सभासदांस मला नेऊन भेटविलें, आणि त्यांचेशीं शाळेसंबंधीं सर्व प्रकारच्या गोष्टी झाल्यावर मी त्यांना म्हटलें कीं, मी पुनः जबलपुरास जाऊन आपल्याला होय किंवा नाहीं तें पक्के कळवितो या प्रमाणें त्यांचीं भेट घेऊन लगेच सायंकाळचे गाडीनें पुन जबलपुरास परत आलों झालेली सर्व हकीकत जबलपुरचे मंडळीस कळविली त्यांत प्रामुख्यानें डॉ. गणपतराव हर्षे यांचेशीं व कुटुंबाशीं विनिमय करून जाण्याचें पक्कें केलें आमच्या कुटुंबाला गंगा, नर्मदा वगैरे नद्यांच्या स्नानाची फार आवड हा त्यांचा हेतू मी मनांत धरून व आपल्या पोटाची व्यवस्था जर सहज होत

आहे तर अशी आलेली सुवर्ण संधी व्यर्थ कां दवडावी अशा सत् हेतूनें मी जाण्याचें पक्कें केलें, व त्या प्रमाणें तयारीस लागलों. सर्व सामानाची योग्य प्रकारें विल्हेवाट लावल्यावर आपल्या बरोबर जे कांहीं सामान नेतां येण्याजोगें होतें त्याचे निरनिराळे सात आठ गठ्ठे बांधून तयार केले, व पेट्या वगैरे व्यवस्थित बांधून जय्यत तयारी केली. ह्या सर्व व्यवस्थेला महिना दीड महिना लागला. माझें जाण्याचें पक्कें ठरल्याचें हां हां म्हणतां सर्व गांवभर पसरलें. तेव्हां मेजवानीची आमंत्रणावर आमंत्रणें त्या महिना दीड महिन्यात रोज येऊं लागलीं अशी पांच पंचवीस आमंत्रणें मीं स्वीकारलीं. त्या प्रमाणें प्रत्येकांनीं आपापल्या घरीं बोलावून आपापल्या परीं आदर सत्कार केला. अशा वेळीं देणगी रुपानें महावस्त्रें वगैरे देऊन मला गौरविलें व जन्माचें ऋणी करून ठेविलें. इकडे कांहीं हितचिंतक व चालक मंडळींनीं सर्वानुमतें विचार करून मानपत्र देण्याचा योग साधून घेतला. व ता. ६-७-१९३३ रोजीं मोठा समारंभ करून मला चांदीच्या तबकासह श्री डॉ गणेश नारायण हर्षे यांचे हस्तें मानपत्र अर्पण करण्यांत आलें. तें मानपत्र खालील प्रमाणें आहे.

# मानपत्र

गुरुवर्य रा. रा. नीळकंठ धोंडदेव लिमये यांस—

*आपण सन १८९२ त तासगांवाहून जबलपुरास आला तेव्हां मातृभाषेत शिक्षणाची सोय नसल्यामुळें येथील महाराष्ट्रीय कुटुंबांत भाषेसंबंधीं आपलेपणा राखण्याची सोय नव्हती. बिकट परिस्थितींत आपण मराठी शाळेच्या कल्पनेला*

मूर्तस्वरूप देऊन येथील मंडळीस स्वभाषेचा अभिमान कायम राखण्यास अवर्णनीय मदत केली आहे. आपला स्वभाव अतिशय मन मिळाऊ व दीर्घोद्योगी असल्यामुळें शाळेची दिवसें दिवस वाढ होत गेली.

येथील सर्व महाराष्ट्रीय संस्था-मराठी व अँग्लो मराठी शाळा, महाराष्ट्र वाचनालय, महाराष्ट्र मंडळ, व्यायामशाळा वगैरे आपल्या परिश्रमाचें इष्टफल समजण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण आपण इतक्या चिकाटीनें प्राथमिक मराठी शिक्षणाचें काम करून मातृभाषेची अभिरुची कायम ठेवली नसती तर या संस्थांचा उदय झाला नसता. तरी आपण येथील महाराष्ट्रीय समाजाचें महाराष्ट्रीयत्व कायम ठेविण्यास कारण आहां.

आपल्या निर्दोष मन मिळाऊ स्वभावामुळें व आपण आचारगरु असल्यामुळें आपण सर्वांस पूज्य व प्रिय आहां. आपले संबंधीं जो पूज्यभाव समाजांत वसत आहे तो शब्दानें यथायोग्य वर्णन करितां येणार नाहीं.

आपल्या शिष्य वर्गांतील अनेक कर्तव्यवान व विद्वान गृहस्थ आपली गुरु दक्षिणा गोळा करून ती अर्पण करण्याचा समारंभ लवकर करतील. आपण येथून प्रयागास जात आहां.

आपल्या वियोगामुळें समाजास खेद होणें सहाजिकच आहे. येथील समाज आपली आठवण जों पर्यंत येथील महाराष्ट्रीय संस्था जीवंत आहेत तों पर्यंत विसरणार नाहीं.

जबलपूर
ता. ६-७-१९३२

जबलपूर येथील
महाराष्ट्रीय समाज

★

# भाग ३ रा

★

★

प्रयाग

सन १९३२ ते १९४१

★

श्री. केशव विनायक तांबे,

ॲडव्होकेट, नागपूर



शाळेचे मुख्य आश्रयदाते कै. विनायकराव तांबे,

जबलपूर यांचे चिरंजीव.

अलाहाबाद बालशाळेचे कार्यवाह

व त्यांच्या सुशील पत्नी



श्री. विद्याधर श्रीधर गोरे

### प्रयागास प्रयाण

मानपत्राचा समारंभ टरकला गेला. आमची सर्व बांधाबांधी झालीच होती तिकीटें गांवांतच मिळत असल्यामुळें आमचे जावई चि. विनायकराव यांनी तीं दुपारींच काढून आणिलीं होतीं. सर्व लगेज सायंकाळींच स्टेशनवर रवाना केलें इतक्या अवधींत श्री. डॉ. शंकरराव शेवडे हे भोजनाचें आमंत्रण देण्यास आले. परंतु आमचे सामानाची रवानगी होऊन आम्हांही जाण्याचे तयारींतच होतों म्हणून आम्हांला निरुपायास्तव त्यांचें आमंत्रण नाकारावें लागलें. यामुळें त्यांचा थोडासा हिरमोड झाल्यासारखा दिसला. ते म्हणत होते कीं, थोडासा फराळ करून तरी जा. परंतु आमचा इलाज नव्हता कशी बशी त्यांची समजूत करून आम्हीं टांगे बोलाविले, व स्टेशनावर गेलों. सामान वगैरे सर्व लगेज झालेंच होतें. रात्रीं नऊ वाजता स्टेशनांत गाडी आली. मी, कुटुंब, व दोघे मुलगे चि. काशिनाथ व चि. रामकृष्ण गाडींत बसलों. सर्व शिक्षक वर्ग व मित्र मंडळी निरोप देण्यास हाजर होती. दोन्हीं शाळेच्या हेडमास्तरांनीं व कांहीं मित्र मंडळींनीं गाडी निघण्याचे अगोदर आमच्या गळ्यांत हार वगैरे घालून आमचा सन्मान केला. व मंडळी खालीं उतरली. इतक्यात गाडीची शिटी होऊन गाडी प्रयागाकडे रवाना झाली व आमची गाडी स्टेशनच्या बाहेर जाईपर्यंत मंडळी सारखी आमचेकडे पाहात होती. आता गाडी दिसेनाशी पाहून सर्व मंडळी मागें परतली असावी. व आम्हींही प्रेमाश्रुमिश्रजलानें भरलेल्या डोळ्यांनीं पुढें रवाना झालों. आज ४० वर्षे ज्या जबलपूर शहरांत आम्हीं वास्तव्य केलें व तेथील मंडळींनीं मला लेंकरा प्रमाणें वाढविलें, त्या जबलपूर शहराचा आज वियोग होत असलेला पाहून आम्हांला दुःख कां बरें होणार नाहीं. शेवटीं आम्हीं मनाचें सांत्वन करून प्रयाग केव्हा येतें याचें चिंतन व मनोराज्य करीत व आजुबाजूची मौज पाहात आणि गोष्टी करीत बसलों झोंप येतच नव्हती. योग्य वेळीं कटणी स्टेशन आलें त्याच प्रमाणें सतना हेंही स्टेशन पार झालें. आतां श्रीगंगामाईचें दर्शन होणार या महत्भाग्यानें अंतःकरण आनंदानें भरून आलें. पंच पंच उषःकाल या समयाला गाडी यमुनेच्या भव्य पुलावरून पार होऊं लागली. तसेंच गंगेचा दूरचा देखावा दृष्टिगोचर होऊन आतां आम्हांला रोजचाच सहवास

घडणार ह्या आनंदानें अंतःकरण भरून आलें. तोंच गाडी स्टेशनांत येऊन थडकली हमालानें सामान बाहेर काढलें, व लगेजचें सामानही पोर्टरानें त्याना योग्य मुशाहिरा मिळाल्यावर स्टेशनचें बाहेर पोहोंचविलें. लगेच टांगे वगैरे करून आम्हीं दारागज येथें सात आठचे सुमारास आमच्या महाराष्ट्र बालशाळेंत येऊन दाखल झालों शाळेंतच आम्हांस जागा मिळाली होती. सर्व सामान वगैरे उतरल्यावर आम्हीं स्नानास गंगेवर गेलों, व ते दिवशींचें भोजन सेक्रेटरी श्रीयुत बाबासाहेब गोरे यांचेकडेच झालें सायंकाळीं आम्हीं आपलें बिऱ्हाडीं येऊन स्वस्थ झोंपलों

## प्रयाग येथील महाराष्ट्र बालशाळेचा चार्ज घेतला

दुसरे दिवशीं तारीख ९-७-१९३३ रोजीं सकाळीं गंगामाईचें स्नान वगैरे करून आल्यावर घरींच जेवण झालें. बरोबर दहा वाजता शाळेंत दाखल झालो व शाळेचा चार्ज घेतला. शाळेंतच राहात असल्यामुळें जेवावें कीं, शाळेंत येऊन बसावें. असा रोजचा परिपाठ सुरू झाला. स्वतःचे मुलाचे शिक्षणाची सोय झाली पाहिजे म्हणून चि. काशिनाथाला दारागंज हायस्कूलमध्यें घेऊन गेलों हेडमास्तरांना येऊन भेटलों. सोबत सर्टिफिकेट दाखल केलें. तो सी पी तील आठवी इयत्ता पास होता. मी हेडमास्तरांना म्हटलें ह्या मुलाला नाईंथमध्यें भरती करा ते म्हणाले आम्हीं बोर्डाला विचारून मग तुम्हांला काय ते उत्तर देऊं. असें म्हणण्याचें कारण कीं, सी पी. मध्यें अकरा वर्षांचा मॅट्रीकचा कोर्स होता, व यु. पी मध्यें दहा वर्षांतच मॅट्रीकचा कोर्स संपे. यामुळें थोडासा अभ्यासांत फरक पडे. व सी. पी कडील मुलाला इकडील नाईंथ क्लासांत घेण्यास शिक्षक धजत नसत. परंतु मी म्हटलें हा मुलगा बुद्धीनें हुशार आहे तो सहसा मागें राहणार नाहीं. अशीं आमचीं बोलणीं होत आहेत इतक्यात बोर्डाचे सेक्रेटरी यांचेकडून उत्तर आलें कीं, या मुलास नाईंथ मध्यें घेण्यास आमच्या कडून कांहीं हरकत नाहीं. मुलानें दोन वर्षे मॅट्रीक कोर्सची पुरी केली म्हणजे झालें असा हुकूम आल्यामुळें प्रश्नच आटोपला. व त्याचें नांव शाळेंत दाखल केलें गेलें, व योग्य प्रसंगीं तो मॅट्रीक पास झाला हें मागें आलेंच आहे. धाकटा मुलगा चि. रामकृष्ण हा लहानच असल्यामुळें महाराष्ट्र बालशाळेच्या तिसऱ्या वर्गांत

ग्याला दाखल केलें व तोही योग्य प्रमाणीं मॅट्रीकची परीक्षा पास होऊन आज इंटरच्या परीक्षेच्या तयारींत आहे

## शाळेंतील कार्यक्रम

महाराष्ट्र बालशाळा सकाळीं १० ला सुरू होऊन दुपारीं ३॥ ला सुटी होते. मी चार्ज घेतला त्या वेळेला शाळेंत फक्त १० मुलें मला मिळालीं. मीं सर्व मंडळीला व कमेटीच्या मेंबर लोकांना जाऊन भेटलों आणि मुलांना शाळेंत पाठविण्याविषयीं विनंतिपूर्वक आग्रह केला. आस्ते आस्ते शाळेंत मुलांची संख्या वाढूं लागली दहाची पंधरा, पंधराची वीस, वीसाची पंचवीस अशी मुलांची संख्या तीन चार महिन्यांचे अवधींत वृद्धिंगत होऊं लागली. या प्रांतीं उन्हाळा आगष्ट ते सप्टेंबर अखेर पर्यंत असल्यामुळें सध्या आमची शाळा सकाळींच भरत होती असे आम्हीं एके दिवशीं शाळा सुटल्यावर जेऊन खाऊन दुपारच्या वामकुक्षीच्या तयारींत होतों; इतक्यांत इन्स्पेक्ट्रेस बाईसाहेबांचा शिपाई शाळेंत येऊन धडकला. आम्हाला कांहीं कल्पना नव्हती, व इकडचा रीतभातही माहिती नव्हती. चपराशी ही बाई असून तिनें हातांत पुजेचें सामान वगैरे घेतलेलें जसें कांहीं गंगामाईच्या स्नानाचीच तयारी अशा स्थितींत ती आमचे शाळेच्या दारासमोर येऊन उभी राहिली, व मास्तर साहेब, मास्तर साहेब म्हणून ओरडूं लागली मला वाटलें कीं, कोणी भिक्षेकरीण दारांत आली आहे म्हणून मी तिचे आंगावर ओरडणार इतक्यांत माझी दृष्टि सहज त्या बाईचे पाठीमागें गेली, तोंच इन्स्पेक्ट्रेस बाईसाहेब तिचे मागें येऊन चूपचाप उभ्या होत्या. लगेच मी सावध झालों व लागलीच इन्स्पेक्ट्रेस बाईसाहेबांना लवून नमस्कार केला, व आंत आणून खुर्चीवर बसविलें. एवढ्या अवधींत ती चपराशीण निघून गेली होती. जसा कांहीं हा प्रसंग घडलाच नाहीं. असें इन्स्पेक्ट्रेस बाई साहेबांनीं दर्शवून माझ्याशीं बोलण्यास सुरवात केली. त्या म्हणाल्या आज स्कूलकी छुट्टी है क्या ? लडके लोक कहां है ? मी म्हणालों हमारा स्कूल अभी सवेरी ही लगता है. अब सब लडके लोक अपने अपने घर गये. तेव्हां त्या म्हणाल्या अच्छा. हाजरी बताव. त्याप्रमाणें हाजरी वगैरे पुस्तकें एका मागून एक सर्व पुस्तकें दाखविलीं. तीं सर्व बरोबर होतीं. त्यांतील योग्य ती माहिती त्यांनीं टिपून घेतल्यावर त्या मला

म्हणाल्या कल हम तुम्हारा स्कूल दस बजे देखेंगे. हुकूमा प्रमाणें मी दुसरे दिवशीं १० वाजतां शाळा लाविली. म्हटल्या प्रमाणें त्या १० वाजतां शाळेंत हाजर झाल्या. व तीन चार घंटे बसून शाळेची पाहणी केल्यावर त्यांचें मन प्रसन्न दिसलें व त्या निघून गेल्या.

दुसरे दिवशींपासून आमची शाळा १० लाच भरूं लागली इकडील वार्षिक परीक्षा मे महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरू होतात. याला अनुसरून आमचे शाळेची परीक्षा मे ७-८-९ या तारखास झाली, व शाळेचा निकालही उत्तम प्रकारें होऊन आमचा जम बसला, व आमचें काम सुरळीत सुरू झाल मी चार्ज घेतल्यावर मला एक सहाय्यक शिक्षक ही मिळाला होता. परंतु ऐन परीक्षेच्या वेळेस या शिक्षकांनी कांहीं गडबड केल्यामुळें त्याच्याविरुद्ध सेक्रेटरी साहेबाकडे मला रिपोर्ट करावा लागला होता. त्याचा परिणाम वाईट होऊन त्या शिक्षकाला आपले घरीं बसण्याचा हुकूम झाला पुढें दोन चार वर्षें मी एकट्यानेंच काम केलें. आता शाळेंत जवळ जवळ चाळीस मुलें झालीं होतीं. येथेंही मी बक्षीस समारंभाची प्रथा पाडलीच होती समारंभाचे वेळीं मुलांकडून कांहीं कार्यक्रमही करून घेत होतों. एकंदरीत माझें काम लोकांना पसंत पडून माझा २५ रु. चा ३० रु. पगार झाला असेंच काम करीत असतांना आमच्या शाळेंतूनच पास झालेली एक विद्यार्थीण मास्तर म्हणून आम्हांला मिळाली तिचें नांव मथुताई साठे असें होतें. ह्या बाईनी माझे बरोबरच पुढें पांच सहा वर्षे काम केलें. मी येथून रिटायर झाल्यावर अधिकारी लोकांशीं या बाईचें न पटल्यामुळें त्यांनीं ही येथील नोकरी सोडली मी नऊ वर्षे या शाळेचें काम केलें, व एका एकीं आजारी पडल्यामुळें व डोळ्यांनीं दिसेनासें झाल्यामुळें मला येथील नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. तो राजीनामा योग्य प्रसंगीं मंजूर होऊन मला तीन महिन्यांची अर्ध्या पगारी रजा मिळाली. त्या तीन महिन्याचे अवधींत माझे बरें होण्याचें चिन्ह कांहीं दिसेना म्हणून बनारसहून पुन प्रयागाला आलों व शाळेचा चार्ज श्री. रामभाऊ आगाशे याना देऊन याही नोकरींतून मोकळा झालों. नोकरी सोडतें वेळीं येथील कमेटीच्या मेंबर लोकांनीं माझा मोठा सन्मान करून मला पानसुपारी केली, व मुलांना मिठाई वाटण्यांन

आली, व मी ज्यावेळीं तेथून नागपूरला येण्याकरितां निघालों त्यावेळीं सड॰केच्या दोन्हीं बाजूला कवायतीच्या शिस्तींत मुलें उभी करून मला खडी ताजीम देण्यांत आली. या प्रमाणें प्रयागला राम राम ठोकून तारीख १९ एप्रील १९४२ ला नागपूरला येऊन दाखल झालों.

## जबलपूर येथें थैली अर्पण व फोटोचा अनावरण समारंभ

अशा प्रकारें प्रयाग येथील जम बसून शाळेचें काम सुरळीत चाललें असतांना चि. गोविंदाचे लग्नाची वाटाघाट सुरू झाली. व आमच्या भावी व्याह्याची अशी तार आली कीं, मुलगा जबलपुरास आहे तेव्हां आम्हीं मुलगा पाहण्यास येतों, व तुम्हींही जबलपुरास या. तारेप्रमाणें ठरल्यावर सध्या शाळेस उन्हाळ्याची सुट्टी असल्यामुळें आम्हीं सर्वच मंडळी तारीख १५ मेच्या सुमारास येऊन दाखल झालों. व्याहीही योग्य वेळीं येऊन मुलगा पसंत केला गेला, व योग्य तें देणें घेणें ठरवून तिथी निश्चय लवकरच कळवितों असें सांगून व्याही आपल्या गांवीं निघून गेले. ह्याच संधीस जबलपूर येथील विद्यार्थ्यांनी व महाराष्ट्र समाजाच्या चालकांनीं मागें मानपत्रांत दर्शविल्याप्रमाणें फोटो अनावरण व थैली समर्पण हा समारंभ घडवून आणण्याचें ठरविलें. व त्या प्रमाणें सर्व तयारी होऊन योग्य वेळीं समारंभ पार पडला. समारंभाची हकीकत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. या प्रसंगी आमचे व्याही समारंभास हाजर होते.

### — तैलचित्र-अनावरण व थैली समर्पण —

जबलपूर येथें ता. ३।६।१९३५ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां महाराष्ट्र हायस्कूलच्या इमारतींत नुकतेच रीटायर झालेले गु. रा. नीळकंठराव लिमये यांना त्यांच्या आजपर्यंतच्या सर्व शिष्यांनीं गुरुदक्षिणा म्हणून त्यांनी जबलपूर येथें प्रायमरी शिक्षण करितां केलेल्या अपूर्व कामगिरीबद्दल थैली देण्याचा समारंभ साजरा केला. या समारंभास त्यांचा शिष्यगण व इतर प्रतिष्ठीत मंडळी हजर होती. हजर असलेल्यांत डॉ. हर्षे, प्रि. टेंभेकर, दे. बा. पाठक, प्रो. ताम्हनकर, डॉ. सरवटे, सौ. सुमित्राबाई परांजपे, सौ. मनोरमा बाई दामले, वगैरे मंडळी प्रामुख्यानें दिसून येत होती. अध्यक्षस्थानीं गुरुवर्य लिमये यांचे माजी शिष्य रा. ज. रा. परांजपे एम्. ए., एल्‌एल्. बी. यांची

सर्वानुमतें निवड झाल्यावर कार्यास सुरवात झाली अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत समारंभाचें महत्व व मराठी शाळेचा इतिहास सांगितला व गुरुवर्यांच्या चिकाटी आणि मनमिळावू स्वभावाबद्दल आपला अनुभव सांगितल्यावर रा. सदाशिवराव परांजपे यांना बोलण्याविषयीं विनंती केली

## सेक्रेटरी रा. सदाशिवराव परांजपे यांचें भाषण

ते म्हणाले आपणा सर्वास गुरुवर्य रा रा. नीळकंठराव लिमये माजी हेडमास्तर न्यु मराठी स्कूल जबलपूर हे परिचित आहेत हे येथील शाळेचे आद्यसंस्थापक होत ह्यांनी ४० वर्षें सतत येथील महाराष्ट्र जनतेची सेवा निरलस व निरपेक्ष बुद्धीनें केली, व सर्वांस ऋणी करून ठेविलें. मास्तर साहेबांनीं मातृभाषाभिमानानें प्रेरित होऊन एका खाजगी जागेत १८९२ सालीं एक वर्ग सुरू केला, व आपल्या चिकाटीच्या प्रयत्नांनीं त्याला शाळेचें रूप आणून दिलें. हीच शाळा पुढें इतक्या भरभराटीस आली कीं, एका शाळेच्या दोन शाळा झाल्या. आपल्या ध्येयप्राप्तीसाठीं त्यांनीं आपल्या आरामाची व वेतनाची मुळींच पर्वा केली नाहीं. हें सर्व येथील आबालवृद्धांस माहीतच आहे. कोणत्याही वाटेनें मास्तर निघाले म्हणजे लहानापासून मोठ्यापर्यंत "मास्तरसाहेब मास्तरसाहेब" ही हाक ऐकूं येते. ह्या वरून हें स्पष्ट सिद्ध होतें कीं, मास्तरसाहेब येथील जनतेस किती प्रिय होऊन बसले आहेत गुरुवर्य सेवानिवृत्त होणार म्हणून एक मोठा समारंभ मराठी शाळेतर्फे सन १९३३ मध्यें साजरा करण्यांत आला होता हे आपणा सर्वांस माहितच आहे तेव्हां हें ध्वनित करण्यांत आलें होतें कीं, त्यांची सेवा जनतेला कितपत रुचली याचा निदर्शक गुणगौरवात्मक समारंभ लोकाकडून स्वतन्त्रीत्या व्हावयास पाहिजे ह्या सर्व गोष्टींचा विचार करून येथील माजी विद्यार्थ्यांतर्फे 'लिमये सत्कार मंडळ' म्हणून तारीख २०–६–३३ रोजीं स्थापन करण्यांत आलें विनंतिपत्रकें काढण्यांत आलीत, व घरोघरीं जाऊन विनतीही करण्यात आली लोकांकडून एकूण रु. ११६ जमा झाले. त्यांतून खर्च वजा जातो रु. १०१ देणगी करितां राहिले तसेच मराठी शाळेची जी एक कमेटी होती त्या कमेटीच्या सभासदांनीं मास्तर साहेबांच्या कामगिरीबद्दल ५०० रुपये देणगी म्हणून देऊं केले. तेही आमचे जवळ आले आहेत मिळून ६०१ रुपयांची थैली

तयार करण्यांत आली लोकांकडून आलेली रकम फारच थोडी आहे. तरी पण फूल नाहीं फुलाची पाकळी ह्या दृष्टीनें गुरुवर्य ह्याचा स्वीकार करतील अशी आशा आहे.

हा समारंभ या पूर्वीच व्हावयास पाहिजे होता. परंतु वर्गणी वेळेवर जमा न झाल्यामुळें व काहीं काळ आणखी थांबल्यास अधिक वर्गणीची उमेद असल्यामुळें हा समारंभ लांबणीवर पडला. असो मध्यंतरी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बेलापूरकर ह्यास शरीर स्वास्थ्याकरितां मसूरीस जावें लागले, व अद्यापी ही ते तेथेंच आहेत, व त्यांना पूर्ण बरें व्हावयास किती दिवस लागतील हें नक्की नसल्यामुळें हा समारंभ आतांच उरकून टाकण्यांत येत आहे. आतां मी विनंति करितों कीं, अध्यक्ष महाराजांनीं ही थैली रा. रा. लिमये मास्तरांस देणगी म्हणून द्यावी. तसेंच येथील एक सद्गृहस्थ व माजी विद्यार्थी यांनीं एक फोटो त्यांचें नांव मराठी शाळेस चिरस्मरणीय राहावें म्हणून दिला आहे, तो उघडण्यास मी अध्यक्षांना विनंति करितों. नंतर गु. लिमये मास्तर यांचे भाषण झालें. ते आपल्या भाषणात म्हणाले कीं, आज जो आपण माझा हा प्रचंड बहुमान केलात, मला थैली अर्पण करून मजविषयीं आपणा सर्वांचें अंतःकरणात वसत असलेल्या सद्भावना व्यक्त केल्यात, आणि थोर महानुभूति दर्शवून जें आज मला भूषविलेंत, ह्या सर्वांबद्दल मी आपली कृतज्ञता कशी प्रगट करावी हें अपदींच कळेनासें झालें आहे इतकें प्रेम करावें आणि नसतें महत्व देऊन एवढी माझी संभावना करावी इतकी माझी पात्रता नाहीं. मनुष्य स्वभावाला आणि कर्तव्य बुद्धीला अनुसरून जेवढें करितां येणें शक्य होतें तेवढें मी केलें आहे त्यांत कांहीं असामान्य आणि वैशिष्ट्यपूर्ण होतें असें मुळींच नाहीं अनुकूल परिस्थिती आणि ज्ञानलालसा असलेली चार मंडळी अशी सहजभूमिका मला मिळाल्यामुळें हे सरस्वतीचें मंदिर मला उभारतां आलें. त्याची खरी सजावट करून सरस्वतीच्या कंठावर हिऱ्या मोत्यांचे हार चढविणें हे तर अद्याप नूतन पिढीवरच अवलंबून आहे श्री. छत्रपती शिवरायांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ केली म्हणून जग त्यांच्या-वरच स्तुति सुमनें उधळतें. पण त्यांच्या कार्याला अनुकूल झालेल्या पार्श्वभूमी-कडे कोणीही पाहत नाहीं किंवा त्यांनीं स्थापन केलेला स्वराज्याचा डोलारा

अखंड उभा राहावा म्हणून ज्यांनीं स्वतःचे प्राण तुच्छ लेखले त्यांनाही ह्या स्तुतिसुमनांत भागदारी घेतां येते, तद्वतच माझी स्थिती आहे केवळ माझ्यावर वसत असलेल्या आपल्या निरतिशय प्रेमामुळेंच आपण माझ्यावर कर्मवीराचा आरोप करीत आहांत यांत आपलें सौजन्य आहे, सुसंस्कृतता आहे. म्हणून मला आपलें वाटतें येवढा हा माझा सत्कार करून मला आपण आजन्म उपकृत करून ठेविलें आहे माझ्यावरील आपलें निःसीम प्रेम पाहून स्नेहार्द्रतेनें गहिंवर येतो, आणि संकोचान मनाला मुग्धता येते. वाटतें ह्या थैलींत केवळ खनीज द्रव्याचे जड तुकडे नाहींत. आपल्या हृदयसागरांतील स्नेहभावनेनें वर ऊर्ध्वबद्धून आलेलीं हीं मोतीं आहेत भावलहरी आहेत. मी त्यांचा स्वीकार करून आज कृतार्थ झालों आहें. आयुष्यात कित्येक प्रसंग असे येतात कीं, परस्पराच्या भावना मूकविनिमयानेंच दिग्दर्शित करणें योग्य व प्रसंग-संमत असतें. नुसत्या वटवटीनें मनाला ग्रासून टाकणाऱ्या सुखस्पंदी जाणिवेला प्रतिबंध निर्माण होऊन रसभंग होतो. मला वाटतें प्रस्तुत क्षण त्यांतलाच आहे. परस्परांचीं मनें स्नेहभावनेनें स्नेहार्द्र झालीं आहेत. स्निग्ध आणि प्रेममय विचारानीं भाराक्रांन्त झालीं आहेत तेव्हां विचारांना व्यक्तत्व देण्याकरिता आतां निर्जिव शब्दांची जरूरी नाहीं

नंतर गुरुवर्य श्री नीळकंठराव लिमये यानीं यथील कांहीं संस्थांना तेथेंच ३१ रुपयांच्या देणग्या जाहीर केल्या.- त्या १५ रु महाराष्ट्र हायस्कूल ५ रु व्यायाम शाळा ५ रु महाराष्ट्र वाचनालय. प्रायमरी मराठी शाळेंतील मुलाकरीतां खाऊ म्हणून रुपये ६ ह्या होत या प्रमाणें पुन एकदा गुरुवर्य लिमये यांचा सन्मान होऊन पानसुपारी झाली व हा गोड समारंभ आटोपला.

## माझा व कुटुंबाचा स्वभाव

या नंतर आमच्या दोघाच्या स्वभावाविषयीं थोडें समालोचन केल्यास वावगें होणार नाहीं. आमच्या मंडळीस देवधर्म, गंगा, नर्मदा वगैरे नद्यांचे स्नानाची फार हौस. जबलपुरास होतों त्यावेळीं जबलपूर पासून नर्मदा नदी पांच सहा मैल लांब. तरी पर्वणी, एकादशी, प्रदोष वगैरे दिवशीं त्यांचें स्नान अंतरलें नाहीं. उपास, तापास याकडे विशेष लक्ष. गाडीरूपी संसाराची दोन्हीं चाकें ठीक असलीं तर ती गाडी कधींही धोका न होता चालवून सारखी

जाते त्यांतील एखादें चाक का कमकुवत असलें तर मग फजीतीस पारावार नाहीं. तशांत आम्हीं प्रायमरी शाळेचे मास्तर आमचा पगार तो किती असणार ? संसार चालविण्यास पैसा मुख्य पाहिजे. तो नसला म्हणजे कोणी आपलें होत नाहीं अशा स्थितींत आज चाळीस पंचेचाळीस वर्षें जी कांहीं प्राप्ती होई त्यात सर्व प्रकारची काटकसर करून ससाराचें गाडें सुरळीतपणें पार नेलें आतां आपण प्रयागास जाणार ही बातमी कुटुंबाचे कानावर पडताच तिला मोठा आनंद झाला कारण कीं, जबलपुरास असताना स्नानास वगैरे जाण्याचे कष्ट पडत आता गंगामाईच्या काठाशींच जाऊन पोहोंचलों वाटेल तेव्हां उठावें कीं, स्नानास जावें जबलपुरास प्राप्ती वाढतां-वाढतां पाऊणशें रुपयेपर्यंत मिळकत होती ती आतां पेन्शन घेतल्यामुळें तीस चाळीस रुपयांत आपलें गाडें हाकावें लागणार त्यातल्या त्यात एवढें बरें होतें कीं, प्रयागास येण्याचे पूर्वीच कार्य प्रसंगांतून बाहेर पडलों होतों आतां पाठीमागें विशेष व्याप असा कांहींच नव्हता मिळणाऱ्या तीस चाळीस रुपयांत काटकसरीनें संसार करूं असे तिनें कबूल केलें होतें तिचें आश्वासन मिळाल्यामुळेंच मी प्रयागास जाण्याची हिंमत बांधली. जबलपुरास सगळा जम बसलेला होता तर प्रयागास नवें राज्य नवी विटी. परदेशात जवळ पैसा पाहिजे नाहींतर फट फजीतीस पारावार नाहीं समजा अधिकाऱ्याशीं आमचें न जमलें तर शें दोनशें रुपयांची तूट येऊन सर्वच रीतीनें आम्हीं संकटांत पडणार परंतु लिहीण्यास आनंद वाटतो कीं, श्रीगंगामाई व ईशकृपेनें अंगिकारलेल्या कार्यांत कांहींही बाध न येतां नऊ दहा वर्षें केव्हां गेलीं हें कळलें सुद्धा नाहीं प्रयागास आल्यावर चि. गोविंदाचें लग्न व चि रामकृष्णाची मुंज हीही पार पडली थोडें बहुत देणें झालें होतें परंतु तें चि गोविंदानें त्याच वर्षी एम. ए पास झाल्यामुळें शिकवण्या वगैरे करून जवळ जवळ हजार रुपयाचें ऋणांतून त्यानें आम्हांला मुक्त केलें. वेळोवेळीं सगळ्यांनीं साह्य केल्यामुळें आम्हाला कोणत्याही तऱ्हेची विवंचना करावी लागली नाहीं आमचा कार्यक्रम बहुतेक आंखलेला असे. सकाळीं पाच वाजतां उठावें, शौचय मुखमार्जन करून लागलेंच स्नान, देवपूजा, संध्या व गुरुचरित्राचा पाठ वगैरे उरकण्यास साडेसाहा वाजत नंतर दोन

शिकवण्या. साडेनऊ वाजतां घरीं येऊन बरोबर साडेदहा वाजतां शाळेंत हाजर. शाळेचें काम साडेचार पर्यंत केल्यावर पुनः दोन तीन शिकवण्या उरकण्यास रात्रीं साडेआठचा वेळ होई. साडेआठला घरीं आल्यावर पुन थोडीशी संध्या करून लगेच भोजन. नंतर मुलाशीं थोड्या गप्पागोष्टी केल्यावर बरोबर दहा वाजतां झोंपेची तयारी. अंथरूणावर पडण्यापूर्वी थोडें ईशचिंतन व रोजच्या कामाचा आढावा आज आम्हीं किती कामें करण्याचें योजिलें होतें त्यांतील किती पार पडलीं व किती राहिलीं अशा तऱ्हेचा आढावा करण्यांत थोडा वेळ जाई. अंथरूणावर अंग टाकल्याबरोबर निद्रा देवीला वश होऊन केव्हांच झोंप लागे हे समजत सुद्धां नसे हा कार्यक्रम जवळ जवळ चाळीस पंचेचाळीस वर्षें अव्याहत चालू होता. त्यात कधींही खंड पडला नाहीं प्रयागला गेल्यापासून माझ्या या वरील कार्यक्रमांत प्रयाग येथील अखेरच्या वर्षात बराच फरक पडला. कुटुंबाचें सोवळें ओवळें विशेष कडक असल्यामुळें माझ्या हातून तें पाळलें जात नव्हतें. नऊ दहा वर्षांत त्याचें गंगेचे स्नान कधींही चुकलें नाहीं तर माझें कधीं होई तर कधीं नाहीं अशा रीतीनें संसार चालतां चालतां मी एका एकीं आजारी पडल्यामळें मला प्रयाग सोडावें लागलें. मुलाच्या शिक्षणाकरितां म्हणून कुटुंबाला तेथे राहणें प्राप्त होतें.

## श्रीमंत छत्रपती करवीर सरकार यांचे अस्थीस पुष्पांजली

१९४० चे सुमारास असा एक योगायोग घडून आला कीं, ज्यांच्या बारशाचे समारंभा निमित्त आम्हीं पन्नास वर्षांपूर्वी कोल्हापुरास गेलों व तेथील देखावा पाहिला त्याच श्रीमंत छत्रपती करवीर सरकारच्या अस्थी मोठ्या समारंभानें प्रयागास आल्या असतांना आमच्या मराठी बालशाळेच्या मुला मुलींना त्या प्रसंगीं घाटावर दुतर्फा उभें राहून अस्थीस खडी ताजीम दिली. त्या प्रसंगीं प्रस्तुत लेखक मराठी बालशाळेचे मुख्य अध्यापकच होते. ही अल्पसेवा महाराजांचे चरणीं अर्पण असो. असा हा एक विचित्र योगायोगच समजला पाहिजे

# भाग ४ था

नागपूर

सन १९४१ ते ४४

**समारोप**

या प्रकारें प्रयाग येथील काल आनंदांत जात असतां एकदा जबलपूर येथील शिक्षक मंडळींनीं स्नेहसंमेलनाकरितां मला मुद्दाम आमंत्रण केलें होतें त्याप्रमाणें मी जबलपुरास गेलों पुष्कळ दिवस माझें मनात असें घोळत होतें कीं, सर्व मोठमोठे लोक आपापलें आत्मचरित्र लिहितात एखाद्या प्रायमरी शाळेच्या शिक्षकानें आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे असें कोठेंही वाचण्यांत आलें नव्हतें प्रो. कर्वे, केसरीचे संपादक श्री. तात्यासाहेब केळकर, श्रीमान जस्टिस रानडे यांच्या आयुष्यातील आठवणी वगैरे पुस्तकें लिहिणारे मोठ मोठे विद्वान व साहित्यसम्राट होते मी य कथित एक प्रायमरी शिक्षक न विद्या, न अक्कल. अशानें चारित्र लिहिण्यास उद्युक्त होणें म्हणजे आपलें जगांत हसें करून घेणेंच होय परंतु महत्वाकांक्षा मोठी जबर असल्यामुळें पुष्कळ दिवस मी या विचारांत होतों हा विचार सारखा मनांत घोळत होता वरील स्नेहसंमेलनाची संधी साधून आपल्या मनात आलेल्या विचारांची परिस्फुटता अशा प्रसगीं करावी असें मनांत योजून रा. काकासाहेब लेले, श्री बाबुराव ओक व श्री दिनकरराव काणे आणि आमचे सर्व सहाय्यक बंधू या सर्वांचे पुढें मी आपलें चरित्रलेखनाचा हेतु मांडला व या सर्वांचे होकारार्थी उत्तर मिळाल्यावर ह्या कामास लागलों लागलेच प्रयाग येथे गेलों व लिहिण्यास आरंभ करून सुमारें पांचशें पानें बावीस दिवसांत लिहून काढलीं परंतु मला अशी भीति वाटूं लागली कीं, माझी भाषा व लेखनशैली वाचकास पसंत पडते किंवा नाहीं मी प्रायमरी शाळेचा शिक्षक, लोकांच्या दृष्टीनें आधींच कमी दर्जाचा, अशा रीतीनें एवढें मोठें धाडस करणें हा एक मोठा निर्वाणीचाच प्रसंग होता परंतु मी मोठी हिंमत करून व मन पक्कें करून आमच्या महाराष्ट्र बालशाळेच्या एक दोन सभासदांना मींच लिहिलेलीं पानें वाचून दाखविलीं त्यांनीं विशेष पसंती दर्शविल्यावरून मनाला जास्त हिंमत वाटूं लागली. आणि जबलपुरात येऊन वर उल्लेख केलेल्या तिन्हीं सद्गृहस्थांस आपलें लिखाण सादर केलें त्या लोकांनींही लिखाण पसंत केले मग आणखी थोडी हिंमत आली शेवटीं पुण्यास जाऊन केसरीचे संपादक व आणखी कांहीं मित्र

मंडळी याना हें लिखाण दाखविलें केसरीचे संपादकांनी संतोष व्यक्त केला, व सांगितले कीं, चरित्र लेखन हा खाजगी प्रश्न असल्यामुळें स्थानीय मंडळींनींच त्याला हातभार लावून प्रसिद्धीस आणलें पाहिजें. पुढें आणखी बऱ्याच लोकाना हें लिखाण दाखविलें. त्यात श्री काकासाहेब आठवले व प्रोफेसर बेहरे यांनीं हें लिखाण पसत केलें छापण्यास कांहीं हरकत नाहीं, असे त्याचें मत पडल्यामुळें मी हें आता छापून कसें प्रसिद्धीस येतें ह्या विचारास लागलों अशा संधीस आमच्या जबलपूर येथील मराठी प्रायमरी शाळेस सुरू होऊन आज पन्नास वर्षे होत होतीं. इतर सर्व लोक सुवर्ण महोत्सव करितात, तर आपल्या ह्या संस्थेचाही सुवर्ण महोत्सव का होऊ नये ? आपल्या शाळेचे विद्यार्थी आज नांवारूपास येऊन सर्व प्रांतभर किंबहुना हिंदुस्थानभर पसरलेले असून आज मोठ मोठ्या हुद्यावर काम करीत आहेत. म्हणून ही कल्पना मी माझे मित्र व कांहीं विद्यार्थी व शाळेचे हितचिंतक यांचे पुढें माडली अशा ह्या कल्पनेस सर्वांची अनुकूलता मिळाल्यावर जबलपूर येथील मंडळींनीं लागलेच त्याला मूर्तस्वरूप देण्याचें ठरवून ती सर्व मंडळी ह्या कामास लागली यांत प्रामुख्यानें डॉ बेलापूरकर, श्रीमंत नारायणराव खरे, श्रीमती मनोरमाबाईसाहेब गोळवलकर, व हल्लीं विद्यमान शिक्षक यानीं मोठ्या उत्साहानें भाग घेऊन कार्यास लागले व तारीख २५-२६-२७ डिसेंबर १९४३ हे कार्याचे दिवस ठरवून तशा तऱ्हेच्या निमंत्रण पत्रिका काढून वाटण्यांत आल्या. ठरल्या प्रमाणे वरील तारखेस समारंभ सुरू होऊन समारंभास कोणत्याही तऱ्हेचीं विघ्नें न येता ईशकृपेनें तो पार पडला

ह्या प्रसंगीं श्रीमान काकासाहेब लेले यानीं समयोचित असें भाषण केल्यावर डॉ बेलापूरकर, उत्सव कमेटीचे सेक्रेटरी यांनीं अहवाल वाचला व मला चरित्र लेखनाकरितां ह्मणून दोनशें रुपयाची थैली अर्पण केली. नंतर भालदारपुरा प्रायमरी शाळेचे हेडमास्तर यांनी एकंदर उत्सवाचा गौरवपर लिहून आणलेला लेख वाचून दाखविला. आणि मीही जे चार शब्द लिहून नेले होते तेही त्यांनींच वाचून दाखविले हीं दोन्हीं भाषणें खालीं दिल्याप्रमाणें आहेत

## माझें भाषण

प्राथमिक शाळा जबलपूर या संस्थेच्या सुवर्ण महोत्सव मंडळाचे व आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष, सभासद, शिक्षक आणि विद्यार्थीगण, व बंधू भगिनींनो:—

सुमारें दोनशें वर्षांपूर्वी '**गढामंडळ**' म्हणजे सध्यांच्या जबलपूर कमीशनरीचा भाग पेशव्याचा मांडलिक होऊन इ. स १७८० चे सुमारास तो प्रत्यक्ष पेशवाईतील एक सुभ्याचें ठिकाण झाला जवळ जवळ ४० वर्षें हा प्रांत पेशव्यातर्फे सागरचे राजे व नंतर नागपूरकर भोंसले यांच्या ताब्यांत होता प्रत्यक्ष जबलपूर शहर म्हणजे मराठ्यांनीं वसविलेलें मराठ्यांचें स्थानिक ठिकाण दिक्षित पुरा, भालदार पुरा, शिंद्याचे पथकाची जागा, कोतवाली, कमानिया फाटक इत्यादि सर्व मराठे काळची स्मृति चिन्हें होत. १८१८ पर्यंत मराठी सत्ता जबलपूर प्रांतीं प्रत्यक्षपणें वास करीत होती पण काळाच्या ओघात १८१८ ह्या वर्षी पेशवाईबरोबर या सत्तेचा अंत होऊन येथें इंग्रजी अमल सुरू झाला १८२० ते १८७० च्या ५० वर्षाच्या अवधींत मराठ्याच्या अंमलाबरोबरच त्यांची भाषा, त्यांची संस्कृती, इत्यादि गोष्टींचा हा लोप होऊन सागर, जबलपूर, मंडला इत्यादि गढामंडळ प्रांतिय लोकांचे तोंडी हिंदी भाषा खेळूं लागली. चोहीकडे मराठी वळण जाऊन हिंदी वळण दिसूं लागलें पुरुषांच्या नेसण्यांत, बोलण्यांत, वागण्यांत, हिंदुस्थानी प्रकार घुसून महाराष्ट्र संस्कृतीचा प्रभाव अगदीं नामशेष होण्याच्या बेतांत आला मराठी संस्कृती किंवा वळण बायकांनीं काय तें तेवढें टेविलें होतें. परंतु त्या तरही काळाचा मोठा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. पुरुष वर्गात चार चौघांत मराठींत बोलण्याची लाज वाटावयाची अशी स्थिती झाली होती. इतका भयंकर परिणाम ५० वर्षांच्या अवधींत घडून आला. याच सुमारास सागरचे राजे यांस सागरहून जबलपूरास आणण्यात आलें होतें १८५७ च्या बंडानंतर आतां कोठें थोडें स्थिरस्थावर होऊं लागलें होतें व देशांत आपल्या आजच्या परिस्थितीचा विचार होण्यास नुकतीच सुरुवात झाली होती अशा वेळीं म्हणजे १८७०-७५ चे सुमारास जबलपूरच्या महाराष्ट्र मंडळींत हा थोडीशी जागृती झाली असल्यास नवल नाहीं जी आय पी रेल्वेच्या

निमित्तानें व इतर सरकारी नोकरीच्या निमित्तानें येथें महाराष्ट्रांतील पांढर-पेशा वर्ग जबलपुरास येऊं लागला होता संस्कृतच्या एक दोन पाठशाळा येथें होत्या. पण मराठी शिक्षणाची सोय येथें नव्हती म्हणून मराठी शिक्षणाची शाळाही उघण्यात आली रा ब गोखलेकरांचे आजे श्री मुकुंदराव हे झांशाहून येऊन जबलपुरांत स्थाइक झाले होते ते फार हौसी असून उत्सव, उत्साह इत्यादि गोष्टींत त्यांनीं भाग घेऊन जोराची चालना दिली मराठी शाळा जवळ जवळ १०-१५ वर्षे चालून पुढें ती कांहीं कारणानीं बंद पडली मराठी शाळेचे त्यावेळीं गुरु साहेब मंडपे हे कर्णधार होते राजासाहेब सागर यांचा सर्व गोष्टींस आश्रय होता. शाळा बंद पडल्यामुळें पुन शिक्षणाचा प्रश्न महाराष्ट्र समाजापुढें दत्त म्हणून उभा राहिला परप्रांतांतून आलेल्या मंडळीस मुलांनीं हिंदीतून शिकणें इत्यादि गोष्टी पसंत पडेनात म्हणून रा विनायकराव ताबे यांनीं खाजगी शिक्षणाच्या दृष्टीनें मला आपल्या मुलांना शिकविण्या-करितां शिक्षक म्हणून १८९३ सालीं बोलविलें त्याच वर्षी मंडळींनी मराठी शाळेची स्थापना करून शाळा रजिस्टर केली व शाळेस थोडीशी ग्रँटही मिळूं लागली श्री राजेसाहेब, कै रा. माधवराव परांजपे, कै रा. माधवराव डोळे मुन्सरीम, कै रा क्षारसागर ड्राईंग मास्तर, कै जयदेवराव दिक्षीत इन्स्पेक्टर ऑफ् स्कूल्स, इ मंडळींची शाळेच्या पहिल्या १० वर्षांत फार मदत झाली. १९०२ चे सुमारास सदर मराठी शाळा हितकारणी संस्थेनें आपल्या ताब्यात घेतली व मराठी शाळेंतून पास झालेल्या विद्यार्थ्यांना ए व्हा. स्कूल व हायस्कूल मध्यें मराठी शिक्षणाची सोयहि त्यानीं केली व या प्रीत्यर्थ श्री राजासाहेब यांनीं आपली व्हिक्टोरिया हॉस्पिटल समोरील कांहीं जागा हितकारिणीस इमारत बांधण्यासाठीं दिली ही व्यवस्था इ. स १९१६ पर्यंत चालली होती. शाळेस कै गणपतराव करमरकर, रा. मुसळे मास्तर, इत्यादि मारखे उत्साही शिक्षक मिळाल्यामुळें शाळा चांगली चालली होती मराठी शाळा चांगल्या तऱ्हेनें चालते हें पाहून जबलपूर म्युनिसिपल कमेटीनें तिला आपल्या ताब्यांत घेतलें. व तेव्हांपासून मराठी शिक्षणाची व्यवस्था म्युनसिपालिटीच्या हातात गेली. विद्यार्थीवर्ग सारखा वाढत चालला व सन १९३२ मध्यें २ मराठी शाळा निर्माण करण्यांत

आल्या. मराठी प्रायमरी शिक्षण प्रचार जोराचा झाल्यामुळें सर्व शिक्षण मराठी माध्यमांतून पुढें का शिकविलें जावूं नये, असा प्रश्न येथील महाराष्ट्र समाजापुढें उभा राहिला, व १९२६ चे सुमारास मराठी मिडलस्कूलचे वर्ग काढण्यास सुरुवात झाली १९३० चे सुमारास मराठी मिडलस्कूल चागल्या तऱ्हेनें चालूं झालें आतां सदर मुलांच्या दृष्टीनें हायस्कूलची गरज भासूं लागली व ही गरज भागविण्यासाठीं १९३३ चे सुमारास हायस्कूलचा वर्ग चालू करण्यात येऊन २–३ वर्षांत महाराष्ट्र हायस्कूलचे विद्यार्थी मॅट्रिक परीक्षेस बसण्यापर्यंत व्यवस्था झाली आज ७–८ वर्षांपासून महाराष्ट्र हायस्कूल यशस्वीपणानें चाललेलें आहे व त्या संस्थेने आपल्याकडून एक हिंदी इंग्रजी हायस्कूल मुलाचें व एक हिंदी इंग्रजी हायस्कूल मुलींचेंही चालूं केलें आहे व या साऱ्या संस्था अत्यंत सुंदर तऱ्हेनें चालविल्या आहेत मराठी प्राथमिक शाळेच्या दृष्टीनें नूतन मराठी विद्यालय ही नवीन संस्था स्थापन झाली असून अजूनही कांहीं प्रायमरी शाळेची लोकाना गरज भासू लागली आहे महाराष्ट्र शिक्षण मंडळास एखादें कॉलेजही चालविणें आतां सहज होईल येथपर्यंत येथील शिक्षणाची वाढ झाली आहे वरील प्रमाणें येथील शिक्षणाचा थोडक्यात आटावा मी आपणापुढें मांडला आहे याची विस्तृत माहिती मी माझ्या चरित्रांत दिली असल्यामुळें आपला जास्त वेळ मी घेऊं इच्छित नाहीं

आता सदर संस्था चालविताना मला शाळा कमेटीची वेळोवेळीं फार मदत झाली व विशेषतः श्री राजे साहेब, रा ब. मनोहरपंत गोळवलकर, रा ब वामनराव कोल्हटकर, श्री रा. रा. रंगोपंत भट, श्री रा. मुकुंदराव लोकरस, श्री रा॰ जयरामपंत हर्षे, डॉ हर्षे, श्री रा लेले, बॅ शेवडे, श्री रा. माधवराव बेलापूरकर, रा केशवराव परांजपे, रा केशवराव पुरोहीत, श्री हनुमानप्रसाद मिश्र, श्री फत्तेचंद, श्री बाबा-साहेब ओक, श्री बापूराव ओक इत्यादि इत्यादि मडळींची फार फार मदत झाली त्या बद्दल मी त्या सर्वांचा फार आभारी आहे

आजच्या उत्सव प्रसगीं माझे सहकार्यकारी श्री रा रा गणपतराव करमरकर हे हयात नाहींत म्हणून मला फार दुःख होतें. त्यांची मला अत्यंत कळकळीची मदत होती माझ्या विद्यमान मास्तर बंधूंनींही मला फार प्रेमानें

वागविलें व आजही ते आपुलकीच्या भावनेनें वागवीत आहेत. या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतों. शाळेचा विद्यार्थीवर्ग आज कोणी अय्य बी एस, कोणी वकील, कोणी प्रोफेसर, कोणी डाक्टर या प्रमाणें मोठमोठ्या हुद्यावर व पदावर चढलेला पाहण्याचा सुयोग त्या परमेश्वरानें मला आणून दिला. या बद्दल मी त्याचा अत्यंत ऋणी आहे. आज आपण जो माझा सत्कार करीत आहात तो वास्तविक माझा नसून आपण म्हणजे येथील महाराष्ट्र समाजानें जो मराठी भाषेचा विद्यावृक्ष ५० वर्षांपूर्वी लावला त्या सत्कार्याचा आहे. आपण लावलेल्या रोपाचा इतक्या लवकर प्रचंड वृक्ष होऊन तो फळभारानें ओथंबून गेलेला पाहण्याचें भाग्य मला आज ईशकृपेनें लाभलें आहे. यातच मला आनंद व धन्यता वाटते.

आता आजच्या प्रसंगाचे अध्यक्ष, कमेटीचे सदस्य व जबलपूर येथील अखिल महाराष्ट्र समाज यांचे मी पुन: पुन: आभार मानून आपली सर्वांची रजा घेतों.

* * *

या प्रमाणें दिवसाचा कार्यक्रम आटोपल्यावर प्रायमरी शाळेच्या लहान मुलांमुलींनीं कांहीं कार्यक्रम रात्रौ करून दाखविले ते फार उत्तम वठले. नंतर दुसरे दिवशीं माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनीं दोन नाटकाचे प्रयोग केले तेही फारच सरस वठले. तशांत एक गायनाचाही प्रोग्राम झाला तोही फार उत्तम वठला. नंतर बक्षीस समारंभ होऊन यशस्वी मुलांना चांगली बक्षीसें वाटण्यात आलीं. या तिन्ही दिवसाच्या कार्यक्रमास पुरुष, मुलें, व स्त्रिया यांची भिकार गर्दी जमत असे. थंडीचे दिवस, रात्रीची वेळ असूनही सर्व मंडप फुलून निघे. अशा रीतीनें योजलेला कार्यक्रम सर्वांच्या मदतीनें व प्रभुरामरायाच्या कृपेनें निर्विघ्नपणें पार पडला व अंगिकारलेलें कार्य यशस्वी रीतीनें पार पडल्याबद्दल पुन: एकदां प्रभुरामरायाचे चरणीं निमग्न होऊन वाचकांची रजा घेतों.

# उपसंहार

**काशीनाथः**– ह्या पुस्तकाचा १ ला, दुसरा, व ३ रा असे ३ भाग १९४० सालीं श्री गंगामाईच्या तीरावर बसून लिहिले गेले त्या नंतर मी बराच आजारी पडलों. कांहीं चैन पडेना, त्याच संधीस चि काशीनाथही नुकत्याच सुरू झालेल्या लढाईवर गेला त्याचाही थोडा परिणाम मनावर झाला लोक म्हणूं लागले काय हो तुमचें हृदय कठोर! मुलाला अशा लहान वयांत लढाईवर पाठविला कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल कोण जाणे! अहो लढाईच ती! असे प्रसंग येणारच! नाना प्रकारचे प्रसंग येणारच, त्याला भिऊन कसें चालेल! प्रसंगास तोंड हें दिलेंच पाहिजे असें मी त्यांना उत्तर देत असे

लहान तरुण मंडळी मोठ्या उत्सुकतेनें आपलीं नावें सैन्यांत नोंदवीत होते कांहींचा स्वभावच असा कीं आपण भियायचें व आपल्याबरोबर दुसऱ्याला हा भिववायाचें गप्पा मात्र मोठ्या व विनाकारण सरकारला दोष

मी मुलाला सांगितलें कीं भिऊं नको तुझी हिंमत असेल तर तूं जा लोक वाटेल तें म्हणोत त्याकडे लक्ष देऊं नको. त्याचीच हिंमत खरी! त्याच्या कांहीं हितचिंतकांनीं त्याला रुकार दिला त्याप्रमाणें तो भरती झाला व कामावर जाऊं लागला पुढें तो वाढता वाढता प्याद्याचा फर्जी झाला सुभेदार होऊन व्हाईसराय कमिशनही मिळालें याच संधीस त्याचें लग्न झालें. इराकपर्यंत मजल मारली शेवटीं मुंबईजवळ मालाड येथें बदली झाली इकडे लढाई बंद झाली तसे लोक कमी करूं लागले. कमी ग्रेडवर राहात असाल तर तुमचा नमणूक पक्की करूं नाहीं तर रजा! आतां सरकारचें काम झालें! त्याना लोक काढावयाचेच होते तेव्हां चालू ग्रेडवर ते कशाला ठेवतात! म्हणून नोकरी सोडणें भाग पडलें. त्याच संधीस त्याला कलकत्त्यास त्याच्या एका मित्रानें एका देशी फर्ममधें शिफारस करून लावून दिलें! त्या ठिकाणीं तो मध्यां काम करीत असून त्याला पगारही चांगला मिळतो. शिवाय राहण्यास जागाही अशा ऐन वेळीं कलकत्या सारख्या शहरांत पोटाची सोय करून दिल्या

बद्दल त्या मित्राचे आभार मानणें अत्यंत जरूर आहे आता तो व त्याची पत्नी एवढ्या मोठ्या शहरात मोठ्या आनंदानें कालक्रमणा करीत आहेत

परंतु लिहिण्यास थोडें दुःख होतें कीं त्याच प्रथम अपत्य घनश्याम, ज्याच्यावर त्याचा फारच जीव होता, कांहीं महिन्यापूर्वी स्वर्गवासी झाला ईश्वरी इच्छा ! त्याच्यापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें म्हणून आलेल्या दिवसास पाठ दिली पाहिजे '! त्याच्या पाठीवर त्याना एक मुलगी झाली आहे ती सध्यां ४।६ महिन्याची आहे, व आपल्या मातापित्याचें मनोरंजन करीत आहे

माझ्या इतर मुलामुलींचा उल्लेख वर येऊन गेलाच आहे त्याच्याबद्दल दोन शब्द लिहून मग माझी हकीकत लिहितों –

**यमू**.– आजकाल ही मुलगी ह्या येथें सरकारी प्रायमरी शाळेंत हेड-मिस्ट्रेस असून पगार १००।१२५ मिळतो लोकांत व सरकारात मान्यता आहे तिलाही एक मुलगी असून वैवाहिक संबंध बिलासपूर येथील गडबोले घराण्याशी झाला आहे.

**चि. सौ. गंगू**:– हिचाही ममार मोठ्या घराण्याशीं संबंध आल्यानें दिवसें दिवस वाढता आहे. हिचा एक मुलगा सध्या बनारस मुक्कामीं एका खाजगी कारखान्याचा मॅनेजर आहे त्याचेंही लग्न नागपूर येथील रहिवाशी भुसारी घराण्यातील मुलीशीं झालें आहे. एकंदरीनें ईश्वरकृपेनें गाडी ठीक चालली आहे

**गोविंद**:– मागें लिहिल्याप्रमाणें हा डी ए. जी पी टी. मध्यें असून सध्या सुपरिंटेंडेंट म्हणून काम करीत आहे वाढती ग्रेड आहे. त्यालाही ३ मुलगे व दोन मुली अशीं ५ अपत्यें असून मोठे दोन मुलगे हायस्कूलमध्यें शिक्षण घेत आहेत त्याच्या लहान मुलांशीं खेळतां खेळतां माझाही बराच वेळ आनंदात निघून जातो.

**रामकृष्ण** – हा अलाहाबादचा मॅट्रिक असून तेथीलच बोर्डाची इंटर-चीही परीक्षा प्रायव्हेट बसून पास झाला आहे. सध्या तो नागपूर येथील

ए आय आर. च्या ऑफिसमध्यें टायपिस्ट असून पगार शेंभर रुपयांशें मिळतो. त्याचा अभ्यास चालू असून यंदा तो बी ए. च्या परीक्षेस बसणार आहे

आतां राहतां राहिली माझी स्वत ची हकीगत माझा आजार १९४१ पासून सुरू झाला मन अस्वस्थ असून कांहीं चैन पडेना अशा सधींसच मीं आपलें आत्मचरित्र लिहिण्यास आरंभ केला व संपविलें. असें नेटानें काम केल्यामुळें त्यांचा डोळ्यावर परिणाम होऊन डोळे बिघडले दृष्टि मदावली शाळेंत काम करणें अशक्य वाटूं लागलें ही स्थिती मी शाळेच्या अधिकाऱ्या-जवळ मांडली पण तेथील शाळेच्या चालकांनीं मोठें आश्वासन देऊन तसेंच पुढें काम चालविण्याचा आग्रह केला परंतु मलाच तें पसंत नसल्यामुळें कांहीं दिवस सुट्टी घेऊन जवळच काशीस मुलीकडे गेलों तिनें त्यावेळीं मोठी सुश्रुषा केली। औषध पाणी केलें परंतु कांहीं बरें वाटेना सर्व मंडळी मनापासून सेवा सुश्रुषा करीत असतांही कांहीं आराम वाटेना मग चि सौ गंगूचे व जावई-बोवांच्या संमतीन चि गोविंदास बोलाविलें व त्याला सर्व हकीगत सांगितली सर्वांचा असा विचार पडला कीं आता प्रयागची नोकरी सोडून गोविंदाजवळ नागपुरास जाऊन राहावें परंतु ही गोष्ट आमच्या कुटुंबास पसंत पडेना त्याचा विचार प्रयागासच राहावें व तेथें औषध पाणी करावें त्यांना गंगा-स्नानाची फार आवड सर्व मंडळी ओळखीची झालेली त्यांना प्रयाग सोडण्याची इच्छा होईना मग आम्ही विचार केला कीं त्याची इच्छा आहे तर त्यांना तेथें राहू द्यावें, आपण नागपुरास जाऊं औषध पाणी करूं. बरें वाटल्यास नागपुरेंच नाहीं तर प्रयागास येऊं प्रयत्न करून पाहूं जसा कांहीं योगायोग असेल तसें होईल ह्याप्रमाणें निश्चय करून शाळेचा राजीनामा व कामाचा चार्ज देऊन गंगामातेचा आशीर्वाद घेऊन प्रयाग सोडलें तेथील मंडळींना मोठें अवघड वाटलें ऋणानुबंध मोठे जबर असतात. कोणत्या ठिकाणीं कसें प्रेम जडेल हें सांगवत नाहीं आम्हालाही अवघड वाटलें. तशा स्थितींतच प्रयाग सोडलें व गोविंदाबरोबर नागपूर गांठलें.

दुखणें असें कांहीं जबर होतें कीं कोणास त्याची परिक्षाच होईना ॲलोपाथी, होमियोपाथी, वैद्य, व डॉक्टर सर्व थकले. आराम पडेना एका डॉक्टरने निदान बरोबर केलें होतें अशी माझी समजूत आहे परंतु त्यावर

औषधोपचार कांहीं चालण्यासारखे नव्हते म्हणून डॉक्टराना काही औषध देतां येईना अशा स्थितींत असतानाच एका मित्राची गांठ पडली ते मित्र म्हणाले मास्तर माझे एक मित्र प्रसिद्ध वैद्य आहेत त्यांना दाखविना का मी दुखण्याला त्रासलेंच होतों मी कबूल झालों व वैद्याकडे गेलों हे वैद्य श्री. छागाणी, नागपुरास प्रसिद्ध व नामांकित वैद्यापैकीं आहेत त्यांनीं माझी प्रकृती वगैरे पाहून औषध देतों असें कबूल केलें व अमक्या दिवशीं येण्यास सांगितलें त्याप्रमाणें आम्हीं ठरलेल्या दिवशीं त्यांचेकडे गेलों पुन त्यांना नाडी वगैरे पाहून औषध सुरु केलें पहिल्याच मात्रेस पोट उठणें बंद झालें मुख्य दुखणें तेच होतें तें कमी झालें तरी ६ महिने औषध घ्यावें लागलें मधून मधून केव्हां तरी त्याचा प्रादुर्भाव होई. ६ महिन्या नतर तें अगदींच कमी झालें ह्या प्रमाणें आमच्या एका स्नेह्याचे कृपेनें आम्ही त्या दुखण्यांतून मुक्त झालों. मध्यंतरी आमची नात चि. सौ शांतीचें लग्नाला बालाघाट मुक्कामीं सर्व मंडळी एकत्र झालों होतों. तेथून परत आल्यावर डोळ्याचें ऑपरेशन करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें नागपूर येथील शेवडे डॉक्टर साहेबाकडे जाऊन डोळ्यांची तपासणी केली. ऑपरेशनचा दिवस निश्चित केला, की ठरली व योग्य वेळीं ऑपरेशन होऊन डोळ्यांनीं दिसूं लागलें. कांहीं त्रास झाला नाहीं पुन एक वर्षानंतर दुसऱ्या डोळ्याचें ऑपरेशन झालें त्यावेळींही डॉक्टर शेवडे यांचे कृपेनें त्यांतून पार पडलों.

त्याच संधीस चि बाबूचें लग्न झालें. मुलगी जळगाव येथील घारपुरे घराण्यांतील आहे. बाबू पुनः इराकला गेला व त्याचें कुटुंब माहेरीं गेलें. मीहां २।४ महिन्याकरितां प्रयागला गेलों होतों. तेथील सर्व मडळींच्या भेटी झाल्या-मुळें बरें वाटलें नातवांच्या मुंजी करितां म्हणून पुन्हा नागपुरास आलों मुज वगैरे पार पडली. इकडे माझ्या हायड्रोसीलच्या ऑपरेशनची वाटाघाट सुरूच होती कोणाकडून ऑपरेशन करवावें हा विचार पडला कारण ते दुखणेंच मोठें कठीण असतें ठरतां ठरतां जबलपूर येथील सिव्हील सर्जन चारी साहेब याचे कडून ऑपरेशन करण्याचें ठरुन मी व चि गोविंद असे दोघेजण एका मित्राचें पत्र घेऊन जबलपुरास चि सौ. मनीकडे रवाना झालों चारी साहेबांची भेट झाली त्यांनी तपासणी करुन ऑपरेशन करण्याचें

ठरवून योग्य वेळीं ऑपरेशनही पार पाडलें. त्यावेळीं मित्राच्या पत्राचा आम्हाला फार उपयोग झाला

एक महिनाभर जबलपुरास राहावें लागलें अशा रीतीनें कांहीं त्रास न होतां त्याही त्रासातून मुक्त झालों. ह्या वेळीं आमचे जावई दामले साहेब हे आमच्या फार उपयोगी पडले चि गोविंद बरोबर होतांच ह्या तीन्ही ऑपरेशनच्या वेळीं आमच्या चि सौ. सूनबाई, मुलें व मुली सर्वांनीं मिळून कष्ट करून मला दुखण्यांतून मुक्त केलें ह्याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे

ह्याही गोष्टीस आज ५ वर्षे झालीं कोणत्याही तऱ्हेनें त्रास झाला नाहीं स्वस्थ, नातू व नातींशीं खेळण्या बागडण्यात आनंदात जात आहेत

ह्याच आनदाचे भरांत आज १० वर्षे लिहून पडलेल्या 'आत्मचरित्र नावाचें पुस्तकाचें प्रकाशनास मुद्रक मिळून तें प्रसिद्ध करण्याचे ठरलें छपाईचें काम सुरु झालें छपाईच्या निमित्तानें कां होईना पण आत्मचरित्र पुन्हा वाचावें लागलें व इतरांनींही तें वाचलें त्यांत कांहीं गोष्टी चुकीच्या लिहिल्या गेल्या आहेत असें आढळून आले आमचे मुख्य आश्रयदाते कै. विनायकराव तांबे ह्यांचे संबंधात त्यांचे बंधूही मोरेश्वरराव प्लेगच्या सपाट्यात परलोकवासी झाले असें लिहिलें गेलें आहे परंतु तसें नसून ते पुढें चार पाच वर्षे जिवत होते. कै. विनायकरावाचे लहान चिरंजीव अकोल्यास गृहस्थ असून आनंदानें कालक्रमणा करीत आहेत असें लिहिलें आहे पण सध्या ते अकोल्यास नसून नागपूर मुक्कामीं आहेत व रामदास पेठेंत मोठी जागा घेऊन बंगला बांधून वास्तव्य करीत आहे. सध्या ते एडव्होकेट असून आपल्या कामात मोठे वाकबगार समजले जातात सारखे कामांत व्यग्र असून त्यांना दिल्लीपर्यंत कामाच्या बोलावणीं येतात.

झाले ग्रंथ संपला माझ्या आयुष्यांत आलेले नानाविध प्रसंग आठवले म्हणजे काय वाटते ते सांगतां येत नाहीं पण तेच प्रसंग लोकांपुढे शब्द रूपाने मांडले तर स्वतःच्या मनाला समाधान मिळतें जनतेला जर त्यांचा उपयोग झाला तर मीं आपणास कृतार्थ समजेन.

खऱ्या अर्थानें ग्रंथ संपण्यास अजून अवकाश आहे तेवढा काल प्रभूच्या नामस्मरणात जावा अशी इच्छा आहे. ती तो दयाघन पूर्ण करो

# मला अर्पण केलेली पुष्पांजली

## सुवर्ण महोत्सव १९४३

### मराठी प्राथमिक शाळा, जबलपूर

याच शाळेतील एके काळची विद्यार्थिनी, परंतु मुशाफिर असलेली, सुवर्ण महोत्सव प्रसंगीं योगायोगानें येथें येते अध्यक्षस्थानीं आपला सहाध्यायी दृष्टीस पडून आनंदते व हा सुप्रसंग पाहून सद्गदित अंतःकरणानें विद्यामंदिराला प्रणाम करून ही काव्य पुष्पांजली समर्पण करिते.

— मंदाक्रान्ता :—

झाले अर्धं शतकहि पुरें पातलों या ठिकाणी ।
विद्यामाता मदिय बघुनी कंठ आला भरोनी ॥
बाल्याची ये स्मृति मनिं जधीं जेविं होतो किशोर ।
तेवीं केलो सवंगडिसवे येथ आम्ही विहार ॥१॥

येथें शिकुनी वकिलहि कुणी शास्त्रि विद्वान झाले ।
कोणी प्रोफेसर कुणितसे डॉक्टरी पास झाले ॥
कोणी साहित्यिक कुणितसे शिल्प-अन् चित्रकार ।
झाले निर्माण, अजुनिहि पुढें मान्यता पावणार ॥२॥

—: वसंततिलका —

पूर्णेंदु जेविं सुखवीं जन मानसातें ।
कार्यार्थ देह झिजले स्मरूनी तयातें ॥

– शाळेतील अध्यापकवर्ग –




उभे.— श्री. नाफड श्रीमती कोगजे श्रीमती भागवत. श्री. देशपांडे.

बसलेले: श्री. पाठक, श्री. सदाशीवराव परांजपे. सौ. धों लिमये. श्री. करमरकर श्री. मुरुड

[library stamp]

गुरुवर्य नी. शॉ. लिमये व त्यांच्या कुटुंबांतील मंडळी



'श्री नीलकंठ लिमये' गुरुवर्य धन्य ।
ध्याता अजी 'गणपती' मन होय खिन्न ॥३॥
केले परिश्रम अखेरहि 'खेरे' मान्य ।
ना कोणि 'राम' तरि 'लक्ष्मण' हा सुधन्य ॥
जो हा प्रकाश दिसतो लव शिक्षणाचा ।
भलींक 'चंद्र' असल्याविण काय साचा ॥४॥

—: शार्दूल विक्रीडित :—

अध्यक्षीय 'मनोरमा' बघुनिया येई स्मृती दाटुनी ।
'आप्पांची' न सुचे, न मार्ग दिसतो, मन्नेत्र द्वारांतुनी ॥
केलें फार परिश्रमास म्हणुनी विश्रांति कां घेतली ।
यांवें कार्य करावयासि फिरूनी जन्मूनिया भूतलीं ॥५॥

— पृथ्वी :—

अहा ? विविधरंगिं शोभति किती पताका महा ।
दिसे जन समूह हा जबलपूरवासी पहा ॥
सुवर्ण ज्युबिली, सभा-प्रमख 'दत्त' उच्चासनी ।
विराजति सभागणीं बहुत हर्पलों मन्मनीं ॥६॥

---

टीपः— (१) श्री लिमये (२) कै. करमरकर (३) कै. राजेसाहेब खेर (४) श्री मुसळे (५) श्रीमती गोळवलकर (६) कै. आप्पासाहेब गोळवलकर (७) डॉ. द. गो. बेलापूरकर

— मन्दाक्रान्ता —

वाटे रत्नाकर जणुं नटे हा विविध स्वरूपें ।
किंवा भाडाराचि उघडले स्त्री पुरूष स्वरुपें ॥
'जाबालीं' जे निवसति सदा धन्य ते आर्य लोक ।
माते ? नमितों निशिदिनीं तुवां हा मुशाफीर एक ॥८॥

— द्रुत विलम्बित —

सुपठना गमतो दृढपाया ।
वरि सुवर्ण शिखरा बघुनीयां ॥
मनिं विचारहि येइ क्षणैक ।
का इमारत तुला नच एक ? ॥८॥

— साकी —

आलों दुरूनी हर्षित हो मनिं पाहुनि जन गगेला ।
मातें ? अर्पुनी पुष्पाजलितें जातों परमुलुखाला ॥९॥

ता० २५-१२-४३ सौ. विजया जोशी

टीप:- (८) जबलपूर

# अभिप्राय

## जबलपुरांतील मराठीचा नंदादीप

ध्येयवादानें प्रेरित झालेला जर स्वतःच्या सतत तपश्चर्येनें नारायण होऊं शकतो, तर श्री नीळकंठराव लिमये हे या सिद्धांताचें प्रतीकात्मक उदाहरण आहे

स्वतःचें शिक्षण फारसे झालें नाहीं दारिद्र्य पांचवीला पूजलेलें, पित्याच्या निधनानें घरदार उघडें पडलेलें, अशा परिस्थितींत वाढून देखील श्री लिमये यांनीं बहुजन समाजाची हिंदी भाषा असणाऱ्या प्रदेशात मराठी प्राथमिक शिक्षणाचा दीप सतत ५० वर्षे तेवत ठेवला व बृहन्महाराष्ट्रीयांना मराठी मायभाषेची गोडी चाखविली व तिचें महत्त्व पटवून दिलें. मराठीचा नंदादीप ही पदवी यांना खास शोभेल एका सामान्य शाळा मास्तराची ही असामान्य कामगिरी खात्रीनें गौरवास्पद ठरेल

श्री लिमये यांनीं आपल्या साध्या भोळ्या वृत्तीनें व बाल सुलभ वाणीनें सांगितलेली आत्मचरित्राची कहाणी आंतील जिव्हाळ्यामुळें वाचकांना खात्रीनें आवडेल, व पन्नास वर्षांपूर्वीचा सामाजिक इतिहास त्यांच्या डोळ्यापुढें उभा राहील.

सागरच्या राजेसाहेबांच्या घरच्या दीर्घ शिकवणीचा लिमये गुरुजींना जितका अभिमान वाटतो तितकाच श्रीमंत राजे साहेबांच्या परिवाराला या सुस्वभावी ब्राह्मणाचा वाटत असेल यांत शंका नाहीं. आम्हां इतरे जनांना ते आदरणीय वाटतात हें सांगणे नकोच

माघ शु १५
संवत २०००

**नारायण केशव बेहरे**
कांग्रेस नगर, नागपूर

## बृहन्महाराष्ट्रांत स्वभाषेतून शिक्षण

श्री रा रा. लिमये यांचा माझा बरेंच दिवसांचा परिचय आहे. कारण आम्ही दोघे जबलपूर येथें बरेंच दिवस होतों. बृहन्महाराष्ट्रांत स्वभाषेतून मुला मुलींना शिक्षण देण्याविषयीं प्रत्येक महाराष्ट्रीयास इच्छा असते पण तें काम प्रत्यक्षांत घडवून आणण्यास कसे प्रयास पडतात याचा चटकदार इतिहास श्री. लिमये मास्तर यांच्या आत्मवृत्तांत पहावयास सांपडतो श्री लिमयांनीं पुस्तक अगदीं साध्या, सरळ आणि घरगुती भाषेंत लिहिलें आहे शिक्षण कार्यांत त्याना कसकसा त्रास सोसावा लागला व त्यांच्या चिकाटी व आवडीमुळें त्याना कसें यश आलें व त्यांनीं लावलेल्या मराठी शाळेच्या रोपट्याचा आज कसा मोठा वृक्ष झाला आहे इ. बद्दलचें वर्णन मार्मिक व वाचनीय झालें आहे. या चरित्राचा विशेष हा कीं, यांत कोणत्याहि व्यक्तीला लागेल असा एकहि शब्द नाहीं सदर पुस्तक प्रसिद्ध करण्यासारखें झालें आहे

नागपूर
ता २०।३।४३

ग. के. पेंडसे
हिंदुधर्म संस्कृती मंदिर, धंतोली

## सामाजिक इतिहासाचा एक भाग

रा. रा नाळकंठ धोंडदेव लिमये यांनीं लिहिलेलें आत्मचरित्र मी वाचून पाहिलें मराठींत नांव घेण्यासारखीं आत्मचरित्रें फार थोडीं आहेत. श्री रा. रा. लिमये यांच्या आत्मचरित्रावरून केवळ निश्चयाच्या व इच्छेच्या बळावर सामान्य मनुष्यही केवढें सामाजिक कार्य करूं शकतो याची कल्पना येईल श्री रा ग लिमये याना मराठींतील इतर आत्मचरित्रकारासारखीं प्रसिद्धी कदाचित् लाभली नसेल पण यामुळें त्यांच्या कार्याचें महत्व कमी होत नाहीं

आमच्या मतें आत्मचरित्रें हा सामाजिक इतिहासाचा एक भाग आहे. दादोबा पांडुरंग, कर्वे, लक्ष्मीबाई टिळक किंवा श्री. लिमये यांच्या आत्मचरित्रावरून आजच्या नवीन पिढीला जुना इतिहास, जुन्या चालारीती, जुने प्रचार यांची यथार्थ कल्पना येते वाङ्मय या दृष्टीनें सुद्धां लिमयांची भाषा ओघवती, अकृत्रिम आणि विनय संपन्न अशीच आहे कोणाला झोंबणारा असा एकही शब्द तींत नाहीं. त्यांच्या शब्दांत एक प्रकारचा प्रांजलपणा आहे सदर पुस्तकानें मराठींत वाङ्मयदृष्ट्या एक चांगली भर पडली आहे असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं

धनोली, नागपूर
ता २०।५।४३

**प्रभाकर केशव ठोसर**
माजी संपादक, श्री लोकमान्य

## प्रत्यक्ष अनुभवाचे बोल

आपले हस्तलिखित आत्मचरित्र मोठ्या उत्सुकतेनें वाचून संपविलें कादंबरी वाचनांत इतरांना जशी गोडी वाटते, त्यांत ते रंगून जातात, तसा मी आत्मचरित्रांत रंगलों होतों आपल्या लिखाणात एक प्रकारचा ताजेपणा जिवंतपणा आहे कारण प्रत्यक्ष अनुभवाचेच बोल आपण लिहिले आहेत. ही साधी गोष्टही पुष्कळांना साधत नाहीं आधीं जीवनांतील धकाधकीचा मामलाच त्यांना नको असतो आणि असले अनुभवच नसतील तर मग त्यांनीं सांगावें तरी काय ? म्हणून कांहीं तरी काल्पनिक बाबींचें पाल्हाळिक गुऱ्हाळ त्यांचें चालू असतें. आपल्या आत्मचरित्रात पाल्हाळ वाटत नाहीं. उलट आणखी कां लिहिलें नाहीं, एवढ्यांतच का आटोपलें हें प्रकरण, असा प्रश्न पडतो. असो.

जमखंडी, सांगली, बुधगाव, मिरज हीं ठिकाणें मीं पाहिलेलीं आहेत जवळपास तेथें वावरलेलों आहे. जबलपुरासही मी गेलों होतों. चिंतोपंत परांजपे

कापडाचे दुकानदार याजकडे उतरलों होतों. स. १९२३ अगर १९२४ चीं हनुमज्जयंती असावी. त्या वेळीं रात्रीं सायकलवरून ४०–५० मंडळी भेडाघाटला गेली रात्री तेथें मुक्काम सकाळीं धूवांधारेवर स्नान करून जबल-पुरास परतली त्या कपूंत मी सांपडलों होतों. आपण त्या वेळी असलाच पाहिजे त्या चांदण्यारात्रीं भेडाघाटला आला होता कीं नाहीं, स्मरत नाहीं

गोळवलकरांची माहिती मला आहे सागरवाले राजे (खेर) यांसही मी त्यांच्या वाड्यांत जाऊन भेटलों होतों कानेटकर, वेहेरे, ही माझ्या निकट परिचयाची स्नेहीमंडळी तेव्हां आपल्या आत्मकथेंत मी विशेष रंगलों

दिल्ली, कलकत्ता, प्रयाग अशा दूरवरच्या ठिकाणीं मराठी शिकवण्याचे प्रयत्न झालेले मी मोठ्या लक्षपूर्वक अभ्यासले आहेत जबलपूरला इतकी अडचण पडेल, ही कल्पनाच मला नव्हती हो, दारागजांत वे. शा. सं. पित्रे रहातात त्याजकडे मी दोन तीनदा गेलों होतों तिथलाही आपला इतिहास वाचून फार मौज वाटली प्रयागला मी वारवार गेलों असलों तरी तत्रस्थांशीं अधिक मिसळत असल्यानें महाराष्ट्र समाजांत गेलों देखील नाहीं म्हणून तेथील मंडळींशीं माझी ओळख नाहीं

ही आत्मकथा कधीं व कशी प्रसिद्ध व्हावयाची हा मोठा प्रश्न आहे खरा पण माझ्या कडून होईल तो प्रयत्न मी करीन. प्रो बनहट्टींना आपण विचारलें होतें का ? त्याच्या मार्फत हें पुस्तक प्रसिद्ध होईल कदाचित्

आपणाला आलेले अनुभव मोठे गमतीचे आहेत. माझ्या मतें खरी इष्टेट दुसरी तिसरी कोणतीच नसून ही स्वत. केलेली कमाई ! तिचा बाह्यात्कारी डामडौल मुळींच दिसायचा नाहीं कुठल्याही बँकेंत ठेव म्हणून ती ठेवतां येत नाहीं कुणी गहाण ठेवून घेत नाहीं तरी देखील तिची थोरवी कायमची आहे तिच्या वाचून जिणें व्यर्थ आहे.

आपल्या हस्तलिखितांत थोड्याशा दुरुस्त्या पेन्सिलीनें केल्या आहेत

पसंत नसतील तर ? बरानें पुस्तकें येतील तें वाचण्यास आपण मुद्दाम पाठविलें, ही मोठी कृपा होय. तिजबद्दल आपले आभार कसे मानूं ?

सध्यांच्या आपल्या प्रकृतिस्वास्थ्यांत अधिकाधिक आराम वाटून आपला हा जीवन सायंकाळ मोठ्या सुखाचा व समाधानाचा जावो, हीच इच्छा.

कळावे सेवेसी श्रुत हो हे विज्ञापना.

श्री. रा. टिकेकर

## स्तुत्य कार्य

श्रीयुत नीळकंठराव लिमये मास्तरांनीं आपलें चरित्र लिहून एक स्तुत्य कार्य केलें आहे या चरित्राच्या पहिल्या भागांत मास्तरांनीं आपल्या बाळपणाचा आणि मिळालेल्या शिक्षणाचा ( अध्ययनाचा ) वृत्तांत दिला आहे आणि दुसऱ्या भागांत त्यांनीं केलेल्या विद्यादानरूपी कार्याचा ( अध्यापनाचा ) वृत्तांत आहे लहानपणींच वडील वारले आणि गरीबीमुळें प्राथमिक शिक्षणापलीकडे त्यांना मजल मारता आली नाहीं, तरी पण जें काय शिक्षण पदरात पडलें त्याचा सदुपयोग करण्याची तीव्र इच्छा त्यांनीं बाळगिली

पन्नास वर्षांपूर्वी जबलपुरास मराठी शिक्षणाची सोय नव्हती ही उणीव कायमची दूर करण्यासाठीं ज्या सद्गृहस्थांचे श्रम खर्ची पडले, त्यांच्या मालिकेंत लिमये मास्तराना प्रमुख स्थान दिलें पाहिजे. या संबंधीं सर्व इतिहास मास्तरांच्या आत्मवृत्तांत आलेला आहे. शिवाय हें चरित्र वाचल्यानें नवीन पिढीला एक प्रकारचें शिक्षण मिळणारें आहे.

जबलपूर

गोविंद नारायण हर्डीकर

## परिपूर्ण आयुष्याचें चित्र

एका परिपूर्ण आयुष्याचें हें चित्र मनोरंजक असून एका अदृष्टकाळाचें वर्णन आहे व्यक्ति व संस्था यांचा किती निगडीत संबंध असतो व कालोघात पूर्ण प्रयत्नाचें फल दोघांनाही कसें मिळतें याचा हा एक दाखला आहे

शाळेच्या श्री गणेशापासूनची आजची वाट श्री लिमये यांच्या देखत झाली व या पुढील प्रगती देखील ते पाहातील अशी सदिच्छा व आशा मी बाळगतों.

१२ मे १९५०
नागपूर

डॉ. डोंकस

११६०६
RI I BK-0011606

कै. राजेसाहेब सागर व त्यांची कुटुंबीय मंडळी



मराठी शाळेचे पहिले आश्रयदाते

★

– प्रकाशक –

श्री. वि. गंधे

जयश्री प्रकाशन, धनतोली, नागपूर

★

पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील

गुरुवर्य नी. धों. लिमये,

धनतोली, नागपूर

★

श्री. वि. गधे,

जयश्री प्रकाशन, धनतोली, नागपूर

★

* मुखपृष्ठ छपाई– प्रदीप मुद्रणालय, धनतोली, नागपूर *